
# डॉ. भीमराव रामजी आंबेडकर



## चरित्र खंड बारावा

श्री. चां. भ. खैरमोडे



महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

# डॉ. भीमराव रामजी आंबेडकर चरित्र

## खंड १२ वा

लेखक
चांगदेव भवानराव खैरमोडे

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

प्रथमावृत्ती .. जुलै, १९९२


प्रकाशक .. सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
नवीन प्रशासन भवन,
मुंबई ४०० ०३२.

© प्रकाशकाधीन

मुद्रक .. व्यवस्थापक,
शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय,
मुंबई ४०० ००४.



बहुजन हिताय । बहुजन सुखाय



**डॉ. भीमराव रामजी आंबेडकर**

(एम. ए., पीएच्. डी., डी. एससी., एल्. एल्. डी., Bar-At-Law)

# अर्पण पत्रिका

चरित्र नायक

जन्म : १४ एप्रिल १८९१



परिनिर्वाण : ६ डिसेंबर १९५६

महामानव

चरित्र लेखक

जन्म : १५ जुलै १९०४



मृत्यू : १८ नोव्हेंबर १९७१

श्री. चांगदेव भवानराव खैरमोडे

या दोघांनाही हा बारावा खंड भावपूर्ण अर्पण.

संपादिका

द्वारकाबाई खैरमोडे (गायकवाड)

# अनुक्रमणिका


| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. निवेदन | .. | .. | .. .. | (अकरा) |
| २. प्रास्ताविक | .. | .. | .. .. | (तेरा) |
| ३. चरित्रकाराचे मनोगत | | .. | .. .. | (एकवीस) |
| ४. प्रा. न. र. फाटक यांचे चरित्रकाराचा गौरव करणारे पत्र | | | .. | (बावीस) |
| प्रकरण १ ले | .. | कांही घटना | .. .. | १ |
| प्रकरण २ रे | .. | बौद्धधर्म दीक्षा | .. .. | २३ |
| प्रकरण ३ रे | .. | बौद्धधर्म दीक्षा (पुढे चालू) | .. | ३९ |
| प्रकरण ४ थे | .. | धम्मदीक्षेसंबंधी लोकमत .. | .. | ६१ |
| प्रकरण ५ वे | .. | परिनिर्वाण यात्रा (दिल्ली) | .. | ८५ |
| प्रकरण ६ वे | .. | परिनिर्वाण महायात्रा (मुंबई) | .. | ९३ |
| प्रकरण ७ वे | .. | जागतिक श्रद्धांजली | .. .. | ११५ |
| संदर्भ सूची | | | .. .. | १६८ |

## अध्यक्षांचे निवेदन

श्री. चांगदेव भवानराव ऊर्फ आबासाहेब खैरमोडे यांनी डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांचे विस्तृत चरित्र लिहिण्याचे १९२३ साली ठरवले. १८ नोव्हेंबर, १९७१ रोजी त्यांचे निधन होण्यापूर्वी त्यांनी चरित्रलेखन पूर्ण केले होते. खैरमोड्यांच्या ह्यातीत त्यांनी लिहिलेल्या आंबेडकर चरित्राचे पाच खंड प्रकाशित झाले होते. त्यानंतरचे खंड प्रकाशित करण्याचा महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने निर्णय घेतला आणि त्या निर्णयानुसार गेल्या दहा वर्षांत मंडळाने उर्वरित खंड प्रसिद्ध करून हा संपूर्ण ग्रंथ वाचकांना उपलब्ध करून दिला आहे. आता प्रकाशित होत असलेला हा बारावा खंड या मालिकेतील अखेरचा असून आबासाहेब खैरमोड्यांच्या निधनानंतर मंडळातर्फे प्रसिद्ध झालेल्या सात खंडांचे संपादन करण्याचे जिकिरीचे काम सेवानिवृत्त झाल्यानंतरच्या विश्रांतीच्या काळातही परिश्रमपूर्वक आणि जिद्दीने पार पाडल्याबद्दल श्रीमती द्वारकाबाई खैरमोडे यांचा मराठी वाचक कायमचा ऋणी राहील.

बॉसवेलने लिहिलेल्या डॉ. जॉनसनच्या चरित्राच्या धर्तीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे चरित्र लिहिण्याचा आबासाहेब खैरमोड्यांचा इरादा होता अशी श्रीमती द्वारकाबाई खैरमोडे यांनी ग्वाही दिली आहे. बॉसवेलने वीस वर्षांहून अधिक काळ अचाट उद्योग करून आपल्या विलक्षण स्मरणशक्तीच्या जोरावर डॉ. जॉनसनची भाषणे रोजच्या रोज क्रमवार लिहून ठेवली. हे उदाहरण समोर असल्यामुळे चांगदेवराव खैरमोड्यांनीही बाबासाहेबांच्या भाषणांचे वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेले वृत्तांत, बाबासाहेबांची पत्रे, बाबासाहेबांच्या ग्रंथातून निवडलेले उतारे, त्यांच्या सहकाऱ्यांनी तसेच अनुयायांनी लिहिलेली पत्रे, संस्थांचे अहवाल वगैरे विविध साधनांचे चिकाटीने संकलन केले. त्यामुळे त्यांनी लिहिलेल्या आंबेडकर-चरित्राची विश्वसनीयता वाढली. डॉ. आंबेडकरांच्या जीवनकार्याची चिकित्सा करणाऱ्या प्रत्येक अभ्यासकाला खैरमोड्यांना वाट पुसत आणि त्यांनी लिहिलेल्या खंडांचा मागोवा घेत लेखन करावे लागले ही वस्तुस्थिती आहे.

कोणताही चरित्रकार चरित्रनायकाचे चित्र रेखाटतो ते त्या त्या व्यक्तीच्या आयुष्यात घडलेल्या घटनांची संगतवार मांडणी करून आणि त्यांचा अन्वयार्थ आपल्या कुवतीनुसार लावून झाल्यानंतर. चरित्रकाराने रंगवलेले चरित्रनायकाचे चित्र मुळाबरहुकुम असतेच असे नाही. चरित्रनायकाच्या निकटवर्तीयांना ते मिळतेजुळते वाटले तरी ते पुरेसे असते. महापुरुषांना देव मानून त्यांची मनोभावे पूजा करण्याची सवय असलेल्या भारतीयांच्या समाजात महापुरुषाचे चरित्र लिहिणे हे चरित्रकारालाही एक आव्हान वाटत असते. महापुरुषही अखेर मुळात जिताजागता, हाडामांसाचा माणूसच असतो याचे भान ठेवून त्याचे गुणदोष दाखवण्याचा प्रयत्न करणे चरित्रकारालाही मूर्तिपूजकांच्या देशात अवघड होत असते. अशा परिस्थितीत चांगदेवराव खैरमोडे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारख्या महापुरुषाचे चरित्र लिहिण्यास उद्युक्त झाले आणि अनेक वर्षे ध्यास घेऊन त्यांनी आपला संकल्प सिद्धीस नेला तो केवळ त्यांच्या दीर्घोद्योगामुळे हे लक्षात ठेवावयास हवे. धुंडाळून मिळेल तितका पुरावा

आधी पारखून घ्यावयाचा आणि मगच त्याचा उपयोग करावयाचा असे खैरमोडयांच्या चरित्रलेखनामागचे एक सूत्र दिसते. आपल्याला उपलब्ध झालेल्या पुराव्याच्या आधारे त्यांनी नोंदविलेले निष्कर्ष हे सर्व वाचकांना मान्य होतीलच असे नाही. त्यांनी आधाराला घेतलेला पुरावा हा काही ठिकाणी एकतर्फी वाटण्याचाही संभव आहे. उदाहरणार्थ या शेवटच्या खंडात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अखेरच्या दिवसांचे वर्णन करताना श्रीमती माईसाहेब आंबेडकरांच्या वागण्याबद्दल खैरमोडयांनी लिहिलेल्या मजकुरात नापसंतीचा सूर उमटला आहे तो मुख्यतः नानकचंद रत्तू, सोहनलाल शास्त्री, के. कृष्णमूर्ती या माईसाहेबांच्या टीकाकारांनी दिलेल्या माहितीवर ते सर्वस्वी विसंबल्यामुळे. माईसाहेबांची बाजू नीट समजावून घेण्याचा प्रयत्न चरित्रकाराने केला असल्याची प्रचिती या खंडाच्या वाचकाला येत नाही. दुर्दैवाने चरित्रकार दिवंगत झाल्यानंतर अनेक वर्षांनी हा खंड प्रकाशित होत असल्याने तो मंडळाकडे सादर झाला तसाच प्रसिद्ध करण्याखेरीज पर्याय नव्हता. त्यामुळे चरित्रकाराने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांविषयी तसेच त्यांच्या कुटुंबियांविषयी व्यक्त केलेल्या मतांशी महाराष्ट्र शासन आणि या खंडाच्या प्रकाशनाची जबाबदारी घेणारे महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ संपूर्णपणे सहमत आहे असे समजण्याचे कारण नाही. खैरमोडयांनी लिहिलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे चरित्र या ग्रंथाच्या मर्यादा लक्षात घेऊनही महाराष्ट्राच्या अर्वाचीन इतिहासाचे एक महत्त्वाचे साधन म्हणून वाचले जाईल असा मंडळाला विश्वास वाटतो.

**य. दि. फडके,**
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ.

मुंबई :
२० मार्च १९९२

# प्रास्ताविक

इ. स. १९२३ साली श्री. चां. भ. तथा आबासाहेब खैरमोडे, मुंबईत एल्फिन्स्टन हायस्कूलमध्ये इयत्ता ६ वी (इंग्रजी) मध्ये श्री. बाळाराम–बाबासाहेबांचे थोरले बंधू यांच्या प्रोत्साहनाने दाखल झाले, त्यावेळी डॉ. बाबासाहेब नुकतेच, इंग्लंडहून आपला सारा अभ्यासक्रम सन्मानाने पूर्ण करून मुंबईस परतले होते. सुरुवातीला त्यांनी "बहिष्कृत भारत" हे साप्ताहिक सुरू केले. त्याकरिता पोयबावडी, परळ येथे श्री. बंडोपंत जाधव यांनी चालविलेल्या "लेबरर्स कॉम्पेन्सेशन ब्युरो" च्या ऑफीसमध्ये भागीदारीत बाबासाहेबांनी बहिष्कृत-भारताचेही ऑफीस थाटले.

त्यावेळी हिंदुस्थानांत तरी डॉ. बाबासाहेब हे एकटेच, एव्हडे शिकलेले व पदव्या धारण करणारे अस्पृश्य वर्गातील गृहस्थ होते. त्यावेळी सर्व भारतात अगदी, हाताच्या बोटावर मोजण्याइतकीच विद्यालये होती. त्यापैकी मुंबईचे "एल्फिन्स्टन" विद्यालय अग्रगण्य होते. त्यामुळे मॅट्रिकपर्यंत शिक्षण घेणारे महाराष्ट्रातील अस्पृश्य विद्यार्थी डॉ. आंबेडकरांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून, शिक्षण घेण्यास मुंबईस येत. प्रत्येकाचे कोणीना कोणी नातेवाईक मुंबईत, मीलमधून अगर रेल्वे वर्कशॉपमधून नोकरीस असत. त्यांच्याकडे कसेतरी थोडे, उदरभरण करण्यास अन्न मिळे. मात्र रात्री झोपण्यासाठी व अभ्यासासाठी जागा नसत. तेव्हां असे हे मॅट्रिकपर्यंत शिकलेले व कॉलेजच्या पहिल्या दुसऱ्या वर्षाला असणारे अस्पृश्य विद्यार्थी अगदीच थोडे म्हणजे हाताच्याबोटावर मोजण्याइतकेच होते. ते विद्यार्थी रात्री या ऑफीसच्या जागेत रहात व अभ्यास करीत आणि डॉ. बाबासाहेबांच्या कामातही मदत करीत. श्री. चां. भ. खैरमोडे हे बाबासाहेबांच्या लेखनांत मदत करणाऱ्यांत अग्रगण्य होते.

श्री. चां. भ. खैरमोडे यांचे थोरले बंधू श्री. वेताळराव भवानराव खैरमोडे हे या समाजातील जे सुरुवातीचे चारपाच ट्रेंड झालेले प्राथमिक शाळामास्तर होते, त्यापैकी श्री. वेताळराव हे एक. त्यांनी आपल्या बंधूच्या शिक्षणाचा चांगला पाया घातला, व मराठी चौथीनंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सातारला ज्या शाळेंत शिकले तेथेच इंग्रजी शिकायला "सातारा न्यू इंग्लिश स्कूल" या सरकारी शाळेत घातले. यावेळी सरकारी शाळांतील वातावरण पुष्कळसे बदलले होते, तरी अस्पृश्यता वरूनवरून पाळली जात नाही असे दाखविणारे सरकारी नोकरीतील शिक्षक भेदभाव करीतच होते. त्याचबरोबर इंग्रजी शिक्षणाने अस्पृश्यता पाळण्यासारख्या कोत्या विचारांना मूठमाती देणारेही श्री. कृ. सि. देवधरांसारखे शिक्षक खालच्या जातींतील मुलांकडे जास्त लक्ष पुरवित व उत्तेजन देत. श्री. खैरमोडे यांची हुशार विद्यार्थ्यांत गणना होत होती. मराठी व इंग्रजी भाषेवर आणि इतिहासावर त्यांचे पहिल्यापासून प्रभूत्व दिसून येत होते.

त्यांनी हायस्कूलमध्ये असतांना स्पर्धेसाठी खादीचे वर्णन करणारी (महती गाणारी) कविता शार्दुलविक्रिडिती वृत्तामध्ये बारा कडव्यांत केली होती. त्या कवितेला पहिले पारितोषिक, "केरळ कोकिळे" च्या त्यावेळचे संपादक—नारायण कृष्णाजी अठल्ये यांच्या हस्ते मिळाले होते, पुढे औंधचे महाराज, पंत प्रतिनिधी भवानराव यांनी श्री. खैरमोडे यांस आपल्या विद्यालयांत दाखल करून घेतले. व त्या वर्षीच्या गणेशोत्सवात या विद्यार्थ्यांच्या मांडीवर गणपती देऊन, गणपती विसर्जनाची हत्तीवरून मिरवणूक काढली. असा हा पुरोगामी विचारांना चालना देणारा, विसाव्या शतकातील दुसऱ्या दशकाचा काळ होता. इंग्रजी शिक्षणांच्या वाघिणीचे दूध प्यालेले हे वाघ बच्चे समाजाच्या सर्व थरातून निर्माण होत होते. स्वातंत्र्याची, समाजसुधारणेची बिजे सुशिक्षितांच्या मनांत रुजून त्याचे अंकूर फोफावत होते. पाश्चिमात्य शास्त्रीय विचारसरणीची दारे सर्वांना खुली होती. विद्यार्थीवर्गाला इतर कोणत्याही दुर्व्यसनापेक्षा नव विचारांच्या वाचनाचे जबरदस्त व्यसन होते. त्यातूनच ते घडत होते. देश, समाज व व्यक्तिस्वातंत्र्यासाठी प्राणपणाला लावण्याची अहमहमिका असे, अशा या काळात मुंबईत आलेल्या व उच्चविद्याविभूषित बाबासाहेबांचे सानिध्य लाभलेल्या श्री. खैरमोडे यांच्यावर बाबासाहेबांच्या विद्वत्तेची, विचारसरणीची व कष्ट करण्याची तळमळ या सर्वांचा मोठा प्रभाव पडला व त्यांनी बाबासाहेबांचे चरित्र लिहिण्याचा तेव्हांच मनाशी दृढ निश्चय केला. अर्थात रात्रंदिवसाच्या सहवासामुळे बाबासाहेबांच्या गुणाबरोबर दोषही दिसू लागले. त्यावेळी, बॉस्वेलने लिहिलेले डॉ. जॉन्सनचे प्रसिद्ध चरित्र, हे चरित्र लेखनाचा आदर्श मानले जात होते. त्या प्रकारचे चरित्र आपण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे लिहावे असे खैरमोडे यांनी मनाशी ठरवून बाबासाहेबांच्या कार्याची, भाषणांची वर्तमानपत्रांतून येणारी माहितीची कात्रणे काढून ठेवू लागले. बाबासाहेब स्वतःच गप्पांच्या ओघात स्वतःबद्दलही माहिती सांगत व त्यांच्या चरित्र लेखनाच्या संकल्पाला "तूच नीट माझे चरित्र लिहू शकशील" असे म्हणून उत्तेजन देत. १९२९ ला श्री. खैरमोडे बी.ए. झाले. ते मधून मधून वर्तमानपत्रासाठी लेखन करीत. कविताही प्रसिद्ध होत होत्या. परंतु त्यावेळी, लेखन हे समाजप्रबोधनासाठी व लेखकाला स्वतःच्या प्रतिभेची आच म्हणून लिहिले जात होते. त्याने निर्वाहाची व्यवस्था होऊ शकणारी नव्हती. बी. ए. झाल्यावर एम.ए. (समाजशास्त्र), एलएल. बी. या पदव्यांसाठी नाव नोंदवून श्री. खैरमोडे बेकार बी.ए. म्हणून दिवस काढीत असत. पुढे ब्रिटिश सरकारच्या मुंबई सेक्रेटरिएटमध्ये त्यांना नोकरी लागली. वरच्या ग्रेडमध्ये सेक्रेटरिएटमध्ये नोकरी मिळणारी अस्पृश्यवर्गीय ही पहिली व्यक्ती होय. त्यांनाही तेथे जाती व्यवस्थेचा अन्याय खूप सहन करावा लागला. या अन्यायातून समाजाची सुटका करण्याचे जे समाजसुधारकांचे प्रयत्न चालले होते, त्यांत डॉ. बाबासाहेबांचे शास्त्रशुद्ध पायावर प्रयत्न चालू होते. स्वातंत्र्याच्या चळवळीचेही म. गांधीमुळे खालच्या थरापर्यंत लोण पोहचले होते. याकडे सुशिक्षित लोक ओढले जात व जेवढी शक्य असेल तेवढी मदत करीत. सरकारी नोकरीतील व्यक्तींना ती मदत मागील दाराने करावी लागत असे. यामुळे या लोकांवर काही बरे वाईट आळही येत असत. पण त्यांचे निवारण करणे त्यांना शक्य होत नसे.

बाबासाहेबांनी सुरुवातीला आपल्या समाजाच्या शैक्षणिक आणि स्वच्छतेच्या उन्नतीवर भर दिला. त्यांच्यात स्वाभिमान जागृत केला. बहिष्कृत हितकारणी सभा स्थापून व बहिष्कृत भारत हे वर्तमानपत्र काढून देवळे, पाणोठे वगैरे सार्वजनिक ठिकाणावर इतरांप्रमाणे माणुसकीच्या हक्कांसाठी झगडण्यास अस्पृश्य समाजास उद्युक्त केले. १९२७ ला महाडला चवदारतळ्याचा सत्याग्रह केला. त्या सत्याग्रहाबद्दल आपले मत स्पष्ट करताना

डॉ. बाबासाहेबांनी म्हटले आहे की, "अस्पृश्य समाज हा सरकार आणि अस्पृश्य वर्ग या दोन दलांच्या तावडीत सापडलेला आहे. त्याला दोहोंपैकी कोणत्यातरी एका दलावर मारा करणे शक्य आहे. दोन्ही दलावर एकाच वेळी मारा करण्याइतके बळ त्यांच्यात आज नाही, हे कबूल करण्यास काही लाज वाटण्याची जरुरी नाही. जेथे स्पृश्य जनता त्यांचे मानवी हक्क स्वखुशीने व सलोख्याने देत नाही. तेथे ते मिळविण्याकरिता सरकारशी तहनामा करणे हेच अस्पृश्य लोकांच्या हिताच्या दृष्टीने शहाणपणाचे आहे असे आम्हास वाटते" यावरून सरकारच्या (ब्रिटिश) कायद्याचे उल्लंघन न करता बाबासाहेबांनी आपली माणुसकीच्या हक्कांची चळवळ सुरू केली. आणि म्हणून त्यावेळी स्वातंत्र्याच्या चळवळीला प्राधान्य देणाऱ्या लोकांनी मात्र बाबासाहेबांना शत्रूचा मित्र ठरवून त्यांना **स्वातंत्र्याचा शत्रू ठरविले.** अशा माणुसकीच्या हक्काबद्दल सत्याग्रह केल्यानंतर १९३० ला ते राऊंड टेबल कॉन्फरन्सला गेले. १९२४ ते १९२९ या काळात बाबासाहेबांनी अस्पृश्यामध्ये शिक्षण व सामाजिक समता याबाबत तीव्र जाणीव उत्पन्न केली होती. वैदिक व पौराणिककालापासूनच्या अस्पृश्यतेबद्दलचा आढावा घेऊन चरित्रकाराने सिंहावलोकनाच्या प्रकरणांतून अर्वाचीन न्या. रानडे, ज्यो. फुले, वि. रा. शिंदे, वि. ना. चंदावरकर वगैरे उच्चवर्णीय लोकांच्या अस्पृश्यता निवारणाच्या कार्याचा आढावा पहिल्या दोन चरित्र खंडात घेतलेला आहे. हे खंड अनुक्रमे १९५२ ला बाबासाहेबांच्या हयातीत व १९५८ ला त्यांच्या परिनिर्वाणानंतर प्रसिद्ध झाले.

१९३० मध्ये बाबासाहेब राऊंड टेबल कॉन्फरन्सला गेले. तेव्हापासून १९५६ सालापर्यंत अस्पृश्यांना, धार्मिक व राजकीय सुधारणेच्या लाटांवर नेऊन बसविले; याचा साध्यंत इतिहास श्री. खैरमोडे यांनी दिलेला आहे. ते आपल्या चरित्र खंड ३ याच्या शेवटी बाबासाहेबांच्या विषयी म्हणतात की, "उपरनिर्दिष्ट अल्प काळातील कार्य पाहिल्यानंतर कोणीही कबूल करील की, अशा अल्प काळात अशी ही विलक्षण समाजक्रांति झालेली जगाच्या इतिहासांत पहिलीच होय! आणि ती घडवून आणणारे आंबेडकर हे अद्वितीय पुरुषोत्तम होत!!"

अस्पृश्यांना न्याय देणारी यंत्रणा म्हणजेच राज्यकारभाराची अधिकार सूत्रे अस्पृश्यांच्या हाती असणे याची मागणी. म्हणजेच भारतीय घटनेंत त्याची तरतूद करण्याची मागणी बाबासाहेबांनी केली. (वर्तुळ परिषदेत.) हा इतिहास श्री. खैरमोडे यांनी खंड ४ मध्ये "अस्पृश्यांच्या राजकीय हक्कांचा खलिता" यांत समग्र दिलेला आहे. याच खंडात कॉंग्रेस व गांधीजी यांच्यावर बाबासाहेबांनी "अस्पृश्यांचे आरोप पत्र" सादर केले. नंतर त्याच विषयावर बाबासाहेब "व्हॉट कॉंग्रेस ॲण्ड गांधी हॅव डन टू अनटचेबल्स" हे पुस्तक लिहिले. हा वृत्तांत आला आहे.

५ व्या खंडात सामाजिक चळवळीच्या प्रगतीचा इतिहास पुणे करारापर्यंत दिलेला आहे. यात स्त्रियांना न्याय मिळाला पाहिजे या प्रगत मतापर्यंत (खान पाणदीकरच्या विवाहानिमित्त लिहिलेला लेख) मजल गाठून आंतरजातीय विवाह झाले तरच जाती भेद नष्ट होतील असेही बाबासाहेबांनी आपले स्पष्ट मत दिल्याचे पुरावे लेखकाने दिलेले आहेत.

या खंड ५ पर्यंतचे लेखन चरित्रलेखक श्री. खैरमोडे यांच्या हयातीत प्रसिद्ध झाले. ६ व्या खंडाला महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अनुदान मिळाले होते. व तो खंड छापखान्यांत छापावयासही दिलेला होता. हे खंड प्रसिद्ध करण्यासाठी एक "डॉ. आंबेडकर एज्युकेशन सोसायटी" नावाची संस्था स्थापन झालेली होती. त्या संस्थेने कऱ्हाडाला एक वसतिगृह चालविले होते. या खंडाच्या विक्रीतून येणारे उत्पन्न त्या वसतिगृहाच्या खर्चाला

देणगी म्हणून वापरण्याची संमती चरित्रकाराने दिलेली होती. ६ व्या खंडाची काही प्रकरणे छापून झाल्यावर हा छापखाना बंद पडला. अनुदानाचे सर्व पैसे त्या " नवभारत प्रिंटिंग प्रेसला " दिलेले होते. मुद्रण प्रत व हस्तलिखित सारेच छापखान्यांत अडकलेले होते. त्यातच चरित्रकार श्री. चां. भ. तथा आबासाहेब खैरमोडे यांचा हृदयविकाराने मृत्यू ओढवला. प्रकाशक मंडळाने मुद्रण प्रत मिळविण्याची खूप खटपट केली पण सारे प्रयत्न व्यर्थ गेले. त्या मंडळाचे सभासदही नंतर एकत्र येऊ शकले नाहीत. प्रा. न. र. फाटकांनी ते पुढील लेखन प्रसिद्ध करा असा निरोप अनेक वेळा पाठविला. परंतु हे काम अंगावर घेण्यास कोणीच पुढाकार घेईना. पुढच्या १२ खंडापर्यंतच्या लेखनाची हजारो पाने होती. मी (द्वारकाबाई खैरमोडे) नोकरी करीत असल्यामुळे ते एवढे मोठे बाड उघडून पहाण्याचे, इकडची प्रकरणे तिकडे होण्याच्या भीतीमुळे, धैर्य होत नव्हते. १९७७ मध्ये मी नोकरीतून निवृत्त झाले. घरच्या जबाबदारीतूनही थोडी उसंत मिळाली. तेव्हा मी माझ्या निवृत्तिवेतन मिळविण्याच्या खटपटीस लागले. आतापर्यंत घराजवळच्या शाळा व घर यापलिकडे मुंबईची मला फारशी माहिती नव्हती. निवृत्तिवेतनाच्या खटपटीसाठी एज्युकेशन डिपार्टमेंटला वेळोवेळी जावे लागायचे. त्याचबरोबर महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळामध्येही जाऊन पुढील (ग्रंथांच्या) खंडांच्या प्रकाशनासंबंधी विचारपूस करू लागले. परंतु ६ व्या खंडाची हस्तलिखित प्रत दुर्मिळ झालेली होती. ती मिळविणे हे पहिले काम होते. त्यासाठी प्रा. नलिनी पंडित यांनी मला प्रेसमध्ये व प्रेसच्या संबंधात महाराष्ट्र बँकेच्या शाखातून फिरण्यास मदत केली. त्या प्रतीचा कुठेच पत्ता लागला नाही. तेव्हा हताशपणे घरी पडून राहिलेले ते हजारो पानांचे बाड उघडण्याचा धीर केला. त्यांत एका गठ्ठयात ६ व्या खंडांची प्रस्तावना लिहिलेली आढळली. म्हणून त्याची प्रकरणे क्रमवार लावून ठेवली. त्यावेळी मंडळाचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्र बारलिंगे होते. त्यांना या लेखनाची विशेष माहिती नव्हती. त्या मंडळाच्या बराचशा सभासदांना त्या लेखनाची चांगलीच माहिती होती. हे खंड प्रसिद्ध व्हायलाच पाहिजे असे मत त्यांनी डॉ. सुरेंद्र बारलिंगे यांना दिले. यामुळे डॉ. सुरेंद्र बारलिंगे मला म्हणाले की, " हे ग्रंथ आम्ही प्रसिद्ध करतो. तुम्ही एकाएका खंडाची मुद्रण प्रत करून मंडळाकडे द्या " हे त्यांचे आश्वासन ऐकून उत्साहाने आम्ही त्या सहाव्या खंडाची मुद्रण प्रत तयार करून मंडळास दिली. त्यांनी ती लागलीच छापावयासही दिली. नंतर त्याची प्रस्तावना लिहून काढतांना लक्षांत आले की जो मजकूर छापावयास (मुंबई बाहेर) दिलेला आहे, तो १९४७ मध्ये नेमलेल्या भारतीय घटनेसंबंधी आहे. व ६ व्या खंडाची प्रस्तावना १९३५ च्या धर्मांतराच्या घोषणेसंबंधीच्या इतिहासाची आहे. तसे मंडळास मी कळविले व तो खंड लेखकाच्या मृत्यूनंतरचा प्रथमच प्रकाशित झालेला खंड १९४५ ते १९५० साल पर्यंतच्या बाबासाहेबांच्या कार्याचा इतिहासाचा आहे. या ८ व्या खंडात मुद्रणाचे अनेक दोष राहिले आहेत. कारण याची प्रुफे दाखविली गेलीच नाहीत. नंतर ६ व ७ चे खंड १९३५ ते १९३८ पर्यंतच्या बाबासाहेबांच्या कार्याचा आढावा घेणारे एकत्रित असे मंडळाने प्रसिद्ध केले. आता आम्हालाही ही प्रकरणे जुळवण्याचा सराव झालेला होता. हेही पुस्तक मंडळाने मुंबईबाहेर सांगलीच्या छापखान्यात छापावयास दिले. याची मुद्रिते तपासावयास मी, श्रीमती मालतीबाई किर्लोस्करांना मंडळाच्या वतीने विनंती केली. प्रा. मालतीबाईंनी आपल्या सहकाऱ्यांकडून हे काम करवून घेऊन आम्हांला उपकृत केले. या खंडात १९३६ ते १९३८ अखेरपर्यंतचा बाबासाहेबांच्या कार्याचा आढाव घेतला आहे. ९ वा खंड १९३९ पासून १९४५ पर्यंतचा आहे. यात दुसऱ्या महायुद्धाच्या काळात बाबासाहेब व्हॉयसरॉयच्या मंत्रि-मंडळात मजूर मंत्री होते. लोकशाहीसाठी लढणाऱ्या ब्रिटिशांना त्यांच्या साम्राज्याखालील देशांनी मदत करणे उचित होते हे जाणून बाबासाहेबांनी युद्धसामुग्री बनविण्याचे कारखान्यात

काम शिकण्याबरोबर वेतन मिळविण्यास व तरुणांना सैन्य भरतीस मदत केली. कामगार व मालक या दोघांच्या हितासाठी चांगले कायदे करवून घेतले.

खंड ८ वा, १९४७ पासून १९५२ पर्यंतच्या भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच्या कालखंडाचा आहे. बाबासाहेबांनी भारताची घटना तयार करण्याचा इतिहास व घटनेवरील बाबासाहेबांनी केलेली भाषणे या खंडात आलेली आहेत. बाबासाहेबांची प्रकृती बरी नसतानाही हिंदू कोड बिलाची महत्त्वाची कामगिरी बाबासाहेबांनी पार पाडली. परंतु काँग्रेसच्या सनातनी हिंदू सभासदांना डॉ. आंबेडकरांनी—शुद्राने—धर्म संहितेत ढवळाढवळ करणे अप्रशस्त वाटून ते बिल पास करवून घेण्याचे आश्वासन दिलेल्या नेहरू सरकारने माघार घेतली. नेहरू सरकारचे परराष्ट्रीय धोरणही बाबासाहेबांना पसंत पडत नव्हते व मंत्री म्हणून त्यांचा विचार न घेता खादीच्या पडद्या आडून योजना आखल्या जात होत्या आणि मंत्रिमंडळ फक्त नामधारी होते; ही गोष्ट डॉ. आंबेडकरांना पटत नव्हती. म्हणून त्यांनी मंत्री पदाचा राजीनामा दिला. हा सर्व साद्यंत इतिहास चरित्रकाराने या खंडात ग्रंथित केला आहे.

खंड ९ वा १९३९ ते १९४५ (अशी माहिती आलेली आहे).

१० व्या खंडात १९५१ ते १९५२ च्या लोकसभेच्या निवडणुकीत काँग्रेसने व इतर पक्षांनी डॉ. आंबेडकरांना निवडून येऊ न देण्याची कशी खेळी खेळली व ज्यांनी भारताची घटना तयार केली, त्यांच्याच तोंडाने ती घटना जाळण्याची भाषा काढण्याइतके चीड आणणारे वर्तन केले. या साऱ्या घटनांचा बाबासाहेबांच्या प्रकृतीवर परिणाम होत होता व दिवसेंदिवस त्यांची प्रकृती ढासळत चालली होती. १९३५ साली बाबासाहेबांची प्रथम पत्नी सौ. रमाबाई तथा आईसाहेब आंबेडकर यांचे निधन झाले. तेव्हापासून बाबासाहेबांनी विधुरावस्थेत, समाजकारणात व राजकारणात १९४७ सालापर्यंत स्वतःला गुरफटून घेऊन आपल्या प्रकृतीकडे त्यांनी लक्ष दिले नाही. स्वातंत्र्यानंतर कामाच्या व्यापामुळे दिवसेंदिवस त्यांची प्रकृती जास्तच ढासळत चालली होती. त्याची काळजी घेण्यासाठी त्यांनी डॉ. लक्ष्मी कबीर यांच्याशी लग्न केले. त्या सौ. सविता आंबेडकरांनी त्यांची काही दिवस काळजी घेतली पण पुढे बाबासाहेबांना त्यांच्या अनुयायांपासून अलग करून एकाकी पाडले. वाचन व लेखनावर बाबासाहेबांनी आता जास्त भर दिला व महत्त्वाच्या विषयांवर वाचन-लेखन सुरू ठेवले. ही माहिती यात आलेली आहे.

खंड ११ वा, यात १९५२ ते १९५४ या कालखंडातील बाबासाहेबांच्या कार्याचा श्री. खैरमोडे यांनी आढावा घेतला आहे. या काळातील भारताच्या पहिल्या पार्लमेंटमध्ये बाबासाहेबांना राज्यसभेवर निवडून दिले. राज्यसभेमध्ये आंध्र प्रदेशाच्या निर्मितीचे वेळी काँग्रेस सरकारच्या धरसोडीच्या धोरणावर व सुसंगत विचारांच्या अभावावर त्यांनी टीका केली. अस्पृश्यतेच्या गुन्ह्याच्या कायद्याच्या पळवाटा दाखवून देऊन कायदा नीट राबवावा लागतो यावर भर दिला. या कालातच १ ली घटना दुरुस्ती करावी लागली. म्हणून घटना कितीही चांगली असली तरी ती राबविणारे चांगले असले तरच तिचा फायदा होतो, हे त्यांना सरकारला सांगावे लागले. "शेडयुल्ड कास्टस् व शेडयुल्ड ट्राईब्ज" वरचा पहिला रिपोर्ट बाबासाहेबांच्या दबावाने पुढे आला.

हा, खंड १२ वा, या खंडात, १९५५ ते ६ डिसेंबर १९५६, बाबासाहेबांच्या परिनिर्वाणापर्यंतच्या कार्याचा आढावा व नंतर जागतिक श्रद्धांजलीचे काही उतारे देण्यात आलेले आहेत.

या कालात राज्यसभेत महत्त्वाच्या विषयांवर बाबासाहेबांचे सर्वांगीण विचारांची भाषणे होत असत. नेहरू सरकारच्या परराष्ट्रीय धोरणावरही ते आपली अभ्यासपूर्ण टीकाटिप्पणी करत असत. त्यांचे "कार्ल मार्क्स व बुद्ध" या ग्रंथाचे लेखन चालू होते त्याच प्रमाणे "बुद्ध अ‍ॅण्ड हिज धम्म" याचेही लेखन पूर्ण करून ते त्याच्या प्रसिद्धीच्या प्रयत्नात होते. ६ डिसेंबरला हा ग्रंथ छापावयास देण्यासाठी संपूर्ण तयार ठेवलेला होता.

१४ ऑक्टोबर १९५६ ला दसऱ्याला नागपूर येथे बाबासाहेबांनी वयोवृद्ध पूज्य भिक्कू महास्थवीर चंद्रमणी यांच्या हस्ते बौद्ध धर्माचा स्वीकार केला. नंतर पाच लाख अनुयायांना, साध्या पद्धतीने कोणत्याही विधीचे अवडंबर न करता बौद्ध धर्माची दिक्षा दिली होती. १९५० साली त्यांनी स्थापन केलेल्या "भारतीय बौद्ध जनसंघ" या संस्थेचे "भारतीय बौद्ध महासभा" असे नामांतर केले. त्या महासभेतर्फेच हा दीक्षा समारंभ नागपूरकरांनी पार पाडला. बाबासाहेबांनी त्यावेळी एकवीस प्रतिज्ञा घेतल्या. त्यापैकी "बौद्ध धर्म हा जगातील सद्धर्म आहे याची मला खात्री पटलेली आहे. तो स्वीकारल्याने माझा नवा जन्म होत आहे." ही एक प्रतिज्ञा होय. त्यावेळी प्रत्येकाने आणि एकातरी व्यक्तीला बौद्ध दीक्षा द्यावी, असे त्यांनी आपल्या नंतरच्या भाषणात जनतेस आवाहन केले. त्याचप्रमाणे धर्मप्रचारक विद्वान असावेत, धर्माची शिकवण सतत लोकांच्या कानावर पडेल अशी शिस्तबद्ध योजना हवी, असेही ते म्हणाले. पूर्वेकडील जगतात बौद्ध धर्माचा प्रसार झालेला असला तरी आजच्या घटकेला तरुण पीढीच्या मनावर मार्क्सवादांच्या विचारांचा पगडा आहे. मार्क्सचे आर्थिक धोरण योग्यच आहे. मात्र रक्तरंजित क्रांतीने बदल घडवून तो चिरकाल टिकणारा नाही. बुद्धाच्या प्रज्ञा व करुणा या शिकवणुकीनेच जगाला शांतता लाभेल! असे त्यांनी सांगितले. नव बौद्धांना बुद्धाची शिकवण बव्हंशी-कटाक्षाने पाळून भारतात नष्ट झालेल्या बौद्ध धर्माचा नावलौकिक व प्रसार वाढविण्याचे आवाहन केले. "तुम्ही हिंदू धर्म का सोडता" हा प्रश्न एका वार्ताहराने त्यांच्या एका सुरुवातीच्या मुलाखतीमध्ये विचारला होता. त्यावर बाबासाहेब चिडून म्हणाले, "तुम्ही स्वतःलाच हा प्रश्न का विचारीत नाही ?" आपल्या सवलती जातील म्हणून अस्पृश्यांच्या मनात चलबिचल सुरू झाली होती. तेव्हा बाबासाहेब म्हणाले, "सवलतीसाठी तुम्ही अस्पृश्य म्हणून हिंदू धर्मात राहू नका. त्यातून बाहेर पडल्यासच तुमची तुम्ही उन्नती करून घ्याल." असे त्यांनी आपल्या अनुयायांना सांगितले. मी राजकारण सोडणार नाही. "समाजात विचारक्रांती झाली तरच आचार क्रांती होते" असेही ते म्हणाले. त्यांच्याबरोबर न्या. नियोगी, प्रि. चिटणीस, श्री. ए. आर. कुलकर्णी, श्री. कबीर इत्यादी उच्चवर्णीय लोकांनीही बौद्ध धर्माची दीक्षा घेतली. राजकारणात इतर लोकांचे सहाय्य हवे. जातीयवादी स्वतंत्र पक्ष नसावेत. सर्वांचा समावेश तत्त्वनिष्ठेनुसार होऊन पक्ष बनावा म्हणून त्यांनी 'रिपब्लिकन' पक्ष काढण्याचे ठरवून त्याची घटना तयार केली होती. स्वातंत्र्य, समता व बंधुत्व हा त्याचा पाया राहील. अशा तऱ्हेची सर्वसमावेशक अशी घटना असलेला असा हा पक्ष राहील अशी त्यांची ही योजना होती.

प्रचलित बौद्ध धर्मिय देश सिलोन, ब्रह्मदेश, नेपाळ वगैरे देशांना त्यांनी भेटी देऊन त्यांच्या आचारविचारांची पाहाणी करून कशा तऱ्हेने धर्मप्रचार व प्रसार करावा याची ते योजना करत होते. तरुण मानसावर मार्क्सवादाचा जो पगडा बसत चालला आहे तो कमी होऊन त्यात मानवतेच्या समान हक्कांच्या संबंधित प्रज्ञा व करुणेमुळे नैतिक परिवर्तन घडवून आणणारा, चिरकाल टिकणारा बौद्धधर्म, याचा प्रसार व्हावा व जगात शांतता नांदावी अशा

आशयाचे अत्यंत विद्वत्तापूर्ण असे नेपाळ येथील काठमांडूला जागतिक बौद्ध परिषदेत त्यांनी भाषण केले. तेथे जमलेल्या श्रोतृवर्गाने त्यांचा "नव बुद्ध" म्हणून जयजयकार केला.

जैन धर्म व बौद्ध धर्माचे एकत्रीकरण व्हावे अशा तऱ्हेची जैनमुनींनी त्यांच्याकडे चर्चा करून त्यावर त्यांनी, बाबासाहेबांना आपले ६ डिसेंबर १९६५ रोजी विचार प्रगट करण्याचे आमंत्रण दिले परंतु त्या ६ डिसेंबर १९५६ च्या सकाळीच त्यांचे परिनिर्वाण झाल्याने बौद्ध व जैनधर्माच्या एकीकरणाचे विचार स्तब्ध झाले!!

मृत्यूनंतर व्यक्तीचे फक्त गुणच आठवतात. हे जरी खरे असले तरी बाबासाहेबांच्या व्यक्तिमत्वाबद्दल विद्वतेबद्दल मौन पाळणाऱ्या पंडित नेहरूंसारख्या व्यक्तींनी बाबासाहेबांच्या अनेक गुणांचा व व्यक्तिमत्वाचा मनःपूत गौरव करून श्रद्धांजली वाहीली.

या सर्व ऐतिहासिक घटनांचे पुराव्यानिशी वर्णन श्री. चां. भ. तथा आबासाहेब खैरमोडे यांनी या खंडात केले आहे.

अशारीतीने बाबासाहेबांचे चरित्र लिहिण्याचा आपला १९२३ साली केलेला संकल्प त्यांनी आपल्या मृत्यूपूर्वी म्हणजे १९७१ मध्ये पूर्ण केलेला आहे.

चरित्र लेखकाच्या हयातीत ५ खंड प्रसिद्ध झाले होते. पुढचे १२ खंडापर्यंतच्या लेखनाचे संपादन करून मी, १९८१ ला म्हणजे चरित्र लेखकाच्या १८ नोव्हेंबर १९७१ मृत्यूनंतर दहा वर्षांनी सुरुवात करून या १९९१ साली ते काम पूर्ण करीत आहे.

चरित्र लेखकाने आपल्या प्रस्तावनेत म्हटले आहे की, "हे सारे खंड प्रसिद्ध झाल्यावरच मला समाधान लाभेल" त्यांच्या हयातीत ते होऊ शकले नाही परंतु मी हे उर्वरित काम माझे कर्तव्य म्हणून पूर्ण केले आहे. ग्रंथ प्रसिद्ध करण्याचे जोखमीचे काम म. रा. सा. सं. मंडळाने अंगावर घेऊन व्यक्तीशः मला व वाचकांना उपकृत केले आहे.

या चरित्र ग्रंथाचा १ ला खंड १९५२ ला अत्रे प्रिंटिंग प्रेस मधून निघाला. त्यावेळेपासून "सामाजिक चळवळीचा इतिहास व डॉ. आंबेडकरांचे कार्य" यांचे यथायोग्य वर्णन करणारे लेखन म्हणून, सर्वश्री प्रा. न. र. फाटक, दत्तो वामन पोतदार, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, श्री. भाऊसाहेब नेवाळकर, डॉ. सुरेंद्र बार्लिंगे, डॉ. यशवंत मनोहर, प्रा. य. दी. फडके इत्यादी मान्यवरांनी त्यास प्रसिद्ध करण्याच्या कामी प्रोत्साहन दिले व हे काम पूर्णत्वास नेण्यास मदत केली.

बाबासाहेबांचा जन्म १८९१ सालचा. त्यांच्या कार्याचा आढावा घेणारे लेखन १९२३ पासून १९७१ पर्यंत श्री. चां. भ. खैरमोडे यांनी पूर्ण केले. मात्र हे समग्र चरित्र खंड प्रसिद्ध होऊन प्रकाशात यायला १९९१ साल म्हणजे बाबासाहेबांच्या जन्म शताब्दीचे वर्ष उजाडले. सूर्यप्रकाशांच्या किरणांचा, झरोक्यांतून का होईना पण त्यांचा प्रकाश पसरतोच? बाबासाहेबांच्या प्रखर बुद्धिमत्तेच्या प्रकाशाने भारतीय जनतेच्या मनांतील अंधःकार दूर करण्याचा

अचाट प्रयत्न केलेला आहे. त्याच्या उर्जेचा उपयोग व्हावा म्हणून श्री. खैरमोडे यांच्या सारख्यानी आपले सर्वस्वपणाला लावून लेखन कार्य केले आहे. ते कार्य तडीस नेण्यास माझाही हातभार लागला म्हणून मी स्वतःला धन्य समजते आणि माझी त्यांच्याबद्दलची कृतज्ञता व्यक्त करते.

आतापावेतो प्रसिद्ध झालेल्या चरित्रखंडातून ज्यांनी ज्यांनी या कामी मुद्रण प्रती तयार करण्यास आणि इतर बाबतींत अमोल- मदत केली त्यांचे स्थल मर्यादेमुळे नामनिर्देश करणे अशक्य असल्यामुळे मी सर्वांचे एकत्रित शतशः आभार मानते.

साहित्य संस्कृती मंडळाचे सध्याचे माननीय अध्यक्ष प्रा. य. दि. फडके, सचिव श्री. पं. रा. पाटील व त्यांच्या कार्यालयातील कर्मचारी वर्ग यांचे हे काम पूर्ण करण्यास मोलाचे सहाय्य मिळाले आहे. त्याबद्दल मी स्वतः व डॉ. आंबेडकरांच्या कार्याचा आढावा घेणारा वाचक वर्ग व चहाते हे सदैव ऋणी राहतील.

हा बारावा खंड सा. सं. मंडळाने शासकीय मुद्रणालयाकडे दिला. तेथील अधिकारी श्री. प्र. शं. मोरे व त्यांचे सहाय्यक कर्मचारी वर्गाने, वेळेवर सुबक छपाईनिशी वाचकांस सादर केला याबद्दल मी या सर्वांचे आभार मानते.

संपादिका,

**द्वारकाबाई खैरमोडे (गायकवाड).**

**१४७-अ, हिंदु कॉलनी, दादर**

**मुंबई, दिनांक १० जानेवारी १९९१.**

□ □ □

## चरित्रकार श्री. चां. भ. खैरमोडे यांचे मनोगत

[१] "जॉर्ज बर्नाड शॉच्या 'इंग्रज लोकांच्या स्वभावाबद्दलच्या उद्गारांचा आधार घेऊन (हे वर्णन) थोड्याबहुत प्रमाणात हिंदुसमाजातील श्रेष्ठ वर्णीयांनाही लागू करता येतील, कारण धार्मिक सुधारणांना ते विरोध करतात, ते समाजातील ईश्वर निर्मित चातुर्बण्याचे रक्षण करण्यासाठी (हक्कांसाठी) भांडणाऱ्या दलित पुढाऱ्यांना विरोध करतात ते राष्ट्राची अभंगता सुरक्षित ठेवण्यासाठी, आणि दलित वर्गांना ते परोपरीने छळतात, ते स्वतःच्या वर्गाची ही छळण्याची मक्तेदारी भूतकाळावरून पुढे भविष्यकाळात चालू राहावी म्हणून.

बाबासाहेबांना या परिस्थितीचे कटू अनुभव (त्यांच्या शेवटच्या क्षणापर्यंत) आले. त्याचे ऐतिहासिक चित्र वाचकांना यथायोग्य स्वरूपात पहावयास मिळावे म्हणून " इतिहासात ज्या घटना घडल्या आणि ते घडविणाऱ्यांनी जे विचार मांडले ते जशाच्या तसे लोकांसमोर ठेवणे हे इतिहासाचे कर्तव्य आहे. त्यांची समिक्षा करून त्या त्या वाचकांच्या कलावर व बुद्धीवर सोपवावे—

(It is the true office of history to represent the events themselves together with the councels and to leave the observations and conclusions there upon to the liberty and faculty of every man's judgement)

हे लॉर्ड बेकनचे वचन डोळ्यासमोर ठेऊन मी या व पुढील खंडात माहिती दिली आहे."

[२] " घरादारावर, संसारावर आणि सुख-दुःखावर (स्वतःच्या) तुळशीपत्र ठेऊन सतत विद्याभ्यास, संशोधन, मनन व लेखन करणारी, केवळ विशाल बुद्धीची प्रबुद्ध व्यक्ती म्हणून, अगर सामाजिक क्रांतीचा तत्त्ववेत्ता व उद्धर्ता म्हणून अथवा पददलितांच्या अंतःकरणात माणुसकीचा रटरटणारा लाव्हा उत्पन्न करणारा धार्मिक द्रष्टा म्हणून, ज्यांना या (महामानव) बाबासाहेबांच्या चरित्राचा अभ्यास करण्याची अगर त्यावर ग्रंथ लिहिण्याची इच्छा होईल, त्यांना या सर्व चरित्र खंडातून भरपूर माहिती मिळेल व इतर माहिती मिळविण्याचे मार्ग सापडतील. माझ्यानंतर जे लेखक या क्षेत्रात उतरतील त्यांना हे खंड उपयुक्त ठरतील; याचे समाधान मला बाकीचे उर्वरित खंड प्रसिद्ध होतील तेव्हाच होईल. गेल्या कित्येक वर्षांच्या परिश्रमाचे फळ काय ते एवढेच माझ्या हाती लागेल ? "

(चरित्र खंड ५ प्रास्ताविक).

□ □ □

# प्रा. न. र. फाटक यांचे पत्र

नवी भटवाडी, कॉसलेन, मुंबई-४
ता. ८–५–१९६५ शनिवार.

श्री. चांगदेव भवानराव खैरमोडे यांच्या एकसष्टीच्या समारंभाचा अध्यक्ष म्हणून आपल्या सत्कारसमितीने केलेल्या पाचारणाबद्दल मी माझे आभार प्रथम मनःपूर्वक व्यक्त करतो.

हल्लीच्या जीवन कलहात एखाद्याला साठावे वर्ष संपून एकसष्टाव्या वर्षात दाखल होण्याचा योग लाभावा ही खरोखरीच अभिनंदन करण्यासारखी घटना असून त्यांचा जाहीर सत्कार साजरा करणे हे एक समाजाचे कर्तव्य आहे. त्यातल्या त्यात श्री. खैरमोडे हे ज्या महाराष्ट्रीय समाजविभागात जन्मले, त्या समाजाची आजतागायतची दुःस्थिती विचारात घेतल्यास ते तर एकसष्टी निमित्त जास्तच अभिनंदनीय ठरतात. श्री. खैरमोडे यांनी शिक्षण घेतले, निर्वाहाचा व्यवसाय केला, समाजाचा प्रत्येक घटक हेच करतो. परंतु त्यांनी डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांचे विस्तीर्ण चरित्र लिहिण्याचे काम हाती घेतले हा त्यांच्या आयुष्यातील महत्त्वाचा भाग आहे व त्याच्या योगाने श्री. खैरमोडे यांचे नाव महाराष्ट्रात चिरस्मरणीय होऊन राहील. त्यानी लिहिलेले चरित्र हे केवळ आंबेडकर या एका व्यक्तीचे चरित्र नसून अखिल महाराष्ट्राच्या अर्वाचीन इतिहासाचे एक नवे अंग स्पष्टपणे जनतेच्या निदर्शनास आणणारे ते एक महत्कार्य आहे. या चरित्रग्रंथाचे प्रसिद्ध झालेले खंड जो कोणी आस्थेने दृष्टीखाली घालील त्याला श्री. खैरमोडे यांच्या क्लेशकारक परिश्रमाची सहज कल्पना करता येईल. त्यात आलेला पत्रव्यवहार हा कालांतराने महाराष्ट्रातील सामाजिक समतेच्या इतिहासाचे बहुमोल साधन समजले जाईल. चरित्रासाठी जवळचा पत्रव्यवहार जतन करणे आणि इतरांचा मिळविणे हे काम सोपे नाही. फार जिकरीचे-सहनशीलतेचे सत्व पहाणारे असते. ते काम शक्य तेवढे जास्तीतजास्त श्री. खैरमोडे यांनी पार पाडलेले आहे. त्यांच्या चरित्र लेखनाने मराठी चरित्र साहित्यांत उत्तम प्रकारची भर पडेल यात संशय नाही.

श्री. खैरमोडे यांच्या लेखनकार्याकडे पाहिले म्हणजे संधी मिळाल्यास जो समाज अस्पृश्यतेच्या शिक्षेने हजारो वर्षे इतर समाजापासून दूर पडला होता, ज्याला विद्येपासून सक्तीने दूर ठेवले होते त्या समाजातील व्यक्ति काय करू शकतात, यांचे डोळचात भरण्याजोगे उदाहरण श्री. खैरमोडे यांनी निर्माण केल्याबद्दल शंका राहात नाही. राजकीय गुलामगिरीहून शेकडो-परीने दुर्धर असलेल्या सामाजिक गुलामगिरीने सडत, पिचत असलेला देशबांधवाचा समूह आता कुठे थोडासा त्या भयंकर गुलामगिरीच्या काटेरी बंधनातून सुटण्याच्या पंथास लागला आहे. ही सुटका निरर्थक नाही. अशी सुटका देशाच्या एकंदर उत्कर्षाला हातभार लावील या भवितव्याचे एक प्रसाद चिन्ह म्हणजे श्री. खैरमोडे यांचे लेखन. त्यांची एकसष्टी गौरवपूर्वक साजरी करणारे जे तरुण होतकरू असतील त्यांनी श्री. खैरमोडे यांचा कित्ता गिरविण्याचा संकल्प या प्रसंगी करावा. येथे कित्ता म्हटले तो फक्त लेखनाचा नव्हे. सर्व प्रकारच्या लोकोपयोगी कार्याचा कित्ता असा या शब्दात अंतर्भाव आहे. ज्याचा जो विषय असेल त्याने त्या विषयाची सिद्धी मिळवून तिचा लाभ सामान्य जनतेस देण्याचे ध्येय बाळगावे हा येथे कित्ता गिरविणे या शब्दांचा अर्थ आहे. श्री. खैरमोडे यांनी लेखणीच्या द्वारे लोकसेवा

चालविली आहे. विद्यार्थी किंवा विद्या संपन्नानी निराळे साधन हाती घ्यावे. पण आपल्यावर समाजाचे ऋण आहे व ते सामाजिक हिताच्या उद्योगाने फेडले पाहिजे हे श्री. खैरमोडे यांच्या कामगिरीचे तात्पर्य आहे. मी श्री. खैरमोडे यांना आशीर्वाद देतो की, त्यांना उदंड आयुष्य लाभावे, ते आयुष्य सुखाचे, निरोगी आणि कार्यक्षम असावे. त्यांच्या हातून सदैव लोकसेवा होत राहावी, आशीर्वाद दिला, ह्याबरोबरच एक लहानशी सूचना करावीशी वाटते की, आशीर्वाद उत्तेजन देतो, पण कार्याचे साफल्य हे ज्यांच्या त्यांच्या श्रमावर अवलंबून असते हे विसरू नये.

मला उपस्थित राहणे शक्य नाही म्हणून हा लेखनप्रपंच केला आहे. "जेथे धर्म तेथे जय" या न्यायाने जेथे गुणगौरव तेथे मी शरीराने नसलो तरी मनाने उपस्थित आहे असे समजावे, सत्कार समितीने मुंबई मराठी साहित्य संघाच्या सहकार्याची अपेक्षा धरली ती या आशीर्वादाने पूर्ण करावी अशीही एक या आशीर्वादामागे भावना आहे.

कळावे,

आपला हितकांक्षी

**न. र. फाटक.**

□ □ □

# प्रकरण १ लें

# कांही घटना

आंतरराष्ट्रीय राजकारणांत भारताने अलिप्तपणाचे धोरण स्वीकारले हे भारताला परिणामी धोकादायक ठरेल, असे मत वेळोवेळी प्रगट करून बाबासाहेबांनी सत्तारूढ पक्षाच्या परराष्ट्रधोरणावर कडक टीका केली होती. कम्युनिस्ट आणि कम्युनिस्टेतर असे जगांतील सर्व देशाचे दोन गट निर्माण झालेले आहेत; आणि या गटांपैकी बिगर कम्युनिस्ट गटांत भारताने सामील व्हावे हे त्याला सर्वस्वी हितावह होईल, असे बाबासाहेबांनी वेळोवेळी मत प्रदर्शित केले होते. चीनचे पंतप्रधान श्री. चाऊ-एन-लाय हे भारतात आले तेव्हां त्यांचा आदर सत्कार फार मोठ्या प्रमाणांत भारत सरकारने केला, तेव्हां 'हिंदी-चीनी' भाई-भाई या आरोळ्यांनी भारतातील वातावरण भरून गेले होते. त्यावेळी बाबासाहेबांनी राज्यकर्ते व इतर विचारी राष्ट्रहितवादी यांच्यापुढें असे विचार प्रदर्शित केले की, हे 'भाई-भाई पणाचे' ढोंग जगाला लौकरच दिसून येईल. बाबासाहेबांच्या या दूरदर्शी सडेतोड, सत्य पण निर्भिड विचार प्रदर्शनाने राज्यकर्ते व इतर लोकही त्यांच्यावर जळफळू लागले. जेव्हा 'हिंदी-चिनी भाई' च्या आरोळ्या भारतात गर्जत होत्या त्याच्या अगोदरपासूनच चीन भारतावर आक्रमण करण्याच्या योजना आखत होता एव्हढेच नव्हे तर या आरोळ्या चालू असतानाच चीनने भारतावरील आक्रमण सुरू केलेले होते; हे खालील माहितीवरून दिसून येईल.

चीन, भारताला बंधु म्हणत असतांनाच तो त्या बंधूचा विश्वासघात करीत होता, ही वस्तुस्थिती भारतीय राज्यकर्त्यांना माहीत नसावी. ती माहीत असली तरी ती जनतेसमोर न मांडता लपवून ठेऊन राज्यकर्ते त्या विश्वासघातावर पुढे सारवासारव करता येईल म्हणून त्या विश्वासघाताला महत्त्व देत नव्हते. कसेही असले तरी राज्यकर्ते चीनच्या फसव्या बंधूपाशात पूर्णपणे अडकले होते हे चित्र बाबासाहेबांना स्पष्ट दिसले होते. या मुद्यावर भरपूर माहिती गोळा करून सर्व सत्य परिस्थिती जनतेसमोर आणि इतर देशांसमोर मांडण्याचे विचार बाबासाहेबांचे मनांत १९५५ च्या सुरूवातीपासून घोळत होते. तेव्हां त्यांनी अनेक संबंधित व्यक्तींना पत्रे लिहिली. पण कोणी त्यांना माहिती पुरविली नाही. बाबासाहेबांनी श्री. एन. आर. पिलाई, आय.सी.एस्., सेक्रेटरी जनरल, एक्स्टर्नल अफेअर्स, न्यू दिल्ली, यांना ९ डिसेंबर १९५५ ला पत्र लिहिले होते. पंचशील या महान तत्त्वाच्या बुरख्याखाली आपले राज्यकर्ते बुल्गानीन, क्रुश्चेव्ह, सौदी अरेबियांचे राजे, आणि चीनचे मुख्य प्रधान चाऊ-एन-लाय या चार व्यक्तींच्या आदरसत्कारासाठी एवढा गाजावाजा व पैसा खर्च करीत आहेत, त्यातून काय निष्पन्न होणार आहे? यासंबंधी मला विचार करून कांही सत्य जगापुढे ठेवायचे आहे. तरी या पंचशीलज्ञ चार परदेशी पाहुण्यांच्याबद्दल सर्व ज्ञात माहिती तुम्ही मला कळवा अशी विनंती

बाबासाहेबांनी श्री. पिलाई यांना केली होती पण त्यांनी तशी माहिती बाबासाहेबांना पाठविली नाही. बाबासाहेबांचे सदर पत्र येणे प्रमाणे :—

Camp : Milind Mahavidyalaya
Nag Sen Van,
Aurangabad (Deccan),
9th December 1955.

My dear Pillai,

I have been separated from you for a long number of years. You have not cared either to contact me or to make any enquiry about me. I take it that it is so because you are practically living in the other Zone, i.e. the Russian and the Chinese Zone. I am of course an old fashioned man and I live in the democratic world to which I am acquaint and familiar. I thought that any attempt on my part to make contact with you might be misunderstood but circumstances have forced me to address this little letter to you, and I hope that you will not disrespect it. Being a Buddhist I am quite acquainted with the Panchshil but I have now been hearing a great deal from the mouths of Bulganin, Krushchev and the King of Saudi Arabia about their knowledge also of Panchshil. Being a man of very limited intelligence, I have never been able to catch what sort of a Panchshil, Bulganin, Krushchev and the King of Saudi Arabia observe. I remember to have read Mr. Chou-En-Lai, the Prime Minister of China also to give an utterance to Panchshil when he came to India to meet our Prime Minister. I am very anxious to collect the text of the Panchshil to which these four notabilities in the world are referring to. You must be the custodian all news in the word especially about foreign countries and I thought that you were the proper source to whom I send this letter.

I have not been very well for some time but I am recovering slowly. If your letter is addressed to my present address as above it will reach me alright.

With kindest regards to my Foreign Friend and his wife.

Yours sincerely,
(Signed) B. R. AMBEDKAR.

Shri. N. R. Pillai,
I.C.S.,
Secretary General,
External Affairs,
Government of India,
NEW DELHI.

१४ एप्रिल १९४८ ते ५ डिसेंबर १९५६ या जवळजवळ पाऊणे नऊ वर्षांच्या काळात बाबासाहेबांचे द्वितीय वैवाहिक जीवन व्यतीत झाले. शारदा तथा-सविता तथा माईसाहेब या डॉ. मालवणकर यांच्याबरोबर प्रॅक्टीस करीत होत्या. बाबासाहेबांना मधुमेह होताच त्यांना जरा जरी कांही लागून जखम झाली तर मधुमेहामुळे ती लवकर बरी होत नसे व ते दुखणे लांबत असे. मधुमेहावर बाबासाहेबांना दररोज ट्रीटमेंट घ्यावी लागे. शारदाबाई तथा माई-साहेब डॉ. मालवणकरांच्या सल्ल्याने बाबासाहेबांना ट्रीटमेंट देत होत्या. सुरूवातीचे थोडे दिवस त्यांचे बरे गेले, नंतर मात्र त्यांची प्रकृती ढासळू लागली. बाबासाहेबांना भेटण्यास हजारो लोक येत असत. कांही म्हणत "बाबासाहेब तुम्ही दुसऱ्या डॉक्टरांची ट्रीटमेंट का घेत नाही?" तेव्हां ते म्हणत, " मला कोणाच्याही ट्रीटमेंटने गुण यावा म्हणजे झाले, तुम्ही करा व्यवस्था", मग या भेटीस आलेल्या लोकांनी डॉक्टर, हकीम, वैद्य यांना बंगल्यावर आणावे तर माईसाहेब व डॉ. मालवणकर यांनी त्यांना बंगल्याबाहेर जाण्यास सांगावे. बाबासाहेब कधी कधी माईसाहेबांवर व डॉ. मालवणकरांवर खूप रागवत. तेव्हा. डॉ. मालवणकर म्हणत "आमची ट्रिटमेंट आहे म्हणून तरी तुमची प्रकृती बरी आहे," अशावेळी बाबासाहेब एकीकडे व माईसाहेब व डॉ. मालवणकर दुसरीकडे असे दोन तट पडत व ते एकमेकांची तोंडे पहाण्यासही राजी नसत. पण इंजेक्शनची वेळ झाली की बाबासाहेबांना माईसाहेबांची अस्वस्थमनाने वाट पहात बसावे लागे.

सिस्टर बॅस्टिन, ही फ्रेंच कॉस्मिक रेडियेशन ट्रिटमेंट एक्सपर्ट, दिल्लीत फेब्रुवारी १९५६ मध्ये आलेली होती. तिने दिल्लीतील बरेच रोगी बरे केले. हे वर्तमान बाबासाहेबांच्या दिल्लीतील प्रमुख अनुयायांना समजले तेव्हां त्यांनी त्या बाईना भेटून बाबासाहेबाना औषधोपचार करण्यास विनविले. त्याही तयार झाल्या. सदर लोकांनी बाबासाहेबांची संमती मिळविली. मंगळवार १७ मार्च १९५६ ला त्या बाईना संध्याकाळी पांच वाजता, (पोष्ट खात्यातील एक अस्पृश्य तरुण) श्री. के. कृष्णमूर्ती यांनी बाबासाहेबांच्या बंगल्यात आणले. तेव्हां तेथे माईसाहेब नव्हत्या. सिस्टर बॅस्टिननी बाबासाहेबांची प्रकृती तपासली. त्यांनी बाबासाहेबांच्या रोगाबद्दल द्याव्या लागणाऱ्या आपल्या ट्रिटमेंटबद्दल, बाबासाहेबांना सविस्तर माहिती दिली, बाबासाहेबांनी ज्या शंका काढल्या त्याचे खुलासे त्यांनी केले. तेव्हां बाबासाहेब म्हणाले, "उद्यापासून तुमची ट्रिटमेंट सुरू करा." त्यांचे सासरे त्यावेळी तेथे हजर होते. त्यानीही ट्रिटमेंटला संमती दिली. त्या फ्रेंच बाई ६ वाजता परत गेल्या. आणि नंतर माईसाहेब आल्या. त्यांना वडिलांकडून फ्रेंच बाईच्या ट्रिटमेंटची माहिती मिळाली. त्या वडिलांवरच खूप उखडल्या. आमच्या ट्रिटमेंटमध्ये हे अडथळे कशाला? त्यांचा त्रागा पाहून सर्वच हतबुद्ध झाले. बाबासाहेबांना, अंगिकारलेले काम व लेखन पुरे करता येणार नाही, याची जाणीव प्रकर्षाने होऊ लागली; तेव्हां ते वेळोवेळी फार निराश होऊं लागले आपल्या नैराश्याबद्दल नानकचंद रत्तूकडे ते म्हणाले "माझी सर्व पुस्तके प्रसिद्ध झालेली मला पहाता येत नाहीत! मला माझी सर्व ध्येये गाठता येत नाहीत! मी फार दिवस जगेन असे मला वाटत नाही? आता सुशिक्षित म्हणविणाऱ्या स्वार्थी लोकांनी मला पुरते घेरले आहे. याच्यापेक्षा अशिक्षित लोक कितीतरी चांगले, ते माझ्या हाकेला ओ देऊन धावून आले. आतां मात्र मी एकाकी आहे. असे वाटू लागले आहे!"

१८ मार्च १९५६ ला सिस्टर बॅस्टिनच्या चिटीणसाचा बाबासाहेबांना फोन आला की आम्ही ट्रिटमेंट देण्यासाठी किती वाजता यावे? माईसाहेबांनी फोन घेतला व सांगितले की तुम्ही येऊं नका.

सिस्टर बॅस्टिनच्या चिटणीसाने बाबासाहेबांना लांबलचक पत्र लिहून झालेल्या गोष्टीचा निषेध केला.

माईसाहेबांच्या या वर्तनाचा (इतर डॉक्टरांचे औषध न घेऊ देणे) अगोदरच बोभाटा झालेला होता. त्या आल्या-गेल्या लोकांनाही चांगल्या रितीने वागवीत नसत. या सर्व गोष्टीं-मुळे बऱ्याच लोकांचा असा समज झाला की या श्रेष्ठवर्णीय समाजातील स्त्रिया लोकमान्य पुरुषांच्या आयुष्यात त्यांच्या लौकिकाच्या व इस्टेटीच्या वाटेकरी होण्यासाठीच केवळ येतात. अशा प्रकारची माईसाहेबांबद्दलचा लोकांचा ग्रह १९५० नंतरच्या काळांत दृढ होत गेला व बाबासाहेबांना, तुम्ही पत्नीपासून सावध रहा अशी पत्रे येऊ लागली. श्री. के. कृष्णमूर्ती यांनी २२ मार्च व २६ मार्च १९५६ ला पत्रे लिहिली. त्यांत त्यांनी हीच धोक्याची सूचना (कांही घटनांचा उल्लेख करून) दिली होती. पण बाबासाहेबांना व इतरांनाही या बाबतीत कांही करता येणे अशक्यप्राय होते.

कृष्णमूर्तींच्या पत्राचा आशय असा :—

बाबासाहेब तुम्ही दीनदुबळ्या समाजासाठी जे अतुलनीय कार्य केलेले आहे, त्याबद्दल उभा समाज तुमचा ऋणी आहे. तुमची प्रकृती सुधारावी, आणि तुमच्या हातून अजून पुष्कळ कार्य व्हावे, अशी आम्हा सर्वांची इच्छा आहे. तुम्ही गेली सात वर्षे आयुर्वेदी, ॲलोपथी, होमोपथी, वगैरे औषधोपचार केले. पण आपली प्रकृती सुधारत नाही. मॅडम बॅस्टिन ह्या फ्रेंच डॉक्टर बाई 'कॉस्मिक रेडिएशन' या ट्रिटमेंटच्या स्पेशालिस्ट आहेत. त्यांना आम्ही भेटून तुमची प्रकृती तपासण्यास १७ मार्चला घेऊन आलो. तुम्ही त्यांच्याशी बरीच चर्चा केलीत आणि ती ट्रिटमेंट घेण्याचे तुम्ही त्यांना वचन दिले. हा सर्व प्रकार तुमच्या पत्नीच्या अपरोक्ष, त्या दिल्ली शहरात गेल्या असता झाला. त्या परत आल्यावर त्यांना सारा प्रकार समजला.

मी १९ तारखेला मॅडम बॅस्टिन यांना घेऊन तुमच्या बंगल्यावर आलो ते तुम्हाला त्यांची ट्रिटमेंट सुरू करावी म्हणून. आम्हाला पहाताच तुमच्या पत्नीने, तुमचे चिटणीस नानकचंद रत्तू यांचे हस्ते आम्हाला निरोप दिला की या बाईची ट्रिटमेंट नको. कोणीही बाईने माझ्या पतीजवळ येऊ नये? आम्ही हताश होऊन परत गेलो. मॅडम म्हणाल्या, आंबेडकरसाहेब निःशक्त झालेले आहेत. आम्हीही हे जाणतो पण आम्हाला काहीच करतां येत नाही. "मॅडम बॅस्टिनच्या ट्रिटमेंटने बाबासाहेबांना बरे वाटेल" असे आम्हीं, तुमचे श्वशूर यांना परोपरीने समजाविले; तुम्ही तुमच्या मुलीचे मन वळवा म्हणून परोपरीने विनविले. पण ते म्हणाले, ती माझे ऐकणार नाही. मी कांही लोकांच्यावरोबर तीनदा तुम्हाला भेटण्यासाठी आलो, तुमची भेट व्हावी म्हणून आम्ही एक-एक, दोन-दोन तास थांबलो पण तुमच्या पत्नीने आमची भेट न होऊ देता, रत्तूच्या हस्ते आम्हाला हाकलून दिले. तुमच्या पत्नीचे म्हणणे असे की ती फ्रेंच बाई माझ्या नवऱ्याला व त्याची इस्टेट काबीज करण्यास आलेली आहे आणि आम्ही सर्वजण तिचे हस्तक आहोत. दुर्दैव आमचे की आम्हाला तुमच्या पत्नी-बद्दल कांही बोलता येत नाही. तेव्हां आमची तुम्हाला हात जोडून हीच विनंती आहे की तुम्ही तुमच्या पत्नीच्या जाळ्यातून बाहेर या. तिला दूर ठेवा नाहीतर वाटेल ते करा. पण तुमची प्रकृती बरी व्हावी असे वातावरण उत्पन्न करा; नाहीतर तुमची पत्नीच तुमचा घात करील.

श्री. कृष्णमूर्ती यांची ही दोन पत्रे अशीः—

13/23 W.E.A. Karolbagh,
New Delhi.
22nd March 1956.

Respected Doctor Sahib,

Pardon me for this intrusion into your precious time. I may re-introduce myself as the person who came along with Mr. M. R. Bhardwaj of the Home Ministry to see you and seek your kind consent to have yourself examined by a spiritualist who is good at curing many chronic ailment without any internal or external administration of medicaments.

On the 17th March, evening, when Mr. Bhardwaj and I met you, you agreed to have the examination on that day itself and we too were happy to bring the specialist, Madame Bastien of France to get you examined and prescribe necessary course of treatment. Madame Bastien has had a long discussion with you over the course of treatment and the causes for your present ailment. She was also kind enough to give you a course of treatment which was a process of irradiation of cosmic energy on to your physical body in order to tone up the degenerated tissues of the legs and spine. As you agreed to continue the treatment and give the new method of fair trial, we wanted to meet you again on the 19th. But, unfortunately, we (Madame Bastien and myself) were told by your Personal Assistant (Mr. Nanak Chand Rattu) that as your Mrs. does not like the method of treatment and as she does not want any women come there (to your bungalow) and do any thing with Dr. Sahib, we were not advised to attend on you. Madame Bastien felt hurt at these words. In fact, it was her conclusion, even at her first visit that the concentrated evil spirit around you is nothing but your Mrs. but we refrained from making this known to you as this may obstruct our anxiety to get you cured and make your services available to the toiling masses for many years more.

I tried in vain in visiting your bungalow with Mr. Ujgar Ram of the Delhi Scheduled Castes Welfare Association and having prolonged discussion with your father-in-law, about the efficiency of such a course of treatment which costs nothing and which does not involve any oral or parenteral administration of medicines. Though your father-in-law was quite convinced, yet he was afraid of his own daughter (your Mrs.) in opening this subject again with her. He told me categorically that she did not want any one else other than her family Doctor to treat you.

Yesterday, the 21st March, I tried again to contact you in person and request you to continue the treatment at least for few weeks and if you find it giving you some relief, you may continue it further.

Your Mrs. who saw both Mr. Ujgar Ram and myself sitting in the verandah awaiting an interview with you, told Mr. Nanak Chand Rattu that we should not be allowed to sit there and should be asked to clear off the bungalow. She even added, insolently, that we had come there as the "agents of the French Woman who was attempting to seduce my husband and rob his property." I felt extremely troubled to hear such words. I have had no intention excepting to get you cured and thereby ensure your services to the people of India. If this is a crime I would gladly plead guilty. In reality, I would be happy to cut off my legs and give them to you, so that you may serve the people better than me, who neither possesses the vast knowledge nor the courage and conviction that you have. At least it would give me that satisfaction that I have served a great man who has rendered great service to the people of India. I am sorry I am engaging you in reading this long rather tense letter.

I once again appeal to you in the interests of community, to give this course of treatment a fair trial and I am sure you will be definitely cured. You have tried all other system-Allopathic, Homeopathic, Ayurvedic, etc., for the last *seven years* but with no result. I only want you to undertake this treatment for *seven weeks* and you will yourself feel the difference.

I am now fully confirmed and I concur with Madame Bastien that if it all anybody is to be held responsible for your premature disability—and God forbid—your earlier death—it will be only due to your own indifference to face reality—that it is your Mrs. who is the enemy of your welfare. You are thousand times more intelligent than me. You have had very wide experience in life. But I am sorry to say—and I may be excused for my impalatable words that you are completely ignorant of the reality of the vicious forces around you.

If we are fortunate—which I doubt very much you will realise the gravity of the situation early, break of the shacles that chain you to the advices of your Mrs. and undertake the course of treatment suggested by madame Bastien.

With folded hands and bended knees, I once again appeal to you, at least on receipt of this letter, to make arrangements for continuing the treatment. I will be leaving for Bombay in about three weeks. Hence I would request you to intimate me through Mr. Nanak Chand Rattu.

Yours sincerely,

(Signed) K. KRISHNAMURTHY.

Dr. B. R. Ambedkar,
26, Alipore Road,
DELHI.

(One of the Scheduled Caste Government Servants in New Delhi. His letter to Ambedkar warning him against Mrs. Ambedkar's ways and means to prolong his sickness).

---

13/23 W. E. A., Karolbagh,
NEW DELHI
Dated 26-3-1956.

K. Krishnamurthy,
Posts and Telegraphs : Associate of the Asian Trade Union College,
International Confederation of Free Trade Unions.

My dear Doctor Sahib,

I am pained to write this letter to you, while I am still in Delhi and I can easily come and see you in person. Yet, the veritable treatment given by your people to me on three occasions prevents me from coming to you unless I get a positive appointment with you.

You may be aware that I took the initiative in bringing Sister Bastein ten days ago to examine you and prescribe the course of treatment suitable for you. You were also, I am told by Sister Bastein, convinced for the usefulness of such a course of treatment based on the principle of Cosmic Radiation. She has also informed you that I would be coming to you for continuing the

treatment as she have to leave for Bombay. Accordingly I came over to your house on three occasions, and on every occasion I was treated badly by your Mrs., and prevented from seeing you in person even for a minute.

Yesterday, I was waiting for you for over one hour. When you arrived at about 9 p.m., I sent my visiting card through your Hon. Private Secretary Shri Nanak Chand Rattu. But I was told by him that you have asked me to go out. I was again prompted to send a long note to you seeking a personal interview for a minute. That too was refused.

I am rather surprised at the way in which I was replied. Is this the courtesy and human attitude you want your ardent followers to practise? If you do not like the treatment yourself, you could have told Sister Bastien that you did not believe in her way of treatment. In that case, I would not have wasted my precious time in writing for you indefinitely. I have the greatest reverence for you. My heart bleeds when I see you struggling with your legs. I feel whether I would cut off my legs and give them to you. The allopathic doctors have been treating you for nine full years and yet could not get even an iota of improvement. Unfortunately, to my spiritual reading, it is your own people, especially your own Mrs. who is the root cause for this unhappy state of affairs. If this continue like this unchecked, I am afraid, you will have shorter life than what we all wish. It is upto you to think of the lakhs of Scheduled Castes whose uplift is dearer to you than the pleasures of family life.

If you are convinced of the treatment and if you feel like continuing it, you may intimate me through your Secretary as to the exact time I can come and attend on you, but there should be no interference from your wife.

Soliciting your reply,

Ever yours,

(Signed) K. KRISHNAMURTHY."

(His second letter to A.)

या सर्व प्रकारामुळे बाबासाहेब हताशपणे दिवस कंठू लागले. एवढया विमनस्क अवस्थेतही त्यांचे लेखन, वाचन, आणि सर्व क्षेत्रातील कार्याबद्दल चिंतन चालूच होते.

१९ एप्रिल १९५६ रोजी ठाणे येथे बाबासाहेबांची जयंती महाराष्ट्र प्रदेश शे. का. फे. चे अध्यक्ष श्री. भा. कृ. गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली साजरी झाली. मुख्य वक्ते फेडरेशनचे सरचिटणीस बॅ. खोब्रागडे हे होते. त्यांनी बाबासाहेबांच्या जन्म दिनांकाबद्दलचा मुद्दा उपस्थित केला.

**" जन्म तारखेतील विरोध**

आपण सर्व बाबासाहेबांचा वाढ दिवस साजरा करण्याकरिता जमलो आहोत. कित्येक ठिकाणी हॅंडबिल्समध्ये ६४ वा तर कित्येक ठिकाणी ६५वा वाढदिवस असे लिहिलेले आढळते. अशा प्रकारची गल्लत कां व्हावी कांही कळत नाही. बाबासाहेबांनीच एकदा सांगितले कीं, माझी जन्म तारीख काय आहे हे माहीत नाही. त्यामुळेच अशी गल्लत झाली असावी. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे इंग्रजीत धनंजय कीर यांनी चरित्र लिहिले आहे त्यात बाबांचा जन्म १८९१ मध्ये झाला असे लिहिले आहे. त्याप्रमाणे बाबांचा ६५ वा वाढदिवस होतो. पण आपण आतापर्यंत १८९२ हे जन्मसाल समजून जयन्ती करतो. डॉ. बाबासाहेबांची सुवर्ण जयन्ती १९४२ साली साजरी करण्यात आली. त्यावेळी बॅ. जयकर हे अध्यक्ष होते. एस्. एम् जोशी (एन्. एम्.) वगैरेंची तेथे भाषणे झाली. त्यावेळी बाबासाहेब स्वतः हजर होते त्यावरून बाबासाहेबांचा ६४ वा वाढ दिवस येतो आणि म्हणून बाबांचा जन्म १८९२ सालचाच समजावा. हा वाद फार महत्त्वाचा नाही, म्हणून हा वाद बाजूला ठेवू." (प्रबुद्ध भारत शनिवार, २८ एप्रिल १९५६, पा. १)

आग्रा येथे १७ मार्च १९५६ ला उत्तरप्रदेशांतील अस्पृश्यांची मोठी परिषद भरली होती. तींत बाबासाहेब प्रमुख वक्ते होते. श्री. राजभोज यांनीं ऑ. इं. शि. का. फेडरेशनच्या चिटणीसपदाचा राजिनामा दिल्यानंतर श्री. बी. डी. खोब्रागडे (बॅरिस्टर) यांना चिटणीस नेमण्यात आले होते. त्यांनी वर्षभरात चिटणीस म्हणून फारशी हालचाल केली नाही, म्हणून बाबासाहेबांचा त्यांचेवर बराच राग होताच, परत या परिषदेत त्यांचा परिचय करून द्यावा या हेतूने परिषदेच्या चालकांना बॅ. खोब्रागडे यांना हजर रहाण्यास, आमंत्रणाचे पत्र पाठविण्यास सांगितले. त्यांनी तसे आमंत्रण पाठविले. प्रवासाचा खर्च देण्याचेही त्यांनी कबूल केले होते. बाबासाहेबांनीही त्यांना पत्रे लिहिली पण बॅ. खोब्रागडे यांचेकडून उत्तर आले नाही. परिषदवाल्यांनी बॅरिस्टर खोब्रागडेंना स्मरणार्थ तारा व पत्रे पाठविली पण बॅ. खोब्रागडे यांच्याकडून उत्तर आले नाही. या बेफिकीर वर्तनाबद्दल बाबासाहेबांनी २२ एप्रिल १९५६ ला पत्र पाठवून बॅ. खोब्रागडे यांची कडक शब्दांत कान उघाडणी केली. अशा वृत्तीने वागणाऱ्या

लोकांबद्दल मला फार तिरस्कार येतो, असे यापुढे वर्तन करू नये असेही बाबासाहेबांनी सदर पत्रात उद्गार काढले. ते पत्र असे :—

26, Alipur Road,
Delhi.
Dated the 22nd April 1956.

Dear Mr. Khobragade,

You were invited for a function where I was to address at Agra on the 17th of last month. It was a biggest meeting in Uttar Pradesh and with myself it was an ideal introduction of yours to our people in that part. I had instructed them to get you there. I am told they had informed you about their willingness to pay your fares. Repeated letters and telegrams were sent to you. You haven't the common courtesy to reply to my correspondence. This sort of behaviour is not befitting a Secretary of the party. I am thoroughly disgusted with your people. Such negligence and lapses I shall not tolerate. It is nearly a year that you are appointed the new General Secretary. The elections are coming so near and as yet you have not showed your face to the people on this side. I wonder when are you going to acquaint them with the resolutions of the Working Committee and similar matters about the party. You haven't yet informed your office address to the office of the Commissioner for Scheduled Castes and Scheduled Tribes who has often some thing or the other to send us. All their correspondence is going to the old Secretary. All press correspondence comes to me, for you have not given your address anywhere. In the interest of the organisation, you must not do what I do with regard to the press. The P.T.I. and U.P.I. people wherever you go must be informed about our meetings, etc. I am sure they will not refuse to print.

Yours sincerely,

(Signed) B. R. AMBEDKAR.

Shri. R. (B) D. Khobragade,
B.A., Bar-at-Law,
General Secretary,
All India Scheduled Castes Federation,
*Gandhi Ward, Chambia* (Madhya Pradesh)

"मला बौद्ध धर्म का आवडतो? सध्याच्या जागतिक परिस्थितींत तो किती उपयुक्त आहे" या विषयावर बाबासाहेबांचे भाषण १२ मे १९५६ रोजी बी.बी.सी. (ब्रिटिश ब्रॉडकास्टींग कॉर्पोरेशन, लंडन) वर झाले. त्याचा सारांश असा :—

जगातील इतर धर्म परमेश्वर, आत्मा आणि मृत्यूनंतरची मानवाची स्थिती यासंबंधी विचार व उपदेश करतात. पण या तीन गोष्टींशिवाय मानवी जीवन सुखमय व्हायला जी तत्त्वे कारणीभूत आहेत ती तत्त्वे बौद्ध धर्माने सांगितली व उपदेशिली. ती तत्त्वे म्हणजे प्रज्ञा, करुणा व समता. मनुष्याने बुद्धिनिष्ठ (अंध चालीरीती व अलौकिक घटना यांना बळी न पडता) रहावे, प्राणीमात्रावर प्रेम करावे आणि त्यांच्याशी आपुलकीने व समपातळीने वागावे, हा या तीन तत्त्वांचा अर्थ. या प्रमाणे सर्व मानव वागू लागले तर जग स्वर्गमय होईल. ही श्रेष्ठतम तत्त्वे बौद्धधर्म शिकवतो म्हणून तो मला आवडतो. हा धर्म जगातील सर्व समाजांना स्थैर्य आणू शकेल. परमेश्वर व आत्मा यांच्या संबंधीची विचारसरणी याबाबतींत निरूपयोगी आहे, अशी माझी श्रद्धा आहे म्हणून मला हा धर्म आवडतो.

निधर्मी राज्य असणे, हे अलिकडच्या काळांतील एक खूळ आहे. निधर्मी विचारसरणीची उत्पत्ति, कार्ल मार्क्सचे विचार आणि साम्यवादी तत्त्वज्ञान यातून झालेली आहे. आणि या दोन्हीनी सर्व धर्मांच्या पायांवरच प्रहार करून ते उखडून टाकण्याचे प्रयत्न चालविलेले आहेत. आणि विशेष आश्चर्याची गोष्ट ही की, या विचारसरणीच्या जाळयांत अग्नेय आशियातील बौद्ध धर्मीय देश सांपडलेले आहेत. या देशांना हे कळत नाही की, निधर्मी राज्यव्यवस्था फारकाळ टिकणारी नाही. राज्यव्यवस्थेला धार्मिक भावनांचा आधार असला तरच ती टिकू शकेल. कम्युनिझमचे (साम्यवाद) सर्व अंग आणि तत्त्वज्ञान बौद्ध धर्मात आहे, हे बौद्ध धर्मातील "संघ" ही कार्य व्यवस्था लक्षात घेतली की, कळून येईल. संघातील लोक स्थावर-जंगम इस्टेट मानीत नाहीत, सद्भावनेने लोकसेवा करतात, निष्कांचन अवस्थेत रहातात व मरतात. हे तत्त्वज्ञान समाजांत रुजविण्यासाठी भगवान बुद्धाने समाजाच्या मनांत विचारांची क्रांती प्रथम घडवून आणली. ही क्राती कांही काळ टिकली व नष्ट झाली. पण ते तत्त्वज्ञान आजतागायत अडीच हजार वर्षे अस्तित्वात आहे. रशियात कम्युनिस्ट क्रांती रक्ताचे पाट वाहून झाली; बौद्ध तत्त्वज्ञानाने क्रांति केली ती रक्ताचा एकही थेंब सांडू न देता. बौद्ध तत्त्वज्ञानांत समतेचे संपूर्ण वातावरण आहे. कम्युनिस्ट तत्त्वज्ञानाने समतेचा रशियात आणि अग्नेय आशियात मुडदा पाडला, हे सर्वांना माहित आहे. असे असूनही अग्नेय आशियातील बौद्ध अनुयायी कम्युनिझमचे गोडवे गातात, हे कशाचे लक्षण आहे? विनाशाचे! हेच त्याला उत्तर. तेव्हा मानवी समाजाचे समतेचे हक्क टाचेखाली रगडणाऱ्या कम्युनिझमला रसातळात गाडले नाही तर जगात समतेचे वारेही रहाणार नाही.

सारांश, बौद्ध धर्म हा मानवी उन्नतीला पोषक असे तत्त्वज्ञान सांगणारा व सामाजिक समतेचा पुरस्कार करणारा समाजसुधारक धर्म आहे. जगाच्या सध्याच्या परिस्थितीत सर्व देशातील लोकांना त्याची सध्या जास्त जरुरी आहे.

मूळ इंग्रजी भाषण असे :—

## TALK FOR THE B. B. C. LONDON

In the short time allotted to me I am asked to answer two questions. First is "why I like Buddhism" and the second is "How useful it is to the world in its present circumstances."

I prefer Buddhism because it gives three principles in combination which no other religion does. All other religions are bothering themselves with God and Soul and life after death. Buddhism teaches Prajna (understanding as against superstition and supernaturalism). It teaches Karuna (love). It teaches Samata (equality). This is what man wants for a good and happy life on earth. These three principles of Buddhism make their appeal to me. These three principles should also make an appeal to the world. Neither God nor Soul can save Society.

There is a third consideration which should make an appeal to the world and particularly the South East Asian part of it. The world has been faced with the onslaught of Karl Marx and the Communism of which he is made the father. The challenge is very serious one. That Marxism and Communism relate to secular affairs. They have shaken the foundation of the religious system of all the countries. This is quite natural for the religious system although today is unrelated to the secular system yet is the foundation on which everything secular rests when the secular system cannot last very long unless it has got the sanction of the religion however remote it may be ?

I am greatly surprised at the turn of mind of the Buddhist countries in South East Asia, towards communism. It mean that they don't understand what Buddhism is. I claim that Buddhism is a complete answer to Marx and his Communism. Communism of the Russian type aims to bring it about by a bloody revolution. The Buddhist Communism brings it about by a bloodless mental revolution. Those who are eager to embrace communism may note that the Sangh is a Communist organisation. There is no private property. This has not been brought about by violence. It is the result of a change of mind and yet it has stood for 2500 years. It may have deteriorated but ideals are still binding. The Russian Communism must answer this question. They must also answer two other questions. One is that why communistic system is necessary for all times. They have done the work which it may be admitted the Russians could never have been able to do, but when the work is done why the people should not have freedom accompanied by love as the Buddha

preached. The South East Asian Countries must, therefore, be beware of jumping into the Russian net. They will never be able to get out of it. All that is necessary to them is to study the Buddha and what he taught, a right and to give political form to his teachings. Poverty there is and there will always be. Even in Russia there is poverty but poverty cannot be an excuse for sacrificing human freedom.

Unfortunately the Buddha's teachings have not been properly interpreted and understood. That his gospel was a collection of doctrines and social reforms have been completely understood. Once it is realized that Buddhism is a social gospel the revival of it would be everlasting event for the world will realize why Buddhism makes such a great appeal to every one.

(Signed) B. R. AMBEDKAR.

26, Alipur Road,
New Delhi.
Dated 12th May 1956.

बाबासाहेबांनी दुसरे भाषण २० मे १९५६ ला " व्हाईस ऑफ अमेरिका " यावर केले. विषय 'भारतीय लोकशाहीचे भवितव्य " (Prospects). त्याचा आशय असा :—

आमच्या देशात लोकशाही आहे, आमचे पंतप्रधान महान लोकशाहीभक्त आहेत, वगैरे गोष्टी भारतीय लोक मोठ्या (अभिमानाने) बोलत असतात, या गोष्टींना परदेशीय लोकही पाठिंबा देतात हे आपणा सर्वांच्या दृष्टीपुढे सध्या नेहमीच घडत आहे. आपल्या देशात प्रौढ मताचा अधिकार जनतेला आहे, या अधिकाराने जनता आपले प्रतिनिधी निवडून देते, हे प्रतिनिधी आपल्या लोकसभेत कायदे करतात, ही लोकसभा आपल्या देशाचा राज्यकारभार संसदीय पद्धतीने करते, म्हणून आपल्या देशात संपूर्ण लोकशाही आहे, असे हे सर्व लोक समजतात. पण हे सत्य आहे काय ? भारतात लोकशाही आहे किंवा नाही, याबद्दल नक्की उत्तर द्यावयाचे तर प्रथम आपणाला आपले काही गैरसमज दूर केले पाहिजेत. लोकसत्तात्मक राज्य व लोकशाही या दोन्ही गोष्टी एकच आहेत हा आपला गैरसमज आहे. लोकशाहीचे सत्य स्वरूप हे फार वेगळे आहे. लोकशाही ही परस्पर निगडीत व पूरक अवयवांनी बद्ध झालेली देहयष्टी आहे. समाजातील लोक सामाजिक बंधने किती दृढपणे अगर किती विस्कळीतपणे पाळतात या परिस्थितीत लोकशाहीची मुळे पाहावी लागतात. समाज म्हणजे परस्पर पूरक अशा मानवांचा संघ होय ! ते सर्व परस्परांच्या हिताबद्दल दक्ष असतात. सार्वजनिक हिताबद्दल त्यांच्यात समभावना असते, परस्परांच्या उपयोगी पडणे हे ते कर्तव्यकर्म मानतात व त्या प्रमाणे वागतात, अशा एकात्म लोकांचा संघ म्हणजे समाज. ही सामाजिक श्रेष्ठ ध्येये भारतीय समाजांत आहेत काय ? भारतीय समाज हा व्यक्तींनी बनलेला नाही, तर निरनिराळ्या जातींनी बनलेला आहे. या जाती परस्परांना उच्च व नीच मानतात.

या उच्चनीच प्रवृत्तीमुळेच भारतीय समाजात उच्च सामाजिक ध्येये रुजू शकली नाहीत. आम्ही भारतीय आहोत या भावनेने निरनिराळ्या जातींतील लोक एकत्र बसू शकत नाहीत, जेवू शकत नाहीत, विवाह करू शकत नाहीत. हे सर्व सामाजिक व्यवहार भारतीय लोक आपल्या जातीच्या सीमेतच करू शकतात, त्या बाहेर नाही! एवढेच नव्हे तर निवडणुकीत ज्या जातीचे उमेदवार असतात, त्याच जातीचे मतदार त्यांना मते देतात. या निवडणुका जिंकण्याचे जे तंत्र आहे त्यांत, या गोष्टीचा (जातीवादाचा) प्रामुख्याने समावेश होतो. एका तोंडाने जाती नष्ट करा म्हणावयाचे आणि निवडणुका जिंकण्यासाठी जातीतील मतदारांना आपल्या जातीचे उमेदवार निवडून द्या, असा प्रचार करणारे जे राजकीय पक्ष आहेत, त्यांत काँग्रेस प्रमुख आहे. औद्योगिक क्षेत्रातही हीच घाण पहावयास मिळते. ज्या जातीचा उद्योग आहे त्याच जातीच्या लोकांना त्या क्षेत्रात प्रथम प्रवेश मिळतो आणि मोठ्या पगाराच्या व मानाच्या जागाही त्यांनाच मिळतात. मग इतर जातींची बाजारभरती करावयाची! व्यापारी क्षेत्रातही हीच तऱ्हा! दान धर्म करण्याच्या क्षेत्रातही हीच तऱ्हा! मृत श्रीमंत आपली संपत्ती आपल्या जमातीतील लोकांसाठीच दानधर्म करावी असे लिहून ठेवतो. पोटापाण्याचे प्रत्येक जातीचे उद्योगधंदे निराळे. एका जातीचे धंदे दुसऱ्या जातीने करावयाचे नाहीत. या बंधनामुळे कोणत्याही जातींना वडिलोपार्जित धंदे करून आपली आर्थिक स्थिती सुस्थिर करता आलेली नाही. या सर्व गोष्टींचा विचार केला तर असे दिसून येते की, जातीजातीतील श्रेष्ठ कनिष्ठ भावनेमुळे भारतीय लोकांना स्वच्छ मनाने, आनंदाने व उत्साहाने एकत्र येताच येत नाही आणि ऐक्यही साधता येत नाही. त्यांच्यात जे ऐक्य आहे (दिसते) ते बळजबरीने घडवून आणलेले आहे; आणि म्हणून ते ठिसूळ आणि ताडकन तडे जाणारे आहे. मुख्यत: हीच परिस्थिती लोकशाहीची मुळे कुरतडणारी घूस आहे. मुळे कुरतडल्यानंतर वेली किंवा झाडे जशी रसरसलेले दिसत नाहीत, तीच स्थिती भारतातील तथाकथित लोकशाहीचे आहे.

जातिभेद हे लोकशाही नष्ट करणाऱ्या अग्निशिखा आहेत, त्या विझविल्या तरच लोकशाही चिरायू होईल. पण जातिभेद नष्ट कसे करावेत? जातिभेदामुळे भारतीय समाजात वर्ग निर्माण झाले नाहीत तर जातीय गट निर्माण झाले. वर्गभेदाचे गट असते तर ते संख्येने थोडे असते म्हणून ते नष्ट करणे सोपे झाले असते. पण जातीय गट हजारोंनी मोजता येतील आणि सर्व नष्ट करणे महाकठिण कर्म आहे. तथापि श्रेष्ठ प्रतीचे (उत्तम) शिक्षण जनतेला देणे, हा एक जातिभेद नष्ट करण्याचा उपाय आहे. पण हे शिक्षण श्रेष्ठ असलेल्या जातींनाच दिले जाते. आणि हेच सुशिक्षित लोक आपापल्या जातीचे उच्च स्थान टिकविण्यासाठी त्या शिक्षणाचा उपयोग करतात. अमेरिका, ब्रिटन वगैरे देशांनी परदेशी शिक्षणासाठी जे द्रव्य सहाय्य केले ते अशा श्रेष्ठवर्णीयांनाच! त्यामुळे जातिभेदावर काहीही परिणाम झालेला नाही. उलट अंशी, श्रीमंताला अधिक श्रीमंत करा व गरिबाला अधिक गरीब करा या धोरणाचाच अवलंब या देशांनी केला हे बरे झाले नाही. हीन समजल्या जाणाऱ्या जातींतील लोक जातिभेद नष्ट करण्यासाठी लढत आहेत. अशा लोकांना, ब्रिटन, अमेरिका वगैरे (सधन व पुढारलेल्या) देशांनी द्रव्यसहाय्य देऊन आपल्या देशातून सुशिक्षित करून परत पाठविले तर, हे लोक जातिभेदावर प्रहार करून त्या जातिभेदाला गाडून टाकतील. हे चित्र भारतात दिसू लागेल तर भारतीय लोकशाहीचे भवितव्य उज्ज्वल आहे. एरवी नाही ! !

बाबासाहेबांचे मूळ इंग्रजी भाषण असे :—

# TALK FOR VOICE OF AMERICA ON PROSPECT OF DEMOCRACY IN INDIA

The subject assigned to me is, "What are the prospects of Democracy in India ?" Most Indians speak with great pride as though their country was already a democracy. The foreigners also, when they sit at a dinner table to do diplomatic honour to India, speak of the Great Indian Prime Minister and the Great Indian Democracy.

From this it is held without waiting to argue that where there is a Republic there must be Democracy. It is also supposed that where there is Parliament which is elected by the people on adult sufferage and the laws are made by the People's representatives in Parliament elected after every few years there is democracy. In other words democracy is understood to be a political instrument and where this political instrument exists there is democracy.

Is there democracy in India or is there no democracy in India ? What is the truth ? No positive answer can be given unless the confusion caused by equating democracy with republic and by equating democracy with Parliamentary Government is removed.

Democracy is quite different from a Republic as well as from Parliamentary Government. The roots of democracy lie not in the form of Government, Parliamentary or otherwise. A democracy is mode of associated living. The roots of democracy are to be searched in the social relationship, in the terms of associated life between the people who form a society.

What does the word "Society" connote ? To put it briefly when we speak of "Society" we conceive of it as one by its very nature. The qualities which accompany this unity are praiseworthy, community of purpose and desire for welfare, loyalty to public ends and mutuality of sympathy and co-operation.

Are these ideals to be found in Indian Society ? The Indian Society does not consist of individuals. It consists of an innumerable collection of castes which are exclusive in their life and have no common experience to share and have no bond of sympathy. Given this fact it is not necessary to argue the point. The existence of the Caste System is a standing denial of the existence of those ideals of society and therefore of democracy.

Indian society is so imboded in the Caste System that every thing is organized on the basis of casts. Enter Indian Society and you can see caste in its glaring form. An Indian cannot eat or marry with and Indian simply because he or she does not belong to his or her caste. An Indian cannot touch an Indian because he or she does not belong to his or her caste. Go and enter politics and you can see caste reflected therein. How does an Indian vote in a election? He votes for a candidate who belongs to his own caste and no other. Even the Indian Congress exploits the Caste System for election purposes as no other political party in India does. Examine the lists of its candidates in relation to the social composition of the constituencies and it will be found that the candidate belongs to the caste which is the largest one in that constituency. The Congress as a matter of fact is upholding the Caste System against which it is outwardly raising an outcry against the existence of caste.

Go into the field of industry. What will you find? You will find that all the topmost men drawing the highest salary belong to the caste of the particular industrialist who owns the industry. The rest hang on for life on the lowest rungs of the ladder on a pittance. Go into the field of commerce and you will see the same picture. The whole commercial house is camp of one caste, with no entry board on the door for others.

Go into the filed of charity. With one or two exceptions all charity in India is communal. If a Parsi dies, he leaves his money for Parsis. If a Jain dies he leaves his money for Jains. If a Marwadi dies he leaves his money for Marwadis. If a Brahmin dies he leaves his money for Brahmins. Thus there is no room for the down and the out-in-politics, in industry, in commerce and in education.

There are other special features of the caste system which have their evil effects and which militates against democracy. One such special feature of the caste system lies in its being accompanied by what is called "Graded Inequality". Castes are not equal in their status. They are standing above one another. They are jealous of one another. It is an ascending scale of hatred and a descending scale of contempt. This feature of the caste system has most pernicious consequences. It destroys willing and helpful co-operation.

Caste and class differ in the fact that in the class system there is no complete isolation as there is in the caste system. This is the second evil effect in the caste system accompanied by inequality. This manifests itself in the fact that the stimulus and response between two castes is only one-sided.

The higher caste act in one recognized way and the lower caste must respond in one recognized way. It means that when there is no equitable opportunity to receive the stimulus from and to return the response from different caste, the result is that the influences which educate some into masters educate others into slaves. The experience of each party loses its meaning when the free interchange of varying modes of life experience is arrested. It results into a separation of society into a privileged and a subject class. Such a separation prevents social endosmosis.

There is a third characteristics of the caste system which depicts the evil thereof which cuts at the very roots of democracy. It is that one caste is bound to one occupation. Society is no doubt stably organized when each individual is doing that for which he has apptitude by nature in such a way as to be useful to others; and it is the business of society to discover these apptitudes and progressively to train them for a social use. But there is in a man an indefitute pluralities of capacities and activities which may characterize an individual. A society to be democratic should open a way to use all the capacities of the individual. Stratification is stunting of the growth of the individual and deliberate stunting is a deliberate denial of democracy.

How to put an end to the caste system? The first obstacle lies in the system of graded inequality which is the soul of the caste system. Where people are divided into two classes, higher and lower, it is easier for the lower to combine to fight the higher for there are no single lower class. The class consists of lower and lowerer. The lower cannot combine with the lowerer. For the lower is afraid that if he succeeds in raising the lowerer he may well himself lose the high position given to him and his caste.

The second obstacle is that the Indian society is disabled by unity in action by not being able to know what is to its common good. Plato has said that the organisation of society depends ultimately upon knowledge of the end of existence. If we do not know its end, if we do not know its good, we shall be at the mercy of accident and caprice. Unless we know the good of their end we have no criterion for rationally deciding that the possibilities are which we should promote. Question is, can the Indian Society in its caste-bound state achieve what is the ultimate question we come upon the most insuperable obstacle that such knowldege is not possible save in a just and harmonious social order. Can there be a harmonious social order under the caste system? Everywhere the mind of the Indians is distracted and misled by false valuations and false perspectives. A disorganized and factional society sets up a number

of different models and standards. Under such conditions it is impossible for individual Indian to reach consistency of mind on the question of caste.

Can education destroy caste? The answer is "yes" as well as "No". If education is given as it is today education can have no effect on caste. It will remain as it will be. The glaring example of it is the Brahmin caste. Cent percent of it is educated, may majority of it is highly educated. Yet not one Brahmin has shown himself to be against caste. In fact an educated person belonging to the higher caste is more interested after his education than to retain the caste system than was when he was not educated. For education gives him an additional interest in the retention of the caste system namely by opening additional opportunity of getting a bigger job.

From this point of view education is not helpful as means to dissolve caste. So far is the negative side of education. But education may be solvent if it is applied to the lower strata of the Indian society. It would raise their spirit of rebellion. In their present state of ignorance they are the support of the caste system. Once their eyes are opened they will be ready to fight the caste system.

The fault of the present policy is that though education being given on a larger scale it is not given to the right strata of Indian society. If you give education to that strata of Indian society which has a vested interest in maintaining the caste system for the advantages it gives them the caste system will be strengthened. On the other hand, if you give education to the lower strata of Indian society which is interested in blowing up the caste system, the caste system will be blown up. All the moment the indiscriminate help given to education by the Indian Government and American Foundations is going to strengthen the caste system. To make rich richer and poor poorer is not the way to abolish poverty. The same is true of using education as a means to end the caste system. To give education to those who want to keep up the caste system is not to improve the prospect of democracy in India but to put democracy in India in greater jeopardy.

(Signed) B. R. AMBEDKAR.

26, Alipur Road,
New Delhi.
Dated 20th May 1956.

"बुद्ध आणि त्याचा धम्म" या ग्रंथाच्या प्रकाशनासाठी भारत सरकारने साहाय्य करावे अशी विनंती करणारे पत्र, बाबासाहेबांनी श्री. जवाहरलाल नेहरू यांना १४ सप्टेंबर १९५६ ला लिहिले. सदर ग्रंथ पाच वर्षे खपून आपण तयार केलेला आहे आणि सध्या तो छापला जात आहे. त्याचा एकंदर खर्च सुमारे वीस हजार रुपये येईल. त्याचे प्रकाशन सप्टेंबरमध्ये होईल. त्याचे स्वरूप फार व्यापक आहे वगैरे गोष्टींची माहिती सदर पत्रात देऊन, बाबासाहेबांनी पं. नेहरूंना विनंती केली की, बुद्ध जयंतीसाठी जे परदेशी पंडित दिल्लीला येतील त्यांना व ग्रंथालयांना भेट देण्यासाठी म्हणून भारत सरकारने सदर ग्रंथाच्या ५०० प्रति विकत घ्याव्यात. तुम्ही बौद्ध धर्मावर प्रेम करता म्हणून मी हे पत्र लिहित आहे असे शेवटी, बाबासाहेबांनी पत्रात लिहिले. पं. नेहरूनी १५ सप्टेंबरला उत्तर दिले की, आम्ही बुद्धजयंतीसाठी म्हणून जी प्रकाशने प्रसिद्ध करण्याचे ठरविले होते त्यासाठी काही रक्कम मंजूर केली होती. पण ती लागलीच संपुष्टात आली. त्यामुळे अनेक लेखकांचे ग्रंथ आम्हाला छापता आले नाहीत. तथापि जयंती समितीचे अध्यक्ष डॉ. राधाकृष्णन् यांच्याकडे आपले पत्र विचारासाठी पाठवितो. ते काय म्हणतात ते पहा.

ती दोन्ही पत्रे अशी :—

My dear Panditji,

I am enclosing herewith two copies of a printed booklet showing the Table of Contents of a book on the " Buddha and His Dhamma " which I have just finished. The book is in the press. From the table of the contents you will see for yourself how exhaustive the work is. The book is expected to be on the Market in September 1956. I have spent five years over it. The booklet will speak for the quality of the work.

The cost of printing is very heavy and will come to about Rs. 20,000. This is beyond my capacity and I am, therefore, canvassing help from all quarters.

I wonder if the Government of India could purchase about 500 copies for distribution among the various libraries and among the many scholars whom it is inviting during the course of this year for the celebration of the Buddha's 2500 years' anniversary.

I know your interest in Buddhism. That is why I am writing to you. I hope that you will render some help in this matter.

Ours sincerely,
(Signed) B. R. AMBEDKAR.

Shri Jawaharlal Nehru,
Prime Minister of India,
NEW DELHI.

No. 2196-PMH/56.
NEW DELHI
September 15, 1956.

My dear Dr. Ambedkar,

Your letter of the 14th September.

I rather doubt if it will be possible for us to buy a large number of copies of your book suggested by you. We had set aside a certain sum for publication on the occasion of the Buddha Jayanti. That sum has been exhausted and, in fact, exceeded. Some proposals for books relating to Buddhism being financed by us had, therefore, to be rejected. I am, however, sending your letter to Dr. Radhakrishnan, the Chairman of the Buddha Jayanti Committee.

I might suggest that your book might be on sale in Delhi and elsewhere at the time of the Buddha Jayanti celebrations when many people will come from abroad. It might find a good sale then.

Yours sincerely,
(Signed) JAWAHARLAL NEHRU.

Dr. B. R. Ambedkar,
26, Alipur Road, Civil Lines,
DELHI.

डॉ. राधाकृष्णन् यांनी बाबासाहेबांना फोनने कळविले की आम्हाला काही करता येत नाही, याबद्दल दिलगीर आहोत !

१९५७ च्या निवडणुकीत डॉ. राममनोहर लोहिया यांच्या सोशालिस्ट पार्टी ऑफ इंडिया, व फेडरेशन यांचा करार करण्याबद्दल सदर पक्षाच्या पुढाऱ्यांनी दिल्लीत बाबासाहेबांची, सप्टेंबर १९५६ च्या सुरूवातीला भेट घेऊन बोलणी सुरू केली. या संबंधात फेडरेशनची बैठक दिल्लीत ३० सप्टेंबरला भरणार आहे व त्याच्या अगोदर तुम्ही समक्ष भेटा व तुमचा कार्यक्रम मला समजावून द्या व मग आपल्या पक्षाचा करार करणे कितपत इष्ट आहे, हे आपण ठरवू; अशा आशयाचे पत्र बाबासाहेबांनी डॉ. लोहिया यांना हैद्राबादला (३ जून १९५७, हिमायत नगर) दिल्लीहून २४ सप्टेंबरला पाठविले त्याला उत्तर (जावक नं. ८८२१) लोहियांनी १ ऑक्टोबरला पाठविले की सर्व कार्यक्रम अगोदर ठरलेला असल्यामुळे

दिल्लीस ३० सप्टेंबरला येता येणार नाही, ऑक्टोबरमध्ये दिल्लीला अगर मुंबईला येईन तेव्हा भेटेन. या पत्रात डॉ. लोहियांनी बाबासाहेबांना कळकळीने विनविले आहे की तुमची प्रकृती फार बिघडली आहे, ती सुधारण्याकडे जास्त लक्ष द्या. आपल्या नादुरुस्त प्रकृतीमुळे मी आपणाला "Mankind" या मासिकासाठी लेख द्या म्हणून विनंति करण्याचा मोह आवरतो आहे, असेही डॉ. लोहियांनी पत्रांत म्हटले आहे. आपल्या देशात बुद्धिमत्तेचा संपूर्णपणे नाश झाला आहे अशा वेळी तुमच्यासारख्या प्रबुद्ध माणसाकडून देशाला मार्गदर्शन व्हावे, व ते तुम्ही निर्भयपणे करालच अशी माझी खात्री आहे, असेही शेवटी आपल्या पत्रात डॉ. लोहियांनी, उद्गार सदर पत्रात काढले आहेत.

("................I only wish to emphasise the utter intellectual collapse that has undertaken our country, I hope only temporarily, and how necessary it is for a man like you to speak unreservedly.").

सोशालिस्ट पक्ष व शे. का. फेडरेशन यांच्या कराराचे प्रकरण शेवटास गेले नाही.

□ □ □

प्रकरण २ रे

# बौद्धधर्म दीक्षा

बाबासाहेबांनी शीख धर्म स्वीकारण्याची योजना तयार केली होती. त्या योजनेतर्फे मुंबईत खालसा कॉलेजही १९३९ साली सुरू झाले होते. या योजनेसाठी सर्व खर्च, गुरुद्वार प्रबंधक समिती, अमृतसर ही संस्था करीत होती. त्या समितीचे प्रमुख कार्यकर्ते आणि बाबासाहेब यांच्यात अनेक कारणांमुळे मतभेद उत्पन्न झाले आणि शेवटी बाबासाहेबांना खालसा कॉलेज आणि शीख धर्म स्वीकारण्याची योजना या गोष्टींशी असलेला आपला संबंध हळूहळू तोडावा लागला. १९४२ च्या अखेरीस हे संबंध पूर्णपणे तुटले गेले. धर्मांतरासाठी विचाराधीन असलेला शीखधर्म संपूर्णपणे बाद झाला. १९४३ ते १९४७ च्या काळांत बौद्ध धर्माकडे त्यांचा कल वाढू लागला. व १९४९ मध्ये बौद्ध धर्म स्वीकारण्याचे नक्की केले.

बौद्धधर्म स्वीकारण्याची आपली भूमिका बाबासाहेब खाजगी बैठकीत बोलू लागले; पण त्यांनी सदर भूमीकेची वाच्यता जाहीर सभेतून केली नाही. सर्व धर्मांचा त्यांचा अभ्यास १९३५ पासून जोरात चालू होता. १९४९ मध्ये ते बौद्ध धर्माचा सांगोपांग व कसून अभ्यास करू लागले. त्यासाठी त्यांनी पाली भाषेचा अभ्यास केला. पाली भाषेतील वाङ्मय आणि हस्तलिखिते यांचा संग्रह करण्याचा त्यांनी सपाटा चालविला. त्यांचा तो संग्रह इतका वाढला की त्यासाठी त्यांना दरमहा नवीन मोठी कपाटे विकत घ्यावी लागू लागली आणि त्यांत या नव्या संग्रहाची व्यवस्था करावी लागे. बौद्ध धर्माचा प्रसार करण्यासाठी "**भारतीय बौद्ध जनसंघ**" ही संस्था १९५० मध्ये त्यांनी स्थापन केली. या संस्थेत ते अध्यक्ष झाले. या संस्थेतर्फे त्यांनी पहिले प्रकाशन "बौद्ध उपासना पाठ" नोव्हेंबर १९५१ मध्ये प्रसिद्ध केले. या पाठाचे संग्राहक "डॉ. भी. रा. आंबेडकर" आणि प्रकाश "डॉ. भी. रा. आंबेडकर, हार्डिज अव्हेन्यू, नवी दिल्ली" हे होते. मुद्रक:—वि. पु. भागवत, मौज प्रिंटिंग ब्यूरो, मुंबई नंबर ४" या ४४ पानांच्या पुस्तिकेवर किंमत छापलेली नव्हती. भारतीय बौद्ध जनसंघ याचे रुपांतर "**भारतीय बौद्ध महासभा**" या नावाने १९५४ मध्ये झाले, बौद्ध धर्मा चा प्रसार करण्यासाठी बाबासाहेबांनी "**भारतीय बौद्ध महासभा**" स्थापन केली. पण बौद्ध धर्माची दीक्षा स्वतः घेणे व इतरांना देणे, या बद्दल त्यांचे विचारचक्र १९५४–५५ या काळांत वेगांत फिरू लागले. त्यासंबंधीच्या योजना ते मनांत नक्की करीत होते. बुद्धाचे चरित्र, तत्वज्ञान आणि बौद्धधर्माचे आचरण यासंबंधी बौद्ध भिक्कूंनी जे स्वार्थासाठी अपप्रकार केलेले आहेत ते खोडून काढून शुद्ध बौद्ध धर्म पुनः चालू करणे, हे आपले उद्दिष्ट आहे. आणि ते साध्य करताना आपणाला भिक्कूंकडून जो विरोध व त्रास होईल त्याना आपणाला तोंड द्यावे लागेल, असे बाबासाहेब, खाजगी

बैठकीतील संभाषणात, म्हणत असत. याबाबतींत त्यांना अनेक प्रसिद्ध बौद्धधर्मीयांबरोबर चर्चा करावी लागे. या चर्चा कधी कधी गरमागरम होत असत. पण बौद्धधर्माच्या मूळ स्वरूपाबद्दल बाबासाहेबांनी जे ठोकताळे व आडाखे बांधून ठेवले होते, त्यांवर अशा चर्चांचा कांहीही परिणाम झालेला नाही. म्हणजे चर्चेसाठी जे लोक त्यांच्याकडे येत ते बाबासाहेबांच्या दृष्टिकोनांत व विचारांत फारसा फरक न पाडता जात असत. (१) घरदार सोडून गौतम अरण्यात आत्मज्ञानार्जनासाठी गेला. (२) एका शरीरातून दुसऱ्या शरीरात प्राणाचा प्रवेश होणे. (३) पुनर्जन्म होणे. (४) परमेश्वराचे अस्तित्व नसणे, वगैरे मुद्यांसंबंधी भिक्कूंनी जे विचार प्रगट केलेले आहेत ते चुकीचे असून या बाबतीतील सत्य कोणते हे आपण आपल्या "बुद्ध आणि त्याचा धम्म" या ग्रंथात दाखविले आहे, असे बाबासाहेब या चर्चेच्या प्रसंगी अगर खाजगी संभाषणातून सांगत असत.

बौद्धधर्माच्या प्रसाराबद्दलचे आपले विचार बाबासाहेबांनी "महाबोधि सोसायटी ऑफ इंडिया, कलकत्ता" या संस्थेचे (स्थापना १८०२ इ. स.) जनरल सेक्रेटरी श्री. डी. वलिसिंह यांना १६ फेब्रुवारी १९५५ ला पत्र पाठवून कळविले. बुद्ध धर्मात येण्यासाठी विधी नाही संघात येण्यासाठी आहे. ही उणीव दूर केली पाहिजे. बौद्धधर्म स्वीकारलेल्या लोकांना, भिक्कू हिंदुधर्मातील देव-देवतांची पूजा करावयास लावतात. ब्राह्मण लोकांचे प्राबल्य बौद्ध धर्मात झाले तेव्हां त्यांनी इतर देवदेवता बौद्ध धर्मात निर्माण केल्या. हेतु हा की हा बौद्ध धर्म नष्ट व्हावा. त्या देवदेवतांना भजणे, हा एक बौद्ध धर्माचा भाग आहे अशी समजूत रूढ झाली. या देवदेवतांच्या थैमानामुळें भारतात बौद्ध धर्म लोप पावला. म्हणून हे विष बौद्धधर्मातून नष्ट करून बौद्धाना फक्त बुद्धाचीच पूजा व भक्ती करावयास लावणे हा उपाय योजला पाहिजे. ख्रिस्तीधर्मात बाप्तिस्मा व ऑर्डिनेशन हे अनुक्रमे ख्रिस्ती धर्मप्रवेश आणि ख्रिस्ती धर्मपुजारी यासंबंधीचे दोन विधी आहेत तसे आपलेही असले पाहिजेत. याबाबतीत आपण ख्रिस्ती धर्माचे अनुकरण करावे यासाठी मी जो विधी तयार केलेला आहे त्याला "धम्म दीक्षा विधी" म्हणावे. सदर पत्र मी येथे देतो.—

"I have been of the opinion that the conversion of the laity is not conversion at all. It is only a nominal thing. The so-called Buddhist laity besides worshipping the Buddha also continued to worship other Gods and Goddesses which were set up by the Brahmins to destroy Buddhism. Buddhism disappeared from India largely of this wavering attitude of the laity. If hereafter Buddhism is to be firmly established in India the laity must exclusively be tied up to it. This did not happen in the past because in Buddhism there was a ceremoney for initiation into the Sangh but there was no such ceremony for initiation into the Dhamma. In Christianity there are two ceremonies : (1) Baptism which is initiation into the Christian religion, (2) Ordination of the priest. In this respect the new movement for the propagation of Buddhism in India must copy Christianity. To remove this dangerous evil in Buddhism I have prepared formula which I call Dhamma Diksha. Every one who wishes to be converted to Buddhism shall have to undergo through ceremony. Otherwise he will not be regarded as a Buddhist."

(Ambedkar's letter, dated 16 February 1955 to D. Wali Singh, General Secretary, Maha Bodhi Society, Calcutta, explaining how to celebrate conversion ceremony and worship Buddha).

बाबासाहेबांना जे कार्यकर्ते भेटावयास येत असत त्यांचे पाशीं ते बौद्ध-धर्म-दीक्षेसंबंधी चर्चा करीत असत. साधारणपणे दहा लक्ष लोकांना दीक्षा देण्याचा समारंभ उरकता येईल, या दहा लक्ष लोकांच्या जेवणाची व दोन दिवस राहण्याची सोय—(दर डोई फक्त एक रुपया दर घेऊन) ज्या ठिकाणी करता येईल, असे ठिकाण नक्की करणे, याबद्दल बाबासाहेबांच्या दृष्टीपुढे मुंबई, औरंगाबाद, सारनाथ व नागपूर ही ठीकाणे होती. या ठिकाणी व्यवस्था करतां येईल का? या बद्दल चर्चा होत असत. तारीख ५ ऑगस्ट १९५६ ला व्हरांड्यांत बसून बाबासाहेबांनी आलेल्या लोकांबरोबर चर्चा केली. या बैठकीत दिल्लीतील अस्पृश्यवर्गीय कार्यकर्ते, सोहनलाल शास्त्री यांनी बाबासाहेबांना अनेक प्रश्न विचारले व त्या प्रश्नांना बाबासाहेबांनी उत्तरे दिली, ती मी सारांश रुपाने खाली देत आहे. या प्रश्नोत्तरावरुन बाबासाहेबांच्या मनांत धर्मदीक्षेबद्दलच्या विचारांचे कसे आंदोलन चालले होते हे दिसेल.

**शास्त्री**—बाबासाहेब! बौद्ध धर्मापेक्षा ख्रिस्ती किंवा इस्लामी धर्म आपणाला जास्त फायदेशीर होणार नाही का?

**बाबासाहेब**—ते धर्म आपणाला फायदेशीर कदाचित होतील, पण ते भारतात निर्माण झालेले धर्म नाहीत, त्या धर्माचा आपण स्वीकार केला तर आपणाला इतर देशांतून, आपल्या लोकांच्या भौतिक उन्नतींकरतां खूप पैसाही मिळेल. आपणाला भारतीय राजकारणांत खूप बळही कमावता येईल. पण या सर्व गोष्टी परस्वाधीन होऊन आपणाला करता येतील. दुसऱ्यांच्यां ओंजळीने दुसऱ्यांचे पाणी पिऊन आपल्या सर्वांगीण प्रगतीची तहान भागविणे हा पुरुषार्थ नव्हे. स्वतःच्या हिमतीने, स्वावलंबनाने व स्वाभिमानाने आणि स्वदेशी नव्या धर्माच्या आश्रयाने आपण आपली प्रगती केली तर तो खरा पुरुषार्थ ठरेल. आणि भारतीय इतिहासात आपला पुरुषार्थ सोनेरी अक्षरांनी लिहिला जाईल. **ख्रिस्ती अगर इस्लामी धर्माने आपली भारतीय संस्कृति नष्ट होईल.** आणि जातिवंत संस्कृति राखणे हे बौद्धधर्माचे रहस्य आहे. ते ज्यांना उमजेल तेच माझ्या धर्मदीक्षेबद्दल मनांत किंतु बाळगणार नाहीत. बौद्ध संस्कृतिचे पुनर्जीवन करणे व सर्वभारत बौद्ध करणे हे माझे उद्दिष्ट आहे.

**शास्त्री**—हे आम्हांला मान्य. पण मग आम्हांला अस्पृश्यसमाज म्हणून विद्यार्जन व नोकऱ्या या संबंधात ज्या सरकारी सवलती मिळतात त्या धर्मांतरानंतर चालू राहतील का?

**बाबासाहेब**—अलबत! आणि सरकारने त्या जर बंद केल्या तर आम्ही, त्या मिळविण्यासाठीं झगडत राहूं कारण त्या घटनेत नमूद आहेतच. आपल्या समाजांत महार, चांभार वगैरे जे भेद आहेत ते नष्ट करुन सर्व समाज बौद्ध धर्मीय तयार करणे व त्यांच्या तर्फे हक्कांसाठी झगडत रहाणे व इतर समाजांतील लोकांना बौद्ध करून आपल्यांत घेणे, असा आपला दुहेरी लढा राहील, आणि तो आपल्या ऐक्य शक्तिने यशस्वी होईल.

**शास्त्री**—बौद्ध धर्माबद्दल आंपल्या लोकांना कांही माहिती नाही. आपण आतापर्यंत तसा प्रचार केलेला नाही. त्याच्यापुढे एकाएकी दीक्षा समारंभ घेतला तर लोक बुजतील, संभ्रमात पडतील कदाचित लोकांचा विरोधही होईल मग मोठा पेचप्रसंग उत्पन्न होईल.

**बाबासाहेब**—अशी परिस्थिती उत्पन्न होणार नाही, याची मला खात्री आहे. लोक दीक्षेसाठी उत्सुक आहे त जे उत्सुक नाहीत ते १०-१५ वर्षांनी दीक्षा घेतील, अशी उत्तेजक परिस्थिती उत्पन्न करू.

**शास्त्री**—मग दीक्षा समारंभ कोठे घेणार ?

**बाबासाहेब**—माझ्या दृष्टीसमोर चार ठिकाणे आहेत. मुंबई औरंगाबाद, सारनाथ व नागपूर. सुमारे दहा लाख लोकांच्या जेवणाची व रहाण्याची व्यवस्था मामुली आकार घेऊन हे प्रमुख कार्य करण्यास जेथील लोक उत्साहाने पुढे येतील तेथेच दीक्षा समारंभ होईल. पण माझ्या मनाचा कल म्हणाल तर नागपूरकडे जास्त आहे !

**शास्त्री**—का ? नागपूरच का ?

**बाबासाहेब**—त्याला ऐतिहासिक कारणे आहेत. नागपूर हे नांवच सांगते की हे नागवंशीय लोकांचे शहर होते. हे नागसंस्कृतीचे केंद्र होते. बुद्ध हा नागवंशीय टोळींत जन्मला. आपणही सारे नागवंशीय आहोत, आपण हजारो वर्षापूर्वी बौद्ध होतो. पुनः आपण बौद्ध होणार ते बौद्ध-नाग संस्कृतीच्या केंद्रात तेथून धर्म दीक्षेचा झेंडा सर्व भारतात फिरेल.

या बैठकीतील विचारांचे पडसाद दिल्ली, नागपूर, औरंगाबाद, मुंबई वगैरे ठिकाणी निघाले. आणि तेथील कार्यकर्त्यांनी दिल्लीला शिष्टमंडळे नेऊन बाबासाहेबांना या बैठकीच्या आगोदरच विनविले होते कीं तुम्ही आमचे ठिकाण पसंत करा, आम्ही दीक्षासमारंभाची आपल्या म्हणण्याप्रमाणे व्यवस्था करतो. 'भारतीय बौद्धजन समिती, नागपूर', हिच्या शिष्टमंडळाची विनंती बद्दल आपले विचार ठाम करून बाबासाहेबांनी जुलै १९५६ च्या सुरूवातीस त्यांची विनंती मान्य असल्याचे सांगितले. नागपूरचे लोक पैसे गोळा करण्यास व भव्य मंडप उभारण्यास रात्रंदिवस झटू लागले. पण थोड्याच दिवसानंतर बाबासाहेबांचे विचार बदलले. त्यांना वाटू लागले कीं मुंबईत दीक्षासमारंभ जसा गाजेल तसा नागपूरला गाजणार नाही. म्हणून त्यांनी मुंबई हे स्थळ ठरविले आणि नागपूरच्या समितीचे जनरल सेक्रेटरी डब्ल्यु. एम. गोडबोले यांना २३ जुलै १९५६ ला पत्र लिहिले कीं मी, दीक्षासमारंभाला मुंबई हेच स्थळ पसंत करतो; तरी पण माझ्या नेतृत्वाखाली नागपूर वगैरे ठिकाणी दीक्षा समारंभ होईलच; आणि तो मुंबईच्या समारंभानंतर लागलीच. ते पत्र असेः—

There is no other way except to stick to Bombay as the place for conversion. This of course does not mean that I shall not come to Nagpur. As a matter of fact I propose to go to various centres, wherever there is likely to be a large

gathering ready for conversion. I have Nagpur in mind. I will let you know the detailed programme later on. I am very pleased with your enthusiasm and of your friends in the matter of turning over to Buddhism."

(Ambedkar's letter, dated 23rd July 1957 to W. M. Godbole, General Secretary, Conversion Committee, Nagpur.)

हे पत्र पाहून नागपूरकर मंडळी निराश झाली. त्यांनी लागलीच दुसरे शिष्टमंडळ दिल्लीला पाठविले. त्या मंडळाने बाबासाहेबांचे पुढे आपली बाजू मांडली. परंतु बाबासाहेबांनी त्यांचे म्हणणे मानले नाही. ते शिष्टमंडळ निराश होऊन परत गेले.

कोणते केंद्र ज्यास्त सोईचे व महत्त्वाचे होईल याबद्दल पुनः बाबासाहेबांनी त्यावर विचार केला व त्यांना सर्वतोपरीने नागपूरच योग्य ठिकाण वाटले. लगेच तारीख ८ सप्टेंबरला त्यांनी श्री. गोडबोले यांना पत्र लिहीले की, तुम्ही दीक्षा समारंभाचा कार्यक्रम ठरविण्यासाठी दिल्लीला या. ते पत्र असे—

"I had written you sometime back in which I had declined to come to Nagpur for my conversion. On further consideration I have come to the conclusion that Nagpur would be best. I would therefore like you to come to Delhi so that we can discuss what arrangements we could make in order to make the ceremony successful."

(Ambedkar's letter, dated 8th September 1956 to Godbole.)

श्री. गोडबोले, सात-आठ माणसे घेऊन दिल्लीला आले. बाबासाहेबांनी त्यांच्याशी विचार-विनिमय करून सर्व कार्यक्रम निश्चित केला. आणि दीक्षेची तारीख १४ ऑक्टोबर १९५६ (विजया दशमी) ही निश्चित केली. २३ सप्टेंबरला बाबासाहेबांनी वृत्तसंस्थांना निवेदन पाठविले की, हा समारंभ सकाळी ९ ते ११ च्या दरम्यान होईल. नंतर बाबासाहेबांचे जाहीर भाषण संध्याकाळी होईल. ते निवेदन प्रेस ट्रस्ट ऑफ इंडिया या वृत्तसंस्थेने प्रसिद्ध केले ते असे :—

"The date and place of Dr. Ambedkar's conversion to Buddhism has now been finally fixed. It will take place at Nagpur on the Dussehra day i.e. 14th October 1956. The ceremony of conversion will take between 9 and 11 a. m. In the evening of the same day Dr. Ambedkar will deliver his address to the gathering.

(Note, dated 23rd September, P256 to P.T.I. by Ambedkar,)

याचा मराठी तर्जुमा असा—

" २६, आलेपूर रोड,
दिल्ली, २३ सप्टेंबर १९५६.

बौद्ध धर्म स्वीकारण्याचा दिवस व ठिकाण मी आता निश्चित केले आहे. दसऱ्याच्या दिवशी, तारीख १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथे मी बौद्ध दीक्षा घेणार आहे.

या दिवशी सकाळी ९ ते ११ माझा धर्मदीक्षा विधी समारंभ होईल व संध्याकाळी माझे सर्व लोकांसाठी जाहीर व्याख्यान होईल.

बी. आर. आंबेडकर,
२३-९-५६."

(प्रबुद्ध भारत : आंबेडकर बौद्ध दीक्षा विशेषांक, २७-१०-५६, पा. २९).

दीक्षा देण्यास योग्य असा बौद्ध धर्मातील श्रेष्ठतम पंडित आणि सर्वांत वयोवृद्ध बुद्धानुयायी पूज्य भिक्खु **चंद्रमणी महास्थवीर** यांची निवड बाबासाहेबांनी केली. पूज्य **चंद्रमणी यांचा** जन्म १८७३ मध्ये ब्रह्मदेशांतील आराकान प्रांतात झाला. ब्रह्मदेशातील बहुसंख्य लोक बौद्ध. ते भारताकडे पवित्र भावनेने पहातात; कारण तेथे गौतमबुद्धाने आपला धर्म प्रस्थापित केला व तो जगातील इतर भागात पसरत गेला. ब्रह्मदेश हा अशा भागांपैकी एक भाग होय. पूज्य चंद्रमणी १६ वर्षांचे असताना (१८८९) भारतात बौद्ध तीर्थक्षेत्राच्या दर्शनासाठी आले. ज्या भारतात बौद्धधर्म निर्माण झाला त्या धर्माला भारतात बहुसंख्येने अनुयायी नसावेत, हे दृश्य पाहून पूज्य चंद्रमणी यांना अत्यंत आश्चर्य आणि दुःख वाटले. भारतात राहून बौद्ध धर्मप्रसाराचे कार्य करण्याचे त्यांनी ठरविले, आणि ते १८८९ पासून भारतातच राहिले. भगवान बुद्ध यांचे महानिर्वाण ज्या गावाच्या शिवेत झाले ते **कुशिनगर** हे गाव त्यांनी आपल्या कार्याचे केंद्र बनविले. या ठिकाणी त्यांनी बौद्ध जयंती आणि बौद्ध धर्मीयांची संमेलने भरविण्याचा पायंडा घातला. आणि त्यानंतर भारतातील इतर ठिकाणी हे कार्यक्रम होऊ लागले. बौद्धधर्माचे उच्च शिक्षण आणि वाङ्मय प्रसार या कामासाठी यांनी शेकडो तरुण-तरुणींना प्रोत्साहन दिले. कांहीजणांना सिलोन, जपान, ब्रह्मदेश वगैरे बौद्धधर्मीय देशात पाठवून त्यांना बौद्धधर्माचे उच्चतम शिक्षण घेण्यास लावले. या तरुणांपैकी दोघांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केला. त्यांनी अनेक ग्रंथ लिहून आपल्या विद्वत्तेचा फायदा जगाला करून दिला. ते दोन बौद्ध पंडित म्हणजे **आनंद कौसल्यायन** आणि **राहुल सांस्कृतायन**. राहुल सांस्कृतायन यांनी तिबेट मध्ये राहून हजारो हस्तलिखिते (बुद्ध-धर्माची) मिळविली; आणि ती भारतात दहा बारा गाढवांच्यावर लादून आणली. बौद्ध धर्मावरील जगातील अधिकृत लेखकांच्या पंक्तीमध्ये राहुल सांस्कृतायनचे स्थान फार वरचे आहे, हे त्यांच्या प्रदीर्घ अभ्यासामुळे व प्रयत्नांमुळे पूजनीय चंद्रमणि यांनी कुशिनारा येथे धर्मशाळा, दवाखाने, स्तूप वगैरे बांधले. गरीब मुलांना मोफत शिक्षण देण्यासाठी शाळा काढल्या. त्यांनी कुशिनारा येथे ज्या इमारती बांधल्या त्यांची किंमत चाळीस वर्षांपूर्वी

सात लाख रुपये होती. पूजनीय चंद्रमणी यांनी ब्रह्मी आणि हिंदी भाषेत बौद्धधर्मावर विद्वत्ताप्रचूर असे अनेक ग्रंथ लिहिले आहेत. त्यापैकी धम्मपद, मंगलसुक्त, भगवान बुद्धाचे चरित्र, बुद्धाचे उपदेश, वगैरे ग्रंथ प्रमुख आहेत. अशा ऐंशी वर्षांच्या आणि महाविद्वान बौद्ध भिक्षूच्या हातून दीक्षा घेण्याचे बाबासाहेबांनी ठरविले; आणि त्यांना या बाबतीत पत्र लिहिले ते असे :—

26, Alipur Road,
Delhi
the 24th September 1956.

Reverend Bhikku Chandramani,
Kushenara, Gorakhpur District,
Uttar Pradesh.

Reverend Bhante,

This is to inform you that I and my wife have decided to embrace Buddhism. The ceremony is to take place at Nagur on the 14th of October, 1956. The time of the ceremony is fixed in the morning between 9 and 11. It is our great wish that you should officiate at the ceremony. You being the oldest Buddhist Monk in India we think it would be appropriate to have the ceremony performed by you.

We realise that your physical condition may make it difficult for you to go to Nagpur but we can manage to provide the transport from Kushenara to Nagpur either by air or by train and all other arrangements for your living in Nagpur. We can send some one to take you from Kushenara to Nagpur. Please let us know whether you can accept the invitation of ours.

With kind regards.

Your sincerely,

(Signed) B. R. AMBEDKAR.

पूजनीय चंद्रमणी यांनी बाबासाहेबांचे आमंत्रण स्वीकारले. त्यानंतर दीक्षेचे स्थळ व वेळ ही बाबासाहेबांनी मुक्रर केली.

याच सुमारास श्री. कर्डक, प्राध्यापक, सिद्धार्थ कॉलेज, मुंबई यांनी स्वतःचा विवाह विधी बौद्ध पद्धतीने करण्याचे ठरविले; आणि त्या विधीबद्दलची माहिती बाबासाहेबांना

पत्राद्वारे विचारली. ती माहिती बाबासाहेबांनी कळविली. ती पत्रे मी येथे उद्धृत करतो.

V. S. Kardak, M.A.

41-2, 3rd Marine Street,
Bombay 2.
Dated 26th September 1956.

My dear Babasaheb,

I am a full-time tutor of philosophy and logic in our college at Bombay. I am also working in Siddharth Night High School as an Assistant Head Master since its inception. I am getting married on 9th December 1956 at 5-00 p.m. at Dr. Ambedkar Vidyarthi Ashram at Manmad, with the daughter of Shri R. R. Pawar whom you know very well.

On 14th October 1956, my fiance and myself sought refuge in Buddhism along with you at Nagpur. Our R. Nos. are 67074 and 67075. Naturally we want to solennise our marriage according to Buddhist religion. There is no better authority save you to guide us in this respect.

Young educated Buddhists like us should lay down the precept and strengthen our movement. Whole of Nasik District will be a witness to this novel marriage ceremony as they are curious to see the Buddhist Marriage Ceremony.

I am sure you will guide us, hence this request.

The reply is expected at your earliest. I shall be leaving for Manmad on 8th December 1956.

Yours sincerely,

(Signed) V. S. KARDAK.

26, Alipur Road,
Delhi,
Dated the 4th December 1956.

Dear Mr. Kardak,

Please refer to your letter of 12th November. The Buddhist Marriage Ceremony is simple. There is no home and there is no saptapadi. The essence of the ceremony lies in placing an earthen pot newly made between the bride and the bridegroom on a stool and to fill it brimful with water. The bride and

the bridegroom to stand on two sides of the pot. They should place a cotton thread in the water pot and each hold one end of the thread in their hands. Some one should sing the Mangal Sutta. Both bride and bridegroom should wear white clothes.

Yours sincerely,

(Signed) B. R. AMBEDKAR.

Shri. V. S. Kardak,
41-2, 3rd Marine Street,
BOMBAY 2.

पूजनीय चंद्रमणी यांनी बाबासाहेबांचे आमंत्रण स्वीकारले. तेव्हा नागपूरच्या कार्यकर्त्यांना दीक्षासमारंभाची व्यवस्था करण्यास आदेश दिला. नागपूरकरांनी ही व्यवस्था समयोचित भव्य प्रमाणात केली. "नागपूर शहराच्या दक्षिणेस जवळजवळ शहराच्या बाहेरच, अंबाझरी नावाचा रोड (रस्ता) आहे. या रोडला लागून असलेले सुमारे १४ एकर क्षेत्राचे विस्तीर्ण मैदान बौद्ध दीक्षा विधीसाठी मुक्रर करण्यात आले होते. या मैदानास सभोवार तट्टे मारले होते. सर्व मैदानाचे सभोवार सुमारे २,००० ते ३,००० विद्युत् दीपांची (बल्बस्) व्यवस्था केली होती. स्त्रियांसाठी अर्ध्या भागात स्वतंत्र व्यवस्था एका छोटचा मंडपात केलेली होती. पुरुषांकरिता राहिलेले सर्व मैदान होते. एरवी तसा नागपूरचा अंबाझरी रोड ओसाडच असतो. पण सदर समारंभामुळे, रोडवर निरनिराळ्या प्रकारची दुकानेच स्थापन झाल्याचे दिसून आले." (प्रबुद्ध भारत, खास अंक, २७ ऑक्टोबर १९५६, पा. ३३).

नागपूरला जाण्यासाठी बाबासाहेब, माईसाहेब व नानकचंद रत्तू हे गुरुवार दिनांक ११ ऑक्टोबर १९५६ ला सकाळी दिल्लीतील सफदरजंग विमान तळावर गेले. त्यांचे विमान ७ वाजता सुटले व १२ वाजता नागपूरच्या विमानतळावर उतरले. विमानतळावर व विमानतळाच्या आजूबाजूस हजारो लोक जमलेले होते. त्यांनी, बाबासाहेब विमानातून खाली उतरतांना टाळ्यांचा कडकडाट करून "जय भीम" च्या गर्जना केल्या. कार्यकर्त्यांनी, बाबासाहेब व माईसाहेब यांना हारतुरे अर्पण केले. स्त्री, पुरुष, मुले यांनी बाबासाहेबांच्या पायांवर मस्तक ठेवण्यासाठी एकच धांदल केली. कोणाला त्यांच्या पायांना हात लावता आले, कोणाला डोके टेकवता आले. कोणाला हे साधले नाही त्यांनी बाबासाहेब ज्या जागेवरून चालत गेले तेथील माती उचलून त्यांनी ती भक्तीभावाने आपल्या कपाळाला लावली. समता सैनिक दलाच्या स्वयंसेवकांनी बाबासाहेबांच्या भोवती कडे केले होते. बाबासाहेबांची मोटार ज्या रस्त्याने शहराकडे गेली त्याच्या दोन्ही बाजूला हजारो स्त्री-पुरुष व मुले ही उभे राहून "जय भीम" च्या गर्जना करीत होती. बाबासाहेबांची रहावयाची व्यवस्था "शाम" हॉटेलमध्ये केलेली होती. तेथेही हजारो लोक उभे राहिलेले होते. बाबासाहेबांचे दर्शन होताच त्यांनीही टाळ्या वाजवून "जय भीम"चा जयघोष केला. येथे बऱ्याच लोकांना बाबासाहेबांच्या पायांवर डोके ठेवून वंदन करता आले. समता सैनिक दलाच्या स्वयंसेवकांनी बाबासाहेबांच्या भोवती कडे करून त्यांना हॉटेलमध्ये नेले. हॉटेलच्या आसपास उभे राहून लोकांनी त्यांच्या नावाचा जयघोष केला.

शुक्रवारी दिनांक १२ ला बाबासाहेबांनी विश्रांती घेतली. दिनांक १२ ते १४ पर्यंत, मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, वगैरे ठिकाणाहून हजारो लोक खास रेल्वेगाडीने नागपूरला आले. नागपूर जिल्ह्यातील खेड्यापाड्यातून लाखो लोक पायी व बैलगाडीने नागपूरला आले. दीक्षा समारंभाचे मैदान, गावातील शाळा, हायस्कूलस्, कॉलेजेस वगैरे ठिकाणी लोकांची रहाण्याची व्यवस्था केलेली होती. लाखो खेडुतांनी मैदानातच मुक्काम ठोकला. तेथेच तीन दगडांची चूल मांडून स्त्रियांनी स्वयंपाक केला. हजारोंनी तीन-चार दिवस पुरेल एवढी शिदोरी बरोबर घरून आणलेली होती.

शनिवार दिनांक १३ ला संध्याकाळी ५ वाजता बाबासाहेबांनी वर्तमानपत्राच्या वार्ताहरांना हॉटेलमध्येच मुलाखत दिली.

एका वार्ताहराने बाबासाहेबांना प्रश्न विचारला "तुम्ही हिंदुधर्म का सोडता ?" त्या वार्ताहराकडे रागाने व तिरस्काराने पहात बाबासाहेब म्हणाले, "हा प्रश्न तुम्ही स्वतःलाच का विचारीत नाही ? हा प्रश्न तुमच्या बापजाद्यांना विचारा म्हणजे ते त्याचे उत्तर देतील. तुम्ही हिंदू लोक हेच विचारण्यासाठी येथे आलात काय ? या पूर्वी कोठे दडून बसला होता ? तुम्ही लोकांनी जन्मभर माझा छळ केला, आणि आता विचारता; हिंदुधर्म का सोडता ? अहो! तुम्ही हिंदुलोक मला खड्डयात लोटण्यासाठी धडपडला. पण मी अजून तुमच्या हातून न मरता जिवंत राहू शकलो. मी बुद्ध धर्माचा प्रसार अखिल भारतात करणार आहे." तो वार्ताहार ओशाळून दोन पावले दूर झाला.

इतर प्रतिनिधींनी काही प्रश्न विचारले. त्यांना बाबासाहेबांनी उत्तरे देताना धर्मांतराच्या एकंदर स्वरूपाबद्दल खुलासा केला. त्या मुलाखतीचा जो वृत्तांत प्रसिद्ध झाला तो असा :—

**"बौद्ध-दीक्षा घेण्याच्या आदले दिवशी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी वृत्तपत्रकारांना दिलेली मुलाखत.**

**सवलतीसाठी अस्पृश्य रहावे काय ?**

**"मी गांधीजींना असे आश्वासन दिले होते की, कमीतकमी हानीकारक मार्ग मी स्वीकारीन. तद्नुसार आता बौद्ध धर्म स्वीकारून मी हिंदू समाजाच्या दृष्टीने एक उपकारक कृत्यच करीत आहे. कारण बौद्ध धर्म हा भारतीय संस्कृतीचेच अंग आहे." असे उद्गार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ता. १३ ऑक्टोबर १९५६ रोजी सायंकाळी 'धर्मांतरा' विषयी पत्रकारांशी बोलताना काढले. वृत्तपत्र वार्ताहराबरोबर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जी मुलाखत झाली ती खाली दिलेली आहे :**

"या धर्मांतरामुळे घटनेने अस्पृश्य वर्गाला ज्या खास सवलती दिल्या आहेत, त्या जातील, त्या विषयी काय ?" असा प्रश्न विचारला असता ते म्हणाले—"सर्व सामान्य नागरिकासाठी ज्या सवलतीच्या तरतुदी केलेल्या आहेत, त्या धर्मांतरानंतर आम्हाला मिळतील. पण खास सवलतींचा प्रश्न का उपस्थित करता ? त्या विषयी चिंता कशाला ? घटनेने दिलेल्या खास सवलतींचा लाभ उठविता यावा म्हणून आम्ही सदासर्वकाळ अस्पृश्यच रहावे, असे तुम्हास वाटते काय ? आम्ही मनुष्यत्व गाठण्याचा प्रयत्न करीत आहोत. घटनेने दिलेल्या खास सवलती मिळाव्यात म्हणून ब्राह्मण अस्पृश्य होतील का ?"

**एक वार्ताहर**—त्यांना त्यांची गरज नाही !

**डॉ. आंबेडकर**—कदाचित त्यांना तशा खास सवलती मागण्याचाही काळ येईल. नाही कोणी म्हणावे? पण पूर्वी जेव्हा आम्ही विभक्त मतदारसंघाची मागणी केली तेव्हा गांधीजींनी विरोध केला. मग आताच खास सवलतीचा मुद्दा का पुढे केला जातो? बुद्धधर्म स्वीकारताना खास राजकीय हक्कामध्ये माझे हितसंबंध गुंतलेले नाहीत. आणि जर विभक्त मतदार संघ आहेत, त्याची अवस्था अशी आज काय आहे? काँग्रेसने सर्वच जागा बळकावल्या आहेत ना? आणि आज अस्पृश्यांचे म्हणून जे प्रतिनिधी राखीव मतदार संघातून काँग्रेसच्या तिकिटावर निवडून गेले त्यांनी कधीतर अस्पृश्यांचे हिताचे काही केले आहे काय? अशा जागा घेऊन करावयाचे तरी काय?

**प्रथम विचारक्रांती आवश्यक**

**प्रश्न**—आपण धर्मांतराचा निर्णय का घेतला?

**उत्तर**—शतकानुशतके सवर्ण हिंदूंनी आणि विशेषतः ब्राह्मणांनी आमच्याशी गैर व्यवहार केला ज्यांच्या नाकाला काही घाण (येत) असेल, तो प्रत्येक जण बौद्ध होईल. बौद्धधर्म हा विश्व धर्म आहे. सबंध भारतात धर्मचक्र प्रवर्तन घडवून आणावयाचे आहे. मी सांगतो ते चिरकाल मानावे, असे बुद्धाने कधीही सांगितले नाही. जे मी सांगितले ते काळाशी विसंगत असेल तेव्हा त्यांत परिवर्तन करावे, असे सांगून त्याने इतकी मोकळीक दिली आहे. प्रथम लोकांच्या विचारांत क्रांती करावी लागते; मग आचार क्रांती होते.

**प्रश्न**—विचारात आणि आचारात काहीच तफावत रहाणार नाही काय?

**उत्तर**—फरक पडतोच. पण धर्माचे शिक्षणही समाजाला द्यावेच लागते;

**अस्पृश्य वर्गातून जातिभेदाचे उच्चाटन करीन**

**प्रश्न**—पण एक जातिभेद सोडला तर तुम्ही बौद्ध आणि हिंदू धर्मात काय फरक दाखवाल?

**उत्तर**—प्राण सोडला तर शरीरांत काय राहिले, अशा सारखाच हा प्रश्न आहे. हा जातिभेद तुम्हीच पाळता ना? जातिभेद वाढविला कोणी? ब्राह्मणांनी आम्हाला आणि मराठ्यांना कधीही मतस्वातंत्र्य दिले नाही.

**प्रश्न**—हा जातिभेद अस्पृश्य वर्गातही आहे ना? तो बौद्धधर्म स्वीकारानंतरही **कायम** राहणार नाही कशावरून?

**उत्तर**—तो आम्ही तुमच्याकडून घेतला ना? पण त्यास आम्ही प्रतिरोध तर करू शकतो. मी शूर आणि धीट आहे. मी लोकांना कसे वागावे, याचे आदेश देईन नाहीतर मी एकटाच बुद्ध होईन, त्यांत बिघडले कोठे? आणि माझा तर असा प्रश्न आहे की, बुद्धकालीन ब्राह्मणांना बौद्धधर्म कसा पटला? आणि आताच तो का पटत नाही? मी हा प्रश्न माझ्या जाहीर भाषणांत विचारणारच आहे.

**राजसंन्यास घेणार नाही**

**प्रश्न**—धर्मांतरानंतर शे.का.फे.चे काय होणार ?

**उत्तर**—कदाचित तो कायम राहील किंवा नवा पक्ष स्थापन होईल. मी मात्र बौद्ध धर्मांत प्रवेश केल्यानंतर शे. का. फे. चा सदस्य रहाणार नाही.

**प्रश्न**—बौद्ध धर्म स्वीकारल्यानंतर आपण काय करणार ?

**उत्तर**—मी 'मिशनरी' होणार आहे पण राजकारणाचा सन्यास मात्र घेणार नाही. निवडणुकीलाही निश्चितपणे उभा राहीन.

**नवीन पक्ष व्यापक रहाणार**

**प्रश्न**—रिपब्लिकन पार्टी स्थापन करण्याचे आपण निश्चित केले आहे काय ?

**उत्तर**—हो. ते नक्की ठरले आहे. मी त्या पक्षाची घटनाही तयार केली आहे. त्याच्या प्रिअंबलमध्ये स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्त्व या तत्त्वावर हा पक्ष आधारलेला राहील असे स्पष्ट केले आहे. पार्लमेंटमध्ये येणाऱ्या प्रत्येक विधेयकाची कसोटी या तीन निष्कर्षांवर पाहिली जाईल.

प्रश्न—पण पक्षाचे तत्त्वज्ञान कोणते राहील ?

उत्तर—पक्षासाठी मुख्य गरज असते ती कणखर नेत्याची !

प्रश्न—या पक्षाचे स्वरूप व्यापक राहील काय ?

उत्तर—हो ! या पक्षात सर्वांना प्रवेश दिला जाईल.

**द्विभाषिक मुंबई राज्य मोडून काढीन**

प्रश्न—द्विभाषिकाविषयी आपले काय मत आहे ? ते टिकेल का ?

उत्तर—ते मोडून काढणे हे तर माझे आद्य कर्तव्य आहे. ज्या संस्कृतीक सीमा भारतात स्वाभाविकपणे निर्माण झाल्या आहेत, त्या आपण बदलू शकत नाही." (खास अंक पा. २६–२५).

समारंभाची व्यवस्था करणारे कार्यकर्ते आणि दीक्षेसाठी आलेल्या लाखो लोकांची रीघ यामुळे दिनांक १४ ला नागपूरात रात्रौ दोन वाजल्यापासून प्रचंड उत्साही वातावरण तयार होऊ लागले. "समारंभासाठी १४ एकर क्षेत्राचे पटांगण सभोवार तट्या मारून तयार केले होते. मधील मंडप सुमारे ४०'×२०' होता. त्याजवर बौद्धकालीन स्मृती दर्शविणारा स्तूप उभारण्यात आला होता. या मध्यवर्ती मंडपातच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा बौद्धदीक्षाविधी करण्यात आला. दोन्ही बाजूच्या मंडपापैकी एक स्त्रियांकरिता व दुसरा, प्रमुख नागरिकांसाठी होता. मध्यवर्ती मंडपासमोर वृत्तपत्रांच्या वार्ताहरांकरिता खास बसण्याची सोय केली होती. स्वदेशी व परदेशी मिळून जवळजवळ ३० वार्ताहर व फोटोग्राफर्स हजर होते.

मंडपावर व विस्तीर्ण पसरलेल्या मैदानांत ठिकठिकाणी बौद्धधर्मी निशाणे फडकत होती निळा, तांबडा, हिरवा असे पट्टे असलेली ती निशाण होती." (कित्ता पा. ३).

"लाल हाफ शर्टस घातलेल्या नागपूरच्या" समता सैनिक दलाने मैदानापासून अलिकडे चार फर्लांग एवढयावर अंबाझरी रोडचा बंदोबस्त ठेवला होता. मुंबईचे समता सैनिक दलही मैदानातील समुदायाची व्यवस्था ठेवीत होते. एवढी प्रचंड गर्दी पण, मध्य प्रदेशचे पोलीस क्वचित कोठे तुरळक १०/११ पहावयास मिळाले. बाकी शांतता व सुव्यवस्था स्वयंसेवकांनीच ठेवली होती. (कित्ता, पा. ३३)

रविवारी दिनांक १४ ऑक्टोबरला श्री. नानकचंद पहाटेस उठले, त्यांनी आंघोळ केली आणि ते बाबासाहेबांच्या खोलीत गेले. बाबासाहेब बिछान्यांत होते. नानकचंदाचा नमस्कार त्यांनी स्वीकारला. ते म्हणाले, "मला अंघोळीला गरम पाणी आणण्यास नोकरांना सांग, आणि मंडपाकडे जाऊन सर्व व्यवस्था नीट कर, मग तू परत ये". नानकचंद मोटारने मंडपाकडे गेले. कार्य-कर्त्यांनी सर्व व्यवस्था नीट केलेली होती. ती पाहून नानकचंद सुमारे ४५ मिनिटांनी परतले. तोपर्यंत बाबासाहेबांनी न्याहरी केली होती. ते कपडे करून मंडपाकडे जाण्याच्या तयारीत होते. नानकचंदानी बाबासाहेबांना मंडपातील सर्व व्यवस्था उत्तम असल्याचे सांगितले. मग बाबासाहेब, माईसाहेब व नानकचंद हे मोटारने मंडपाकडे ८–५० वाजतां निघाले, महास्थवीर भिक्कू चंद्रमणी हेहि त्याच सुमारास मोटारने आपल्या सहकाऱ्यांच्या बरोबर निघाले. मंडपात महास्थवीर पुढे, मागे बाबासाहेब, उजव्या हातांत दंड घेऊन आणि डावा हात नानकचंदाच्या उजव्या खांद्यावर ठेवून, उजव्याबाजूला माईसाहेब, अशा स्थितीत चालत चालत मंडपात शिरले. व्यासपीठावर चढताच त्यांनी दोन्ही हात जोडून उपस्थित समुदायास नमस्कार केला व ते आसनस्थ झाले. नानकचंद त्यांचे पाय दाबीत बसले. तेव्हा ९–३० वाजले होते.

**"५ लाखावर उपस्थिती**

......अदमासे ५ ते ६ लक्षापर्यंत जनसमुदाय उपस्थित झाला होता. त्यांपैकी जवळ जवळ ३ ते ४ लक्ष लोक बाहेर गांवचेच होते.

त्यावेळी '**भगवान बुद्ध की जय, बाबासाहेब करे पुकार, बौद्ध धर्मका करो स्वीकार**' अशा घोषणांनी वातावरण दुमदुमून गेले.

व्यासपीठावर अग्रभागी एका मेजावर बुद्धाचा ब्रांझचा पुतळा ठेवण्यात आला होता व त्याचे दोन्ही बाजूला एक-एक सिंह होता व समोर धूप प्रज्वलीत होत होता.

**बाबासाहेबांच्या पिताजींच्या पुण्यतिथीचे स्मरण**

समारंभास कु. इंदुताई वराळे यांनी स्वागतपद गाऊन सुरुवात केली. तद्नंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पिताजी, कै. रामजी मालोजी आंबेडकर यांची पुण्यतिथी दिनांक १४ ऑक्टोबर १९५६ रोजीच (ही माहिती चुकीची आहे) असल्यामुळे त्यांच्या स्मृतीस अभिवादन करण्यासाठीं सर्व पांच लाखांवरील जनता काही मिनिटे स्तब्ध राहिली. नंतर डॉ. बाबासाहेब व माईसाहेब यांनी पूज्य चंद्रमणी यांच्यासमोर उभे राहून भगवान बुद्धाच्या मूर्तीपुढे आपले हात एकत्रित जोडून **नमो तस्य भगवतो अरहतो सम्मासम्बुद्धस** (अर्थ— त्या भगवान बुद्धाला माझे नमन असो, की जो **जीवन मुक्त** संपूर्ण व जागृत आहे.) असे पाली भाषेत लागोपाठ तीन वेळां म्हटले". (कित्ता पा. ३).

महास्थवीर चंद्रमणी यांनी बाबासाहेब व माईसाहेब यांच्याकडून पाली भाषेतील सरणत्रयं (तीन अनुसरणे) आणि पंचशीलानि (पांच शीले) म्हणवून घेतली. (कित्ता, पा. ३) त्यानंतर बाबासाहेबांनी घोषणा केली, "**मनुष्य मात्रास नीच मानणाऱ्या हिंदुधर्माचा मी त्याग करतो**". हे शब्द त्यांच्या तोंडून बाहेर पडले तेव्हां त्यांचा कंठ दाटून आला आणि डोळ्यांतून अश्रू वाहूं लागले (कित्ता पा. ३३)

**"बुद्धाच्या चरणी**

शेवटी उभयतांनी (बाबासाहेब व माईसाहेब), भगवान बुद्धाच्या प्रतिमेस स्वच्छ कमलांचा पुष्पहार अर्पण करून, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रत्यक्षात **आपले मस्तक** भगवान बुद्धाच्या चरणी ठेवून तीन वेळा वंदन केले. तदनंतर डॉक्टर साहेब म्हणाले:—" भगिनीनो आणि बंधुजनहो, आम्ही दोघांनीं तुमच्यासमोर भिख्खु **चंद्रमणी** यांच्या हस्ते बौद्ध धर्माचा अनुग्रह केला आहे. **चंद्रमणी** हे भारतातील सर्वांत वयस्क भिख्खु आहेत. आता आमचा जो बौद्धधर्म अनुग्रह झाला तो पाली भाषेत झाला. त्या अनुग्रहाचे मराठी भाषांतर करून, पुनः अनुग्रह घेत आहे. असे म्हणून त्यांनी खालील प्रतिज्ञा घेतल्या.

**बौद्धजनांच्या प्रतिज्ञा**

(१) मी ब्रह्मा, विष्णु, महेश यांना देव मानणार नाही किंवा त्यांची उपासना करणार नाही.

(२) राम व कृष्ण यांना देव मानणार नाहीं किंवा त्यांची उपासना करणार नाही.

(३) गौरी-गणपती इत्यादि हिंदुधर्मातील कोणत्याहि देवदेवतेस मानणार नाही किंवा त्यांची उपासना करणार नाही.

(४) देवाने अवतार घेतले, यावर माझा विश्वास नाही.

(५) बुद्ध हा विष्णूचा अवतार होय हा खोटा आणि खोडसाळ प्रचार होय, असे मी मानतो.

(६) मी श्राद्धपक्ष करणार नाही, पिंडदान करणार नाही.

(७) बौद्ध धर्माच्याविरुद्ध विसंगत कोणतेच आचार करणार नाही.

(८) कोणतेहि क्रियाकर्म ब्राह्मणांचे हातून करवून घेणार नाही.

(९) सर्व मनुष्यमात्र समान आहेत, असे मी मानतो.

(१०) मी समता स्थापन करण्याचा प्रयत्न करीन.

(११) भगवान बुद्धाने सांगितलेल्या अष्टांग मार्गाचा अवलंब करीन.

(१२) भगवंताने सांगितलेल्या दहा पारमिता मी पाळीन.

(१३) सर्व प्राणीमात्रावर दया करीन, त्यांचे लालन पालन करीन.

(१४) चोरी करणार नाही.

(१५) खोटे बोलणार नाही.

(१६) व्यभिचार करणार नाही.

(१७) दारू पिणार नाही.

(१८) ज्ञान, शील आणि करुणा या बौद्धधर्माच्या तीन तत्त्वांची सांगड घालून मी माझे जीवन चालवीन (व्यतीत करीन).

(१९) माझ्या जुन्या मनुष्यमात्राच्या उत्कर्षाला हानिकारक असणाऱ्या आणि मनुष्य-मात्राला असमान व नीच मानणाऱ्या हिंदुधर्माचा मी त्याग करतो व बुद्धाच्या धर्माचा स्वीकार करतो.

(२०) तोच सद्धर्म आहे अशी माझी खात्री पटलेली आहे.

(२१) माझा नवा जन्म होत आहे असे मी मानतो.

(२२) इतःपर बुद्धाच्या शिकवणीप्रमाणे वागेन अशी प्रतिज्ञा करतो.

हा संपूर्ण समारंभ सुमारे ५० मिनिटे चालू होता. स्वतः बाबासाहेब आंबेडकर आणि सौ. माईसाहेब यांचा दीक्षाविधी ९-४० ते ९-४५ या पांच मिनिटांत झाला. (विधी संपताच बाबासाहेबांनी बुद्धमूर्तीपुढे नम्र मस्तक करून तीन वेळा मूर्तीला नमन केले.) बौद्ध धर्मदीक्षा घेतल्यानंतर बाबासाहेबांना पुष्पहार घालून त्यांचे स्वागत करण्यात आले. नंतर १० वाजता सामुदायिक दीक्षाविधी व 'शरणाच्या त्रिवार घोषणेनंतर **डॉ. बाबासाहेब आंबेडकर की जय** चा निनाद वातावरणात घुमला.

या वेळी अ. भा. महाबोधी समितीचे सरचिटणीस श्री. वाली सिन्हा यांनी बाबासाहेबांना एक चिकण मातीची बुद्ध प्रतिमा भेट म्हणून दिली.

या वेळी सारनाथचे थेरो भिख्खु सध्दातिसा, भिख्खु परमशांति, **सयामचे शंघटरना** सांचीचे पन्नातिसा, हुबळीचे परमशांती भिक्षु पण्णानंदा हे उपस्थित होते " (कित्ता पा ३–४).

"याच वेळी न्या. भवानी शंकर नियोगी, श्री. कुलकर्णी (बुद्ध समितीचे चिटणीस), औरंगाबादच्या मिलिंद कॉलेजचे प्रिन्सिपाल श्री. एम्. व्ही. चिटणीस, श्री. बी. एस. कबीर आदि सवर्ण हिंदूंनीही बौद्ध धर्माची दीक्षा घेतली." (पा. ३४) दीक्षा समारंभाचे फोटो व फिल्म घेण्यात आली.

□□□

## प्रकरण ३ रे

# बौद्धधर्म दीक्षा (पुढे चालू)

रविवार दिनांक १४ ऑक्टोबर विजया दशमीचा दीक्षाविधी संपल्यानंतर बाबासाहेबांचे अभिनंदन आणि अभीष्टचिंतन करणारे संदेश वाचून दाखविण्यात आले. हे संदेश ब्रह्मदेशाचे पंतप्रधान यू-बा-स्वे, त्याच देशाचे माजी पंतप्रधान यू-नू, पूर्व-पाकिस्तान बुद्धिस्ट कॉन्फरन्सचे पूज्य प्रियदर्शी सिहावीर, आंध्र बुद्धिस्ट असोशियशनचे अध्यक्ष पी. बी. सेनगुप्ता, बौद्ध धर्मांकुवर सभेचे (कलकत्ता) डॉ. अरविंद बारुआ, एम.ए., पीएच.डी., बार-अॅट-लॉ, कोलंबोचे एच्. डब्ल्यू. अमरसुरीया, रंगूनचे महाथेरो पन्नलोक; कोझिखोडे येथील महाबोधी बुद्धिस्ट मिशनचे भिख्खू धर्मानंद वगैरे महापुरुषांकडून आलेले होते. (प्र. भा. खास अंक पा. २). त्यानंतर बाबासाहेबांनी लाखो उपस्थितांना स्वतः दीक्षा दिली. ती म्हणजे त्रिशरण व बुद्ध-वंदना उच्च स्वरांत म्हणून व उपस्थितांना त्याचे अनुकरण करावयास सांगून म्हणावयास लावले.

सोमावार दिनांक १५ ऑक्टोबरला सकाळी १० ते १२ पर्यंत बाबासाहेबांचे बौद्धधर्माचा स्वीकार यासंबंधी उद्बोधक, स्फूर्तिदायक आणि अत्यंत तळमळीचे, माहितीपूर्ण भाषण, दीक्षामंडपात झाले. लाखो लोक, ते भाषण उन्हात उभे राहून व जागा मिळेल तसे बसून, एकाग्रतेने ऐकत होते. ते भाषण असे :—

" सर्व बौद्धजन हो ! आणि उपस्थित पाहुणे मंडळी !

काल आणि आज सकाळी जो बौद्धदीक्षा घेण्याचा व देण्याचा विधीसमारंभ या ठिकाणी घडून आला, त्याचें स्थान विचारवंत लोकांना कदाचित अवघड वाटत असेल. त्यांच्या व माझ्याहि मताने कालचा समारंभ आज व आजचा समारंभ काल व्हावयास पाहिजे होता. आपण हे कार्य अंगावर कां घेतले, त्याची जरुरी काय, व त्याने काय होईल, याची छाननी करून घेणें आवश्यक आहे. ते समजाऊन घेण्यानेच आपल्या कार्याचा पाया मजबूत होईल. हें समजावून घेण्याचे कार्य आधी व्हात्रयास हवें होतें. परंतु कांहीं गोष्टी अशा अनुचित असतात कीं, त्या आपोआप घडत असतात. आतां या विधीबाबत व्हावयाचे तसे घडले आहे खरें. तथापि अशी दिवसांची अदलाबदली झाली तरी मोठेंसे कांहीं बिघडलेलें नाहीं.

**नागपूर का निवडले**

पुष्कळसे लोक मला असा प्रश्न करतात की, या कार्याकरितां नागपूर शहर हेंच कां ठरविलें ? अन्य ठिकाणीं हें कार्य का केले नाहीं? कांही लोक असे म्हणतात कीं, आर. एस. एस. ची (राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची) मोठी पलटन नागपूर येथे असल्यामुळे त्यांच्या उरावरती म्हणून

आम्ही ही सभा या शहरात घेतली आहे हें मुळीच खरें नाही. त्यासाठीं नागपूर येथें हे कार्य घेतलेले नाही. आमचें कार्य इतकें मोठें आहें कीं, आयुष्यातील एकएक मिनिट देखील कमी पडते. आपले नाक खाजवून दुसऱ्याला अपशकून करण्यासाठीं मजजवळ वेळ नाहीं.

### नाग लोकांचे नाग-पूर

हें ठिकाण निवडण्याचे कारण निराळें आहे. ज्यांनी बौद्ध इतिहासाचे वाचन केले असेल, त्यांना हें कळून येईल कीं, भारतात बौद्ध प्रसार कोणी केला असेल तर तो नाग लोकांनी केला, नाग लोक आर्यांचे भयंकर शत्रू होतें. आर्य व अनार्य यांच्यामध्ये लढाया व तुंबळ युद्धे झालीं. आर्य लोकांनी नागांना जाळून टाकल्याचे दाखले पुराणांत सापडतात, अगस्ति मुनींनी त्यातून फक्त एक नाग मनुष्य वाचविला. त्याचेच आपण वंशज आहोत, ज्या नाग लोकांना एवढा छळ सोसावा लागला त्यांना वर येण्यास कोणीतरी महापुरुष हवा होता. त्यांना तो महापुरुष गौतमबुद्ध भेटला. भगवान बुद्धाचा उपदेश नाग लोकांनी सर्व भारतामध्ये पसरविला. असें आपण नाग लोक आहोत. नाग लोकांची मुख्य वस्ती नागपूर येथे व आसपास होती असें दिसते. म्हणून या शहरास 'नाग-पूर' म्हणजे नागांचे गाव असे म्हणतात. सुमारे २७ मैलावर नजिकच वहाणारी जी नदी आहे ती नाग-नदी आहे. अर्थातच या नदीचे नांव येथे रहाणाऱ्या लोकांवरून पडले आहे. हे स्थळ निवडण्यांचे मुख्य कारण आहे. नागपूर यामुळें निवडले आहे. यामध्ये कोणालाही खिजविण्याचा कोठेच प्रश्न येत नाही. तशी भावनाहीं नाहीं. आर.एस्.एस्. चें कारण माझ्या मनाला शिवलेही नाहीं. तसा कोणी त्याचा अर्थ करून घेऊ नये.

### विरोधकांची नाहक ओरड

इतर कारणांवरून कदाचित् विरोध वाटू शकेल. हे ठिकाण विरोधासाठी पसंत केलेले नाहीं हे आतां मी सांगितलेलेच आहे. मी जे हें कार्य आरंभले आहे त्यासाठीं माझ्यावर अनेक लोकांनीं व वृत्तपत्रांनी टीका केलेली आहे. काहींची टीका कडक आहे. त्यांच्या मते मी माझ्या गरीब बिचाऱ्या अस्पृश्य लोकांना भलतीकडेच नेत आहे. आज जे अस्पृश्य आहेत ते तसेच अस्पृश्य रहातील, व जे हक्क अस्पृश्यांना मिळाले आहेत ते मात्र नष्ट होतील, असे सांगून आमच्यांतील कांहीं लोकांना ते बहकवीत आहेत. आमच्यातील अज्ञ लोकांना पगदंडीने जा असें ते म्हणतात. आमच्यातील कांहीं तरुण व वयोवृद्ध लोकांवर त्याचा परिणाम होत असेल. यामुळें लोकांच्या मनामध्यें संशय निर्माण झाले असतील तर त्या संशयाची निवृत्ति करणें हें आपले कर्तव्य आहे; आणि अशा संशयाची निवृत्ति करणे म्हणजेच आपल्या या चळवळीचा पाया मजबूत करणे आहे.

### केसरी मधील त्या वेळचा प्रचार

मागें आपण लोकांनी मांस खाऊ नये म्हणून चळवळ केली होती. त्यामुळे स्पृश्य लोकांवर मोठी गदा आल्याप्रमाणे त्यांना वाटत होते. त्यांनी जिवंत म्हशीचे दूध प्यावयाचे आणि ती म्हैस मेल्यावर मात्र आम्ही मृत म्हशीला खांद्यावर घेऊन जावयाचे, हा प्रकार विचित्रच नव्हे काय? आम्ही त्यांना म्हणतो कीं, तुमची म्हातारी मेली तर तिला आम्हाला का नेऊ देत नाही? त्यांनी मेलेली म्हस द्यावी, तशी म्हातारीही द्यावी. त्या वेळी, कोणी तरी मनुष्य 'केसरी'मधून पत्र व्यवहार करून, अमूक अमूक गावी दर वर्षाला ५० ढोरे मरतात,

त्यांच्या कातड्यांची, शिंगांची, हाडांची, मांसाची, शेपटीची, खुराची मिळून ५०० रुपये इतकी किंमत होईल व मृतमास सोडल्यामुळे एवढ्या प्राप्तीला हे लोक मुकतील, असा प्रचार त्यावेळी **केसरी** मधून होत असे. त्याच्या प्रचाराला उत्तर द्यायची आवश्यकता खरे म्हणजे होती काय? पण आमच्या लोकांना असे वाटे, या गोष्टीला आमचा साहेब उत्तर देत नाही, तर साहेब करतो तरी काय?

### मृत जनावराच्या कातड्यांचे, शिंगांचे, खुरांचे उत्पन्न

एकदां मी संगमनेरला सभेला गेलो होतो. सभा झाल्यानंतर संध्याकाळी जेवणाची व्यवस्था केली होती. त्यावेळी मजकडे एक चिठ्ठी केसरीच्या बातमीदाराने पाठविली व मला विचारले "अहो, तुम्ही तर तुमच्या लोकांना मेलेली ढोरे ओढू नका म्हणून सांगता, त्यांची हलाखी किती आहे, त्यांच्या बायकांना लुगडे चोळी नाही, त्यांना अन्न नाही, त्यांना शेतीवाडी नाही, अशी त्यांची अत्यंत बिकट परिस्थिती असता, दर वर्षी त्यांना मिळणारे कातड्याचे, शिंगाचे, मांसाचे ५०० रुपयांचे उत्पन्न फेकून द्या म्हणून सांगता, यात तुमच्या लोकांचा तोटाच नाही का?"

### तुम्ही मेलेली ढोरे ओढा आणि घ्या उत्पन्न

मी म्हणालो, तुम्हाला याचे उत्तर देऊ? ते येथे पडवीत देऊ की सभेत देऊ? लोकांच्या समोर सवालपट्टी झालेली बरी. मी गृहस्थांना विचारले, तुमचे म्हणणे एवढेच की आणखी कांही आहे? ते गृहस्थ म्हणाले, एवढेच म्हणणे आहे व तेवढ्याचेच उत्तर द्या. मी त्या गृहस्थास विचारले, तुम्हास मुले माणसे किती आहेत? त्याने सांगितले, मला पाच मुलगे आहेत, भावालाही ५/७ मुले आहेत. मी म्हणालो तर तुमचे कुटुंब मोठे आहे, तेव्हा तुम्ही व तुमच्या नातेवाईकांनी त्या गावची मेलेली सर्व ढोरे ओढावीत, आणि ५०० रुपयांचे उत्पन्न घ्यावे. हा फायदा तुम्ही अवश्य घ्यावा. शिवाय दर वर्षी मी स्वतः तुम्हाला ५०० रुपये वर देण्याची व्यवस्था करतो. माझ्या लोकांचे काय होईल, त्यांना अन्न वस्त्र मिळेल की नाही ते माझे मी पाहुन घेईन. मग एवढी फायद्याची गोष्ट तुम्ही का सोडून देता? तुम्ही का हे करीत नाही? आम्ही हे काम केले म्हणजे फायदा होतो, आणि तुम्ही केले म्हणजे फायदा होत नाही? ओढा ना तुम्ही मेलेली ढोरे?

### महार बनून राखीव जागा घ्या

काल एक ब्राह्मणाचा मुलगा मजकडे येऊन म्हणाला, "पार्लमेंटमध्ये तुमच्या लोकांना राखीव जागा दिल्या आहेत त्या तुम्ही का सोडता?" मी त्यास म्हणालो, तुम्ही महार व्हा व त्या जागा पार्लमेंट-असेंबल्यामध्ये भरा. नोकरी खाली असली की त्या जागा भरतात. त्यासाठी कोणा ब्राह्मणाचे कोणा इतरांचे किती अर्ज येतात; मग नोकऱ्यांच्या जागा भरतात तशा राखीव जागा तुम्ही ब्राह्मण लोक महार बनून का भरत नाही?

### इज्जत प्यारी, लाभ प्यारा नाही

आमचे नुकसान झाले तर तुम्ही रडता का, असा माझा त्यांना सवाल आहे. खरे म्हणजे मनुष्यमात्राला इज्जत प्यारी असते; लाभ प्यारा नसतो. सद्गुणी व सदाचारी बाईला व्यभिचारामध्ये किती फायदा असतो हे माहित नसते. आमच्या मुंबईत व्यभिचारी बायांची

एक वस्ती आहे. त्या बाया सकाळी ८ वाजता उठल्या की न्याहरीसाठी शेजारच्या हॉटेलात वर्दी देतात आणि म्हणतात, (डॉक्टरसाहेबांनी यावेळी आवाजात फरक करून नक्कल करून सांगितले), "सुलेमान, अरे, खिम्याची प्लेट व पाव रोटी घेऊन ये." तो सुलेमान ते घेऊन येतो. शिवाय चहा, पाव, केक, वगैरेही आणतो. पण माझ्या दलित वर्गीय भगिनींना साधी चटणी-भाकरी देखील मिळत नाही; मात्र त्या इज्जतीने राहतात. त्या सदाचारानेच राहतात.

**पोरकटपणा सोडून प्रौढ बना**

**आम्ही झगडतो आहोत ते इभ्रतीकरिता! मनुष्यमात्राला पूर्णावस्थेस नेण्यांकरिता आम्ही तयारी करीत आहोत. त्यासाठी वाटेल तो त्याग करण्याची आमची तयारी आहे. हे वृत्तपत्राचे लेखक (त्यांच्या कडे वळून) माझ्या मागे गेली ४० वर्षे हात धुवून लागले आहेत. माझ्यावर केवढी टीका त्यांनी आजवर केली! मी त्यांना म्हणतो अजून तरी विचार करा. आता तरी पोरकटपणांची भाषा सोडून प्रौढ भाषा वापरा !**

**हक्क पुनः मिळवूच**

**आम्ही बौद्ध धर्मीय झालो तरी राजकीय हक्क (मी) मिळवीन याची मला बालंबाल खात्री आहे ( डॉ. बाबासाहेब आबेडकरांचा जयघोष व प्रचंड टाळ्या). मी मेल्यावर काय होईल सांगता येणार नाही. या चळवळीसाठी फार मोठे काम करावें लागेल. आम्ही बौद्ध धर्म स्वीकारल्यामुळे काय होईल, अडचणी असल्याच तर त्या कशा टाळता येतील, त्यासाठी काय युक्तिवाद व खटाटोप करावा लागेल, याचा मी पूर्ण विचार केला आहे. माझ्या पोतडींत सर्व कांही भरलेले आहे. जे भरलेलें आहे तें काय प्रकारानें भरलेले आहे तें मला पूर्ण माहित आहें. हे जे हक्क मिळविलें ते मीच माझ्या लोकांच्यासाठीं मिळविलें. ज्यांनें हें हक्क मिळविले ते तों पुन: मिळवून देईलच!** हे हक्क व सवलती मिळवून देणारा मीच आहे. आणि मी पुन: या सवलती मिळवून देईन अशी मला खात्री आहे. म्हणून सध्या तरी तुम्ही माझ्यावर विश्वास ठेऊन चालले पाहिजे. विरोधी प्रचारात काही तथ्य नाही हे मी सिद्ध करून देईन.

**नरकांतून सुटलों**

मला एका गोष्टीचे मात्र आश्चर्य वाटते. एवढा वादविवाद सर्वत्र होतो आहे. पण एकाही माणसाने "मी बौद्ध धर्मच का स्वीकारला ?" हा प्रश्न मला विचारला नाही, कोणताही धर्म न स्वीकारता हाच धर्म का स्वीकारला, हा कोणत्याही धर्मांतरांच्या चळवळीतील मुख्य व महत्त्वाचा प्रश्न असतो. धर्मांतर करताना धर्म कोणता व का? घ्यावयाचा हे तावूनसुलाखून पाहिले पाहिजे. आम्ही हिंदुधर्मत्यागाची चळवळ १९३५ पासून येवले येथे, एक ठराव करून हाती घेतली. **'मी हिंदु धर्मांत जन्मलो असलों तरी हिंदुधर्मांत रहाणार नाहीं' अशी प्रतिज्ञा मी मागेच केली होती आणि काल मी ती खरी करून दाखविली. मला इतका आनंद झाला आहे–हर्षवायूच झाला आहे. नरकातून सुटलो असें मला वाटत आहे. बौद्ध धर्म स्वीकारणारे मला कोणी अंधभक्त नको आहेत. ज्यांना बौद्ध धर्मात जायचे आहे, त्यांनी जाणीवेनें आले पाहिजे. त्यांना तो धर्म पटला पाहिजे.**

**कार्ल मार्क्सचा पंथ व आम्ही**

मनुष्य मात्राच्या उत्कर्षाला धर्म ही अत्यंत आवश्यक वस्तू (बाब) आहे. मला माहीत आहे की, **कार्ल मार्क्सच्या** वाचनामुळे एक पंथ निघाला आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे धर्म म्हणजे

काहीच नाही. त्यांना धर्माचे महत्त्व नाही. त्यांना सकाळी ब्रेकफास्ट (न्याहरी) मिळाली त्यात पाव, मलई, लोणी, कोंबडीची टांग वगैरे असले, पोटभर जेवण मिळाले, निवांत झोप मिळाली, सिनेमा पहावयास मिळाला, की सगळे संपले. हे त्यांचे तत्त्वज्ञान! मी त्या मताचा नाही. माझे वडील गरीब होते, म्हणून मला या प्रकारचे सुख कांही मिळाले नाही. माझ्याइतके कष्टमय जीवन कोणीही आयुष्यात काढलेले नाही. म्हणून माणसाचे जीवन समाधानाच्या अभावी कसे कष्टमय होते याची मला जाणीव आहे. **आर्थिक उन्नतीची चळवळ आवश्यक आहे. असे मी मानतो. त्या चळवळी विरुद्ध मी नाही. माणसाची आर्थिक उन्नती व्हावयास पाहिजेच.**

### रेडा, बैल व माणूस

पण मी याबाबत एक महत्त्वाचा फरक करतो. रेडा, बैल व माणूस यांमध्ये फरक आहे **रेडा व बैल यांना रोज वैरण लागते. माणसासही अन्न लागते मात्र दोहोंत फरक हा आहे कीं रेडा व बैल यांना मन नाहीं; मनुष्याला शरीराबरोबर मनहि आहे, म्हणून दोन्हीचाही विचार करावयास हवा. मनाचा विकास झाला पाहिजे. मन सुसंस्कृत झाले पाहिजे, तें सुसंस्कृत बनविले पाहिजे. ज्या देशांतील लोक अन्नाशिवाय माणसांचा सुसंस्कृत मनाशी संबंध नाही, असे म्हणतात, त्या देशाशी अगर लोकांशी संबंध ठेवण्याचे मला कांहींच प्रयोजन नाही. जनतेशी संबंध ठेवतांना माणसांचे शरीर जसे निरोगी पाहिजे, तसे शरीर सुदृढ होण्याबरोबर मनहि सुसंस्कृत झाले पाहिजे. एरवीं मानव जात उदयास आली असे म्हणता येणार नाही.**

### उत्साहाचे मूळ, सुसंस्कृत मन

मनुष्याचे शरीर अथवा मन हे रोगी का असते? त्याची कारणे ही की, त्यास एकतर शारीरिक पीडा असते, किंवा मनाला उत्साह नसतो. मनात उत्साह नसेल तर अभ्युदयही नाही. हा उत्साह का रहात नाही? त्याचे पहिले कारण हे की, मनुष्यास अशा रीतीने ठेवण्यात आले आहे की, त्याला वर येण्याची संधी मिळत नाही अगर आशा रहात नाही. त्यावेळी त्यास उत्साह कोठून असणार? तो रोगीच असतो. ज्या माणसाला आपल्या कृतीचे फळ मिळू शकते, त्यास उत्साह प्राप्त होतो. नाही तर शाळेत असे शिक्षक म्हणू लागला, कोण रे हा? हा तर महार? आणि हा महारडा पहिल्या वर्गात पास होणार? त्याला पहिला वर्ग कशाला पाहिजे? तू आपल्या ४ थ्या वर्गातच रहा. पहिल्या (५ वीं) वर्गात येणे हे ब्राह्मणाचे काम! अशा व्यवस्थेत या मुलाला काय उत्साह मिळणार? त्याची उन्नती ती काय होणार? उत्साह निर्माण करण्याचे मूळ मनात आहे. ज्यांचे शरीर व मनही धडधाकट असेल, जो हिम्मतबाज असेल, मी कोणत्याही परिस्थितीतून झगडून बाहेर (येईन) असा ज्यास विश्वास वाटतो, त्यामध्येच उत्साह निर्माण होतो, व त्याचाच उत्कर्ष होतो. हिंदु धर्मात अशी विलक्षण तत्त्वप्रणाली ग्रथित केलेली आहे की, त्यापासून उत्साहच वाटत नाही! माणसाला निरुत्साही करून टाकणारी परिस्थिती हजारों वर्षे टिकली तर जास्तीत जास्त कारकुनी करून पोट भरणारे लोक होतील. या पलिकडे दुसरे काय होणार? या कारकुनांचे रक्षण करण्यास मोठा कारकून पाहिजे.

### लंगोटी लावून शिक्षण केलें

मनुष्याच्या उत्साहाला काही कारण असेल तर मन! तुम्हाला मिलचे मालक माहीत आहेत. ते गिरण्यावर मॅनेजर नेमतात, व त्यांच्या करवी मिलमधील काम करवून घेतात. हे मिलचे मालक कसल्या ना कसल्या व्यसनांत असतात. त्यांच्या मनाचा सुसंस्कृत असा विकास झालेला नसतो. आपल्या मनाला उत्साह वाटावा म्हणून आपण चळवळ केली. तेव्हां कोठे शिक्षण सुरूं झालें. मी लंगोटी घालून शिक्षणाला सुरवात केली. शाळेमध्ये मला प्यावयास पाणी सुद्धा मिळाले नाहीं. पाण्याशिवाय मी किती दिवस काढले! मुंबईसारख्या एल्फिन्स्टन कॉलेजमध्यें देखील अशीच परिस्थिती होती. अशी परिस्थिती असेल तर दुसरी काय अवस्था निर्माण होणार? कारकुनीच निर्माण होईल!

### हिंदु, मुसलमान व आम्ही

मी दिल्लीच्या एक्झिक्युटिव्ह कौंसिलमध्यें असतांना **लॉर्ड लिन्‌लिथगो** व्हाईसरॉय होते. मी त्यांना म्हणालो, तुम्ही सर्वसामान्य खर्च तर करताच, पण मुसलमानांकरितां **अलिगड** युनिव्हर्सिटीस तीन लाख रुपये शिक्षणाकरतां खर्च करता. त्याच प्रमाणें बनारसच्या हिंदु-विद्यापीठासही तुम्ही तीन लाख रुपये देतां. मात्र आम्ही हिंदुहि नाही कीं मुसलमानहि नाहीं. आमच्यासाठीं कांहीं करावयाचे म्हटलें तर त्यांच्या हजारो पटीनें जास्त करावयास हवें. निदान, आमच्यासाठीं मुसलमाना इतकें तरी करा. तेव्हां लिनलिथगोनें सांगितलें, तुला याबाबत काय लिहून आणावयाचें तें आण! त्याप्रमाणें मी एक मेमोरँडम लिहिला. तें मेमोरँडमचें चोपडे अजून आहे. युरोपियन लोक मोठे सहानुभूतीचे होते. त्यांनीं माझें म्हणणें मान्य केलें. पण घोडें जें पेंड खाऊ लागले तें हे पैसे कोणत्या गोष्टीवर खर्च करावयाचे त्यावर! त्यांना वाटत होते आमच्यांतील मुली शिकलेल्या नाहींत, त्यांना शिक्षण द्यावें, त्यांची बोर्डिंग काढात्रीत व त्यावर ते पैसे खर्च करावेत. आमच्यातील मुलींना शिकविले व सुशिक्षित केले तरी त्यांना वेगवेगळ्या पक्वांनांचे पदार्थ करावयास घरीं सामान कोठें आहे? त्यांच्या शिक्षणाचा शेवटी परिणाम काय? इतर गोष्टींवर वरील रक्कम सरकारनें खर्च केली व शिक्षणावरील रक्कम अडवून ठेवली.

### राजवाड्याच्या टोंकावर बसणारी माणसें

**म्हणून एके** दिवशीं मी लिन्‌लिथगोकडे गेलों; आणि या शिक्षणावरील खर्चाबाबत म्हणालों, तुम्हाला राग येणार नसेल तर एक प्रश्न विचारतो. मी एकटा ५० ग्रॅज्युएटस्‌च्या समान आहे कीं नाहीं? तें त्यांना मान्य करावें लागलें, नंतर मी पुन: विचारलें, याचें कारण काय? ते म्हणालें, ते कारण आम्हास माहित नाहीं. मी म्हणालों कीं माझी विव्दत्ता एवढी मोठी आहे कीं, मी राजवाड्याच्या **टोंकावर जाऊन बसूं शकतो. मला अशी माणसें हवीं आहेत. कारण तेथून सर्वत्र टेहळणी करता येते. आमच्या लोकांचे संरक्षण करावयांचे असेल तर अशी पारध करणारी माणसें निर्माण झाली पाहिजेत. कारकून काय करणार ?** त्यासरशी लिन्‌लिथगोस माझे म्हणणें पटलें, व त्या वर्षी १६ विद्यार्थ्यांना विलायतेंत उच्च शिक्षण घेण्यास पाठविण्यांत आले. त्या १६ जणांपैकीं, कांहीं मडकी जशी कच्ची कांहीं पक्की असतात, त्याप्रमाणें कांहीं कच्ची कांहीं पक्की निघाली, ही, गोष्ट निराळी! पुढें **राजगोपालचारी** यांनी ही उच्च शिक्षण योजना रद्द करून टाकली.

### हजारो वर्षांची निरुत्साही परिस्थिती

या देशांत, आम्हाला हजारो वर्षे निरुत्साही करुन ठेवील अशी परिस्थिती आहे. ही परिस्थिती जोपर्यंत आहे तोपर्यंत आपल्या उन्नतीबद्दल उत्साह उत्पन्न होणे शक्य नाही. या बाबतींत, या धर्मात राहून आम्ही कांहींच करू शकत नाही. मनुस्मृतीमध्यें चातुर्वर्ण्य सांगितले आहें. चातुर्वर्ण्य व्यवस्था ही मनुष्य मात्राच्या उत्कर्षाला अत्यंत घातुक आहे. मनुस्मृतींत लिहिलें आहे कीं, शूद्रांनीं फक्त सेवाचाकरी करावी त्यांना शिक्षण कशाला? ब्राह्मणानें शिक्षण घ्यावें, क्षत्रियानें शस्त्रे धारण करावीत, वैश्याने व्यापार उदीम करावा, व शूद्रानें चाकरी करावी, ही घडी कोण उलगडू शकेल? ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य वर्णांच्या लोकांना काहींना कांहीं फायदा आहे. शूद्रांचे काय? तीन वर्ण सोडले तर इतर जातींत काही उत्साह उत्पन्न होईल. काय? चातुर्वर्ण्याची व्यवस्था कांहीं फुकाफुकी नाही. ही रूढी नाही. हा धर्म आहे.

### चातुर्वर्ण्य, गांधी व नष्ट धर्म

हिंदुधर्मामध्ये समता नाहीं. गांधीना एकदां मी भेटावयास गेलों असतां ते म्हणाले मी चातुर्वर्ण्य मानतो. मी म्हणालो तुमच्या सारखे महात्मे चातुर्वर्ण्य मानतात, पण हें चातुर्वर्ण्य कोणते व कसे? (हाताचा पंजा उलट सुलट करुन दाखवीत) हे चातुर्वर्ण्य उलट कीं सुलट? चातुर्वर्ण्याची सुरुवात कोणाकडून व शेवट कोणाकडून? गांधीनीं या प्रश्नांचे उत्तर दिले नाहीं. आणि देणार तरी काय? आमचा ज्या लोकांनी नाश केला. त्यांचा देखील या धर्माने नाश होईल, हा मी हिंदुधर्मावर उगीच आरोप करीत नाही, हिंदुधर्मामुळे कोणाचाहि उद्धार होऊं शकणार नाही. तो धर्मच नष्ट धर्म आहे.

### आम्हाला शस्त्रे धारण करण्याचा अधिकार असतां तर

आपला देश परकीयांच्या ताब्यात कां गेला? युरोपमध्ये १९४५ पर्यंत लढाया चालू होत्या. जेवढ सैन्य मरत असे तेवढे रिक्रूट भरतीमुळे पुढे येत असे. त्यावेळी कोणीही आम्ही लढाई जिंकली असें म्हटले नाही. आमच्या देशाचें सगळे कांही निराळे! क्षत्रिय मेले कीं आम्ही खलास! आम्हांला जर शस्त्रे धारण करण्याचा अधिकार असतां तर हा देश पारतंत्र्यांत गेला नसता. मग कोणीही हा देश जिंकू शकले नसतें.

### उत्कर्ष बौद्ध धर्मानेच होईल

हिंदुधर्मामध्ये राहून कोणाचा कांहींहीं उद्धार होणार नाहीं. कांहींना हिन्दुधर्म रचनेप्रमाणे वरिष्ठ वर्णांना व जातींना फायदे आहेत हे खरे आहे. पण इतरांचे काय? ब्राह्मण बाई-बाळंतीण झाली की तिची नजर हायकोर्ट जज्जची जागा कोठे रिकामी आहे त्याकडे असते आमची झाडूवालीबाई बाळंतीण झाली तर तिची नजर कोठे झाडूवाल्याची जागा रिकामी आहे तिकडे असते. अशी विचित्र रचना हिंदु धर्माच्या वर्णव्यवस्थेने केलेली आहे. यांतून सुधारणा ती काय होणार? उत्कर्ष हा फक्त बौद्ध धर्मानेच होऊ शकेल.

**भगवंताचा समतेचा उपदेश**

बौद्धधर्मांत ७५ टक्के ब्राह्मण भिख्खु होते. २५ टक्के शूद्रादि होते. परंतु, भगवंतांनी सांगितले "हे भिख्खु हो ! तुम्ही निरनिराळ्या देशांतून व जातीतून आला आहांत. ज्या प्रमाणे आपल्या प्रदेशांतून नद्या वहातात, तेव्हां त्या पृथक पृथक असतात, मात्र त्या सागरास मिळाल्या कीं त्या पृथक रहात नाहींत त्या एकजीव व समान होतात. बौद्ध संघ हा सागराप्रमाणे आहे. या संघांत सर्व सारखे समान! सागरांत गेल्यावर हे गंगेचे पाणी किंवा हे महा-नदीचे पाणी ओळखणे अशक्य असते. त्याप्रमाणे बौद्ध संघात आले म्हणजे आपली जात जाते व सर्वजण समान असतात." असें समतेने सांगणारा एकच महापुरुष आहे, आणि तो महापुरुष म्हणजे भगवान बुद्ध होय. (प्रचंड टाळ्या).

**माझ्यावरील प्रचंड जबाबदारी**

काही लोक असे म्हणतात, तुम्ही धर्मांतर करण्यास इतका अवधी कां लावला? इतके दिवस काय करीत होता? हा प्रश्न महत्त्वाचा आहे. धर्म पटवून देणे हें काम सोपे नाहीं. तें एका माणसाचें काम नाही. धर्माबाबत विचार करणाऱ्या कोणत्याही माणसास हे समजून जगता येईल. माझ्यावर जेवढी जबाबदारी आहे तेवढी जबाबदारी जंगलातील कोणत्याही माणसावर नाहीं. मला अधिक आयुष्य लाभल्यास मी योजलेले कार्य पूर्ण करीन ! (डॉ. बाबासाहेब चिरायु होवोतच्या घोषणा व निनाद ! )

**महार बौद्ध म्हणून हिणवू नका**

महार बौद्ध झाले तर काय होईल, असे कांही लोक म्हणतील. असें त्यांनी म्हणू नयें, असे माझें त्यांना सांगणे आहे. ते त्यांना धोकादायक होईल. वरिष्ठ व संपत्तिवान वर्गाला धर्माची आवश्यकता वाटणार नाही. त्यांच्यामधील अधिकारावर असलेल्या साहेब लोकांना राहण्यास बंगला आहे. त्यांची सेवा करावयास चाकर नोकर आहेत, त्यांना धनसंपत्ती आहे. मानमरातब आहे. अशा माणसांना धर्माबद्दल विचार किंवा चिंता करण्याचे कारण नाहीं.

**धर्माची आवश्यकता गरिबांना**

**धर्माची आवश्यकता गरिबांना आहे. पीडित लोकांना धर्माची आवश्यकता आहे. गरिब मनुष्य जगतों तो आशेवर (Hope)! जीवनाचे मूळ आशेत आहे. ही आशाच नष्ट झाली तर जीवन कसे होईल ! धर्म आशादायी बनवतो, व पीडितांना, गरिबांना संदेश देतो, " कांही घाबरू नकोंस, होईल, जीवन आशादायी होईल." म्हणून गरीब व पीडित मनुष्यमात्र धर्माला चिकटून रहातो.**

**ख्रिस्त धर्माचा इतिहास काय सांगतो ?**

जेव्हां युरोपमध्ये ख्रिस्ती धर्म शिरला त्यांवेळी रोमची व आसपासच्या देशांची परिस्थिती अतिशय हलाखीची होती. लोकांना पोटभर जेवणही मिळत नव्हते. त्यावेळी गरीब लोकांना

खिचडी वाटण्यात येत असे. यावेळी ख्रिस्तांचे अनुयायी कोण झाले? गरीब पीडलेले लोकच झाले. युरोपमधील सर्व गरीब व कनिष्ठ जनता, ख्रिस्ती बनली. हा ख्रिश्चन धर्म भीक मागणारांचा आहे, असे **गिबनने** म्हटले होते. ख्रिस्ती धर्म हा युरोपमध्ये सर्वांचा धर्म कसा झाला, याचे उत्तर द्यावयास **गिबन** हयात नाही. त्याचे उत्तर त्याला द्यावे लागले असते.

### जग बुद्धालाच मानते

काही लोक असे म्हणतील, हा बौद्धधर्म महारड्या मांगांचा धर्म आहे. ब्राह्मण लोक भगवंताला **भो गौतम** म्हणजे 'अरे गौतम' असे म्हणत असत. ब्राह्मण बुद्धाला असे हिणवीत, चिडवीत असत. पण **राम, कृष्ण, शंकर,** यांच्या मूर्ती परदेशांत विकावयास ठेवल्यातर, (घेणारे) किती सापडतील ते पहावे. पण बुद्धाची मूर्ती ठेवली तर एकही मूर्ती शिल्लक रहाणार नाही. (टाळ्यांचा कडकडाट) आता घरातल्या घरात (भारतात) हे पुष्कळ झाले. बाहेर काही दाखवा. जगात नाव जाहीर आहे ते फक्त **बुद्धांचेच! तेव्हा बौद्ध धर्माचा** हा प्रसार झाल्याशिवाय कसा राहील?

### आमचा मार्ग बौद्ध मार्ग

आमच्या वाटेने आम्ही जाऊ; तुमच्या वाटेनें तुम्ही जावे. हा आशेचा दिवस आहे. हा अभ्युदयाचा, उत्कर्षाचा मार्ग आहे. हा मार्ग काही नवीन नाही. हा मार्ग कोठून आणलेला नाही. हा मार्ग येथलाच आहे, भारतातीलच आहे. या देशामध्ये २००० वर्षे बौद्ध धर्म होता. खरे म्हणजे, या पूर्वीच आम्ही बौद्ध धर्मात का गेलो नाही, याचीच आम्हाला खंत वाटते. भगवान बुद्धाने सांगितलेली तत्त्वे अजरामर आहेत. पण बुद्धाने मात्र तसा दावा केलेला नाही. कालानुरूप बदल करण्याची सोय त्यात आहे. एवढी उदारता कोणत्याही धर्मात नाही.

### मिलिंद व नागसेन

बौद्ध धर्माचा नाश झाला याचे मुख्य कारण मुसलमानांच्या स्वाऱ्या हे होय. मुसलमानीं स्वाऱ्यांमध्ये मूर्ती फोडून टाकल्या गेल्या. त्याचे बौद्ध धर्मावर यामुळे पहिले आक्रमण झाले. त्यांच्या स्वाऱ्यांना भिऊन बौद्ध भिक्खू नाहीसे झाले. कोणी तिबेटला गेले! कोणी चीनला गेले, कोणी कोठे गेले! धर्माचे रक्षण करण्यासाठी उपासक लोक हवे असतात. वायव्य सरहद्द प्रांतात एक ग्रीक राजा होता, त्याचे नाव **मिलिंद.** हा राजा सदोदित वादविवाद करीत असे. वादविवादाची त्यास मोठी आवड होती. तो हिंदूंना सांगे, जो कोणी वादविवादपटु असेल त्याने येऊन वादविवाद करावा. त्याने पुष्कळांना निरुत्तर केले होते. एकदा त्याला बौद्ध लोकांबरोबर वादविवाद करावा असे वाटले; व वादविवादपटु कोणी बौद्ध असल्यास त्यास घेऊन यावे असे त्याने सांगितले. तेव्हा बौद्ध लोकांनी **नागसेनास** विनंती केली की तुम्ही या वादविवादांत बौद्धजनांची बाजू मांडावी. **नागसेन** विद्वान होता. तो ब्राह्मण होता. नागसेनाचा व मिलिंदचा जो वादविवाद झाला तो पुस्तक रूपाने जगाला महशूर आहे. त्या पुस्तकाचे नाव '**मिलिंद पन्ह**' आहे. मिलिंदाने असा प्रश्न विचारला की, धर्मास ग्लानी का येते? नागसेनाने त्याचे उत्तर देऊन त्याची तीन कारणे सांगितली.

**धर्मग्लानीची तीन कारणे**

**(१) पहिले कारण हे कीं, एखादा धर्मच कच्चा असतो, त्या धर्माच्या मूळ तत्वांत गांभिर्य नसते. तो कालिक धर्म बनतो व कालानुसार असा धर्म टिकतो.**

**(२) दुसरे कारण हे की, धर्मप्रचार करणारे विद्वान लोक नसतील तर धर्मग्लानी होते, ज्ञानी माणसांनी धर्मज्ञान सांगितले पाहिजे. विरोधकांशी वादविवाद करण्यास धर्माचे प्रचारक सिद्ध नसतील तर धर्माला ग्लानी येते.**

**(३) आणि तिसरे कारण हें कीं, धर्म व धर्माची तत्त्वे विद्वानांसाठी असतात. प्राकृत व सामान्य लोकांकरिता मंदिरे, देवळे असतात. ते तेथे जाऊन आपल्या श्रेष्ठ विभूतीचे पूजन करतात.**

**एकमेव उदारतेचा धर्म**

आपण बौद्ध धर्म स्विकारताना ही कारणें लक्षात ठेवली पाहिजेत. बौद्ध धर्माचीं तत्त्वे कालिक (काही कालापुरती) आहेत असे कोणासही म्हणता यावयाचे नाही. आज २५०० वर्षांनंतर ही बुद्धाची सारी तत्त्वे सर्व जग मानते. अमेरिकेमध्ये बुद्धाच्या २००० संस्था आहेत. इंग्लंडमध्ये ३,००,००० रुपये खर्च करून बौद्ध मंदिर बांधण्यात आलेले आहे. जर्मनीतही ३/४ हजार बौद्ध संस्था आहेत. बुद्धाची तत्त्वे अजरामर आहेत. तथापि, बुद्धाने असा दावा केला नाही की, हा धर्म ईश्वराचा आहे. बुद्धाने सांगितले माझे वडील प्राकृत होते; माझी आई प्राकृत बाई होती, हा धर्म तुम्हाला वाटेल तर घ्यावा. हा धर्म तुमच्या बुद्धीला पटेल तेव्हा तो तुम्ही स्वीकारा. एवढी उदारता कोणत्याही धर्मात सांगितलेली नाही.

**बौद्ध धर्माचे कार्य गरिबांचे दुःख कमी करणे**

बौद्ध धर्माचा मूळ पाया काय आहे? इतर धर्मांत व बौद्ध धर्मात फार फरक आहे. इतर धर्मात बदल हा घडून यावयाचा नाही. कारण मनुष्य व ईश्वर यांचा संबंध ते धर्म सांगतात. इतर धर्मांचे म्हणणें असे कीं, ईश्वराने सृष्टी निर्माण केली, ईश्वराने आकाश, वायु, चंद्र, सूर्य, सर्व काही निर्माण केले. आम्हाला ईश्वराने काहीही करावयाचे शिल्लक ठेवले नाही. म्हणून ईश्वरास भजावे. ख्रिस्ती धर्माप्रमाणें तर मृत्युनंतर एक **निर्णयाचा दिवस (Day of Judgement)** असतो; व त्या निर्णयाप्रमाणें सर्व काही घडते.

देव व आत्मा यांना बौद्ध धर्मांत जागा नाही. भगवान बुद्धांनी सांगितले जगात सर्वत्र दुःख आहे; ९० टक्के माणसे दुःखाने पीडलेली आहेत. त्या दुःखांतून पीडलेल्या, गरीब माणसांना मुक्त करणे हे बौद्ध धर्माचे मुख्य कार्य आहे. बुद्धापेक्षा कार्ल मार्क्सने वेगळे काय सांगितले? भगवंतांनी जे सांगितले ते वेड्यावाकड्या मार्गाने सांगितले नाही.

**माझ्या बांधवांचे कार्य**

बंधूंनो! मी सांगावयाचे होते ते सांगितले. हा धर्म सर्वतोपरी परिपूर्ण आहे. त्यास लांछन कोठेच नाही. हिंदुधर्माची अशी काही तत्त्वप्रणाली आहे की, त्यामधून उत्साहच निर्माण होऊ शकत नाही. हजारो वर्षांपासून, परवापर्यंत आपल्या समाजामधून एकही मनुष्य ग्रॅज्युएट

अगर विद्वान होऊ शकला नाही. मला सांगावयाला हरकत नाही की, माझ्या शाळेंत झाड-लोट करणारी एक बाई होती. ती मराठी होती. ती मला शिवत नसे. माझी आई मला सांगत असे की, मोठ्या माणसास (मामा, दादा, काका वगैरे) म्हणत जा. पोस्टमनला मी मामा म्हणत असे (प्रचंड हशा). लहानपणी शाळेत असताना मला तहान लागली होती. मी मास्तरांना तसें सांगितलें. मास्तरांनी माझ्या संरक्षणाकरता चपराशाला दुसरीकडून बोलाविले व याला नळावर ने असें सांगितले. आम्ही नळावर गेलों. चपराशानें मग नळ सुरू केला व मी पाणी प्यालों. मला ६/६ दिवस शाळेंत पाणी प्यावयास मिळत नसें. पुढें मला डिस्ट्रिक्ट जज्जाची नोकरी देऊ केली होती. पण ती घोरपड मी गळयांत बांधून घेतली नाही. माझ्या बांधवांचे कार्य कोण करील, असें माझ्या पुढें कोडें होते. म्हणून मी नोकरीच्या बंधनांत अडकलो नाहीं.

### तुमच्या डोकीवरील उतरंड

मला वैयक्तिक रित्या या देशातील कोणतीही गोष्ट अशक्य नाहीं (टाळया). तुमच्या डोक्यावर, वैश्य, क्षत्रिय, ब्राह्मण अशी जी उतरंड रचली आहे ती कशी उलटेल व मोडेल हा खरा (मजपुढें) प्रश्न आहे. म्हणून या धर्माचे ज्ञान सर्वप्रकारे तुम्हांला करून देणें हें माझें कर्तव्य आहे. मी पुस्तके लिहून तुमच्या शंका-कुशंका दूर करीन व ज्ञानाच्या पूर्णावस्थेला तुम्हास नेण्याचे सर्व प्रयत्न करीन. आज तरी तुम्ही माझ्यावर विश्वास ठेवून वागले पाहिजे.

### आपला व जगाचाही उद्धार करू

मात्र तुमचीही जबाबदारी मोठी आहे. तुमच्या बद्दल इतर लोकांना आदर वाटेल अशी तुम्ही कृती केली पाहिजे. हा धर्म म्हणजे आपण एक गळयांत मढे अडकवून घेत आहोंत असें मानूं नका. बौद्ध धर्माच्या दृष्टीने भारताची भूमी सध्या शून्यवत् आहे. म्हणून आपण उत्तम रीतीने धर्म पाळण्याचा निर्धार केला पाहिजे. नाही तर महार लोकांनी तो निंदा-जनक स्थितीस आणला असे होऊ नये. म्हणून आपण दृढ निश्चिय केला पाहिजे. हे आप-णाला साधले तर आपण आपल्याबरोबर देशाचा, इतकेच नव्हें तर जगाचाहीं उद्धार करू. कारण बौद्ध धर्माने जगाचा उद्धार होणार आहे. जगांत जोपर्यंत न्याय मिळत नाहीं; तो पर्यंत शांतता रहाणार नाहीं.

### प्राप्तीचा २० वा हिस्सा देण्याचा निश्चय करा

हा नवा मार्ग जबाबदारीचा आहे. आपण कांहीं संकल्प केला आहे, कांहीं इच्छिले आहे, हें तरुणांनी लक्षांत घ्यावे. त्यांनीं केवळ पोटाचे पाईक बनू नयें. आपल्या प्राप्तीचा निदान २० वा हिस्सा या कामी देईन, असा निश्चय करावा. मला सर्वांना बरोबर न्यावयाचे आहे. प्रथम तथागताने कांहीं व्यक्तींना दीक्षा दिली व त्यांना "या धर्माचा प्रचार करा" असा आदेश दिला. त्याप्रमाणे पुढे यश व त्याच्या ४० मित्रांनी बौद्ध दीक्षा घेतली. यश हा श्रीमंत घराण्यांतील होता. त्यांना भगवंतांने सांगितले, हा धर्म कसा आहे? तर "बहुजनहिताय बहुजन सुखाय, लोकानुकंपाय, धम्मं आदि कल्याणं, मध्य कल्याणं, पर्यासान कल्याणं". त्यावेळच्या परिस्थितीप्रमाणे तथागताने आपल्या धर्माच्या प्रचाराचा मार्ग तयार केला. आतां

आपल्याला ही यंत्रणा तयार करावी लागेल. म्हणून समारंभानंतर दरएकाने दरएकाला दीक्षा द्यावी. दरएक बौद्ध माणसाला दीक्षा देण्याचा अधिकार आहे असें मी जाहीर करतो". (किता, पाने ५ ते १२ आणि १८).

या नंतरचा कार्यक्रम फेडरेशनतर्फे झाला. त्याचा वृत्तांत खालीलप्रमाणे :—

"मध्यप्रदेश दलित फेडरेशन शाखेच्या वतीनें, तारीख १५ ऑक्टोबर १९५६ रोजी सायंकाळी ५॥ वाजतां डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सन्मानार्थ, नागपूरमधील श्याम हॉटेल मध्यें छोटीशी चहापार्टी देण्यांत आली होती. या समारंभास सौ. माईसाहेब होत्या. शिवाय दलित फेडरेशनचे पदाधिकारी व कार्यकर्त्यापैकीं बॅ. खोबरागडे, श्री. दादासाहेब गायकवाड, श्री. आवडेबाबू, श्री. मेश्राम, श्री. कुंभारे, श्री. गोंडाणे, श्री. जी. टी. परमार (गुजरात), श्री. ए. जी. पवार, श्री. आर. डी. भंडारे व श्री. बी. सी. कांबळे वगैरे हजर होते.

(प्रथम श्री. आवडेबाबू यांनीं डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हजर राहून उपकृत केल्या-बद्दल डॉक्टर साहेबांचें आभार मानले. नंतर, दलित फेडरेशनच्या कार्यकर्त्यांना उद्देशून मार्गदर्शनपर दोन शब्द सांगावेत म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना विनंति केली.

### धर्म अधिक प्यारा

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या विनंतीस मान देऊन कार्यकर्त्यांना उपदेशपर असे भाषण हिंदीत केले. ते म्हणाले :—

"या ठिकाणी मला भाषण करावे लागेल याची कांहीं कल्पना नव्हती. तशी कल्पना असती तर माझे विचार संकलित करून मांडणे सोईचे झाले असते.

एकंदर मला असे दिसते की, तुम्हाला राजकारण फार प्यारे आहे. कोणत्याही गोष्टी पेक्षां राजकारणाची तुम्हाला अधिक आवड दिसते. माझें तसें नाहीं. मला धर्म प्यारा आहे आणि त्यासाठीच मी माझी शक्ति वेचणार आहे.

### आदर्श विरोध

तुम्हांला काही खास अधिकार मिळवून देण्यासाठी मी आजवर खूप प्रयत्न केले. ते अधिकार मिळवून देण्यासाठी मी गांधीशी झगडा केला; काँग्रेसशी सामना दिला. त्यावेळी प्रथमत: त्या वेळच्या मुंबई असेंब्लीत १५/१६ आमचे लोक निवडून आले. असेंब्लीत सरकार विरोधी-पक्ष म्हणून आम्ही काम केले ते एवढे वाखाणण्या सारखे होते की, असेंब्ली मधील 'आदर्श विरोध' म्हणून त्यावेळचे मुख्य मंत्री श्री. खेर यांना उद्गार काढावे लागले.

त्या काळानंतर लढाई आली. लढाईच्या काळात वेगळे असे काही करता आले नाही.

### राखीव जागा उपयोग शून्य

आपला देश स्वतंत्र झाल्यावर राज्यघटना घडविली जातेवेळी आपल्या राखीव जागेचा विचार झाला. काँग्रेसवाल्यांना राखीव जागा करता स्वतंत्र मतदार संघ मान्य नव्हता. तेव्हा जे

वारे वहात होते ते संयुक्त मतदार संघाचे होते, त्याचाही प्रयोग करून पहावा असे पुष्कळांना वाटले. चोराची लंगोटी देखील सोडू नये म्हणतात. त्याप्रमाणे राखीव जागा सोडून न देता त्याचा संयुक्त मतदार संघाने प्रयोग करावा असे वाटले पण आता असा अनुभव येऊन चुकला आहे की, कॉंग्रेसच्या तिकिटावर राखीव जागेवर जी माणसे येतात ती आपली तोंडे बंद करून बसतात. अशा तऱ्हेने संयुक्तमतदार संघामुळे जर गंधे लोक निवडून येत असतील तर निवडणुकांचा व जागांचा उपयोग काय? त्यांचा काही उपयोग होत नाही हे अनुभवाने आता सिद्ध झाले आहे.

### समाजाचे ऐक्य महत्त्वाचे

राखीव जागा नकोत, म्हणून फेडरेशनने ठराव केला आहे. त्या ठरावास मी चिकटून राहू इच्छितो. त्या ठरावापासून ढळण्याची माझी इच्छा नाही. राखीव जागा १० वर्षासाठी आहेत, त्या जागा आता या निवडणुकानंतर रहाणार नाहीत. आपल्या समाजाचे ऐक्य ही कोणत्याही गोष्टीपेक्षा अधिक महत्त्वाची गोष्ट आहे. या राखीव जागा गौण आहेत.

### आपली तटबंदी

आपल्या आजपर्यंतच्या फेडरेशनच्या चळवळीने स्वाभिमान अवश्य निर्माण केला. ही गोष्ट फेडरेशनला भूषणावह आहे. त्यामुळे संघटना झाली. तथापि, त्यामुळे एक प्रकारची तटबंदीही निर्माण झाली. दुसरे लोक आम्हाला मत देत नाहीत व आपण लोक त्यांना मत देत नाही, ही एक प्रकारची तटबंदीच होय. दुर्दैवाने आपली लोकसंख्या कमी आहे. आपण केवळ अल्पसंख्यांक आहोत. अशा परिस्थितीत फेडरेशन आहे त्या स्थितीत ठेवणे कठीण आहे.

### आमचे दुःख जाणणारे कोण ?

**यासाठी, इतर समाजांतील आमचे दुःख जाणारे कोण आहेत हे पाहिले पाहिजे. अशा सर्वांना आपण एकत्रित करून त्यांच्यासह जाण्याची आपली सिद्धता पाहिजे. अशा लोकांना एकत्रित करण्याचा मी प्रयत्न करीत आहे. तो प्रयत्न यशस्वी झाल्यास आपल्याला नवीन पक्ष स्थापावा लागेल व त्या पक्षांत आपल्याशिवाय इतरांनाही दार मोकळे राहील.**

### राजकारण धीराचे आहे

तुमच्यातच नव्हे तर या देशात एक विचित्र विकृति दिसून येते. ती ही की, आज झाड लावले की, त्यास दुसऱ्या दिवशी फळ खावयास आले पाहिजे. राजकारणांत अशी अपेक्षा धरणे चूक आहे.

इंग्लंडमधील राजकारण घ्या. तेथील मजूर पक्षाचा इतिहास काय सांगतो? १९०० साली त्यांचे फक्त दोन लोक पार्लमेंटमध्ये निवडून आले. १९०६ साली त्यांना सुमारे १४ जागा मिळाल्या. १९२४ पर्यंत त्यांना विशेष यश नव्हते. त्या साली मात्र त्यांचे जवळजवळ १२५ लोक निवडून तो खरा विरोधी पक्ष बनला. अशा तऱ्हेने राजकारण दमाचा, धीराचा खेळ आहे. ज्यांना दम, धीर नाही, त्यांना राजकारण करता यावयाचे नाही.

**आता इतर समाजाच्या सर्व लोकांबरोबर काम करावयास तुम्ही शिकले पाहिजे. तुमच्यात तुम्ही फूट ठेवून चालणार नाही. माझ्या दबदब्यामुळे अजून काही वेडेवाकडे घडत नाही.**

**पण मी तुम्हांसाठी कोठपर्यंत रहाणार ?** आता उमेदवार निवडण्याचे काम लोकांनीच केले पाहिजे. त्यांच्या अडीअडचणींना तुमच्या ताकदीप्रमाणे वाचा फोडली पाहिजे. त्यांच्या सुखदुःखाशी समरस होण्याचा तुम्ही प्रयत्न केला पाहिजे. मी भंडाऱ्यातील निवडणुकीमध्ये पडलो. त्याचे मला कधी वाईट वाटले नाही. तरी त्या निवडणुकीत मला बरीच मते पडली. आपली मते सोडली तर इतर समाजाने देखील मला मते दिलेली आहेत, ही गोष्ट माझ्या समाधानाची आहे. मी पडलो की निवडून आलो याचा प्रश्न मी विचारात घेत नाही. तुम्हीही अशाच प्रकारे कर्तबगार होण्याचा प्रयत्न करून इतर समाजास देखील तुम्हास मते द्यावीत असे वाटले पाहिजे. माझी खात्री आहे की, या गोष्टींचा विचार करून तुम्ही तुमचे राजकीय जीवन व कार्यक्रम चालवाल, यापेक्षा आता अधिक काही मी सांगत नाही."

शेवटी श्री. आवडे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे हार्दिक आभार मानले व बाबासाहेबांच्या उपदेशाप्रमाणे आम्ही वागू असे आश्वासन त्यांनी व्यक्त केले व चहापार्टी समाप्त झाली (कित्ता, पा. १८–१९).

१५ ऑक्टोबरला संध्याकाळी ६ ते ८ च्या दरम्यान नागपूर कॉर्पोरेशनने बाबासाहेबांना मानपत्र दिले. मानपत्र समारंभासाठी खास मंडप तयार करण्यात आला होता. तो उपस्थित लोकांनी चिक्कार भरून गेलेला होता. मंडपाच्या बाहेर चोहोबाजूस लाखो लोक उभे राहिलेले होते. कॉर्पोरेशनचे महापौर यांनी बाबासाहेबांचे स्वागत केले व त्यांना देण्यासाठी तयार केलेले मानपत्र वाचून दाखविले. ते मानपत्र असे :—

## भारतीय पददलित जनतेच्या मूक भावनांची साकार मूर्ति––

### सन्माननीय डॉ. बाबासाहेब आंबेडकर,

एम.ए., पीएचडी., डीएस्सी., बार-ॲट-लॉ.

आपल्या सारख्या समाजसुधारक, तत्त्वज्ञ व विधिज्ञ पंडिताचे स्वागत करण्याची संधी नागपूरच्या जनतेस लाभली याबद्दल आम्हाला परम हर्ष होत आहे.

तसे पाहिले तर नागपूर शहराशी आपल्या जीवनाचा अत्यंत घनिष्ट संबंध आला आहे. महान परिश्रमाने विद्यासंपन्न झाल्यानंतर याच नगरीत आपण १९३० साली दलित जनता परिषद भरवून, देशातील दलित समाजाला मार्गदर्शन केले व आपल्या सामाजिक आणि राजकीय जीवनाला प्रारंभ केला आहे. याच नगरीत १९४२ साली अखिल भारतीय शेड्युल्ड कास्टस् फेडरेशनला जन्म देऊन पददलित समाजाच्या राजकीय आकांक्षांचा निनाद आपण साऱ्या भारतात प्रथम दुमदुमविला आहे. आणि आज याच नगरीत आपल्या उत्तर जीवनात बौद्ध धर्माची दीक्षा घेऊन, आपण आपल्या नवीन जीवनाला आरंभ करीत आहांत.

आपल्या अष्टपैलू जीवनाकडे दृष्टिक्षेप केल्यास असे दिसून येईल की, आपला पिंड प्रगाढ पंडिताचा असला तरी तो नुसत्या, तार्किक विवेचनातच गुरफटून न ठेवता प्रत्यक्ष कर्तव्य सृष्टीत उतरविला आहे. शतकानुशतके धार्मिक, सामाजिक व आर्थिक अशा सर्वच

बाबतीत पिळवटून निघालेल्या अस्पृश्य समाजाच्या मूक, करुण किंकाळयांनी आपल्या हृदयाला पाझर फुटून आपण त्यांच्या सेवेचे असिधाराव्रत स्वीकारले.

महाडच्या "चवदार तळ्याचा सत्याग्रह", नाशिक येथील "काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह" यासारख्या किती तरी सत्त्वपरीक्षांनी आपले जीवन अधिकच उज्ज्वल केले आहे.

'वन्ही तो चेतवा बारे, चेतविताची चेततो; केल्याने होत आहे रे आधि केलेचि पाहिजे' या समर्थ रामदासाच्या उक्तीप्रमाणे दलित समाजाचा आत्मा आपल्या अविरत परिश्रमाने जागृत झाला आणि त्याने आपल्या राजकीय व सामाजिक हक्कांसाठी आपल्या नेतृत्वाखाली लढा आरंभिला. त्याचाच परिपाक लंडन शहरी भरलेल्या गोलमेज परिषदेत दलित समाजाचे एकमेव नेते म्हणून आपली निवड होण्यात झाली. गोलमेज परिषदेतील आपली कामगिरी स्पृहणीय आहे.

आपल्या आंगच्या अशा असामान्य गुणामुळेच १९४२ साली त्या वेळच्या भारत सरकारने मजूर मंत्री म्हणून आपली नियुक्ति केली आणि आपण ती जबाबदारी उत्कृष्टपणे सांभाळली व श्रमजीवी वर्गाची आपण अपरिमित सेवा केली.

पारतंत्र्याच्या काळोख्या रात्रीनंतर भारतीय क्षितिजावर स्वातंत्र्य सूर्याचा उदय झाला. या स्वातंत्र्य रवीचा प्रकाश प्रत्येक भारतीयाच्या जीवनात पडून त्याचे जीवन तेजोमय झाले पाहिजे म्हणून भारतीय सार्वभौम गणराज्याची घटना तयार करण्याचे ठरले. आपण घटना समितीवर निवडून आलात आणि या समितीचे अध्यक्षपदी विराजमान झालात. समता, स्वातंत्र्य व बंधुत्व या त्रयींवर उभारल्या गेलेल्या सामाजिक, राजकीय व आर्थिक न्याय हक्काच्या राष्ट्रीय सनदेचा जन्म आपल्या नेतृत्वाखाली झाला. भारतीय घटनेचे शिल्पकार म्हणून कलियुगातील 'स्मृतिकार मनू' अशी सार्थ पदवी आपणास भारतीयांनी दिली. भारतीय राज्यघटना आपली स्मृती भारत वर्षात चिरकाल टिकवील अशी आम्हाला खात्री आहे. तसेच, स्वतंत्र भारत सरकारचे विधिमंत्री असताना आपण हिंदू कोड बिलाच्या योगाने भारतीय स्त्री जातीच्या हक्कांचे जे समर्थन केले, त्याला दुसरी तोड नाही. युगानुयुगे भारतीय स्त्रीजात आपल्या सेवेबद्दल ऋणी राहील.

शिक्षणाशिवाय जीवन पवित्र व तेजस्वी होत नाही हे ओळखून बहुजन समाजाच्या जीवनात त्याचा प्रसार करण्याकरता अनेक अडचणींना तोंड देऊन आपण मुंबई येथे 'पीपल्स एज्युकेशन सोसायटी' नावाची संस्था स्थापन केली व तिच्या विद्यमाने मुंबई येथे सिद्धार्थ महाविद्यालय व औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालय काढून दलित समाजाकरिता उच्च शिक्षणाचे महाद्वार मुक्त केले आहे. बाबासाहेब ! आपले सारे जीवन बहुजन हिताय व बहुजन सुखायच खर्च झाले आहे. पददलितांच्या उन्नतीशिवाय राष्ट्र उन्नत होणार नाही या मताविषयी दुमत होऊ शकणार नाही.

आजच्या अशांत युगात शांती व अहिंसेचेच तत्त्व जगाला आशेचा किरण दाखवन पथ प्रदर्शन करील अशी प्रत्येकाची धारणा आहे. शांती व अहिंसेचा भारतात व भावरताबाहेर अडीच हजार वर्षापूर्वी प्रचार केलेल्या सम्राट अशोकाच्या अशोक चक्राला आपल्या राष्ट्रीय ध्वजावर

स्थान प्राप्त झाले आहे. त्याच महान सम्राटाने स्वीकारलेल्या बुद्धधर्माची दीक्षा आपण घेत आहात. भारताच्या शांती व अहिंसा नीतीचा प्रकाश आपण साऱ्या विश्वात प्रसारीत कराल अशी आम्हास खात्री आहे. परमेश्वर आपणास दीर्घायुरारोग्य प्रदान करो.

विनीत

नागपूर
दिनांक १५ ऑक्टोबर १९५६.

महापौर व सदस्य
नागपूर महापालिका "
(कित्ता, पा. १६–१७).

मानपत्र वाचून झाल्यानंतर महापौरांनी बाबासाहेबांना हारतुरे समर्पण केले. त्यानंतर बाबासाहेबांनी मानपत्राला उत्तर म्हणून भाषण केले ते असे:––

" नागपूर कार्पोरेशनचे मेयर, कार्पोरेटर्स आणि उपस्थित नागरिक हो ! माझा या नागपूर प्रांताशी विशेष संबंध आलेला नाही. माझा राजकीय संबंधिही तितकासा नाही. या प्रांतासाठी मी काही विशेष असे केलेले नाही. मी म्युनिसिपालिटीचा कधी सभासद नव्हतो. (हंशा) त्यामुळे म्युनिसिपल कारभाराबाबत तुम्हाला मी उपदेश करू शकणार नाही. असे असतां तुम्ही मला हे जे मानपत्र देऊन सत्कार करीत आहांत त्यात तुमची उदारताच आहे असे म्हटले पाहिजे.

तेव्हा या प्रसंगी तुम्हांस कोणत्या विषयावर दोन शब्द सांगावेत याचा विचार मी करीत आहे. हा विचार करतांना मला असे वाटते की, म्युनिसिपल कारभार हा काही अंशी भिन्न असला तरी, म्युनिसिपालटीचा कारभार व देशाचा कारभार यांत साम्य आहे. म्हणून, या प्रसंगी आपल्या देशाच्या कारभारासंबंधी तुम्हास मी दोन शब्द सांगू इच्छितो.

### 'दिसायला' एक 'करायला' दुसरेच

आपल्या देशाची राज्यघटना अंमलात येऊन ५ वर्षे झाली. बाह्यांतकारी तरी असे दिसेल की, आपली राज्ययंत्रणा व इंग्लंडमधील राज्ययंत्रणा, काही भाग सोडला तर बहुतांशी सारखीच आहे. तिकडे प्रौढ मतदान पद्धतीने निवडणूका होतात; आपल्या देशातही तशाच निवडणूका होतात. त्या देशात पार्लमेंट आहे. या देशांतही पार्लमेंट आहे. त्या देशात पार्लमेंट बहुमताने, निर्णय घेतात; आपल्या देशातील पार्लमेंटमध्येही बहुमताने निर्णय घेतात. असे असले तरी त्या देशातील राज्यकारभारात व आपल्या देशातील राज्यकारभारात, एक विलक्षण फरक दिसून येतो. तो हा की आपल्या देशाच्या कारभारात 'दिसायला' एक व 'करायला' दुसरे असे काही निराळे चित्र दिसते.

### " भयानक चित्र !

तुम्ही या गोष्टीबाबत, आपल्या देशाची राज्यघटना कशी काम करते व ती कशी राबविली जाते याचा विचार करता का नाही, मला माहीत नाही. लोकांनी आता राज्यकारभाराबाबत व राज्यघटनेबाबत जागरूक राहिले पाहिजे. मी स्वतः या गोष्टीचा नित्य विचार करतो.

कारण या राज्यघटनेचा मी आद्य कर्ता आहे. आणि विचार करताना शेवटी या देशाचे होणार तरी काय असे भयानक चित्र माझ्या डोळयापुढे उभे रहाते.

### बॅट सोडून तंबूत न जाणारा खेळाडू

मला निवडणुकीची आता मोठी आवड नाही. राजकारणाचा उपभोग घेऊन मी पाहिला आहे. जातीपातीच्या भेदामुळें या देशांतील राजकारण आता काँग्रेस राजवटीत असे बनले आहे की, अल्पसंख्य असलेल्या जमातींना जीवनासाठी काही तरोणपाय राहिलेला नाही. तरीपण मी काही राजकारण सोडणार नाही. मी माझे राजकारण चालूच ठेवणार आहे. कारण, मी काही तसा बॅट सोडून तंबूत जाऊन बसणारा खेळाडू नाही (हंशा व टाळ्या).

### उमेदवार निवडण्याचा हक्क कोणाचा ?

मी तुम्हाला, आताच इंग्लंडमधील यंत्रणा व आपल्या देशातील यंत्रणा याबाबत सांगत होतो. या दोन देशातील राज्य यंत्रणेत मुख्य फरक आहे. तो हा की, इंग्लंडमधील मतदारसंघातील मतदारच आपल्या उमेदवाराची निवड करतात. त्यांच्या मतदारसंघातील जे मतदार असतात त्यांना त्यांच्यामधील कोणता उमेदवार कसा आहे, त्याचे शिक्षण काय आहे, त्यांचे चरित्र, काय आहे, त्याची समाजसेवेची वृत्ती काय आहे, याची चांगली कल्पना असते. व त्यानुसार तेथील मतदारच आपला उमेदवार कोण असावा, हे ठरवितात.

### रस्त्यावरील खांबाला मत द्यावयाचे ?

आपल्या देशात या बाबतची तऱ्हा काही निराळीच आहे. कोणत्या मतदार संघात कोण उमेदवार उभा करावा याचे स्वातंत्र्य अजूनही मतदानरांना नाही. आज काँग्रेसची निवडणुकीबाबतची जी पद्धती चालू आहे त्यावरून तुम्हास हे दिसून येईल की, कोणत्या मतदार संघात कोणा माणसाला उभे करावे; हे **सर्व दिल्लीला काँग्रेस हायकमांड ठरविते.** त्याची वास्तपूस्त मतदार संघातील मतदारांना काहीच नसते. काँग्रेस हायकमांडने उभा केलेला उमेदवार कसा आहे, त्याचे चारित्र काय; त्याने काही काळाबाजार, अफरातफर केली आहे काय, तो समाजाच्या कल्याणाची बाजू घेऊन पार्लमेंट, असेंब्ली मध्ये झगडतो काय? याच्याशी काँग्रेस हायकमांडने मतदारांना कोणतेच कर्तव्य ठेवलेले नाही. आम्ही सांगू त्याला तुम्ही मत दिलेच पाहिजे असा काँग्रेस हायकमांडचा दंडक आहे. असे इंग्रजी भाषेत म्हणतात की, जर रस्त्यावरील खांबाला (Lamp Post) मत द्या असे सांगितले तरी देखील, काँग्रेस हाय कमांडच्या हुकमाप्रमाणे तुम्ही रस्त्यावरील खांबालासुद्धा मत दिले पाहिजे. काँग्रेस हायकमांडचा असा दावा आहे; व तो दावा आचरणातही आणला जातो. आणि याला हे काँग्रेसचे लोक "**लोकशाही**" म्हणतात. यास लोकशाही कोण म्हणेल? लोकशाहीवर हा शुद्ध घाला आहे.

### काँग्रेसी बायकांचे राजकारण

सध्या काँग्रेसच्या राजकरणात स्त्रियांच्या सभासदांची संख्या वाढविण्यात येत आहे. स्त्रियांच्या या काँग्रेसीराजकारणाचा अर्थ काही समजत नाही. या बायांनी दिवसभर पार्लमेंट-असेम्ब्लीमध्ये जावयाचे आणि संध्याकाळी परत आल्यावर नवऱ्याला विचारावयाचे,

"आहो मी पार्लमेंटमधून आले आहे. झाली आहे की नाही घरातील सर्व व्यवस्था"? या बाया पार्लमेंटात जायच्या आणि त्यांची मुले कोणी सांभाळायची? एक मूल रडत आहे, दुसऱ्याला शेंबूड आहे, तिसरे भलत्या ठिकाणी गेले आहे. अशा मुलांची व्यवस्था मग ठेवणार कोण? बरे. पार्लमेंटमध्ये जाऊन या बाया करतात तरी काय? त्याबाबत मला तर सांगण्याची शरम वाटते.

### बहकलेल्या स्त्रिया

त्यांच्या बाबत सांगावे असा माझा विचार नव्हता, पण सांगतोच. त्यांच्या अंगची नीतिमत्ता तर साफ निघून चालली आहे. माझ्याकडे काही पत्रे आलेली आहेत. त्या पत्रातील मजकूर तर पंतप्रधानाबाबतचा आहे. अशी पत्र लिहिणारी बाई महाराष्ट्रीयन आहे. तिने पत्रामध्ये तर नेहरूंचा उल्लेख करून आमचे 'ते' व आमचे 'हे' असे करतील नि तसे करतील अशा प्रकारे लिहिले आहे. मला प्रथम वाटले, पंतप्रधानास बदनाम करण्यासाठी तिने तसे पत्र लिहिले असेल. परंतु, त्या पत्राची जाणीव मी पंतप्रधानांना दिली तर म्हणाले, अशी शेकडो पत्रे येतात. याला काय म्हणावे? या पार्लमेंटमध्ये जाणाऱ्या स्त्रिया अशा बहकलेल्या असतील, त्यांना तेथे काँग्रेसने जाऊ देण्याचे काय कारण आहे?

### ही हुकूमशाही नव्हे काय?

काँग्रेसच्या राजकारणातील आता दुसरे एक उदाहरण पहा. आमच्या मुंबई राज्यातील **मोरारजीभाई देसाई** म्हणतात, "मला एकमताने निवडले पाहिजे आणि एकदा निवडल्यावर माझ्या (मोरारजींच्या) कारभारात **कोणीही** ढवळाढवळ करता कामा नये." 'आता या प्रकारास काय म्हणावे ते तुम्ही पहा. उद्या समजा, मोरारजींना निवडले आणि त्यांनी त्यांच्या मंत्रिमंडळात त्यांचे एखादे कुत्रे नेमले तरी देखील त्यामध्ये कोणी ढवळाढवळ करू नये असे सांगण्याचा त्यांचा मतलब आहे. ज्या इंग्लंडची राज्यपद्धती आपल्या राज्यघटनेमध्ये स्वीकारण्यात आली आहे, तेथे हे कार्य कसे केले जाते? त्या ठिकाणी सत्तेवर बसलेल्या पक्षांतील पहिल्या रांगेत पार्लमेंटमध्ये बसलेले जे सभासद असतात, त्यांच्या सर्वांच्या अनुमतीने या गोष्टी ठरविल्या जातात. एका माणसाला एकदा का निवडले म्हणजे दुसऱ्या कोणीही ढवळाढवळ करू नये असे तत्त्व तेथे कोणीही सांगत नाही. व तसे सांगितले तर चालणारही नाही. पण आमच्या देशांत, मोरारजीभाई सारखे म्हणतात की, **मी म्हणेन तेच झाले पाहिजे. मग यामध्ये आणि हुकूमशाहीमध्ये फरक काय आहे! जर्मनीमध्ये हिटलरची हुकूमशाही होती. त्याच्या एकट्याच्या तंत्राप्रमाणे त्यास राज्यकारभार हवा होता. त्यापेक्षां मोरारजी काही निराळें सांगताहेत काय? हा अजब प्रकार या देशातच व काँग्रेस पक्षामार्फत चालू शकतो. त्यांचे पुढे काय घोर परिणाम या देशाला भोगावे लागतील याची कल्पना पुष्कळांना नाही.**

### सुएझ कॅनॉल बाबतचे धोरण

काँग्रेसच्या चालू राजवटीतील, सुएझ कॅनॉलबाबतचे नेहरूंचे धोरण घ्या. नासेरने त्या कॅनॉलचे राष्ट्रीयकरण केले आहे. नेहरू त्यास पाठिंबा देऊन एक प्रकारे चंचल प्रदर्शनच करीत आहेत. या बाबतीत मुख्य प्रश्न आहे तो हा की, जगाचा व्यापार उदीम ज्या

कॅनॉलच्या जलमार्गाच्या रहदारीवर अवलंबून आहे तो कॅनॉल एकाच राष्ट्राच्या अखत्यारीखाली असला पाहिजे की आंतरराष्ट्रीय नियंत्रणाखाली असला पाहिजे ? भारताचा फार मोठा व्यापार या कॅनॉलच्या मार्गाने होतो. आज **नासेर व इजिप्त सरकार** भारताबरोबर मैत्रीच्या नात्यात आहे. सदासर्वकाळ इजिप्त मैत्रिनेच भारताशी राहील असे कोण म्हणू शकेल ? समजा उद्या, इजिप्तचे सरकार भारताशी मैत्रीने राहिले नाही तर काय होईल? जर भारत एखादे प्रसंगी युद्धात ओढला गेला तर कोणता प्रसंग ओढवेल? इजिप्त सरकारने कॅनॉलमधून भारताकडे येणारा शस्त्रपुरवठा थोपवून धरला, व पाकिस्तानला अनुकूल धोरण इजिप्तने अंगिकारले तर या देशाचा पराभव होण्यास कितीसा वेळ लागेल? सुएझ बाबतचे काँग्रेस सरकारचे धोरण असे शहाणपणाचे नाही. ते धोकेबाज आहे. नेहरूंनाच काही याबाबत बुद्धि आहे व इतर नागरिकांना नाही, असे समजून नेहरूंनी चालविलेले धोरण हे बंद झाले पाहिजे. काँग्रेस राज्याचा एक एक मामला तो असा आहे.

**बुवाबाजीचे ढोंग**

आता, आणखी दुसरे एक उदाहरण भूदानवाले विनोबा भाव्यांचे घ्या ! हे गृहस्थ ठिक-ठिकाणी हिंडून भूदानासाठी जमीन गोळा करीत आहेत. एवढे जर आहे, तर लोक विनोबा भावे यांनाच भारताचा पंतप्रधान का करीत नाहीत ? विनोबा भावे यांनी पंतप्रधान व्हावे व देशातील जमिनीचा प्रश्न सोडवावा. नाहीतर उगीच हा चोंबडेपणा कशाला हवा ? हे ना धड काँग्रेस सरकारचे काम ना धड भाव्यांचे काम असे होऊन बसले आहे. या देशातील बुवाबाजीचे फार मोठे खूळ आहे. एखाद्या माणसाने काही 'विचित्र' केले तर तो साधु पुरुष बनतो. त्याने जर फाटके कपडे घातले, गटारातील तो पाणी प्याला, अगर लंगोटी लावली, असे काही तरी विचित्र केले की, या देशात त्या माणसाला साधु पुरुष मानतात. पण एखाद्याने स्वच्छ कपडे वापरले, स्वच्छ पाणी पाहिजे असे म्हटले, की मोठा 'मिजासखोर' आहे असे म्हणतात. हा देश काही विक्षिप्त विचारसरणीत सापडलेला आहे. त्यासाठी आता सर्वांनी जागरूक राहून हे प्रकार बंद केले पाहिजेत.

**देशाचा नाश होईल**

आपण नवीन घटना घेतली आहे. आपल्याला या घटना पद्धतीचा अनुभव नाही. ती या देशात अत्यंत दक्षतेने राबविली नाही तर या देशाचा नाश होईल. केवळ पांढऱ्या टोप्यांनी काम चालणार नाही. सगळ्या राष्ट्राने बसून राजकरणाचा अभ्यास केला पाहिजे. एकट्या जवाहरलालनांच बुद्धी दिलेली आहे, असेही नाही. जवाहरलालपेक्षा बुद्धिमान लोक अनेक आहेत. मी मंत्रिमंडळात असताना आठवड्यांतून एक वेळ कॅबिनेट भरत असे. तेथे मी त्यांना चांगले तोलून पाहिले आहे. ते केवळ पोकळ भोपळ्या प्रमाणे आहेत. यापलिकडे काही नाही. 'पाहिजे मुलीला सुंदर नवरा' असेच म्हणावयाचे असेल, तर मात्र ठीक आहे. पण नेत्याला बुद्धि पाहिजे. कणखरपणा पाहिजे. तो देशाचे कार्य करणारा हवा असेल तर असे लोक सापडतील. पण तुम्हाला तोच हवा! विषयांतर झाले आणि कांहींना ते अरुचिकर वाटले तर त्यांनी क्षमा करावी. पण लोकांना तुम्ही मुर्ख आहांत हे स्पष्टपणे कुणी तरी सांगायलाच हवे. तुम्ही कदाचित् मला मते देणारे नाही. पण त्याची मला फिकीर नाही.

शेवटी स्थायी समितीचे चेअरमन **श्री. चौधरी** यांनी आभार मानले. आभार मानतांना श्री. चौधरी म्हणाले, " काँग्रेसच्या राजकारणात, पडद्यामागे कशा गोष्टी चालतात, व काँग्रेस राज्य कसे हुकुमशाहीकडे चालले आहे, याची खात्री आम्हास **डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या** भाषणावरून पटली आहे. त्यासाठी आपण सर्वांनी जागरूक राहिले पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना देशकार्य करण्यास दीर्घायु लाभो, अशी मी कार्पोरेशनच्या वतीने प्रार्थना करून आभार प्रदर्शन संपवितो." (कित्ता, पा. १३–१५ व १७).

१५ ऑक्टोबरला रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास मुंबईतील **नवयुग** या साप्ताहिकाच्या प्रतिनिधीला बाबासाहेबांनी मुलाखत दिली. प्राथमिक चर्चा झाल्यानंतर प्रतिनिधीने बाबासाहेबांना विचारले की, हिंदुधर्म आणि बुद्ध धर्म यांचे देव, पुनर्जन्म, कर्म, वगैरे प्रश्नांसंबंधी जे विचार आहेत त्यांत कोणते भेद आहेत आणि त्यांचे इष्टानिष्ट परिणाम कोणते होतात. या प्रश्नांना उत्तर देण्याच्या ओघांत बाबासाहेब म्हणाले, " भगवान बुद्धाने जे कॉन्ट्राडिक्ट केलें ते आम्ही कॉन्ट्राडिक्ट करणारच! कर्म म्हणजे काय हें तुम्ही माझें पुस्तक प्रसिद्ध होइल तें ३२ रुपयास विकत घेऊन वाचा म्हणजे कळेल. भगवान बुद्धांनीं सांगितले आहे की देव नाही. कारण आमच्या भाकऱ्या भाजण्यास काही देव येत नाही. ...... विश्व कसे निर्माण झाले याच्या कोड्यावर देवांचे अस्तित्व अवलंबून आहे. विश्वात चंद्र, तारे, पृथ्वी, मानव कोणी निर्माण केले असा प्रश्न केला जातो. आणि त्या प्रश्नाला धरून असें काहीं जण सांगतात कीं, याचा कर्तासवर्ता देवच असला पाहिजे. या बाबत आमच्या भगवान बुद्धाचे काय म्हणणे आहे हे तुम्हास माहित आहे काय? भगवंताच्या म्हणण्याप्रमाणे विश्वाच्या उत्पतीचे दोन अर्थ आहेत. एक अर्थ हा की, विश्व हे शुन्यातून निर्माण झाले. शुन्यातून विश्व निर्माण होणे शक्य नाही. अगर दुसरा मार्ग हा की, आधीच विश्वामध्ये काही तरी मुळातच उत्पन्न झालेले होते. जर मुळांतच काही उत्पन्न झाले असेल, तर मग देवानें ते उत्पन्न केलें असे कसे म्हणता येईल? भगवान बुद्धांची विचारसरणी अशी शास्त्रोक्त व तर्कशुद्ध आहे त्या भगवंताच्या मार्गाने आम्ही जात आहोत." (कित्ता, पा. ३४).

चांदा या शहरात दीक्षा समारंभाचा कार्यक्रम दिनांक १६ ऑक्टोबर १९५६ ला बाबासाहेबांचे हस्ते व्हावा, असा कार्यक्रम ठरलेला होता. त्या कार्यक्रमासाठी बाबासाहेब, माईसाहेब, नानकचंद व बॅ. खोब्रागडे हे मोटारने सकाळी नागपुरहून निघाले. त्यांची मोटार रात्री ७ वाजता पोहोचली. दीक्षा मंडपात व बाहेर हजारो लोक उपस्थित होते. मोटार आलेली पहाताच लोकांनी जय घोषणा सुरू केल्या. बाबासाहेब व्यासपीठावर चढले ते नानकचंदच्या उजव्या खांद्यावर डावा हात आधारासाठी ठेवून, त्यांच्या उजव्या हातात दंड होता. त्यांनी जनसमूहाला हात जोडून नमस्कार केला. लोकांनी प्रचंड जयघोष केले. बाबासाहेबांनी लोकांना दीक्षा दिली. पण भाषण केले नाही. तीन दिवसांच्या परिश्रमाने ते खूप थकलेले होते. आणि तो थकवा त्यांच्या मलूल चेहऱ्यावर दिसत होता. त्यांची रहाण्याची व्यवस्था सर्कीट बंगल्यावर केली होती. ते थोडेसे जेवले व झोपले. नानकचंदानी दररोजच्या कार्यक्रमाप्रमाणे त्यांच्या डोकीला तेल लावून चोळले आणि पायांच्या पोटऱ्या १५–२० मिनिटे दाबल्या. तिसरे दिवशी दिनांक १८ ला सकाळी चांद्याहून दिल्लीला रेल्वेने जाण्याची व्यवस्था अगोदरच केलेली होती. बाबासाहेबांच्या सुचनेप्रमाणे ती गुप्तही ठेवली होती. पण बाबासाहेब बंगल्यावरून स्टेशनकडे मोटारने गेले तेव्हा लोक धावतच स्टेशनकडे गेले. प्लॅटफॉर्मवर तोबा गर्दी झाली. लोकांनी जयघोष केले. बाबासाहेबांनी खिडकीतून लोकांना दर्शन दिले हे करता करता त्यांनी नानकचंदला विचारले की, तुला ऑफिसला कधी जावे लागेल ?.

उत्तर मिळाले, आज. बाबासाहेब त्यांना जरा कृत्तककोपाने बोलले, की तू हे अगोदरच का सांगितले नाहीस ! आपण नागपुरला उतरू, दिल्लीचे रेल्वे-रिझर्वेशन कॅन्सल करू व विमानाने दिल्लीला जाऊ. आणि त्याप्रमाणे बाबासाहेब, माईसाहेब व नानकचंद हे नागपुरहून सकाळी ११–१५ च्या विमानाने दिल्लीस गेले. नानकचंद ऑफिसात हजर झाले. दिनांक १८ ते २१ ऑक्टोबर या दिवशी ते रात्रौ बाबासाहेबांच्या घरी आलेल्या पत्रांची उत्तरे टाईप करण्यासाठी राहीले.

**महा थेरो पूज्य चंद्रमणी** हे मुंबईला आले असता २३ ऑक्टोबरला त्यांचा अखिल भारतीय बौद्ध महासभेतर्फे भोईवाडा पोलीस स्टेशन समोरील मैदानांत जाहीर सत्कार करण्यात आला. (कित्ता पा. २०).

नागपुरला १४ ऑक्टोबरला जसा भव्य धर्मदीक्षा समारंभ साजरा केला तसा डिसेंबर महिन्यांत मुंबईत दुसरा समारंभ साजरा करण्याचा कार्यक्रम बाबासाहेबानीं ठरविलेला होता. याबद्दलची जाहिरात प्रबुद्ध भारताच्या ३३ पानावर (विशेषांक) सर्वश्री का. वि. सावदकर, बा. कृ. कबीर आणि भ. स. गायकवाड, चिटणीस अखिल भारतीय बौद्ध महासभा, मुंबई, यांच्या नावाने प्रसिद्ध झालेली होती. एक रुपया भरुन महासभेचे सभासद व्हा, अशी मुंबई-करांना विनंती करण्यात आली होती. पण हा समारंभ बाबासाहेबांच्या हस्ते झाला नाही.

बाबासाहेब १८ ऑक्टोबरला आले. त्यांना खूप दगदग झाल्यामुळें ते थकलेले होते. पण दीक्षासमारंभ उत्तम झाले म्हणून ते खूप आनंदातही होते. दिनांक १९ ला रात्रौ ते कबीराचे दोहे मोठ्यांदा म्हणत होते. ते म्हणून झाल्यानंतर त्यांनीं स्वरचीत बुद्धावरीत अभंग, जे 'हिज मास्टर्स व्हाईस'ने रेकॉर्ड केलेले होते, ती रेकॉर्डस् बाबासाहेबांनी नानकचंदला, रेडिओग्रामवर लावण्यास सांगितले व स्वत: डोळे मिटून ते ऐकत होते. ते त्यावेळी थकले होते तरी फार आनंदात होते.

दिनांक २० ला सकाळी श्री. सोहनलाल शास्त्री बाबासाहेबांना भेटावयास आले असतां त्यांना बाबासाहेब म्हणाले, "या शास्त्री, तुम्ही नागपुरला आला नाही ? आमचे कार्यक्रम भव्य झाले. तुम्हाला फोटो दाखवितो. आणि दीक्षासमारंभाचे दोन आल्बम्स् त्यांनी शास्त्रींना पहावयास दिले. नंतर बाबासाहेब म्हणाले, 'तुम्ही आता पंजाब, दिल्ली, उत्तरप्रांत येथे दीक्षा समारंभाचे कार्यक्रम ठरवा. मात्र आता आपण एक गोष्ट अगोदर केली पाहिजे. जे धर्मांतरास तयार होतील त्यांचें नाव व पत्ता, यांची यादी प्रथम तयार करा. यावरून आपणास सर्व अंदाज बांधता येतील." या विषयावर पंधरा वीस मिनिटे संभाषण झाल्यावर शास्त्रींनी साहेबांची रजा घेतली व ते घरी गेले.

□ □ □

प्रकरण ४ थे

# धम्मदीक्षेसंबंधी लोकमत

बाबासाहेबांनी बौद्धधर्माची दीक्षा घेतली, या घटनेला उद्देशून 'सकाळ' या पत्राने (पा. २). अग्रलेख लिहून आपले विचार प्रगट केले, ते असे :—

" **आंबेडकरांचा नवा अवतार**

डॉ. भीमराव आंबेडकर यांनी, पत्नी सौ. सविताबाई व एक लाख अनुयायांसह नागपूर येथे काल बौद्ध धर्माची दीक्षा घेतली. धर्मांतराचा हा सोहळा खूपच थाटात पार पाडण्यात आला. एवढ्या मोठ्या प्रमाणावर ही कृति करण्याचे कारण हिंदू धर्मीयांना या घटनेचा विचार करावयास लावणे, हा तर आहेच, त्या खेरीज डॉक्टर मजकूर बरेच दिवस आपण अजून हिंदू धर्मातच आहोत, या विचाराने अस्वस्थ झाले होते. धर्मांतराखेरीज आपल्या मनाला शांती मिळणार नाही, अशी त्यांची पुरी खात्री झाली होती. यापुढे आपले राहिलेले आयुष्य नव्या धर्माचा प्रचार व प्रसारासाठी वेचण्याचा त्यांचा निर्धार आहे. हिंदू धर्माची मूल तत्त्वे ज्यांना खऱ्या अर्थाने समजली आहेत असे लोकतरी आंबेडकरांना त्यांच्या नव्या प्रयत्नात यश चिंतण्यात कसलाही संकोच बाळगणार नाहीत.

बौद्ध धर्म हिंदू धर्माहून काही वेगळा असे बहुसंख्य हिंदु मानीत नाहीत, आपल्यातीलच एक शाखा अशीच त्यांची भावना. धर्मांतराचा विचार करतांना डॉ. आंबेडकरांनी बौद्ध धर्माची निवड केली हे पाहून अनेकांना समाधान झाले असेल. त्यातही चटकन लक्षात येणारी गोष्ट म्हणजे नव्या धर्माची दीक्षा घेण्यासाठीही त्यांनी हिंदुधर्मातील विजयादशमीचा सुमुहुर्त निवडला. धर्म प्रचाराच्या नावाने व विजिगीषु वृत्तीने दसऱ्याच्या दिवशी एवढ्या मोठ्या संख्येने धर्मांतरितांचे सीमोल्लंघन यापूर्वी कधी झालेले असेल असे वाटत नाही. बुद्ध निर्वाणास अडिच हजार वर्षे झाली म्हणून चालू साली देशभर मोठ्या प्रमाणावर जो उत्सव साजरा केला गेला त्यात बुद्धाच्या शिकवणुकीबाबत स्तुतिवाचक शब्दांचे धबधबे आसेतुहिमाचलात ऐकू येत होते. डॉ. आंबेडकरांची कृति मात्र या उत्सवाची चिरस्थायी आठवण म्हणूनच लक्षात रहाण्याजोगी आहे. डॉ. आंबेडकरांनी बौद्ध धर्मप्रचाराचे बांधलेले कंकण हिंदुस्थानापुरतेच मर्यादीत न रहाता पूर्वीप्रमाणेच शेजारील राष्ट्रातील जनतेमध्ये त्या मोहिमेचे लोण, त्यांनी पोहोचवावे अशी आमची अपेक्षा आहे.

डॉ. आंबेडकर नव्या धर्मात आपल्या अनुयायांसह गेले तरी त्यांचा मूळचा स्थायीभाव बदलणार नाही. राजकारणात तर ते रहाणारच आहेत आणि निवडणुकाही लढविणार आहेत. नव्या अवतारकार्यास जुन्या राजकारणाची बाधा नको म्हणून ते एक नवीन रिपब्लिकन पक्षही स्थापन करणार आहेत. शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन ही त्यांचीच एकेकाळची निर्मिती,

पण तीत त्यांच्या मनाजोगे कार्यकर्ते मिळाले नाहीत आणि जे मिळाले त्यांनी फेडरेशनचा उपयोग स्वतःची प्रतिष्ठा वाढविण्यासाठीच करून घेतला. इतर काहींनी आंबेडकरांवरच अप्रिय आरोप केले. तेव्हा या फेडरेशनचे लोढणे गळयात बांधून घेणे बौद्ध आंबेडकरांना विसंगत वाटणे सहाजिक आहे. परंतु राजकारणाची कास न सोडता धर्म प्रसाराचे कार्य ते कसे करीत रहाणार हा गूढ प्रश्न आहे.

धर्मांतराने हरिजनांचा प्रश्न सुटेल असे मानणे चुकीचे आहे. त्यांची मूळ गाऱ्हाणी दूर करण्याबाबत अशा उपायाने कसलीही मदत लाभेल अशी खात्री नाही. परकीय राजवटीत ख्रिस्ती बनण्यामध्ये आर्थिक स्वास्थ्याचे प्रलोभन तरी होते, परंतु आता स्वतंत्र हिंदुस्थानात धर्म खाजगी बाब ठरविली गेल्याने राजकीय व आर्थिक प्रश्नात त्यास स्थान उरलेले नाही. हिंदुस्थान सरकार व निरनिराळी प्रांतिक सरकारे अस्पृश्यतेचा डाग धुवून काढण्यासाठी व हरिजनांचे जीवन सुधारण्यासाठी आपल्या परीने प्रयत्न करीत आहेतच. डॉ. आंबेडकरांच्या मते, हे सारे प्रयत्न अपुरे व वरपांगी आहेत, त्यात त्याना प्रामाणिकपणाचा अभाव जाणवत असावा, म्हणूनच त्यांनी आपल्या अनुयायांना धर्मांतराचा आदेश दिला असला पाहिजे. परंतु अशा बाह्योपचारांनी! हरिजनांचे जीवन आतून बाहेरून निर्मळ कसे होईल व जीवनास आवश्यक गोष्टी त्यांच्या आवाक्यात कशा येऊ शकतील, हे समजत नाही.

डॉ. आंबेडकरांनी आपल्या राजकारणाची कक्षा प्रथमपासूनच आपल्या ज्ञातीबांधवांपुरती मर्यादित ठेवली. त्यातही त्यांनी प्रक्षोभक कृति आणि विधाने यांच्या सहाय्याने हिंदू धर्मीयांना सोयीसवडीने विस्मयाचे धक्के देण्यावरच आपल्या कार्याची बरीच भिस्त ठेवली. त्यात धर्मांतराची इच्छा अधूनमधून बोलून दाखविणे, हे त्यांचे एक हुकमी शस्त्र होते. परंतु हरिजनांच्या बाबतीत कळकळीने प्रत्यक्ष कृति करण्यात ते काही महात्माजींना मागे टाकू शकले नाहीत. आपल्या ज्ञातिबांधवांवर हिंदुधर्मीयांकडून हजारो वर्षे होत असलेल्या अन्याया-च्या परिमार्जनासाठी त्यानी मुख्य कृति काही केली असेल, तर या गाऱ्हाण्यांचा राजकीय साध्यासाठी उपयोग केला. त्यांच्या या कृतीने हिंदी स्वातंत्र्य लढयात अडथळे आले, पण त्याची त्यांनी पर्वा केली नाही. स्वातंत्र्यानंतरच्या काळात तरी त्यांनी आपली राजकीय भूमिका बदलली असती व ज्ञातीपलीकडील हजारो देशबांधवांचे नेतृत्व करण्याचे त्यांनी मनावर घेतले असते, तर त्यांच्या या बदललेल्या भूमिकेचे स्वागत कालच्या धर्मांतरापेक्षा किती तरी मोठया प्रमाणावर लोकांनी केलेले आढळले असते. आजच्या घडीला तरी कालची त्यांची कृति केवळ त्यांच्या राजकारणासक्त मनाने प्रकट केलेली हिंदुधर्माबद्दलची आत्यंतिक प्रतिक्रिया, एवढेच मानले जाईल, रिपब्लिकन पक्ष स्थापून फक्त हरिजनांबद्दलच बोलत रहातील तर ते त्यांच्या नव्या अवतार कार्याशी विसंगत ठरेल. देशाला आज त्यांच्या सारख्या विद्वान, व्यासंगी व कर्तबगार पंडिताची नेता म्हणून आवश्यकता आहे. नव्या धर्माची दीक्षा घेतांना त्यांच्या विचारांचाही कायाकल्प होईल व ते बुद्धाच्या शिकवणूकीस साजेसे व्यापक भमीकेवरून प्रचारकार्य करतील, अशा अपेक्षा लोकांच्या मनांत निर्माण झाल्यास त्यात अवास्तव असे काही नाही ". (सकाळ, सोमवार, १५ ऑक्टोबर १९५६).

बाबासाहेबांनी नागपूरला बौद्धधर्मदीक्षा घेतली तेव्हा त्यासंबंधी काही हिंदू लेखक, पुढारी आणि समाजसेवक यांनी आपापल्या दृष्टीकोनातून जाहीरसभेतून अगर वर्तमानपत्रात लेख लिहून आपली मते व्यक्त केली. श्री. न. र. फाटक यांनी २४ ऑक्टोबर १९५६ च्या

नवाकाळ पत्रात लेख लिहून बाबासाहेबांच्या वैयक्तिक रहाणीवर आणि इतर गोष्टींवर टीका केली. बाबासाहेबांच्या या धर्मांतराच्या कृतीमुळे अस्पृश्य समाजाचे भले होईल की वाईट होईल याबद्दल श्री. फाटकांनी आपले मत व्यक्त केले नाही.

३० ऑक्टोबर १९५६ च्या केसरीच्या दीपावली अंकात (पुरवणी, पा. १७–१८) स्वा. वीर सावरकर यांचा लेख छापला होता. लेखाच्या डाव्या बाजूच्या वरच्या कोपऱ्यात बुद्ध लेण्याचे एक रेखाचित्र, त्याच्या उजव्या बाजूला आद्य शंकराचार्यांचे रेखाचित्र देऊन आणि लेखाच्या शिरोभागी भडक अर्थाचे मळळे देऊन हा लेख छापण्यात आला. सर्व लेख हिंदुत्ववाद आणि हिंदुराष्ट्र यांच्या हितसंरक्षणाच्या तळमळीने लिहिलेला असल्यामुळे त्यांच्या एकांगीपणाचा भपकारा वाचकांना ओळीओळीत दिसून येतो. सदर लेख मी खाली देतो :—

**“ डॉ. आंबेडकर यांच्या पंथांतरावर विदारक शोध ज्योत बौद्ध आंबेडकर म्हणजेच हिंदू आंबेडकर सीमोल्लंघन केले पण हिंदुत्वाच्या सीमाक्षेत्रातच ! गत्यंतर उरले नाही. तेव्हा बुद्ध धर्माचा स्वीकार. डॉ. आंबेडकरांची हिंदुराष्ट्रघातक महत्त्वाकांक्षा.**

**लेखक––स्वा. वी. वि. दा. सावरकर,**

आसिंधुसिंधुपर्यंता यस्य भारतभूमिका ।
पितृभूः पुण्यभूश्चैव स वै हिंदुरिती स्मृतः ॥

गेल्या विजयदशमीला नागपूर येथे डॉ. आंबेडकर यांनी त्यांच्या उण्यापुऱ्या एक लक्ष अनुयायांसह बौद्ध धर्माची दीक्षा घेतली. बौद्ध धर्मात जाण्याची सिद्धता डॉ. आंबेडकर यांनी गेली सात आठ वर्षे तरी विशेषतः महाराष्ट्रातील महारवाड्यातून आणि त्यांच्या अनेक प्रचारकांकडून पद्धतशीरपणे चालविलेली होती. ही वस्तुस्थिती ज्याना माहीत आहे त्यांना आंबेडकरांचे बौद्ध धर्माची दीक्षा घेण्यासाठी एकगटी एक लक्ष अनुयायी नागपूरला एकत्र झाले त्यामुळे तितकेसे आश्चर्य वाटणार नाही. इतकेच काय पण काही बौद्ध धर्मीय परदेशातून आणि विशेषतः आज भारतीय शासनाच्या कारभराची सूत्रे ज्यांच्या हाती पडलेली आहेत त्यातील पंतप्रधान नेहरू प्रभृति काही जणांकडून प्रत्यक्ष नि अप्रत्यक्षपणे धनादिक सर्व प्रकरणी सक्रिय पाठिंबा या बौद्ध धर्म प्रचाराच्या अभियानास मिळालेला असल्यामुळे आणि मिळणारा असल्यामुळे दोन एक वर्षांच्या आत भारतात दहा लक्ष लोकही बौद्ध धर्म स्वीकारतील असे आपणास समजून चाललेले पाहिजे.

**चिंतनीय पण चिंताजनक नव्हे**

काही लाख लोकांनी हिंदुधर्मातील सनातन किंवा वैदिक सांप्रदाय सोडून बौद्ध संप्रदायाचा स्वीकार करावा आणि तोही इतक्या गाजावाजाने नि संघटीतपणे करावा ही गोष्ट चिंतनीय आहेच आहे, परंतु त्यामुळे हिंदू राष्ट्रावर किंवा समाजावर कोणचा एखादा चिंताजनक प्रलय ओढावणार आहे अशी काहीशी जी भीति कित्येकांना आतून वाटते ती मात्र निराधार आहे. डॉ. आंबेडकरांनी कितीही मोठ मोठ्याने गर्जून सांगितले की ते साऱ्या भारतांतून हिंदू धर्माचे आमूलाग्र उच्चाटन करून सर्व धर्मांत श्रेष्ठ असा जो बुद्ध धर्म त्याची प्रस्थापना करणार आहेत तरी त्या त्यांच्या गरजण्याला क्रोधाविष्ट वल्गनांपेक्षा अधिक महत्व देण्याचे काही एक कारण नाही. स्वतः बुद्ध भगवान हे त्यांनी धर्म स्थापल्यानंतर चाळीस वर्षे स्वतःच्या धर्माचा अखंड उपदेश करीत गेले असताही जेथे त्यांना सनातन धर्माचे उच्चाटन करता आले नाही; आणि अशोकासारख्या सम्राटाच्या राजशक्तीने त्या उच्चाटनासाठी सर्वस्व पणास

लावले असताही शेवटी जेथे त्यांनाही थकून जाऊन हात टकावे लागले; तेथे डॉ. आंबेडकर यांची कथा काय? परंतु अशा चळवळीत जो राष्ट्रीय फुटीरपणा शिरण्याचा पुढेपुढे संभव असतो त्यास आपण प्रथमपासूनच पायबंद माल कटाक्षाने घालीत गेले पाहिजे.

**आंबेडकर ख्रिस्ती वा मुसलमान झाले नाहीत ते काही आमच्यावर उपकार करण्यासाठी नव्हे**

आज डॉ. आंबेडकर त्यांच्या वृत्तपत्रांतून नि भाषणांतून सारखी घोषणा करीत आहेत की, जगांतील सर्व धर्मांत बौद्ध धर्म हाच श्रेष्ठ, परंतु ह्याच डॉक्टर महाशयांनी मागे एकदा मुस्लिम धर्माचे गोडवे गाऊन मी 'श्रेष्ठ अशा इस्लाम धर्मास अंगिकारणार आहे' असा आपला दृढनिश्चय प्रकटविला नव्हता काय? एकदां 'मी श्रेष्ठ अशा ख्रिस्ती धर्मास स्वीकारणार आहे' अशीही त्यांनीं प्रसिद्धी केली नव्हती काय? त्यानंतर 'मी शीख धर्मच स्वीकारणार आहे' अशीही हूल त्यांनी उठविली नव्हती काय? त्यावेळी डॉ. आंबेडकर काही शाळेत शिक्षण घेणारे एखादे अपक्व वयाचे मूल नव्हते. तेव्हाही ते डॉक्टर या पदवीनेच मिरवित होते. तेव्हा त्यांना बौद्ध-धर्म हा जगातील सर्व धर्मांत श्रेष्ठ आहे हे कळले नव्हते की काय? आणि नव्हते कळले असे म्हणतील तर त्यांच्या त्या वेळच्या त्या त्या घोषणा धर्माधर्मांच्या गाढ व्यासंगाच्या द्योतक नसून अपरिपक्व बुद्धीच्या किंवा निव्वळ दिशाभुलीच्या घोषणा होत्या हे उघड होत नाही काय? मुसलमानी धर्मात वा ख्रिस्ती धर्मात आणि त्यांच्या व्यवहारात म्हणे, अस्पृश्यता नाही! क्षणभर हे गृहीत धरले तर त्या धर्माची नुसती तोंडओळख असणारांनाही हे ठाऊक आहे की अस्पृश्यतेहुनही भयंकर असणारी दासतेची, गुलामगिरीची, मनुष्याला जन्मतःच पशूप्रमाणे लेखणारी नि वागविणारी प्रथा या दोन्ही धर्मांच्या संस्थापकांनी आणि प्रचारकांनी अधर्म्य समजलेली नाही. 'Slaves only your masters' असे बायबलच म्हणते. खरी गोष्ट अशी आहे की, डॉ. आंबेडकरांना वरील अहिंदु धर्मातील ही सर्व व्यंगे ठाऊक आहेत. त्यांना हेही ठाऊक होते की, त्यांच्या आधीच शेकडो वर्षांपासून शतावधि अस्पृश्य लोकांना स्वेच्छेने वा सक्तिने ख्रिश्चन नि मुस्लिम धर्मात बाटवून नेलेले होते. अगदी आमच्या महार बांधवांची फुटकळ गोष्ट घेतली तरी अनेक महारांना आंबेडकरांच्या जन्मापूर्वीपासून ख्रिश्चन आणि मुसलमान करण्यात येत आहे. पण जे अस्पृश्य असे बाटले गेले त्यांची अस्पृश्यता सामुदायिक प्रमाणात बोलावयाचे म्हणजे, ख्रिस्ती आणि मुस्लिम समाजानेही जशीच्या तशीच ठेवली. त्रावणकोरमध्येच पहा. शंभर शंभर वर्षांपूर्वी ख्रिस्ती झालेल्या अस्पृश्यांना नुसत्या वस्तीतून नि शाळांतूनच नव्हे तर ख्रिस्ती प्रार्थना मंदिरातूनसुद्धा इतर ख्रिस्त्यांत एकत्र बसू देत नाहीत. त्यांची बाके एका कोपऱ्यात दूर ठेवण्यात येतात आणि त्यांना प्रार्थनाही त्याच अस्पृश्य कोपऱ्यांत करावी लागते. अगदी महाराष्ट्रात बाटलेल्या महार, चांभार, मांग, इत्यादि अस्पृश्य ख्रिस्त्यांना अस्पृश्यच मानले जाते. दुसऱ्या ख्रिस्त्यांकडूनच नव्हे तर ते स्वतः आपापसातही एकमेकांस अस्पृश्य मानतात. त्यांची लग्ने तर बाटल्या पण त्यांच्या त्यांच्या जातींतच होतात. मुसलमानांत तर बळाने बाटविलेल्या अस्पृश्यांना इतके दडपले जाते की मागे एकदा बंगाल विधिमंडळात 'अस्पृश्य मुसलमानांच्या नावे गाऱ्हाणे करण्यात आले होते की, मुसलमानांसाठी ठेवलेल्या राखीव जागा आम्हा अस्पृश्य मुसलमानांच्या वाट्यास स्पृश्य मुसलमान येऊ देत नाहीत! शिखात जे अस्पृश्य गेले त्यांचा वर्ग 'महजबी शीख' म्हणून स्वतंत्रच ठेवण्यात येतो. ही वस्तुस्थिती आंबेडकरांच्या डोळ्यापुढे होती. अशा अनेक अडचणीमुळे आणि इतर काही अंतस्थ कारणांमुळे डॉ. आंबेडकरांच्या त्या त्या धर्मांतराविषयीचा सौदा त्या त्या वेळी पटला नाही. ही अंतस्थ कारणे ज्यांना ज्यांना ठाऊक आहेत ते हे जाणून आहेत की, हिंदुसमाजाची अधिकात अधिक हानी नि

मानभंग करण्यासाठी मुस्लिम किंवा ख्रिश्चन धर्मात जाण्याची इच्छा असूनही डॉ. आंबेडकरांना ते दुष्कृत्य करवले नाही. करताच आले नाही. परंतु ही वस्तुस्थिती ध्यानात न आल्यामुळे काही सदिच्छ परंतु सर्वसाधारण हिंदुच्याप्रमाणेच भाबड्या स्वभावाच्या हिंदुपुढाऱ्यांना वाटते की, डॉ. आंबेडकर जे मुसलमान किंवा ख्रिश्चन झाले नाहीत. ते हिंदुवर उपकार करण्यासाठी, त्यांच्या मनात हिंदुविषयी काही अंतस्थ ओलावा होता म्हणूनच होय! पण तसा कोणताही प्रकार नाही. डॉ. आंबेडकरांना दुसरा 'काळा पहाड' होण्याची मनासारखी संधीच मिळाली नाही. नाही तर ते "सवाई काळ पहाड" होण्यास सोडते ना.

## हिंदूंनीच बाटग्यांचे कौतुक करणे हा कोडगेपणा होय

याचे प्रत्यंतर म्हणजे गेल्या दोन तीन वर्षांत त्यांनी बौद्धधर्माचा प्रचार करण्याच्या ढालीखाली त्यांच्या वृत्तपत्रातून व भाषणांतून ज्याला ते हिंदू धर्म म्हणतात त्या हिंदुधर्माविरुद्ध आणि हिंदुसमाजाविरुद्ध जी सारखी शिवीगाळ चालविली आहे हेच होय. त्यांचे वृत्तपत्र आम्ही हेतुतः वाचीत असतो. त्यात ते नि त्यांचे प्रचारक हिंदूंच्या वेदपुराणे इत्यादी धर्मग्रंथांवर, श्रीरामकृष्णादिक अवतारांवर हिंदूंच्या धार्मिक आचारांवर आणि रुढींवर इतकी बाष्कळ, अन्यायकारक आणि प्रसंगी अगदी हीन भाषेतही वर्षानुवर्षे टिका करीत आले आहेत की, सहिष्णुतेची व्याधी जडलेल्या हिंदुसमाजावाचून कोणत्याही अहिंदु समाजाने तशी टीका ऐकून घेतली नसती. म्हणूनच बौद्धधर्माचे सर्वधर्मापेक्षा श्रेष्ठत्व पटवितानाही हे आंबेडकरी प्रचारक मुसलमान किंवा ख्रिस्ती धर्मग्रंथाविरुद्ध किंवा रुढीविरुद्ध मात्र एक चकार शब्दही तसल्या भाषेत उच्चारण्याचे धाडस करीत नाहीत. कारण डॉ. आंबेडकरांनी त्या अहिंदु धर्मग्रंथाविरुद्ध ब्रही काढला असता तर त्या अहिंदुसमाजाने डॉ. आंबेडकरांना दुसरा कन्हय्यालाल मुनशी करून टाकला असता. त्याही पुढे जाऊन हिंदु धर्मातील नि रुढीतील व्यंगे दाखविताना त्यांनी बौद्ध धर्मातील तशाच व्यंगाविषयी चकार शब्दसुद्धा कधी काढलेला नाही. बुद्धाची दहा पाच उदात्त वचने—जी बहुतेक बुद्धपूर्व सनातन ऋषिमुनींनी नि साधुसंतांनी उपदेशिलेल्या संस्कृत वचनांची केवळ पाली भाषांतरेच काय ती आहेत! ती तेवढी आंबेडकरी प्रचारक सारखी छापीत नि घोळीत असतात; आणि ओरडत असतात हा पाहा बुद्ध धर्म कसा सर्वांत श्रेष्ठ आहे तो! त्यांना केव्हा तरी सणसणीतपणे बजावले पाहिजे की, बौद्धधर्मात, बौद्ध पुराणात आणि नाना देशातील त्यांच्या रूढ आचारातही भ्रामक मते, भाकड कथा, भाबडेपणा, भंगड आचार आणि अनाचार इत्यादींचा, इतर कोणत्याही जागतिक धर्माप्रमाणेच, बुजबुजाट झालेला आहे. पण हे ठाऊक असूनही आंबेडकरांच्या हिंदुद्वेषाने अंध झालेल्या डोळ्यांना ते खुपत नाहीत. ते आता आवर्जून सांगतात की, लहानपणीच त्यांच्या वाचनात एक बुद्धचरित्राचे पुस्तक आले होते. तेव्हापासूनच त्यांचा बुद्धधर्माकडे ओढा होता. पण जर त्यांना लहानपणापासूनच बौद्धधर्म आवडत आलेला होता तर मध्यंतरी त्यांना बुद्धास काफर नि हीदन (Heathen) मानणाऱ्या मुस्लीम धर्माचा नि ख्रिस्ती धर्माचा अंगीकार करण्याइतका पुळका कसा आला!

अर्थात् बौद्ध धर्मास अंगीकारण्यावाचून त्यांना जेव्हा गत्यंतर उरले नाही तेव्हा त्यांनी तो अंगीकारला. त्यात हिंदुनींच अशा गृहस्थाचे कोडकौतुक ते काय म्हणून करावयाचे!

## पण बौद्ध होताच डॉ. आंबेडकरांची भंगड प्रतिज्ञा भंग पावली

डॉ. आंबेडकर गेली २०–२५ वर्षे पुन्हा पुन्हा गर्जत आले होते की, हिंदुधर्मात माझा जन्म झाला ह्याला माझा उपाय नव्हता. पण मी प्रतिज्ञा करतो की. मी हिंदुधर्मात मरणार

मात्र नाही. नागपुरास झालेल्या समारंभात बुद्ध धर्माची दीक्षा घेतल्यानंतरसुद्धा हिंदुद्वेषाने जळफळणाऱ्या डॉ. आंबेडकरांनी पुन्हा एकदा हिंदुधर्माची निंदा करण्यास आणि मी हिंदू म्हणून मरणार नाही म्हणून केलेल्या वरील भंगड प्रतिज्ञेची पुनरुक्ती करण्याचे सोडले नाही. पण ते आता अशा पेचात सांपडले आहेत की जर ह्यापुढे ते धर्मांतराची पुन्हा एखादी कोलांटी उडी मारणार नसतील व बौद्धधर्मातच उरलेले आयुष्य घालविणार असतील तर त्यांना हिंदु म्हणूनच मेले पाहिजे! कारण हिंदुत्वाच्या क्षेत्राबाहेर जाण्यासाठी जी उडी त्यांनी मारली ती सर्वतोपरी फसून हिंदुत्वाच्या सीमाक्षेत्राच्या आतच पडलेली आहे. हिंदुत्वाच्या सीमाक्षेत्राची आज बहुमान्य झालेले, स्वर्गीय लाला लजपतराय, स्वामी श्रद्धानंद, रामानंद चतर्जी, भाई परमानंद प्रभृति हिंदु धुरंधरांनी स्वीकारलेली, हिंदुमहासभेसारख्या अखिल हिंदुसंस्थेच्या घटनेतच गेली वीस वर्षे समाविष्ट झालेली आणि जी ऐतिहासिक दृष्ट्या जितकी सत्य तितकीच प्रत्यक्ष वस्तुस्थितीचे काटेकोरपणे मोजमाप करून अतिव्याप्ति आणि अव्याप्ति ह्या दोन्ही दोषांपासून शक्य तो अलिप्त असलेली अशी जी अनन्य व्याख्या आहे ती ही की ज्याची ज्याची पितृभूः आणि पुण्यभूः (Holy Land) भरतखंडच आहे तो तो हिंदु! डॉ. आंबेडकर जर कोणी भरत खंडाबाहेरच्या परदेशात जन्मलेले गृहस्थ असते आणि ते बौद्ध झाले असते तर त्यांना ह्या हिंदुत्वाच्या व्याख्येतून एक लहानशी पळवाट काढता आली असती. परंतु आंबेडकर आणि त्यांचे नागपुरास बौद्ध झालेले सर्व महार अनुयायी हे आता निर्भेळ भारतीय बौद्ध आहेत. अर्थात् त्यांची पितृभूमि, त्यांच्या परंपरागत सहस्रावधि पूर्वजांच्या पिढ्या जेथे नांदत आल्या अशी पितृभूमी, आसिंधुसिंधु भारतच आहे, हे त्यांना नाकारता येणे शक्य नाही. त्याचप्रमाणे त्यांनी स्वीकारलेल्या बौद्ध धर्माचा संस्थापक जो गौतमबुद्ध त्याची जन्मभूमी जी कर्मभूमीही भारतखंडच आहे, हेही कोणाला नाकारता येणे शक्य नाही म्हणूनच जगातील हीनयानी असो किंवा महायानी असो किंवा वज्रयानी असो, यच्चयावत् बौद्ध भरतखंडालाच आपली पुण्यभूमि मानतात. अर्थात जोवर आंबेडकर हे भारतीय बौद्ध आहेत, तोवर त्यांची पितृभूमी आणि पुण्यभूमीही अपरिहार्यपणे आसिंधुसिंधु भारतच असल्यामुळे हिंदुत्वाच्या सीमाक्षेत्रात त्यांचा समावेश अटळपणे होणारा आहे. ते सीमाक्षेत्र उल्लंघन करणे हे आंबेडकर बौद्ध आहेत तोपर्यंत तरी त्यांना शक्यच नाही. ईश्वर त्यांना उदंड आयुष्य देवो! परंतु आपण सगळेच मर्त्य आहोत. त्या योगे जेव्हा केव्हा आंबेडकरांचा अंतकाल येईल तेव्हा ते बौद्ध आहेत यामुळेच त्यांना हिंदू म्हणूनच मरावे लागेल! मी हिंदु म्हणून मरणार नाही ही त्यांची प्रतिज्ञा शेवटी अशी एक वल्गना काय ती ठरणार! त्यांनी बौद्ध धर्म स्वीकारल्यामुळे जो काही पालट झाला तो इतकाच की हिंदूंतील वैदिक पंथाचा त्याग करून ते हिंदुत्वाच्या कक्षेतीलच जे अवैदिक पंथ आहेत त्यांना पाहिजे तर धर्म म्हणा, त्या धर्मापैकी बौद्धधर्माचा त्यांनी स्वीकार केला आहे इतकेच काय ते. आपली सीमोल्लंघनाची उडी तोकडी पडून ती हिंदुत्वाच्या सीमाक्षेत्रांतच पडली आहे. प्रांशुलभ्ये फले मोहादुद्बाहुरिव वामनः ऽ अशी आपली स्थिति झालेली आहे ह्याची टोचणी डॉ. आंबेडकरांनाही मनातल्या मनात लागलेली आहे ह्यातही काही शंका नाही. म्हणूनच बौद्ध धर्माचा परंपरागत दीक्षाविधीत नसलेली वाक्ये आंबेडकरांनी नागपूरच्या दीक्षाविधीत घुसडून 'मी हिंदुधर्माचा त्याग करीत आहे, मी विष्णूला मानीत नाही, बुद्ध हा विष्णूचा अवतार नाही, असे पुन्हा पुन्हा घोळून सांगितले. पण ज्या मातापितरांच्या पोटी जन्म झाला त्यांना वैतागाच्या किंवा वायूच्या झटक्यात कोण्या हेकट मुलाने हे माझे मातापितरच नव्हेत म्हणून नाकारले तरी त्याला त्याचे मातापितर पालटता येणे जसे अशक्य आहे तसेच डॉ. आंबेडकर हिंदुद्वेषाच्या झटक्यात 'मी हिंदु नाही, मी हिंदु नाही' असे जरी बरळत

राहिले तरी ते जोवर भारतीय बौद्ध आहेत तोवर त्यांना हिंदुत्वाचे बंधनही तोडू म्हटले तरी तोडता येणे अशक्य आहे.

**त्याचप्रमाणे केवळ बौद्ध झाल्याने अस्पृश्यतेची बेडीही तुटणार नाही**

अस्पृश्यतेची दुष्ट रूढीच नव्हे पण केवळ जन्मावरूनच मानला जात असलेला जातिभेद नष्ट करण्यासाठीं इतर कोणत्याही त्या मताच्या हिंदुत्वहितचिंतकाप्रमाणे आम्हीही जन्मभर तनमनधनाने कष्ट करीत आलों आहों. हिंदुधर्मातील सहस्त्रावधि तथाकथित स्पृश्य अस्पृश्य संतमहात्म्यापासून तो सामान्य नागरिकापर्यंत अस्पृश्यतेची रूढी उच्छेदण्यासाठी आजवर जे प्रयत्न झाले आणि त्या प्रयत्नांत आंबेडकरांचाही महत्त्वाचा भाग आहे–त्यांच्या योगे आज अस्पृश्यता व्यवहारातही अक्षरश: मरू घातलेली आहे. आजच्या भारतीय शासनानेही नैर्बंधिक दृष्टयाच जन्मजात अस्पृश्यता पाळणें हा दंडनीय अपराध ठरविला आहे. आज नगरानगरातून तरी जन्मजात जातिभेदीय रूढीचे उच्चाटन बव्हंशी झालेले असून रोटीबंदीची बेडीसुद्धा तुटत आलेली आहे, तथापि दूरवरच्या खेडयापाडयांतून मात्र, विशेषत : अशिक्षित आणि अडाणी वर्गात अस्पृश्यता उच्चाटिली गेली नाहीं, हे खरे आहे; पण तिचे उच्चाटन ज्या मार्गाने नगरानगरांतून होत आले आहे त्याच मार्गाने खेडयातही निश्चितपणे होणार आहे. पण केवळ "आम्ही बौद्धधर्म स्वीकारला, आता आम्ही अस्पृश्यच राहिलो नाहीं !" अशा शाब्दिक घोषणेने खेडयापाडयांतून ती अस्पृश्यता चुटकीसरशी नाहीशी होईल ही गोष्ट असंभाव्य आहे. हे जे लाखों, विशेषत : आमचे महार बंधू, नागपुरास बौद्धधर्माची दीक्षा घेते झाले ते त्या समारंभाचा गाजावाजा संपताच आपआपल्या खेडयापाडयांत फुटकळपणे जेव्हां परततील आणि आपल्या दहा–दहा पाच–पाच झोपडयांत राहू लागतील तेव्हां त्यांना त्या समारंभाचा तात्कालिक आवेश उतरतांच आढळून येईल की केवळ बौद्ध झाल्याने त्यांची अस्पृश्यता लवलेशही उणावलेली नाहीं. प्रत्यक्ष हर्षासारख्यां बौद्धधर्मीय सम्राटाच्या काळींही बौद्धलोकसुद्धा चांडालादिकांना अस्पृश्यच मानीत होते, त्यांना गावा बाहेरच राहावे लागे आणि गावात यायचे तर खुळ-खुळयांच्या काठया वाजवीत मार्गाच्या कडेकडेने दुसऱ्यास न शिवता चालावे लागे. सिलोन सारख्या बौद्ध देशात आजही बौद्ध लोक ह्यां–ना–त्या प्रकारची अस्पृश्यता खेडयापाडयातून पाळतात. जेथे बौद्ध धर्मीयांची ही मनोवृत्ती आहे तेथे बहुसंख्य सनातन हिंदूंची वस्ती असलेल्या आमच्या खेडयापाडयांतून हे आज नागपुरला बौद्ध झालेले आमचे महार "अस्पृश्य" बंधू जेव्हां परततील तेव्हां ते बौद्ध झाले एवढयासाठीच काय ते त्यांना तात्काळ "स्पृश्य" मानले जाईल हे असंभवनीय आहे. तशा खेडेगावांत हे चार दोन बौद्ध महार विहिरीवर गेले आणि अस्पृश्यांना म्हणाले कीं, 'आम्ही आता बौद्ध झालों आहोंत, आम्ही ईश्वर मानीत नाही, आम्ही हिंदु नाही, म्हणून आम्हास आतां ह्या विहिरीवर पाणी भरण्याचा तुमच्याइतकाच अधिकार आहे.!' तर तेवढयासाठी त्या खेडयातील "स्पृश्य' लोक त्यांना पाणी भरू देतील का? उलट हिंदुधर्म बंधुत्वाच्या ओलाव्यामुळे जे 'स्पृश्य' गांवकरी पूर्वी त्या महारांचा कैवार घेणारे होते ते सुद्धा तो बंधुत्वाचा ओलावा नष्ट झाल्यामुळे त्या मूठभर बौद्ध महारांना परकीयां-सारखे पाहू लागतील. आर्थिक दृष्टयाही केवळ बौद्ध झाल्याने त्या बौद्ध झालेल्या महारांच्या झोपडयांचे अकस्मात वाडे झालेले आहेत किंवा त्यांच्या अर्ध्या भाकरीचा चमत्कारासरशी भाकऱ्यांचा ढीग झालेला आहे असे तत्काळ थोडेंच आढळून येणार आहे?

ह्या नि इतर अशाच कारणांसाठी आमची सर्व तथाकथित अस्पृश्य धर्मबंधूंना अशी-कळकळीची विनंती आहे की, त्यांनी ह्या धर्मांतराच्या खड्डयांत बळेच होऊन उडी टाकू नये.

ह्यासाठीच 'अस्पृश्यांचे' इतर मोठे मोठे पुढारी ह्या आंबेडकर 'धर्मांतराच्या जाळ्यांत सांपडू इच्छित नाहीत. श्री. जगजीवनराम, श्री. तपासे, श्री. काजरोळकर, श्री. राजभोज प्रभृती पूर्वास्पृश्य पुढाऱ्यांनी ह्या आंबेडकरी उपद्‌व्यापाचा आधिच स्पष्टपणे निषेध केलेला आहे. उरली आहे ती अस्पृश्यताही ह्या पुढाऱ्यांनी अवलंबिलेल्या मार्गानेच अधिक त्वरेने नाहीशी होईल.

**एक सावधानतेची सूचना—बौद्धस्थान-नि-नागराज्ये ?**

डॉ. आंबेडकरांनी त्यांच्या कांही लाख अनुयायांसह जे संप्रदायानंतर, किंवा पाहिजे तर त्यास धर्मांतर म्हणा, केलेले आहे, ते बौद्ध धर्माविषयी त्यांच्या मनात प्रगाढभक्ति उत्पन्न झाली म्हणूनच कांही केवळ केलेले नाही. त्यांच्या मनाच्या एका अंधारी कप्यांत आणखी एक हिंदु राष्ट्रघातक राजकीय महत्वाकांक्षा दडून बसलेली आहे. ती हीच की त्यांना स्वतःच्या पीठाचार्यात्वाखाली जर भारतात अवश्य तितके बौद्धांचे संख्याबळ वाढविता आले तर झारखंडादिक इतर फुटीर प्रवृत्तींच्या समूहाशी हातमिळवणी करून शक्य होतांच एक स्वतंत्र बौद्ध स्थान, एक स्वतंत्र नागराज्य स्थापन करावयाचे आहे. ह्या त्यांच्या महत्त्वाकांक्षेची शंका येण्याचे कारण त्यांचीच त्यांच्या अनुयायांपुढे दिलेली जी भाषणे त्यांच्या स्वतःच्या संपादकात्त्वाखाली प्रसिद्ध झालेली आहेत. त्यांच्यात त्यांनी व्यक्तविलेले विचार हेच होत. या प्रकरणीं सध्या आम्ही इतकीच चेतावणी आमच्या हिंदु राष्ट्रास देऊ इच्छितो की, ह्या आंबेडकरी धर्मांतराचे कोणीही अंधळे कौतुक करू नये. प्रथम प्रथम बॅ. जीना ह्यांना राष्ट्रीय मुसलमान म्हणून कॉंग्रेसने कौतुकाने कवटाळले नव्हते का? पाकिस्तानची योजना पहिल्यांदा पुढे आली तेव्हा याच नेहरूंनी तिला (Fantastic Nonsense) म्हणून हेटाळली नव्हती का? तसल्या बावळटपणाच्या नि आंधळेपणाच्या चुका पुन्हा तरी घडू नयेत, म्हणून अशा धर्मांतरासारख्या कोणत्याही फुटीर चळवळींविषयी प्रथमपासूनच ढिलेपणाच्या संभ्रमें राहोंची नये ! संदेहात्मक संकट असे समजून तिचा विरोधच केला पाहिजे. त्यांतही जेव्हां बुद्धाच्या अस्थि उकरून काढून परदेशाहून आणून कांही राज्यधुरंधर लोकही त्यांना डोक्यावर घेऊन मिरवूं लागले आहेत. तेंव्हा ह्या वाढत्या बुद्धप्रस्थांची धार्मिक नि राष्ट्रीय दृष्टिनेही आम्हाला चिकित्सा केलीच पाहिजे. त्यांनीच पुन्हा उघडलेल्या त्या बुद्धकाळाच्या इतिहासास पुन्हा एकदां वाचले पाहिजे कीं अगदी यवन, शक, कुशाण, हूणादिक परकीय आक्रमणापासून तो मुसलमानांच्या स्वाऱ्यापर्यंत, कुलांगार जयचंद सारख्या फुटकळ व्यक्तींनी स्वार्थाच्या अधम लोभापायी नव्हे तर समुहशः धार्मिक कर्तव्य समजन भारतीय बौद्धांनी त्या परकीय म्लेंच्छ व्यक्तींशी हातमिळवणी करण्याचा नि तीं तीं म्लेंच्छ राज्ये भारतात स्थापण्याचा हिंदुराज्यद्रोह पुन्हा पुन्हा केलेला आहे! त्याच त्यांच्या पापाने पेटलेल्या भारतीय क्रोधाच्या प्रचंड यज्ञाग्नीत मागच्या बुद्धप्रस्थाचा बळी पडून भारतांतून बुद्ध धर्म पूर्वी नामशेष झाला होता !

पुढे मागे तसे काही घडण्याचा संभव आज जरी निश्चितार्थी दिसत नसला तरी हिंदुराष्ट्राच्या हितशत्रूंच्या या बौद्ध उठावाविषयी अखंड सावधान असावे हेंच उत्तम. विष पिऊन मग त्याची परीक्षा पहात बसण्यापेक्षा तें मुळातच न प्यालेलें बरे ! "

बाबासाहेबांनीं व त्यांच्या अनुयायांनीं बुद्धधर्माचा स्वीकार केला म्हणून त्यांच्यावर आणि त्या धर्मावर विषारी टीका करणारी भाषणे व लेख ही वर्तमानपत्रातून प्रसिद्ध झाली. परंतु त्याचा परिणाम बौद्धदीक्षितांवर कांहीही झाला नाही. उलट अंशी त्यांना असे आश्चर्य वाटलें कीं, भारत देश भगवान बुद्धाची २५०० वी पुण्यतिथि १९५६ च्या मे महिन्यांत साजरी करतोच

त्या समारंभाला जगातील सर्व राष्ट्रांना आमंत्रण देतो आणि अस्पृश्यवर्गाने त्या समारंभानंतर पांच महिन्यांनी त्या धर्माचा स्वीकार केला तर त्यांत कोणते पाप त्यांनी केले म्हणून हिंदू लोक आम्हाला बौद्ध म्हणून तुच्छतेनें वागवितात !

भारताचे पंतप्रधान श्री. जवाहरलाल नेहरू हे ईश्वराचे अस्तित्व मानीत नसले तरी भगवान बुद्ध व बौद्ध धर्म यांच्याबद्दल त्यांना नितांत आदर आहे, म्हणूनच त्यांनी २५०० वी पुण्यतिथिचा जंगी समारंभ दिल्लीत भरविला. त्या संबंधात खालील वृतांत महत्त्वाचा आहे.

कला, साहित्य आणि तत्वज्ञान यांच्यात बौद्धधर्माने किती भर टाकली होती, या बद्दलचा आंतरराष्ट्रीय स्वरूपाचा परिसंवाद २६ नोव्हेंबर १९५६ ला दिल्ली येथे भरविण्यात आला होता. त्याचा वृत्तांत २७ नोव्हेंबर, १९५६ च्या 'टाईम्स ऑफ इंडिया' च्या पत्राने "Buddhism's Contribution to Art and Phylosophy—Mr. Nehru Inaugurates Symposiam in Delhi". या शिर्षकाखाली दिलेला होता. त्यांत २४ राष्ट्रांतून आलेले ८५ बौद्ध पंडित आणि बौद्ध धर्माचे अभ्यासक यांनी भाग घेतलेला होता. दलाई लामा, पंचेनलामा, यू नू (ब्रह्मदेश, पंतप्रधान), सिक्कीमचे महाराज हे प्रमुख पाहुणे होते, नेहरूंनी परिसंवादाचे उद्घाटन केले. भारत सरकार धर्मातीत असल्यामुळे कोणत्याही धर्माच्या बाबतींत ते ढवळाढवळ करीत नाही. परंतु युनोस्कोतर्फे हा परिसंवांद भरविण्यात आलेला असल्यामुळे मी या परीसंवादाचे उद्घाटन करीत आहे. गौतम बुद्ध हा माझ्या देशाचा श्रेष्ठतम रहिवाशी अडीच हजार वर्षापूर्वी होऊन गेला. त्याने जे तत्वज्ञान सांगितले ते शाश्वत, मंगल आणि विश्वशांतीला मार्गदर्शन करणारे आहे. त्याचे चित्त बहुतेक सर्व देशांतील विचारवंत स्त्री-पुरुषांच्या अंतःकरणावर कोरलेले आहे. मग ते स्त्री-पुरुष बौद्धधर्माचे अनुयायी असोत अगर नसोत. बुद्धाच्या पावित्र्याने पुनीत झालेल्या या देशांत रहाण्याचे भाग्य आम्हांला लाभलेले आहे. मी जेव्हां माझ्या या श्रेष्ठतम रहिवाश्याबद्दल विचार करतो तेव्हां माझे अंतःकरण त्या महात्म्याची प्रचंड ऊंची पाहून उचंबळून येते आणि माझ्या डोळ्यांत आनंदाश्रू उभे राहतात.

("It is our privilege to live in the land which was graced and influenced by the presence of the Buddha and whether we call ourselves Buddhists or not, his message remains imprinted in our minds and hearts............ This message is so powerful and so fragrant and so topical in this troubled world–would continue to guide mankind more and more. When I think of this mighty countryman of mine and ponder over the greatness that has dominated the minds and feelings of peoples in so many countries my heart is moved and tears come to my eyes.") (Times of India, dated 27th November 1956–Nehru's speech on Buddha's contribution to Art, etc.–in a Symposium on 26th November 1956 in Delhi).

अशा आशयाचे ते नेहरूंचे भाषण होते.

भगवान बुद्ध, बुद्ध धर्म आणि दीक्षित नव-बौद्ध यांच्याकडे पहाण्याचा हिंदूंचा व नेहरूंचा दृष्टीकोन हे जरी दीक्षित नव-बौद्धांना व इतरांना कळून आले तरी त्यांच्याशी हिंदूंचे जे हडेलहप्पीचे वागणे दररोजच्या व्यवहारात होते ते त्यांना तिरस्करणीय वाटले तर त्यांत वावगे काय ?

८ ते १५ डिसेंबर १९५६ ला एलिफन्स्टन कॉलेज सेंटेनरीचा (शताब्दि) समारंभ साजरा करण्यात आला. तेव्हा कॉलेजच्या लायब्ररी हॉलमध्ये (पहिला माळा) अनेक वस्तुंचे प्रदर्शन मांडलेले होते. कॉलेजमधून पदवीधर झालेल्या व पुढील आयुष्यांत नाव लौकिक कमावलेल्या प्रसिद्ध पुरुषांची पत्रे तीन काचेच्या कपाटांत ठेवलेली होती. पहिल्या कपाटात बाबासाहेबांची २७ ऑक्टोबर १९५२, २६ नोव्हेंबर १९५२ व २६ ऑगस्ट १९५६ ची कॉलेजच्या प्रिन्सिपॉलला लिहिलेली पत्रे ठेवली होती. दुसऱ्या कपाटांत दादाभाई नौरोजी यांची खाजगी पत्रे होती. तिसऱ्या कपाटांत दादाभाई नौरोजी, काशीनाथ नारायण तेलंग, फिरोजशहा मेहता आणि चिमणलाल सेटलवाड यांची खाजगी पत्रे होती.

एल्फिन्स्टन कॉलेजच्या प्रिन्सिपालनी पत्र पाठवून बाबासाहेबांना विनंती केली की, कॉलेजच्या १९५५ च्या वार्षिक संमेलनाचे सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित रहा आणि एक व्याख्यान द्या. ते पत्र बाबासाहेबांना मिळाले तेव्हा ते मुंबईत आजारी होते. त्यांच्याकडून उत्तर आले नाही. म्हणून प्रा. कामत यांनी बाबासाहेबांना २१ ऑक्टोबर १९५५ ला परत स्मरण पत्र पाठविले दिल्लीला गेल्यावर बाबासाहेबांनी सदर पत्राला उत्तर प्रा. कामत यांना पाठविले. ते उत्तर त्यांनी स्वहस्ताक्षरात लिहिले होते. ते पत्र असे.

"BHIMRAO R. AMBEDKAR
M.A., Ph.D., D.Sc.,
Barrister-at-Law.

27th October 1955.
26, Alipore Road,
Civil Lines, Delhi.

Dear Mr. Kamat,

Please refer to your letter of the 21st October. Your principal's letter reached me in Bombay. It came when I was ailing and just forgot to reply. Will you be so good as to convey my apology to your Principal.

I am very grateful for the invitation. I am now so far away that I shall have to make a special journey for the occasion which is a difficult thing. I would like therefore to be excused. If however you insist on my accepting your invitation I will make it convenient to do so.

Yours sincerely,

(Signed) B. R. AMBEDKAR.

एल्फिन्स्टन कॉलेजचा शतसावंत्सरिक समारंभ १९५६ च्या नोव्हेंबर-डिसेंबर मध्ये भरविण्यात आला तेव्हा सदर कॉलेजमधून जे पदवीधर होऊन अखिल भारतीय व जागतिक कीर्तीचे थोर पुरुष होऊन गेले, त्यांची हस्तलिखिते, वगैरे स्मृतीचिन्हे कॉलेजच्या दिवाणखाण्यांतील प्रदर्शनांत ठेवलेली होती. एका काचेच्या शोकेसमध्ये बाबासाहेबांचे वरील पत्र ठेवलेले होते. त्यांतील शेवटच्या परिच्छेदाला समासामध्ये तांबड्या पेन्सिलीने उभी रेघ ओढून त्याच पेन्सिलीने पत्राच्या डाव्या कोपऱ्यांत Received 29th Octobar at 12-10 A. M. असें लिहिलेले होते. शेवटच्या परिच्छेदातील " I shall have to make a special journey " याचा अर्थ भाविकांनी असा केला होता की, बाबासाहेबांना आपल्या मृत्यूची चाहूल आगोदरच लागली होती. कारण त्यांचा पार्थिव देह ७ डिसेंबरला स्पेशल विमानाने मुंबईस आणला गेला होता. पण हा त्यांचा प्रवास १९५६ च्या डिसेंबर मधला होता, आणि त्यांचे पत्र १९५५ च्या ऑक्टोबर मधले होते, हे भाविकांच्या दुःखावेगात ध्यानांत आले नाही.

याच पत्राबरोबर बाबासाहेबांची आणखी दोन पत्रे प्रदर्शनातील शोकेसमध्ये ठेवलेली होती. ती कॉलेजच्या वार्षिक समारंभात सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित रहाण्याबद्दल आणि शतसावंत्सरिक समारंभात "लोकशाही म्हणजे काय ? आणि तिचे भारतातील भवितव्य" या विषयावर भाषण करण्याबद्दल ती दोन्ही पत्रे मी येथे देत आहे.

पहिल्या पत्रात बाबासाहेबांनी आपले डोळे दुखत आहेत असा उल्लेख केलेला आहे. या आजारामुळे त्यांना भाषणास उपस्थित रहाता आले नाही. हे पत्र टंकलिखित होते व दुसरे त्यांच्या स्वहस्ताक्षरांत होते. त्यात आपण वार्षिक संम्मेलनास उपस्थित रहातो असे आश्वासन दिले होते. ती दोन्ही पत्रे अशी :—

"B. R. AMBEDKAR,
M.A., Ph.D., LL.D.,
D. Litt., Bar-at-Law,
Member, Council of State.

26, Alipore Road,
Civil Lines, Delhi.
Dated the 26th August 1956.

Shri. N. R. Ahmad,
Principal, Elphinstone College Celebrations Committee,
Elphinstone College,
BOMBAY I.

Dear Sir,

I am in receipt of your letter of 16th August 1956 inviting me to address the gathering to be held in celebration of the Centenary of the Elphinstone College. I am glad to accept your invitation. The subject on which I would like to speak is "What is Democracy and what are its prospects in India." I shall send you the text of my paper by the date you have suggested.

I am not sure that I shall be able to address the gathering because of my ill-health. My eye-sight is also poor and I am advised by the doctor not to put more strain on my eyes for the present. It may be that by the time the date arrives my eyesight may improve, and I may be able to attend the function.

Yours faithfully,

(Signed) B. R. AMBEDKAR.

दुसरे पत्र हस्तलिखित होते. त्यांत आपण कॉलेजच्या वार्षिक संमेलनास उपस्थित राहतो, असे आश्वासन दिले होते. ते पत्र असे:—

BHIMRAO R. AMBEDKAR,
M.A., Ph.D., D.Sc., LL.D.,
Barrister-at-Law,
Member, Council of State.

26, Alipore Road,
Civil Lines, Delhi.
26th November 1956.

Dear Sir,

I got your wire. I could not understand the necessity for it as I had already informed Mr. Kamat confirming my acceptance of your invitation to your Annual gathering. That letter must not have reached Mr. Kamat. However this is my confirmation.

Yours sincerely,

(Signed) B. R. AMBEDKAR.

To
The Principal,
Elphinstone College,
BOMBAY.

या समारंभास बाबासाहेब दिल्लीहून आले व त्यांनी भाषणही केले.

१९५७ मध्ये होणाऱ्या निवडणुकांत अस्पृश्य वर्ग काँग्रेसला पाठिंबा देईल, कारण काँग्रेस समाजवादाचा पुरस्कार करीत आहे, असा ठराव कलकत्ता येथे २९ ऑक्टोबर १९५६ रोजी भरलेल्या बंगाल प्रांतीय अस्पृश्य परिषदेत मंजूर करण्यात आला. ऑल इंडिया शिड्यूल्ड कास्ट फेडरेशनने निवडणुकीत यश मिळविण्यासाठी कम्युनिस्ट पक्षाशी करार केला याबद्दल निषेध, अस्पृश्य व वन्य जाती यांना घटनेत जे जादा हक्क दिलेले आहेत ते आणखी १० वर्षे वाढवावेत (१९६० नंतर), या जमातींच्या प्रगतीसाठी जादा योजना अंमलात आणण्याची तरतूद करण्यासाठीं घटनेत योग्य ती दुरुस्ती करण्याची पंतप्रधानांना विनंती, हे ठराव मंजूर करण्यात आले, परिषदेचे अध्यक्ष, श्री. ना. स. काजरोळकर, एम. पी. हे होते (टाइम्स ३१ ऑक्टोबर १९५६, पा. १५).

बाबासाहेबांनीं भारतात बौद्ध धर्माचे जे चक्रपरिवर्तन १४ ऑक्टोबर १९५६ ला सुरू केले त्याबद्दल अभिनंदन करणारे व आभार मानणारे पत्र ब्रह्मदेशाच्या सुप्रीम कोर्टाचे न्यायधिश श्री. चॅन हतून यांनी बाबासाहेबांना पाठविले. अभिनंदन व आभार मानण्यास विलंब लागला, याबद्दल त्यांनीं पत्रांत खेद प्रदर्शित केला. तुमच्या पावलावर पाऊल ठेवून आम्हीहि पांच हजार तामिली अस्पृश्यांना ब्रह्मदेशांत बौद्ध धर्म दीक्षा दिली. तुमच्या प्रयत्नाने भारतात बौद्ध धर्माचा प्रकाश पडेल, अशीहि त्यांनी इच्छा प्रदर्शित केली. जपानमधील व ब्रह्मदेशातील वजनदार बौद्धांच्या साहाय्याने बौद्ध धर्माचा प्रसार करण्यासाठी एक मोठी संस्था जपानमध्ये आपण काढणार आहोत. बाबासाहेबांनी लिहिलेला The Buddha and His Dhamma हा ग्रंथ प्रकाशित करण्यासाठी एशिया फौंडेशनकडून (अमेरिका) आर्थिक साहाय्य मिळवून देण्याचे वचन पूर्वी श्री. हतून यांनी बाबासाहेबांना दिले होते. तेथील त्यांच्या परिचयाचा असलेला अधिकारी बदलला सबब ते आर्थिक साहाय्य मिळणे आता अशक्य आहे, असाही श्री. हतून यांनी त्या पत्रात खुलासा केला. बौद्ध धर्म व बुद्ध चरित्र यांचा अभ्यास विद्यार्थी वर्गात व्हावा व त्यासाठी त्यांना निबंध व भाषणे यांच्या स्पर्धा ठेवून बक्षिसे द्यावी, याबद्दल ब्रह्मदेशाकडून आर्थिक साहाय्य होईल काय, असे बाबासाहेबांचे व श्री. हतून यांचे संभाषण झालेले होते त्यावेळी माईसाहेबही तेथे होत्या. याबद्दल तुमची काय योजना आहे, ते कळवा, असे श्री. हतून यांनी सदर पत्रात लिहिले होते. खाटमांडू येथे भरणाऱ्या चौथ्या जागतिक विश्वबंधु बौद्ध परिषदेला आपण सहपरिवार येणार व मग दिल्लीत तुम्हाला भेटून पुढील योजनेबद्दल चर्चा करू, असाही या पत्रात शेवटचा मुद्दा होता. ते पत्र असे :—

Supreme Court of the Union
of Burma.
Dated 22nd November, 1956.

My dear Dr. Ambedkar,

Please accept my heartiest congratulations on the greatest contrubution you have made towards the re-establishment of Buddha Sasan in India. The hearts of all the Buddhists of Burma go out to you for your memorable achievement in this Jayanti Year. The Buddha Sasana Council and Buddhists of Burma are greatly overjoyed to know that millions of the country men of the Buddha are now beginning to come back into the light enkindled by the Buddha with your leadership we are confident that Buddha Sasan would be re-established in all parts of India.

I have, on my part been able, in a small scale, to follow up what you have started while in Burma during the third WFB Conference on the 28th of last month about 5,000 Tamils formally accepted Buddhism in a very impressive ceremony held in the Chatta Sangayana Great cave in the presence of Mahatheras, Cabinet Ministers and Buddhist leaders, many more of the Tamils in Rangoon and other parts of Burma are being aroused to follow your lead.

I owe you a good deal of explanation and thousands of apologies for not being able to write to you earlier. I have been very busy with the Chatta Sangayan work and other activities connected with the propagation of Buddhism abroad, particularly in Japan. You would perhaps be glad to learn I have been able to get a large number of influential Buddhist leaders in Japan to form a society for the establishment of Therawada Buddhism in Japan; there centres are going to be set up by May 1957 with about 15 Mahatheras from Burma. Building constructions are already underway at Moji and Isoshira. A delegation from the Japanese Society is already here and engaged with discussions with me from day-to-day since the 27th of last month.

As regards the contribution towards the cost of publication of your work on Buddhism, I did write to you earlier as I was not able to get aid from the Asia Foundation because of the change of representative. The representative who had a talk with you while you were here was soon transferred to Manilla and the new representative does not seem to take much interest in matters of this kind. I was hoping that I would be able to do some thing about the matter, but I find there is no hope for it for some time to come.

As regards the scholarships for students by Essay competition I have been able to get the important members of the Buddha Sasana Council to agree to the idea in principle. So I would like you or Mrs. Ambedkar to send us a detailed scheme to be put up to the Council.

Nine persons, including U Nu, the Chief Justice U Thein Maung, and myself, are coming to join in the Jayanti celebrations at New Delhi on the invitation of the Indian Jayanti Celebrations Committee. I am leaving for Khatmandu, leading a delegation of about 10 persons from Burma, to attend the 4th WFB Conference. My wife will also be accompanying me. We shall proceed from Lumbini to New Delhi. We expect to be in New Delhi on or about the 22nd of this month.

Please convey my best regards to Mrs. Ambedkar and also to other colleagues of yours.

Yours in the Dhamma,
(Signed) CHAN HTOON.
Judge, Supreme Court,
Union of Burma, Rangoon.

Dr. B. R. Ambedkar,
M.A., Ph.D., D.Sc., LL.D., D.Litt.,
Barrister-at-Law,
Member, Council of States,
26, Alipur Road, Civil Lines,
New Delhi, India.

बुद्ध आणि त्याचा धम्म या ग्रंथाच्या प्रकरणांची 'आत्मा नाही', 'ईश्वर नाही'—मुद्रिते मुंबईहून आलेली होती. बाबासाहेबांनी दिनांक २२ ऑक्टोबरच्या रात्री ती तपासली आणि नानकचंदला ती मुंबईस पाठविण्यास सांगितले.

दी वर्ल्ड फेलोशिप ऑफ बुद्धिष्ट कॉन्फरन्सचे चौथे अधिवेशन नेपाळची राजधानी काटमांडू येथे भरविण्याचे वृत्त याच सुमारास प्रसिद्ध झाले होते. या अधिवेशनास आपण हजर रहावे, असे माईसाहेबांनीं बाबासाहेबांकडे बोलणे काढले. तेव्हा ते म्हणाले, "मला खूप दगदग झालेली आहे व मला विश्रांतीची जरुरी आहे. मला माझी अपुरी राहिलेली पुस्तकें लिहून पुरी करावयाची आहेत. तेव्हां तू काटमांडूला जाण्याबाबतींत त्रास देऊ नकोस! मला स्वस्थपणे पुस्तकांची प्रकरणें लिहून पुरी करूं देत," पण माईसाहेबांना नेपाळला जाण्याची प्रबळ इच्छा होती. त्यांच्या ओळखीचे गृहस्थ श्री. एम्. एच्. ज्योती हे कलकत्त्याचे रहिवाशी महाबोधि सोसायटीशी संबंधीत होते. माईसाहेबांनी नानकचंद यांना सांगितले कीं श्री. ज्योती यांना पत्र लिही, आणि त्यांना सांग कीं, आंबेडकर यांनी या अधिवेशनास उपस्थित रहाणें अत्यंत महत्त्वाचें आहे, या मुद्यावर भर देऊन आंबेडकरांना त्यांनीं पत्र पाठवावे, आणि त्यांनी अधिवेशनास उपस्थित रहावे, असा आंबेडकरांच्या मनावर परिणाम करावा. महाबोधी सोसायटीकडून आंबेडकरांना या अधिवेशनाचे आमंत्रणही पाठविण्याची व्यवस्था करावी तसे पत्र नानकचंदांनी श्री. ज्योतींना लिहिले. माईसाहेबांनी डॉ. मालवणकर व बाळू (बंधु) यांना पत्रे पाठविली कीं, तुम्ही काठमांडूला जाण्याच्या तयारींत असा. श्री. ज्योतींचे पत्र बाबासाहेबांना आले, ते आधी माईसाहेबांनी स्वतः वाचले व जेवणानंतर बाबासाहेबांच्या पुढे ठेवले. पत्रवाचून बाबासाहेब म्हणाले, "नानकचंद, त्या पत्राला उत्तर दे की मला येतां येत नाहीं; फार दिलगीर आहे," माईसाहेबांनी एकांती नानकचंदास सांगितले, थांब, मी त्यांना तयार करते, इतक्यांत पत्र लिहूं नकोस." माईसाहेबांनी, नेपाळची हवा, सृष्टीसौंदर्य यामुळे बाबासाहेबांना बरे वाटेल, मनावर व प्रकृतीवर चांगला परिणाम होईल; आपण जाऊ या. डॉ. मालवणकरांना बरोबर घेऊ. ते तुमच्या प्रकृतीची चांगली काळजी घेतील! या मुद्यावर दोघांची थोडी चर्चा झाली आणि हो ना करता करतां शेवटी बाबासाहेब तयार झाले. माईसाहेबांनीं लगेच कलकत्त्याला पत्रे पाठवून आमंत्रणपत्रिका पाठविणें व रहाण्याची व्यवस्था करणें या बद्दल लिहून कळविले.

दिनांक १८ नोव्हेंबर १९५६ ला बाबासाहेब, माईसाहेब, डॉ. मालवणकर, बाळू कबीर आणि श्री. वराळे हे दिल्लीच्या सफदरजंग विमानतळावरून काटमांडूस गेले. तेथे जो वेळ मिळेल तेवढया वेळांत नवीन ग्रंथांची प्रकरणे लिहिणें अगर लिहिलेली दुरुस्त करणे, यासाठी बाबासाहेबांनी (१) रेव्होल्युशन अँड काऊंटर रेव्होल्युशन इन एन्शंट इंडिया, (२) बुद्ध अँड कार्ल मार्क्स् आणि (३) रिडल्स ऑफ हिंदुइझम, या ग्रंथांची कांही प्रकरणे बरोबर घेतली.

बाबासाहेब खाटमांडूला कॉन्फरन्सला गेले, परंतु प्रकृती अस्वास्थामुळे ते परिषदेच्या दैनंदिन कार्यक्रमाला हजर राहू शकले नाहीत.

बाबासाहेब परिषदेला आले याचा थोडाफार फायदा घ्यावा या हेतूने, त्यांच्या बौद्ध धर्मावरील गाढया व्यासंगावर आधारित विषयावर त्यांनी भाषण करावे अशी विनंती केली गेली, तेव्हां त्यांनी 'बौद्धधर्मातील अहिंसा' हा विषय निवडला परंतु पुष्कळ लोकांची

इच्छा, त्यांनी 'बौद्ध धर्म आणि कम्युनिझम' या विषयावर बोलावे अशी दिसली. म्हणून त्यांनी त्या विषयावर भाषण केले त्याचा आशय थोडक्यांत असा होता. 'बौद्धधम्म व कम्युनिझमचे' मूलभूत तत्त्व 'दु:ख निवारणे' हेच आहे. बौद्धधर्म, ते शाश्वत टिकणाऱ्या प्रेमाच्या मार्गाने करावयास सांगतो. कम्युनिझम बळजबरीने का होईना परंतु तावडतोब परिवर्तन घडवितो. असे परिवर्तन फारकाळ टिकणारे नाही. म्हणून बौद्ध शिकवणकीचा मार्ग धरला पाहिजे. अशारितीने परिवर्तन करण्यास भिक्कू व बौद्धमंदिरे चांगली म्हणजे ख्रिस्ती चर्च प्रमाणे. बौद्धधम्माची शिकवण सतत लोकांच्या कानावर पडावी अशा तऱ्हेची सोय झाली पाहिजे. अशा आशयाचे ते भाषण होते.

ते असे :—

**Dr. Ambedkar's speech at the closing session of the Fourth Conference of the World Fellowship of Buddhists in the State Gallery Hall in Kathmandu (Nepal), on 20th November 1956.**

*Subject* :—Buddhism and Communism.

President, Your Reverences, Ladies and Gentlemen!

I am sorry that, having come to Nepal to attend the Conference, I have not been able to participate in its proceedings in the way in which a delegate ought to participate, but I am sure, I am physically a very ill man, and I am quite unable to bear the stress and strain of the Conference proceedings. It is, therefore, not out of any disrespect for the Conference that I have been usually absent, it is because of my personal condition that I could not do justice to the task of the Conference. It is perhaps because of my absence from the Conference that I was asked by way of compensation to address you this afternoon. I consented to do that, but even here there have been rather surprises flung upon me. I had not enough notice that I was to speak here. And when I was asked what subject I would speak on, I mentioned the subject of "Ahimsa in Buddhism." But I find that a large majority of the people attending this Conference are desirous that I should speak on "Buddhism and Communism," a subject to which I in a very passing sentence, referred at the general meeting, first General meeting.

The subject, I am quite prepared to agree to the suggestion of the change of subject. Although, I must say that I am not quite on the spur of the moment prepared to deal with such a large, enormous, and if I may say so, a very massive subject, a subject which has had half the world in grips, and I find that it has held also in its grip large number of the student population even of the Buddhist countries. I look upon the latter aspect of the matter with grave concern.

If the younger generation of the Buddhist countries are not able to appreciate that Buddhism supplies a way of life which is better than what is supplied by the Communist way of life, Buddhism is doomed. It cannot last beyond a generation or two. It is therefore quite necessary for those, who believe in Buddhism, to tackle the younger generation, and to tell them whether Buddhism can be a substitute for Communism. It is then only that Buddhism can hope to survive. We must all remember that to-day a large majority of the youngers in Asia look upon Karl Marx as the only prophet who could be worshipped. And they regard, I need not say much about it, regard large part of the Buddhist priesthood as nothing but the yellow peril. That is an indication which the Bhikkus must take up, must understand, must reform themselves in order that they could be compared with Karl Marx. And Buddhism could compete with it. Now, with this introduction, I propose to give you a few salient points in Buddhism and in Marxism or Communism in order to show you where the similarity of ideals lies, where the differences arise between Buddhism and Marxism. And thirdly, whether the Buddhist way of life of reaching the goal which communism has is a lasting one, or whether the communist way of bringing about the goal is the lasting one. Because, there is no use in pursuing a certain path, if that path is not going to be a lasting path, if it is going to lead you to jungle, if it is going to lead you to anarchy, assured that the path, that you are asked to follow is slow, may be devious, may be there are long detours, but it ultimately makes you land on a safe, sound ground, so that the ideals you are pursuing are there to help you, to mould your life permanently and for ever, is much better, in my judgement to follow the slower path, and the detourous path rather than to rush up and to take what we call short cuts. Short cuts in life are always very dangerous, very dangerous.

Now let me go to the subject. What is the theory of Communism? What does it start with? Communism starts with the theory that there is exploitation in the world, that the poor are exploited by the rich because of the property that they hold, and they enslave the masses, that enslavement results in suffering, in sorrow, in poverty. That is the starting point of Karl Marx. He uses the word "exploitation." What is the remedy that Karl Marx provides? The remedy that Karl Marx provides is that in order to prevent poverty, suffering of one class, it is necessary to prevent private property. Nobody should possess private property, because it is the private owner who appropriates or misappropriates, to use the technical language of Karl Marx, the surplus value which the workers produce the worker does not get the surplus value which he produces. It is appropriated by the owner. And Marx asked the question

why should the owner, misappropriate the surplus value which is produced by the efforts of the working man? His answer is that the only owner is the State. And it is because of this that Marx propounded the theory that there must be the dictetorship of the proletariat. That is the third proposition that Marx enunciated that Government must be by the exploited classes and not by the exploitating class, which is, what meant by dictetorship of the proletariat. These are fundamental propositions of Karl Marx, which have the basis of Communism in Russia. It has undoubtedly been expanded, it has been added too, and so on. But these are the fundamental propositions.

Now let me, for a moment, go to Buddhism and see what the Buddha has to say about the points made out by Karl Marx. As I told you, Karl Marx begins with what is called exploitation of the poor. What does the Buddha say? How does he begin? What is the foundation on which he has raised the structure of his religion? That Buddha too, 2000 or at any rate 2400 years ago, said exactly the same thing. He said 'There is "Dukkha" in the world.' He did not use the word "exploitation" but he did lay the foundation of his religion on what is called "Dukkha". There is 'Dukkha' in the world. The word 'Dukkh' no doubt has been interpreted in various ways. It has been interpreted to mean rebirth, the round of life, that is "Dukkha". I do not agree with that. I think there are lot of places in the Buddha literature, where the Buddha has used the word 'Dukkha' in the sense of poverty. Therefore, so far as the foundation is concerned, there is really no difference at all. It is unnecessary for the Buddhist people to go to Karl Marx to get that foundation. That foundation is already there, well laid, well laid. It is the first proposition with which the Buddha begins his sermon–the Dharma-Chakra Paribartana Sutta. Therefore, to those who are attracted by Karl Marx, I say, study of the Dharma-Chakra Paribartan Sutta and find out what the Buddha says. And you will find sufficient satisfaction on this question. The Buddha did not lay the foundation of his religion either on god, or on soul, or anything supernatural as to that. He laid his finger on the fact of life-people are living in suffering. Therefore so far as Marxism or Communism is concerned Buddhism has enough of it. And the Buddha has said it 2000 years before Marx was born. With regard to the question of property, you will again find some very close affinity to the doctrine of the Buddha and the doctrine prepeached by Karl Marx. Karl Marx said that in order to prevent exploitation, the State must own the instrument of production, that is property. Land must belong to the State, industry must belong to the State so that no private owner intervens and robs the worker of the profits of his labour. That is what Marx said.

Now let us go to the Sangha, the Buddhist Sangha, and examine the rules of life that the Buddha laid down for the monks. What are the rules that the Buddha laid down? Well, the Buddha said that no monk shall have private property. Ideally speaking, no monk can own property. And although there might be a few lapses here and there, I have noted that in some countries the monks own some property. Yet in the large majority of the countries the monks have no property-no property at all. In fact the Buddhist rule for the Sangha are far more severe than any rule that the communists have made in Russia. I take it, it is a mute subject, nobody has yet discussed it and come to any conclusion. What object did the Buddha have in forming the Sangha? Why did he do it? Going back a little into the history, when the Buddha was engaged in propagating his religion, what we to-day call the 'Paribarjikas', they were existing there long before the Buddha was there. The word "Paribrajakika" means a displaced person, a person who has lost his home. Probably during the Aryan period the different tribes of the Aryans were warring against one another as all tribal people do. Some broken tribes left lost their moorings and they were wanding about. And it is those wanderers that were called Paribrajikas. The great service that the Buddha did to these Parivrajikas was to organise them into a body, to give them rules of life what are contained in the "Vinayapitaka". In the rule, the Bhikku is not allowed to have property. The Bhikku is allowed to have only seven things–a razor, a lota for getting water, a bhikshapatra, the three chibaras, and the needle for sewing things. Well, I want to know if the essence of property of Communism is to deny the private property, can there by any greater and more severe rule, as regards private property, that is to be found in the "Vinayapitaka" I do not, I do not fiind. Therefore, if any people or any youngster are attracted by the rule contained in the communist system of rules that there shall be no private property, they can find it here. The only question is to what extent can be applied this rule of denial of private property they can find it here. The only question is to what extent can be applied this rule of denial of private property to society as a whole. But that is a matter of expediency, time, circumstances, development of human society. But so far as theory is concerned, whether there is anything wrong in abolishing private property of Buddhism will not stand in the way of anybody who wants to do it, because it has already made this concession in the organisation of the Buddhist Sangha.

Now we come to another aspect of the matter, and that aspect is, what are the ways and means which Karl Marx or the Communists wish to adopt in order to bring about Communism? That is the important question. This means that the Communists wish to adopt in order to bring about communism

by which I mean recognition of Dukkha, the abolition of private property, the means that they wish to adopt is violence and killing of the opponents. There lies the fundamental difference between the Buddha and Karl Marx. The Buddha's means of persuading the people to adopt the principle is by persuation, by moral teaching, by love. He wants to conquer his opponents by inculcating in them the doctrine that love can conquer anything, and not power. That is where the fundamental difference lies—that the Buddha would not allow violence, and the communists do. No doubt the communists get quick results because when you adopt the means of annihilating men, he does not remain to oppose you. You go on with your ideology, you go on with your ways of doing things. The Buddha's ways, as I said is a long way, perhaps some people may say, a tedious way. But I have no doubt about it that it is the surest way. There are two or there questions which I have always asked my communist friends to answer. They establish by means of violence what they call the dictatorship of the proletariat. They deprive all people who have property of political rights. They cannot have representation in the legislation, they cannot have right to vote, they must remain what they call second great subjects of the state, ruled, not sharing in the ruling authority or power. When I asked them whether you agree that dictatorship is a good method of governing people, they say, " No, we don't ; we don't like dictatorship. " Then we say, "How do you allow it?" But they say, " This is an interim period in which dictatorship must be there." You proceed further and ask them "What is the duration of this interim period? Twenty years? Forty years? Fifty years? Hundred years?" "No answer." They only repeat that the proletariat dictatorship will vanish, somehow automatically. Very well, let us take the thing as it is that dictatorship will vanish. Well, I ask a question " What will happen when dictatorship disappears? What will take its place? Will man not need Government of some sort?" They have no answer. Then we go back to the Buddha and ask this question in relation to his Dhamma. What does he say? The greatest thing that the Buddha has done is to tell the world that the world cannot be reformed except by the reformation of the mind of the man and the mind of the world. If the mind accepts the communist system and loves it loyally and carries it out it is a permanent thing, it does not requrire force, it does not require a soldier or a police to keep a man in order. Why? The answer is, " The Buddha has energised your conscience to such an extent that your conscience itself is acting as a sentinel in order to keep you on your path. There is no trouble when the mind is converted, the thing is permanent. The communist system is based on force. Supposing tomorrow the dictatorship in Russia fails, and we see signs of it, what would happen? I really liked to know what would happen to the communist system. As I see it there would

be bloody warfare among the Russian people for appropriating the property of the state. That would be the consequence of it. Why? Because they have not accepted the communist system voluntarily. They are obeying to it because they are afraid of being hanged. Such a system can take no roots, and therefore in my judgement, unless the communists are able to answer these questions, what would happen to their system ? When force disappears, there is no use persuing it, because if the mind is not converted, force will always be necessary, and this is what I want to say, in conclusion, that one of the greatest things I find in Buddhism is that his system is a democratic system. He told the Vajis when the Prime Minister of Ajat Shatru went to ask the Buddha, the Ajat Shatru wants to conquer the Vajis, and he said he won't be able to do it until the Vajis follow their ways of their age old system. It is unfortunate that the Buddha did not explain in plain terms what he meant. But there is no doubt about it that what the Buddha was referring to was the democratic and the republican form of Government, which the Vajis had. He said so long as the Vajis were following their system, they would not be conquered. The Buddha, of course, was a great democrat.

Therefore, I say, and I have been, if I may say so, if the President will allow me, I have been a student of politics, and I have spent a great deal of time in studying Karl Marx, Communism and all that, and I have also spent a good deal of time in studying the Buddha's Dhamma, and after comparing the two I came to the conclusion that Buddha advise with regard to the great problem of the world namely that there is Dukkha, that the Dukkha must be removed, that the Buddha's method was the safest and the soundest, and I advise the younger generation of the Buddhist countries to pay more attention to the actual teachings of the Buddha. If I may say so in conclusion, if any peril arises in the Buddhist country to the Dhamma, the blame shall have to be cast upon the Bhikkus, because I personally think that they not discharging the duty which devolves on them. Where is the preaching? Who preaches the Buddha's religion to anybody for the matter of God? The Bhikku is living in his cloister taking his meal, one meal no doubt, and sitting quietly, probably he is reading, and most probably I find them sleeping, and in the evening having little music. That is not the way of propagating religion. My friends I want to tell you, I do not want to criticise anybody, but religion, if it is to be a moral force for the regeneration of society, you must constantly din it into the ears of the people. How many years a child has to spend in school? You do not send the child to school on a day to grow into learning, to get child home and expect the child to grow into learning, to get education, the child has to go to school every day, sit there for five hours and study constantly. It is then and

then alone that the child gets a little saturated with what is called knowledge and what is called learning. Here the monastery is not a state. The Bhikkus do not call for the people to the monastery on any single day and deliver a sermon to them on some subject of moral education. I have never seen it. I went to Ceylon and I told some people that I was particularly anxious to see how the Bhikkus preach. They told me that they have got "Bharna", "Bharna" some word they use, which I subsequently learnt it meant "Vanaka". They took me at 11 O' clock to one place to a small little square thing as big as this, a table and I sat on the ground. A Bhikku was brought in with a cross on his head dress. Several men and women brought water and washed his feet and he came up and sat there. He had a "Pankha" with him, you see, God only knows what he said. Of course he must have preached in Singhalese. It was not more than two minutes, and after two minutes he departed.

You go to a Christian Church. What happens? Every week people assemble there. They worship and some priest delivers a sermon on some subject from the Bible in order to remind the people what Jesus told them that they should do. You will be probably surprised, most of us are, that 90 per cent of Christianity is copied from Buddhism, both in substance and form. You go to Rome, see the main Church and you will be reminded of the big temple which is known as "Vishwa Karma" at Beirut.

Vishabigne, who wrote a book on Buddhism, he was a missionary in China, had expressed his great surprise as to how this similarity occurs between Buddhism and Christianity. So far as the outlook, he dared not say that the Buddhists (copied Christianity) but he would not admit that Christianity copied Buddhism, copied Buddhism. There is so much of it, I think, time has turned and we must now copy some of the ways of the Christians in order to propagate religion among the Buddhist people. They must be made aware every day and all the time that the Buddha's Dhamma is there, standing by them as a policeman to guard those who go the wrong way. Without that this religion will remain probably in a very decadent state. Even now that I find it even in the Buddhist countries its condition is very decadent. But its influence is there, no doubt about it.

I wanted to tell you one very interesting epilogue which I saw in Burma. I went to Burma, I was called for the conference and they took me to show how they were going to reconstruct the villages. I was very happy. I went with them and the Committee had planned to reform the villages. Their streets as usual were crooked, bent here, and bent there, nothing systematic. So the Committee put down iron pillar and lined ropes that this street must go this

way. In good many cases I found that the lines drawn by the Committee went across a portion of the house of a certain gentleman or it went across a portion of a piece of land which was owned by a private individual. When I went and saw and asked them, "How are they going to manage? Have you got money?" I said, "to pay for the property that you are going to take?" They said, "Nobody wants money". Everybody said, "If you want it, take it." Why is this? While in my country there would have been bloodshed if you take a little piece of land from somebody without giving his compensation. But there it is, why? Why were the Burmese so free with their properties, so free? Why did they not care for it? It is because the Buddha has taught "Sarliam Anityam." Everything, you see, is impermanent. Why fight for impermanent things? It is alright if you want the land, take it. Now, ladies and gentlemen, I do not think I can continue any further nor is necessary for me to continue.

I just wanted to give you a point of view from which to look at. Do not be allowed by the Communist successes. I am quite confident that if we all become one tenth as enlightened as the Buddha was we can bring about the same result by the methods of love, of justice and good will. Thank you very much.

बाबासाहेबांचे हे भाषण ऐकून अधिवेशनातील प्रेक्षक व कार्यकर्ते आनंद व आश्चर्य यांनी थक्क झाले, प्रमुख कार्यकर्त्यांनी बाबासाहेबांचे आभार मानणारी भाषणे केली. 'नवबुद्ध आंबेडकरांच्या रुपाने भारतात आले. आंबेडकरांनी आता आम्हाला धर्मप्रसाराच्या कार्यात मार्गदर्शन करावे', असा त्या भाषणांचा सारांश होता. काठमांडूत बाबासाहेबांची कीर्ती पसरली. नेपाळच्या राजाने पाहुण्यांना चहापार्टी दिली तेव्हा राजाने बाबासाहेबांना आपल्या उजव्याबाजूस बसविले होते. ते बाबासाहेबांच्या बरोबर बोलत होते तर माईसाहेब राणी-साहेबांच्या बरोबर गप्पा मारीत हसत खिदळत होत्या. हे त्यांचे वागणे व बोलणे तेथील लोकांना चमत्कारिक वाटले. हा सर्व प्रकार पाहून बाबासाहेब चिडले. रात्री माईसाहेबांना खूप रागाने बोलले. माईसाहेबांनीही दुरुत्तरे केली; त्यावेळेपासून दोघेही अबोल अवस्थेत वावरू लागले!

याच वेळी मुंबईला एक केस चालू होती तिचा निकाल बाबासाहेबांच्या विरुद्ध लागला. हे त्यांचे सॉलिसिटर श्री. काळे यांनी त्यांना पत्राने दिल्लीला कळविले ते पत्र नानकचंदने काठमांडूला पाठविले. माईसाहेबांच्याशी झालेल्या झगडयाच्या दुःखात याची भर पडली. त्या केसचे असे झाले की, सिद्धार्थ कॉलेजसाठी विद्यार्थी वसतिगृह नव्हते ते असावे असा मुंबई युनिव्हर्सिटीने तगादा लावला होता पण मुंबईत हॉस्टेलसाठी इमारत मिळत नव्हती. शेवटी बाबासाहेबांनी ठरविले की, राजगृहाची—जे स्वतःच्या वाचनालयासाठीच प्रामुख्याने बांधले होते त्याची—दुरुस्ती करावी आणि तेथे वसतिगृह ठेवावे. राजगृहावर दोन मजले बांधणे व विद्यार्थ्यांसाठी खोल्या तयार करणे, याचे कॉन्ट्रक्ट इंजिनिअर श्री. पाटणकर यांना दिले. यशवन्त व मुकुंद यांच्याकरताही रहावयास घरे खारला बांधण्याचे कॉन्ट्रॅक्टही

पाटणकरांनाच दिलेले होते. ही तिन्ही कामे व्यवस्थित ठरल्याप्रमाणे झाली नाहीत; असे म्हणून बाबासाहेबांनीं इंजिनिअर पाटणकरांना काही पैसे दिले नाहीत. त्या बाबतीत उभयपक्षी बराच पत्रव्यवहार झाला. शेवटी इंजिनिअर पाटणकरांनी बाबासाहेबांच्यावर कोर्टात फिर्याद, ऑगस्ट १९५६ मध्ये केली. ही केस इंजिनिअर तर्फे मेसर्स मावानी अँड कंपनी, मुंबई या सॉलीसिटर फर्म तर्फे चालविली जात होती. (सूट नंबर १२१/१९५६). बाबासाहेबांच्यातर्फे ॲडव्होकेट श्री. के. जे. काळे हे काम पहात होते. चाळीस हजार रुपये कोर्टात अनामत रक्कम म्हणून ताबडतोब ठेवा, अशी सॉलिसिटर्सनी नोटीस पाठविली होती. त्या प्रमाणे ही रक्कम बाबासाहेबांनीं कोर्टात ठेवण्याची व्यवस्था केली होती. ही रक्कम माईसाहेबांनी विमानाने येऊन भरली होती. ती केस बाबासाहेबांचे विरुद्ध लागून त्यांच्या दु:खात भर पडली होती.

बाबासाहेब बरोबरच्या मंडळीसह काठमांडूहून विमानाने २३ नोव्हेंबर १९५६ ला निघून बनारसला आले. तेथून ते बनारस, सारनाथ व कुशिनारा येथे गेले. बनारस युनिव्हर्सिटीत त्यांचे बौद्ध धर्मावर व्याख्यान झाले. सारनाथला ते गेले तेव्हा बुद्धाला ज्या बोधीवृक्षाखाली 'ज्ञान' प्राप्त झाले तेथे अर्धातास बाबासाहेब ध्यानस्थ बसले. कुशिनारहून बाबासाहेबांनी नानकचंदला २९ नोव्हेंबरला तार केली की, आम्ही ३० तारखेला तिसऱ्या प्रहरी ४ वाजता दिल्लीला विमानाने पोहोचू ("ONUL KUSHENAGAR-DAR 29-19 NANAK CHAND CARE DR. AMBEDKAR 26, ALIPORE ROAD, DELHI. REACHING TOMORROW 30TH FOUR, AFTERNOON WITH PARTY-AMBEDKAR").

नानकचंद विमानतळावर गाडी घेऊन गेले तेव्हा बाबासाहेब फारच थकलेले त्यांना दिसून आले. गाडीत बसल्या बसल्याच आपल्या हॉस्पीटलमध्ये ठेवलेल्या कुत्र्याची त्यांनी नानकचंद जवळ चौकशी केली. माईसाहेब व बाबासाहेब एकमेकांशी बोलत नाहीत हेही नानकचंदच्या लक्षांत यायला वेळ लागला नाही. बंगल्यात आल्या आल्या बाबासाहेबांनी चहा घेतला व ते बिछान्यांत पडून राहिले. रात्री दोघांचेही जेवण वेगवेगळी झाली. माईसाहेब त्यांच्याजवळ गेल्या नाहीत. ही परिस्थिती पाहून नानकचंद त्या रात्री तिथेंच राहिले, आलेल्या पत्रांना उत्तरे टाईप करून ती बाबासाहेबांना सहीसाठी दिली. त्या रात्री गोळ्या देणे वगैरे औषधोपचार नानकचंदनीच केला.

□ □ □

प्रकरण ५ वे

# परिनिर्वाण यात्रा (दिल्ली)

दिनांक १ डिसेंबरला बाबासाहेब सकाळी सात वाजता बिछान्यातून उठून बसले व नोकरास चहा आणावयास सांगितले, चहा घेतल्यावर त्यांना ताजेतवाने वाटू लागले. नोकराच्या सहाय्याने नित्य कर्मे आटोपून वऱ्हांडयातील आरामखूर्चीवर पडून वर्तमान पत्रे वाचू लागले. नेहमी प्रमाणे जेवण वगैरे आटोपल्यावर दुपारी नानकचंद यास फोन करून "ऑफीस सुटल्यावर परस्पर, मथूरा रोडवर बुद्धीस्ट आर्टस एक्झीबीशन भरविण्यात आले आहे. ते पहाण्यास मी जात आहे तेथे तू ये;" असे त्यांनी सांगितले . नानकचंद ऑफीस सुटावयाच्या आधीच तेथे गेले. तेव्हां बाबासाहेब आपल्या गाडीत बसून पुस्तक वाचीत आहेत असे दिसले. इतक्यात समोरून सोहनशास्त्रीही येतांना दिसले. ते दोघेही मिळून बाबासाहेबांकडे येऊन कांही क्षण उभे राहिले. बाबासाहेब वाचनामध्ये गर्क झालेले होते. सोहनशास्त्री मोठ्याने उद्‌गारले, "जय भीम !" बाबासाहेबांनी पुस्तकातून तोंड बाहेर काढले व हसून म्हणाले, " वहावा शास्त्री! काय पाहिले प्रदर्शनात? " ते म्हणाले, "बाबासाहेब सर्व प्रदर्शन पाहिले व ते मला आवडलेही! पण बाबासाहेब, बुद्धाचे पुतळे अनेक आहेत आणि प्रत्येकांत बुद्धाचे अवयव निरनिराळ्या आकाराचे हे कोडे मला उलगडत नाही." बाबासाहेब थोडे हसून म्हणाले, " हे कोडे आहे खरे! पण ते फारसे कठीण नाहीं. बुद्धाच्या परिनिर्वाणानंतर सुमारे सहाशे वर्षांनी बुद्धाचे पुतळे बनविण्याची प्रथा सुरू झाली. श्रेष्ठतम पुरुषांच्या अवयवांची जी वर्णने आहेत त्यांत मोठ्या आकाराचे कान, अजानुबाहू, कुरळे केस, गोल चेहरा, भव्य कपाळ, इत्यादिकांचा समावेश होतो. ही वर्णने परंपरेने लोक ऐकत आले. आणि चित्रकार, शिल्पकार यांनी त्या वर्णना-वरहूकूम पण स्वत :च्या प्रतिभेची जोड देऊन अशा श्रेष्ठतम पुरुषांची चित्रे व शिल्पे तयार करू लागले, बुद्धाची चित्रे व त्यांचे पुतळे त्यांच्या नंतरच्या सहाशे वर्षांतील कलावंतांनी तयार केले भारतीय कलावंतांनी बुद्धाचे अवयव भारतीय पद्धतीने काढले. चिनी, जपानी, सिलोनी, तिबेटी वगैरे कलावंतांनी त्यांच्या त्यांच्या देशांतील पुरुषश्रेष्ठांचे अवयव त्या बुद्धाला दिले. यामुळे बुद्धाची चित्रे व त्यांचे पुतळे यांत अवयवांचे निरालेपण प्रेक्षकांना ठळक दिसून येते. सिद्धार्थ गौतम हा अत्यंत देखणा होता ते देखणेपण जसेच्या तसे कोणत्याही कलावंताला रेखाटता येणे अशक्य आहे. याबद्दल दुःख करण्याचे कारण नाही. हिंदु ख्रिस्ती वगैरे धर्मातील देव व संत यांची चित्रे व पुतळे याबद्दलही हीच अवस्था आहे. आपण बुद्धाची चित्रे व पुतळे यांकडे लक्ष न

देतां, त्याची तत्वे व शिकवण यांकडे सर्व लक्ष केंद्रीत केले पाहिजे". बाबासाहेबांचा हा खुलासा ऐकून सोहनशास्त्री खूष झाले. थोडावेळ इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्यावर तेथून, मोटार बाहेर काढावयास सांगून कॅनॉटप्लेस रोडवरील बुक डेपोकडे नेण्यास बाबासाहेबांनी ड्रायव्हरला सांगितले. बुकडेपोत १५–२० मिनिटे नवे ग्रंथ पहाण्यांत व ५–७ ग्रंथ विकत घेण्यात वेळ घालवून बाबासाहेब नानकचंदाला बरोबर घेऊन बंगल्यावर परत आले.

रविवार २ डिसेंबरला नानकचंद सकाळी नेहमीप्रमाणे सव्वासातला आले, तेव्हां बाबासाहेब बिछान्यांत पडून राहिले होते, त्याला पहातांच बाबासाहेब म्हणाले," आलास वेळेवर! आज आपल्याला खूप काम करावयाचे आहे". ते बिछान्यांतून उठले, चहा घेतला व कार्लमार्क्सचे 'दास कॅपिटल' या ग्रंथातील, संदर्भीत मजकूर परत डोळयांखालून घालून, बुद्ध अँड कार्ल-मार्क्स' या आपल्या ग्रंथाच्या लेखनासाठी बसले .लिहिलेल्या मजकूराची पाने ते नानकचंदला टाईप करायला देत होते. अकरा नंतर, स्नान जेवण व थोडी विश्रांती यांत तीन तास घालवून परत लिहावयास बसले, व लिहिलेला मजकूर टाईप करवून घेत होते. संध्याकाळपर्यंत हे काम चालले होते.

संध्याकाळी तिबेटचे दलाई लामा यांच्या सत्काराचे त्यांना आमंत्रण होते. दिल्ली नागरिकांतर्फे हा सत्कार समारंभ अशोकविहार महरौली येथे होणार होता तेथे ते गेले. फक्त नानाकचंद बरोबर गेले माईसाहेब गेल्या नाहीत. समारंभाला दिल्लीतील अस्पृश्य लोक हजारोंच्या संख्येने उपस्थित होते. समारंभानंतर बरेच लोक बाबासाहेबांना भेटावयास त्यांच्या बंगल्यावर आले. व्हांडयात खुर्च्या मांडल्या होत्या. भेटावयास आलेले लोक आपापसांत चर्चा करीत होते. चर्चेचा मुख्य स्त्रोत होता 'बुद्धधर्माच्या प्रसारासाठी काय काय केले पाहिजे' यावर सर्व लोक रात्री आठ वाजेपर्यंत गप्पा करून आपापल्या घरी गेले बाबासाहेबांनीही तेथेच थोडे हलके जेवण घेतले. "माझ्या हयातींत हे माझे ग्रंथ प्रकाशित होतील का? बौद्धधर्माचा प्रचार जोरात चालेल का?" या विषयावर नानकचंदबरोबर अंतरीच्या तळमळीने बोलत राहिले. साडेदहाच्या सुमारास ते झोपी गेले तेव्हां नानकचंद आपल्या घरी गेले.

दुसरे दिवशी नेहमीप्रमाणे आपली दैनंदिन कामे उरकून संध्याकाळी नानकचंदकडून लिहिलेल्या मजकूराची पाने टाईप करवून घेतली. संध्याकाळी बाबासाहेबांनी त्यांच्या आजारी म्हाताऱ्या माळयाची चौकशी केली. परंतु कोणाकडूनही उत्तर आले नाही. माळी वयस्कर होता. त्याला कामाचा उरकही नव्हता, म्हणून, माईसाहेब त्याला काढून दुसरा तरुण माळी ठेवायला सांगत होत्या. बाबासाहेब त्यांना सांगत होते की तो म्हातारा आहे, आता त्याला दुसरे कोण नोकरीस ठेवील? असूं दे आपल्याकडे! त्याला तू औषधोपचार कर. परंतु माईसाहेबांनी त्याला औषधोपचार केले नाहीत की चौकशीही केली नाही. बाबासाहेब नानकचंदला घेऊन माळयाच्या खोलीवर गेले. माळी बाजल्यावर पडला होता. अंगात ताप होता व खोकल्याने तो हैराण झालेला होता. त्याची वृद्धपत्नी जवळच होती. बाबासाहेबांना पहाताच माळी उठण्याचा प्रयत्न करू लागला. बाबासाहेबांनी त्याला उठू दिले नाही. त्यांनी त्याच्या कपाळाला हात लावून ताप पाहिला. तेव्हां माळी, डोळयात अश्रू आणून गहिवरुन म्हणाला 'आज प्रत्यक्ष भगवान माझ्या झोपडीत आला' असे म्हणून त्याने आपल्या दोन्ही हातांनी बाबासाहेबांचा हात पकडून कपाळाला लावला आणि रडू लागला. त्याची पत्नीही रडू लागली. बाबासाहेब म्हणाले 'असे कशाला रडायचे?' माळी म्हणाला "भगवान, मी आता एक दोन दिवसांचा सोबती आहे." मला मृत्यूच्या

अगोदर भगवानाचे दर्शन झाले, हे माझे महाभाग्य आहे.' बाबासाहेब म्हणाले 'अरे रडू नका! औषधोपचार करा! मी औषध पाठवून देतो. मृत्यू टाळता येत नाही पण औषधोपचाराने थोडा आराम मिळतो व कांही काळ तो पुढेही ढकलला जातो. मृत्यूला का एव्हढे भितोस? अरे सर्वांना कधीतरी मरायचेच आहे. मलाही मरायचे आहे! मरण कोणाला चुकवता येत नाही. तू शांत हो व मी पाठवतो ते औषध घे'. असे थोडासा दिलासा देणारे बोलून बाबासाहेब तेथून परतले व माळचाला लागणारी औषधे केमिस्टकडून आणवून माळचाकडे पोहचती केली.

दिनांक १६ डिसेंबरला मुंबईत दिक्षा समारंभ भरविण्याचा कार्यक्रम बाबासाहेबांनी ठरविला; आणि त्याप्रमाणे त्यांनी मुंबईतील कार्यकर्त्यांना कळविले होते. त्या समारंभासाठी रेल्वेने जाण्यासाठी फर्स्टक्लासची चार तिकिटे रिझर्व्ह करावयास सांगितली होती. तरी ती मिळत नसल्याने तारीख ३ डिसेंबरला नानकचंदाने सांगितले. त्यावर माईसाहेबांनी, त्या व बाबासाहेब हे दोघे चौदा डिसेंबरला विमानाने व बाकीचे लोक जमेल तसे रेल्वेने जावेत असे सुचविले. तशी व्यवस्था करण्यास नानकचंदला सांगण्यात आले.

लॉनवरच्या खुर्च्यांवर, माईसाहेबांचे वडील, बंधू व डॉ. मालवणकर बसले होते. बाबासाहेबांचा मूडही चांगला होता. तेव्हा त्यांच्या मेव्हुण्याने निरनिराळ्या कोनांतून फोटे काढले.

१६ डिसेंबरचा जो दिक्षा समारंभ मुंबईत होणार होता, तो बाबासाहेबांचे हस्ते. त्यासाठी त्यांचा मुक्काम कुमारसेन समर्थ, बॅ. समर्थ यांचे चुलत चुलते, यांच्याकडे करावा असे बाबासाहेबांनी ठरविले होते. ते जमत नसेल तर बाबासाहेबांच्या मुंबईतील चार दिवसांच्या रहाण्याची सोय बॅ. समर्थ यांच्या घरी करावी असे पत्र बाबासाहेबांनी नानकचंद यास टाईप करायला सांगितले व त्यावर स्वाक्षरी करून ते सकाळी पोस्टात टाकण्यास सांगितले. ते पत्र असे:

'Last time when Doctor Ambedkar was in Bombay you had promised to arrange for his stay with Mr. Kumar Samarth. Doctor Saheb is leaving Delhi on the 14th for his conversion programme in Bombay on the 16th December. If Mr. Kumar's place is available he will prolong his stay in Bombay. Otherwise he will have to cut short his stay. In that case he will stay in Bombay for three-four days, in which case you will have to oblige us by accommodating him at your residence. So please let us know what arrangments are possible." (Letter of Rattu to Barrister Samarth to make arrangments for A's stay in Bombay when he comes in Bombay for conversion ceremony).

'बुद्ध अँड कार्ल मार्क्स' या ग्रंथाचा बराचसा मजकूर व आलेल्या पत्रांना द्यावयाची उत्तरे, यांचा मजकूर नानकचंद टाईप करीत बसले. माईसाहेबांचे वडील, बंधु व शामराव जाधव अशा तिघांनी मुंबईस, त्याच दिवशी रात्रीच्या गाडीने जायचे ठरले व ते लोक स्टेशनवर गेले. बाबासाहेब झोपी गेल्यावरसुद्धा नानकचंदने हातातील काम पूर्ण करून सर्व टाईप केलेले कागद टेबलावर नीट ठेऊन ते रात्रौ एक वाजता तेथेच बंगल्यावर झोपले.

दुसरे दिवशी दिनांक ४ ला बाबासाहेब सुमारे ८–४५ ला उठले. नानकचंदने, रात्री टाईप केलेली पत्रे बाबासाहेबांच्या पुढे करून सह्या घेतल्या व पोस्ट करण्यासाठी बरोबर घेऊन ते १० वाजता बंगल्याच्या बाहेर पडले व बाहेरच जेवण करून ऑफिसला गेले. सकाळी सुमारे ११ वाजता बाबासाहेबांना भेटायला जैन धर्माचे काही लोक आले. त्यांनी जैन व बौद्ध धर्मातील तत्त्वांची सम व विषम स्थळे यावर त्यांच्याशी चर्चा केली. या बाबतीत जास्त विचारविनिमय करावा व दोन्ही धर्मातील लोकांचा मिलाफ करावा, यासाठी योजना आखावी अशी त्यांनी बाबासाहेबांना विनंती केली. बाबासाहेब म्हणाले, 'या संबंधी आपण उद्या रात्री ८–३० च्या नंतर जास्त चर्चा करू.' जैन मंडळी दिनांक ५ ला रात्री परत येतो असे आश्वासन देऊन परत गेली. त्या संध्याकाळी डॉ. बाबासाहेबांनी काही पत्रे स्वतःही लिहिली. त्यापैकी एक आचार्य अत्रे यांना व दुसरे श्री. एस. एम. जोशी यांना होते. शिवाय 'रिपब्लिकन' पक्षाचे ध्येय, धोरण, कार्यक्रम वगैरे मुद्यासंबंधी माहिती देणारा १०–१२ पानांचा इंग्रजी मजकूर; ब्रह्मदेशाच्या सरकारने भारतात बौद्ध धर्माचा प्रसार करण्यासाठी सहाय्य करावे अशा अर्थाचे त्या सरकारास पत्र—असे सर्व लिखाण बाबासाहेबांनी तयार करून ते टाईप करण्यासाठी नानकचंदकडे सोपविले आणि वरील तारीख १६ च्या व्यवस्थेसंबंधीचे पत्रही लिहायला सांगितले.

दिनांक ५ डिसेंबर १९५६ ला संध्याकाळी ५–३० ला ऑफिस सुटल्याबरोबर नानकचंद साहेबांच्या बंगल्यावर आले. तसा साहेबांचा नोकर सुदाम याने त्यांना फोन केला होता. दुपारी दोन वाजता माईसाहेब व डॉ. मालवणकर बाबासाहेबांना इंजेक्शन देऊन बाहेर गेले होते. बाबासाहेबांना झोप लागत नव्हती. ते अस्वस्थ होते. ते माईसाहेबांना बोलावीत होते. परंतु त्या घरी नव्हत्या. सुदामाला त्यांनी खडसावून विचारले तेव्हा त्याने, त्या बाजारात जातो म्हणून दुपारीच गेल्या आहेत; परंतु कांही सांगू नकोस म्हणाल्या आहेत. म्हणून मी काही बोललो नाही असे सांगितले. अशा मनःस्थितीत मधूनमधून बाबासाहेब 'बुद्ध अँड कार्ल मार्क्स' या ग्रंथाचा मजकूर लिहीत; त्यामुळे त्यांच्या हातून तीन-चारच कागद लिहून झाले होते. नानकचंद ५–३० ला आले. त्यावेळी बाबासाहेबांचा चेहरा म्लान झालेला व ते अस्वस्थ असलेले त्याला दिसले. त्यांनी नानकचंदला लिहिलेले कागद टाईप करण्यास दिले. संध्याकाळी माईसाहेब आल्या, सुदामने त्यांना बाबासाहेब दुपारपासून बोलावित होते हे सांगितले. माईसाहेब काही वेळ डायनिंग टेबलाजवळच बसून होत्या. नंतर त्या साहेबांच्या रुममध्ये गेल्या. थोड्यावेळाने माईसाहेब बाहेर येऊन नानकचंदला, डॉ. मालवणकरांना विमानाने–आताच्या–फोनने रिझर्वेशन करून मुंबईला पाठवून द्यायला सांगितले. मोटारने विमानतळावर पोहोचविण्याचीही व्यवस्था करावयास सांगितली.

बाबासाहेब संतापलेल्या मनःस्थितीत अस्वस्थपणे बिछान्यावर जाऊन पडले. अगोदर ठरल्याप्रमाणे थोड्याच वेळाने ते जैन गृहस्थ, बौद्ध व जैन धर्माचे ऐक्य संपादन करता येणे कितपत शक्य आहे या संबंधी चर्चा करण्यास आले. त्यांनी नानकचंदजवळ भेटण्यास आल्याचा बाबासाहेबांना निरोप दिला. 'मी फार थकलो आहे, त्यांना उद्या बोलाव' असे ते म्हणाले व नानकचंदची पाठ फिरते न फिरते तोच, 'मी एक पांच दहा मिनिटाने येतो, त्यांना बसायला सांग' असे सांगितले. थोड्या वेळाने ते नानकचंदचा आधार घेऊन बाहेर वऱ्हांड्यांत पाहुण्यांशी बोलावयास येऊन बसले. त्या दोघा जैनांनी, बाबासाहेबांना उत्थापन देऊन नमस्कार केला. दुसरे दिवशी दिनांक ६ डिसेंबरला जे जैनांचे संमेलन भरणार

आहे, त्यातील जैन मुनींबरोबर बौद्धधर्म व जैनधर्म यांचे ऐक्य व्हावे याबद्दल, बाबासाहेबांनी चर्चा करावी अशी त्यांनी इच्छा प्रदर्शित केली; आणि 'श्रमणसंस्कृति की दो धारणें :— जैन और बौद्ध-मुनि श्री नथमलजी–प्रकाशक—आदर्श साहित्य संघ सरदार शहर (राजस्थान) संवत २०१३–मूल्य १२ आ.' ही पुस्तिका दिली. बाबासाहेब ती पहात असताना, डॉ. मालवणकर विमानतळावर जाण्यास निघाले. ते साहेबांशी चकारशब्द बोलले नाहीत. 'उद्याच्या चर्चेसंबंधी नक्की वेळ ठरवू या' या जैन गृहस्थांच्या बोलण्यावर साहेबांनी त्यांना चिटणीसांना फोन करून शक्य तो संध्याकाळीची वेळ घ्यायला सांगितली कारण सकाळी त्यांना जमणार नव्हते. ते गृहस्थ बाबासाहेबांना नमस्कार करून उठून गेले. बाबासाहेब तेथेच थोडा वेळ डोळे मिटून बसून राहिले. आणि हळू आवाजात 'बुद्धं शरणं गच्छामी' त्रिशरण म्हणू लागले. नंतर त्यांनी नानकचंदला 'बुद्ध भक्तिगीते' ही रेकॉर्ड लावायला सांगितली व त्या गीतांबरोबर आपणही गुणगुणू लागले. नोकराने जेवणास यायला सांगितले तेव्हा, 'जेवणाची इच्छा नाही' म्हणाले. नानकचंदच्या आग्रहाने नंतर जेवावयास उठले. डार्यानग हॉलचा मार्ग ड्राइंग हॉलमधून होता. त्या हॉलच्या दोन्ही बाजूला भिंतीच्या कडेने ग्रंथांची कपाटे ओळीने लावलेली होती. ती कपाटे ग्रंथांनी खच्चून भरलेली होती. ग्रंथाने भरलेले स्टँडसुद्धी होते, त्यातील एक ग्रंथ घेऊन बाबासाहेबांनी तो उघडला. तो ठेवून दुसरी अलमारी उघडून त्यात जी अत्यंत दुर्मीळ पुस्तके होती. त्यातील काही ग्रंथ काढून नानकचंदच्या हाती दिले. त्या अलमारीच्या बाजूच्या अलमारीत कायद्याची पुस्तके, त्या पुढच्या अलमारीत समाजशास्त्राची, त्याच्या बाजूच्यात तत्त्वज्ञानाची, एका अलमारीत अर्थशास्त्राची तर दुसरीत राजकारणाची, त्याच्या बाजूच्या अलमारीत उत्तम चरित्र ग्रंथ होते. हे सर्व आपले अद्यावत ग्रंथभांडार पाहून एक दीर्घ निश्वास सोडला; आणि हळूहळू चालत डायनिंग टेबलापाशी गेले. इच्छा नसतानाही दोन घास खाल्ले, व परत हॉलमध्ये येऊन बसले. नानकचदांना डोकीला तेल लाऊन मसाज करायला सांगितले. मसाज संपल्यावर ते काठीच्या सहाय्याने उभे राहीले आणि एकदम मोठ्यांदा म्हणाले, "चल उचल कबीरा तेरा भवसागर डेरा." परत हॉलमधून येताना आपल्या वाचनालयातील ग्रंथांकडे पहात पहात ते बिछान्याकडे आले व त्यावर आडवे झाले. नेहमीप्रमाणे नानकचंद पाय चोळू लागले, त्यावेळी बाबासाहेब, नुकतीच नानकचंदाजवळ दिलेली पुस्तके बाजूच्या टेबलावर होती ती चाळून पाहू लागले. त्या टेबलावर या पुस्तकांशिवाय काही ग्रंथाची टिपणे, लिहिलेली प्रकरणे, टाईप केलेला मजकूर यांचा ढीग पडलेला होता. त्यावेळी ते फार थकलेले दिसत होते, चेहराही एकदम निस्तेज झाला होता. त्यांना झोप येऊ लागली तेव्हा नानकचंदाने जाण्याची परवानगी मागितली, तेव्हा ते म्हणाले "जा आता पण उद्या सकाळी लवकर ये, लिहिलेला मजकूर टाईप करावयाचा आहे." नानकचंद दिनांक ५ ला रात्रौ घरी निघाले तेव्हा रात्रीचे ११–१५ झाले होते; इतक्यात सुदामने त्यांना परत बोलावले व सांगितले 'साहेब तुम्हाला बोलावताहेत'. ते परत येऊन साहेबांना म्हणाले 'साहेब कशाला बोलावलेत?' ते म्हणाले "अरे ती, अत्रे आणि एस. एम. जोशींना लिहिलेली पत्रे आणि 'बुद्ध अँड हिज धम्म' हे सर्व इथे मजजवळ ठेव त्यावरून मला दृष्टी फिरवायची आहे." नानकचंदने त्याप्रमाणे केले व ते जायला निघाले तेव्हा ११–३५ झाले होते. घरी जातांना थोड्या अंतरावरच त्यांची सायकल पंक्चर झाली. आणि सर्व दुकानेही बंद झालेली! त्यांना तसेच रखडत पायी जावे लागले. घरी जाईतो, मध्यरात्र उलटली होती. झोपायला त्यांना एक वाजून गेला होता.

दिनांक ६ ला नानकचंद सकाळी नेहमीपेक्षा उशीराच उठले. तेव्हा त्यांच्या लक्षात आले की, साहेबांनी सकाळी लवकर बोलावले आहे. ते तसेच आपली सकाळची कामे भरभर आटपावीत म्हणून दाढीचे सामान बाहेर काढतात न काढतात तोच सुदामा त्यांच्या पुढे उभा राहिला आणि म्हणाला, 'माईसाहेबांनी तुम्हाला लागलीच बोलावले आहे. मला गाडी घेऊनच पाठविले आहे, असाल तसे चला!' नानकचंद तसेच सुदामाबरोबर बंगल्यावर गेले. माईसाहेब वऱ्हांड्यातच होत्या. त्यांना नानकचंदने विचारले, "एवढ्या घाईने का बोलावलेत?" माईसाहेबांनी त्यांना बाबासाहेबांच्या बिछान्याजवळ नेले. नानकचंदन, "बाबासाहेब मी आलो आहे!" असे भांबावून मोठ्यांदा ओरडले! साहेबांच्या अंगाला त्यांनी हात लावला; त्यांना ते गरम असल्याचा भास झाला म्हणून ते छातीला मसाज करू लागले. माईसाहेबांनीही एक चमचा ब्रँडी घेऊन साहेबांच्या तोंडात घातली, ती सर्व तशीच बाहेर आली; मग त्यांनी नानकचंदला ऑक्सीजनचे सिलेंडर उघडायला सांगितले व साहेबांना ऑक्सिजन देण्याचा प्रयत्न केला. हे सर्व प्रयत्न निष्फळ होते. तेव्हा कळून चुकले की, बाबासाहेबांच्या जीवनाचा प्रचंड ग्रंथ आटोपलेला आहे. साहेबांच्या जवळच्या टेबलावर एक सिरिंज व औषधे पडलेली होती. पुस्तके व टाईप केलेले कागदही अस्ताव्यस्त खाली पडलेले होते. नानकचंदने विचारले हे कधी झाले? ते कधी व कसे झाले हे माईसाहेब काहीच सांगू शकत नव्हत्या. बाबासाहेबांच्या अनुयायांचे माईसाहेबांबद्दल पुष्कळ गैरसमज झालेले होते. त्यामुळे या अचानक झालेल्या मृत्यूमुळे त्या भयग्रस्त झालेल्या होत्या. म्हणून त्या नानकचंदला, 'रात्रौ बंगल्यावरच झोपलो होतो' असे सांगण्यास सांगत होत्या. तसे सांगणे नानकचंदने नाकारले! कारण ते रात्रौ उशीरा घरी जाऊन झोपले असता असे खोटे सांगणे कशासाठी करायचे? माईसाहेब म्हणाल्या, 'ही एवढी मोठी लायब्ररी. ही त्यांची इस्टेट याबद्दल ते माझ्याजवळ काहीच बोलले नाहीत, आता हे सर्व कसे निस्तरायचे! तुमचे लोक माझ्यावर वाटेल ते आरोप करतील? या त्यांच्या बोलण्याकडे नानकचंदचे फारसे लक्ष नव्हते ते बाबा गेल्याचे पाहून मोठ्यांदा रडू लागले, बंगल्यातील माळी, सुदामा वगैरे सर्व लोक गोळा झाले. माळ्याने बाबांच्या पायावर लोळण घेतली, व 'माझा भगवान गेला' म्हणून तो मोठ्यांदा रडू लागला.

माईसाहेबांनी ही बातमी सर्वांना कळवावयास व पुढची व्यवस्था कशी करायची हे पहाण्यास नानकचंद यास सांगितले. नानकचंदाने सुमारे ९ वाजता फोन करण्यास सुरवात केली. सर्वश्री भारद्वाज, टी. बी. भोसले, शंकरानंद शास्त्री, सोहनलाल शास्त्री यांना फोन केले; पण कोणीच प्रत्यक्ष फोनवर भेटले नाहीत; म्हणून बाबासाहेबांच्या बंगल्यावर त्यांना ताबडतोब पाठवा असा निरोप प्रत्येकाच्या घरी ठेवला. हे सर्व लोक दहा, सव्वा-दहाच्या सुमारास आले. सर्वांचे 'बाबा' गेले होते! कोणाला दुःखावेग आवरणार? दिल्ली-तील निकटवर्तीयांना फोन केल्यानंतर मुंबईला सिद्धार्थ कॉलेजवर श्री. तळवटकरांना व औरंगाबादच्या 'मिलिंद' कॉलेजवर श्री. वराळे यांना फोन करून ही दुःखद बातमी कळविली व त्याच बरोबर बाबांचा पार्थीव देह मुंबईस आणीत आहोत तरी तुम्ही कोणी दिल्लीस येऊ नये हेही सांगितले.

सर्वश्री टी. बी. भोसले, शंकरानंद शास्त्री, सोहनलाल शास्त्री, पुरणचंद भारद्वाज वगैरे मंडळी, बाबांचा पार्थिव देह मुंबईला चार्टर्ड प्लेनने न्यायचा व त्यासाठी लागणाऱ्या पैशाची व्यवस्था करण्याचे ठरहोत होते; इतक्यात माईसाहेब तेथे आल्या व म्हणाल्या की, शव

मुंबईला न नेता सारनाथला न्यावे व त्यासाठी लागणारे पैसे तुम्ही जमवा, मजजवळ काही नाही ! हे ऐकून सर्व लोक संतापले. अलिकडे बाबासाहेबांकडे, त्यांच्या अनुयायांना येण्याचा माईसाहेबांनी मज्जाव केला होता. बाबासाहेबांच्या इच्छेविरुद्धही त्या वागत होत्या असा बोलबाला झालेला होता. त्यामुळे हे सर्व बाबासाहेबांचे चहाते अनुयायी यांनी त्यांना या दुःखद परिस्थितीतही तोंड न घालण्याची समज दिली ! आणि ते सर्वजण विचार करून शव मुंबईस नेण्याच्या व्यवस्थेस लागले. लागलीच पैसा उभा करायचा तर श्री. टी. बी. भोसले म्हणाले माझी गाडी विका आणखीन जादा पैसे लागले तर कोणाकडून तरी कर्ज घेऊ या.

ही चर्चा चालली असता सर्वश्री जगजीवनराम, गोविंदवल्लभ पंत, सवर्णसिंग आणि इतर मंत्री व लोकसभेचे व लोक परिषदेचे सभासद बाबासाहेबांना आदरांजली वहाण्यास आले. दुःखावेगाने सर्वांच्या डोळ्यात अश्रू आले. श्री. जगजीवनराम तर स्फुंदून स्फुंदून रडत होते. ते कॉंग्रेसवाले असले तरी डॉ. आंबेडकरांच्याबद्दल नितांत आदर होता. बाबासाहेबांची अस्पृशोद्धाराची व पर्यायाने भारताचे जगातील स्थान उंचावण्याची त्यांची तळमळ कोणीही नाकारू शकत नव्हते. जगजीवनराम म्हणाले, "आमचा स्वातंत्र्यदाता गेला." थोड्या वेळाने ते माईसाहेबांजवळ जाऊन बसले. सांत्वनपर दोन शब्द बोलल्यावर त्यांनी माईसाहेबांना विचारले, हे कधी झाले ? माईसाहेब म्हणाल्या, "माहीत नाही. रात्री त्यांच्याजवळ कोणीच झोपलेले नव्हते." हे ऐकून जगजीवनरामना आश्चर्याचा धक्काच बसला व ते उद्विग्न होऊन म्हणाले, 'सात कोटी अस्पृश्यांच्या अनभिषिक्त राजाच्या शेवटच्या क्षणी कोणीही नसावे, हे आश्चर्य आहे ! ! " सर्वश्री टी. बी. भोसले, शंकरानंद शास्त्री, सोहनलाल शास्त्री, नानकचंद हे सर्वच आपणाला, त्यांच्या शेवटच्या क्षणी का राहता आले नाही याबद्दल हळहळत होते. या लोकांनी जगजीवनरामना शव मुंबईस नेण्यासाठी निम्म्या खर्चात सरकारकडून विमान मिळेल का ? म्हणून चौकशी केली. तशी व्यवस्था करण्याचे जगजीवनरामने मान्य केले. इतक्यात पं. जवाहरलाल नेहरू बाबासाहेबांना श्रद्धांजली वाहण्यास आले. थोडावेळ ते बाबांच्या पार्थिव देहाकडे रोखून पहात होते. त्या गाढ्या विद्वानाला मूक मानवंदना देऊन ते माईसाहेबांकडे हॉलमध्ये येऊन बसले. सुमारे वीस मिनिटे तेथे बसले. सभोवारची बाबासाहेबांची लायब्ररी पाहिली आणि उद्‌गार काढले की धन्य धन्य या पुरुषोत्तमाची ! भारताच्या आकाशातला एक दिव्य तारा निखळला ! शवाजवळ, नेहरू व वरील सर्वमंडळी आणि माईसाहेब असताना प्रेसच्या व अनेक खाजगी फोटोग्राफर्सनी अनेक फोटो घेतले. नंतर माईसाहेब, पं. नेहरूना म्हणाल्या, "डॉ. आंबेडकरांच्या पार्थिव देहाचे दहन सारनाथला व्हावे अशी माझी इच्छा आहे, त्यांचे अनुयायी मुंबईला नेण्याचे बोलताहेत. शव नेण्याची सरकारतर्फे व्यवस्था व्हावी." पं. नेहरू म्हणाले, डॉ. आंबेडकरांचा पार्थिव देह नेण्यासाठी विमानाची व्यवस्था केली जाईल, पण सारनाथला नेणे फार अवघड आहे. रस्ते चांगले नाहीत. व्यवस्था चांगली होणार नाही. मुंबईत सर्व व्यवस्था ठीक होईल. पं. नेहरू परतल्यावर त्यांच्या खाजगी चिटणीसांचा फोन आला की शव विमानतळावर नेले की मला फोन करा मी हार घालायला येतो.

शव लोकांच्या दर्शनासाठी बाहेर ठेवले. लाखो लोकांनी रांगेतून येऊन शवाचे दर्शन अश्रूपूर्ण डोळ्यांनी घेतले. कांहींनी शवाच्या पायावर डोके ठेवून टाहो फोडला. कांहींनी दुःखातिषयाने आपले अंग जमिनीवर टाकले व "बाबा" असा टाहो फोडला. लाखो लोकांनी काळ्या फिती दंडावर व छातीवर लावल्या.

एका ट्रकवर प्लॅटफार्म तयार केला. त्यावर फुलांची शेज केली. त्यावर बाबासाहेबांचा पार्थिव देह चार वाजता ठेवण्यात आला. ट्रक साडेचारला बंगल्याच्या बाहेर पडला, तेव्हा "बाबासाहेब झिंदाबाद! बाबासाहेब अमर रहे!" अशा अश्रुपूर्ण नेत्रांनी लोकांनी उत्स्फूर्त घोषणा केल्या. सारे असमंत दुःखाने व्यापून गेले. ट्रक व त्या समवेतचा लोकसमुदाय काश्मिरी दरवाजा, चांदणी चौक, नई सराई, चौरी बाझार, हौसखस, अजांमिरी दरवाजा, कॅनॉट प्लेस, कर्झन रस्ता, इंडिया गेट, शहाजान रस्ता, पृथ्वीराज रस्ता या भागातून सफदरजंग विमान तळावर गेले तेव्हा रात्रौ नऊ वाजले होते. शव आणताना रस्त्याच्या दोन्ही बाजूला लाखो लोक रडत शेवटच्या दर्शनास उभे होते. पं. जवाहरलाल नेहरू व अनेक इतर मान्यवरांचे हार विमानतळावर आले होते. ते शवास वाहिले व शव विमानात नेले, तेव्हा लोकांनी बाबासाहेबांच्या नावाचा प्रचंड जयघोष केला. बरोबर रात्रौ ९–३० ला विमान दिल्लीहून निघाले. सकाळपासून गोळा झालेली निकटवर्ती मंडळी, शास्त्रीद्वय, पूरणचंद नानकचंद, टी. बी. भोसले वगैरे व माईसाहेब विमानात बसले. ते विमान मध्येच नागपूरला उतरविले गेले. तेथील असंख्य अनुयायांनी साश्रुनयनांनी, भावपूर्ण श्रद्धांजली वाहिल्यावर ते रात्रौ १-५० ला सांताक्रुझ विमानतळावर उतरले. प्रथम ६ डिसेंबरला दिल्लीत असे ठरविले होते की, तारीख ७ ला सकाळी १०–३० च्या सुमारास शवाला अग्नीसंस्कार करावा. परंतु दिल्लीहून निघायलाच वेळ लागला, शिवाय नागपूरलाही थांबावे लागले. तोपर्यंत बाबासाहेबांच्या मृत्यूची बातमी सर्व देशभर पसरली. तावडतोब लोक मिळेल त्या वहानाने व गाड्यांतून जागा न मिळाल्यास टपावर बसूनसुद्धा लोक बाबासाहेबांच्या अंत्य-दर्शनाला येऊ लागले. सांताक्रूस विमानतळावरही प्रचंड लोकसमुदाय हजर होता. तेथून तो बाबासाहेबांचा पार्थिव देह दादरच्या त्यांच्या लाडक्या राजगृहात आणला. राजगृहाकडे चोहो दिशांनी लोक दर्शनास येत होते. सर्वांना त्यांचे अंत्यदर्शन घेता यावे म्हणून बंगल्याच्या पोर्चमध्ये मुख्य प्रवेश दाराशी तो पार्थिव देह ठेवला होता. दर्शनार्थी लोकांची रांग एवढी लांब होती की संबंध हिंदुकॉलनीला वेढा पडला होता. दर्शनासाठी मुंगीच्या पावलांनी लोक पुढे सरकत होते.

□ □ □

प्रकरण ६ वे

# परिनिर्वाण महायात्रा (मुंबई)

शुक्रवार दिनांक ६ डिसेंबर १९५६ रोजी, मी ओल्डसेक्रेटरिएट बिल्डिंगमध्ये नेहमीच्या ऑफिसच्या वेळेला पोहचलो व ऑफिसच्या कामाला सुरवात केली. सुमारे १२ वाजता डायरेक्टर ऑफ इन्फर्मेशनच्या कचेरीतील एक कर्मचारी श्री. सावंत हे माझ्याकडे आले व व्यथित अंतःकरणाने डोळ्यांत अश्रू आणून मला त्यांनी सांगितले, "घात झाला! बाबासाहेब गेले!! मी टेलीप्रिंटरवरची बातमी वाचली!!!" त्यांच्या बोलण्यावर माझा विश्वास बसला नाही. 'मी लागलीच सिध्दार्थ कॉलेजकडे गेलो. तेथे दरवाजावर इंग्रजी माहिती पत्रक लावले होते, सिद्धार्थ कॉलिजचे जनक डॉ. भी. रा. आंबेडकर यांच्या मृत्युनिमित्त कॉलेज बंद' मी दुःखित अंतःकरणाने माझ्या ऑफिसमध्ये परतलो व इतरांना ही बातमी सांगितली.

दुःखाने भारावलेल्या अंतःकरणाने व शून्य मनाने सर्वव्यवहार उरकून मी घरी येत असतानाच राजगृहात शिरलो कारण राजगृह माझ्या घराच्या थोडेसे आधीच मुख्य रस्ता-न. पु. रोडवर आहे. राजगृहासमोर लोकांचे थवेच्या थवे, अश्रूंनी डबडबलेल्या डोळ्यांनी व दुःखाने म्लान झालेल्या चेहऱ्यांनी उभे राहिले होते. काही बसले होते. काही मुंबई व उपनगर यांच्या चारी दिशांतून येत होते. स्त्रिया व मुले तर हमहमसून रडत होती. सर्वांचे बाबासाहेब गेले होते!!

मी आणि श्री. भास्कर कद्रेकर जुन्या आठवणी काढून सायंकाळी सात ते पहाटेस साडेतीन वाजेपर्यंत, राजगृहाच्या एका खोलीत बोलत बसलो होतो. बाबांचा पार्थीव देह मुंबईला आणणार, की दिल्ली अगर नागपूर येथे त्यांचे अंत्य विधी होणार, याबद्दल लोकांत अनेक प्रकारच्या बातम्या पसरलेल्या होत्या. बाबांना मृत्यू आला तो नैसर्गिक की अनैसर्गिक या संबंधीही लोकांमध्ये अनेक प्रकारच्या बातम्या पसरलेल्या होत्या. कारण बाबासाहेब, मधुमेहामुळे व बैठ्या कामामुळे शरीराने गलीतगात्र झाले होते तरी त्यांचे बौद्धिक काम अखंड चालू होते. आजारी आहेत अशी काही बातमी नसतांना हे अचानक कसे घडले! यावर अनेक तर्कवितर्क चालले होते.

पहाटे बाबासाहेबांचा पार्थिव देह राजगृहावर आणला गेला. त्यानंतर, सोहनलाल शास्त्री, शंकरानंद शास्त्री, नानकचंद व मी असे राजगृहापुढील महापालिकेच्या बागेत बोलत बसलो. नानाकचंद, दिनांक ५ डिसेंबरच्या रात्री साडे अकरानंतर बंगला सोडून गेल्यानंतर आणि दुसरे दिवशी सकाळी सुदामाच्या बरोबर गाडीतून बंगल्यावर आले. या दरम्यान ज्या घटना नानकचंदानी नोकराकडून ऐकल्या त्या त्यांनी मला सांगितल्या त्याचा सारांश असा :

औषधोपचार करावयास माईसाहेब, बाबासाहेबांच्या खोलीत गेल्या तेव्हा साहेब खूप मोठ्यांदा बोलत होते. त्यानी इंजेक्शन नको तू जा, असे माईसाहेबांना उद्देशून उद्गार काढले होते, असे ताकाचा ग्लास, नेहमीप्रमाणे नेऊन ठेवणाऱ्या नोकराने ऐकले व तो ग्लास ठेवून बाहेर आला.

बाबासाहेबांनी ताक घेतले व १२ च्या सुमारास, लिहिलेल्या प्रस्तावनेच्या मजकुरावरून शेवटचा हात फिरवावा म्हणून बसले. १२–१५ वाजेपर्यंत त्यांनी ते काम पूर्ण केले, आणि झोपण्यासाठी बिछान्यावर पडले.

त्यांची खोली पहिल्या मजल्यावर होती. तेथेच त्यांचा पलंग होता. बाजूच्या खोलीत ग्रंथांची कपाटे होती. माईसाहेब दररोज त्यांच्या खोलीत शेजारच्या पलंगावर झोपत. त्या रात्री त्या तळमजल्यावरच्या एका खोलीत झोपलेल्या होत्या. त्या दुसऱ्या दिवशी पहाटेस उठल्या व बाबासाहेबांच्या खोलीत गेल्या. नोकरांकडून कॉफी करवून घेतली व ती पिऊन त्या पुन्हा बिछान्यावर (तळमजल्याच्या) पडल्या. बाबासाहेबांना चहा घेऊन जा म्हणून त्यांनी सुदामाला सांगितले. सुदामा चहा घेऊन वर गेला व भीतीने तसाच धावत परत आला व म्हणाला, 'साहेब विचित्रपणे झोपलेले दिसले!' माईसाहेबांनी त्याला सांगितले,'तू नानकचंद, शास्त्री आणि इंजिनिअर भोसले यांना आठ वाजता फोन करून सांग की साहेब फार सीक आहेत, लौकर या.' फोन करण्याचे रद्द करून माईसाहेबांनी सुदामाला मोटारीने नानकचंदाकडे पाठविले. नानकचंदानी, बाबासाहेबांना बिछान्यात झोपलेल्या अवस्थेत पाहिले, आणि त्यांनी हंबरडा फोडला. नंतर त्यांनी सर्वांना फोन करून हे दुःखद वृत्त कळविले. बाकी सर्व लोकांनी त्यांना बिछान्यावर झोपलेल्या अवस्थेत पाहिले. हेच सर्व वर्णन सुदामा नोकराकडूनही ऐकावयास मिळाले.

बाबासाहेबांच्या अकस्मात मृत्यूची बातमी उभ्या हिंदुस्थानात आणि सर्वजगभर दुपारपर्यंत पोहोचली. भारतातील दलित वर्गातील लहान थोर लोक दुःखाने व्याकूळ झाले. नागपूर, विदर्भ, मराठवाडा, कर्नाटक, पंजाब वगैरे लांबच्या पल्यावरचे लोक मुंबईला बाबासाहेबांचे शेवटचे दर्शन घेण्याकरता रेल्वेने आले. मुंबईच्या आसपासच्या जिल्ह्यातील लोकही मोठ्या प्रमाणात आले. फार थोड्या लोकांनी रेल्वेची तिकिटे काढली होती. बहुतेकांनी मृत्यूची बातमी कळताच भांबावलेल्या स्थितीत स्टेशन गाठले व मिळेल त्या गाडीने, मिळेल त्या डब्यात, फुटबोर्डवर उभे राहून, डब्यांच्या वरचे भागावर (टपावर) बसून मुंबईला येऊ लागले. रेल्वे स्टेशनवरील प्रचंड जनसमुदाय पाहून रेल्वे अधिकाऱ्यांनी बाबासाहेबांच्या अनुयायांना प्रवासात शक्य तेवढे सहाय्य केले. नागपूर, मनमाड, मिरज, वगैरे स्टेशनांतून स्पेशल रेल्वे गाड्या सोडल्या. मुंबईच्या दादर स्टेशनवर उतरून लोकांच्या झुंडी दिनांक ६ ते ९ एकसारख्या राजगृहाकडे येत होत्या.

बाबासाहेबांचा पार्थिव देह मुंबईस विमानाने येत आहे ही बातमी मुंबईतील लोकांना कळली तेव्हा लोकांचे थवेच्या थवे विमानतळाकडे जाऊ लागले. दिल्लीहून, बाबासाहेबांचा पार्थिव देह घेऊन जे विमान निघाले ते नागपूर येथील लोकांनी ९ ते १२ (रात्रौ) असे तीन तास बाबासाहेबांना मूक वंदना साश्रुनयनांनी व भारावलेल्या अंतःकरणांनी दिली. विमान तेथून निघून सांताक्रूस विमानतळावर रात्रौ १–५५ दिनांक ७ ला उतरले. राजगृहाच्या गच्चीवर लाऊड स्पीकर लावून लोकांना आदेश देण्यात येत होते. विमानातील लोकांपैकी शंकरानंद शास्त्री वगैरे काही जण राजगृहावर सरळ अगोदर आले व लाऊड स्पीकरवरून त्रिशरणांचा घोष सुरू केला. विमानतळावर २५–३० हजार लोक जमा झाले होते. देह ॲंब्युलन्समध्ये ठेवण्यात आला. ॲम्ब्युलन्स २-२५ वाजतां विमानतळावरून राजगृहाकडे जाण्यास निघाली. हजारो लोक थंडीत कुडकुडत रस्त्याच्या दोन्ही बाजूंना हातात हार घेऊन व डोळ्यांतून अश्रूंना वाट करून देत उभे होते. काहींनी हातात कंदील आणले होते. काहींनी गॅसबत्या तर काहींनी रॉकेलच्या दिवट्या आणल्या होत्या. लोकांची वंदना घेत घेत ॲब्युलन्स हळूहळू चालत राजगृहाला

४-३५ वाजता आली. तेव्हा राजगृहापुढे जमलेल्या लाखो लोकांच्या तोंडून एकच आर्त स्वर निघाला "बाबा ! ! " आणि ते असाह्यपणे रडू लागले.

बाबासाहेबांचा पार्थिव देह कोठे ठेवावा याबद्दल पुढाऱ्यांत चर्चा सुरू झाली. तेव्हा मी श्री. भाऊराव गायकवाड व शंकरानंद शास्त्रीना सुचविले की, पोर्चमध्ये ठेवले जावे म्हणजे एवढ्या अफाट समुदायाला त्यांचे नीट दर्शन घेता येईल. शं. शास्त्रींनी सुचविले की, आधी घरात ठेवा व मग बाहेर. देहाला राजगृहात आणतांना माईसाहेब प्रथम आत रडत रडत आल्या. दिल्लीहून बरोबर आलेले लोक त्यांचे रडे पाहून तुच्छतेने टोचून बोलत होते. ते मी स्वत: ऐकले. मुकंद व यशवंत तबकात मेणबत्या घेऊन मागून आले. शुक्रवारच्या सकाळी पोर्चमध्ये उच्चासनावर पश्चिमेस पाय व पूर्वेस डोके करून बाबासाहेबांचा पार्थिव देह लोकदर्शनासाठी ठेवला. त्यांच्या एका बाजूला माईसाहेब व यशवंत आणि मुकुंद बसले. डोक्याच्या मागे बुद्धाची मूर्ती ठेवली होती. मग लोकांच्या दर्शनाला सुरुवात झाली. यशवंत व मुकुंदची लहान मुले माझ्याच घरी होती. औरंगाबादेहून आलेले वराळे, प्रि. चिटणीस वगैरे मंडळीनी हातातले सामान माझ्या घरी ठेऊन ते राजगृहावर आले. मी स्वत:ही राजगृहावरच रात्रभर होतो.

समता सैनिक दलाचे स्वयंसेवक व अधिकारी; यांनी जमलेल्या लाखो लोकांची व्यवस्था करण्यासाठी जीवाचे रान केले. दोन दोन पुरुषांच्या व दोन दोन स्त्रियांच्या अशा रांगा नप्पू रोड व खारेघाट रोड यांवर केल्या होत्या. नप्पू रोडवरच्या रांगा राजगृहापासून दक्षिणेला फाळके रोडवर गेल्या होत्या तर खारेघाट रोडच्या रांगा किंगजॉर्ज स्कूलच्या बाजूने माझ्या घरापुढून नप्पुरोडवरून किंगजॉर्ज हायस्कूलला वळसा घालून दर्शनासाठी पुढे सरकत होत्या. लोक मिनिट अर्धे मिनिट उभे राहून दर्शन घेत व त्यांना पुढे सरकावे लागे.

बाबासाहेबांच्या पार्थिव देहाला अनेक संस्थांचे व त्यांच्या चाहत्यांचे हजारो हार अर्पण करण्यात आले. एवढे हार आले की, पहिले हार काढून बाजूस ठेवले जात. त्या ढीगावरच लोकांना उभे राहून दुसरे हार घालावे लागत. ही व्यवस्था करण्यास सात आठ लोक आळीपाळीने सकाळी सात ते दुपारी एक वाजेपर्यंत उभे होते; त्यांपैकी मीही एक होतो. यावेळी मला काही दृश्ये अत्यंत हृदयद्रावक दिसली. मुंबईचे महापौर श्री. मिरजकर आणि डॉ. रा. बा. मोरे हे कम्युनिस्ट पक्षातर्फे हार घेऊन सकाळी ८-२० ला आले. हार अर्पण करून मिरजकर गहिवरून ओरडले "बाबासाहेब ! दलितांचे राज्य स्थापन्याच्या आगोदरच निघून गेलात !" रावबहादूर सीताराम केशव बोले हे हार अर्पण करण्यास ८-२५ ला आले. हार बाबासाहेबांच्या चरणावर ठेवून त्या ८५ वर्षांच्या वृद्ध सहकाऱ्याने बाबासाहेबांच्या देहाला मिठी मारली व ते मोठ्यांदा रडू लागले. त्यांच्या दंडाला धरून मी त्यांना बाजूला खूर्चीवर नेऊन बसविले. प्रा. जोशी यांनी हार अर्पण करून बाबासाहेबांच्या पायांना मिठी मारून ते ओक्साबोकशी रडू लागले.

दलित स्त्रियांचा आक्रोश तर विचारायलाच नको! मातांनी आपली मुले बाबांच्या-चरणांवर घातली. काहींनी भींतीवर डोकी आपटली, कित्तेकजणी मुर्छीत पडल्या; त्यांना स्वयंसेवकांनी प्रथमोपचार केले व बागेत नेऊन बसविले.

माईसाहेब, त्यांची नातलग मंडळी, बॅ. समर्थ व त्यांच्या पत्नी नर्मदाबाई, श्री. देवराव नाईक वगैरे मंडळी एका बाजूस बसली होती. डॉ. जी. टी. मेहताही पार्थिव देहाची योग्य ती काळजी घेत तेथेच बसले होते.

राजगृहाच्या सभोवती जमा झालेले लोक, लाऊड स्पीकरमधून प्रसारीत होणाऱ्या त्रिशरणाच्या घोषणेला कंपायमान आवाजाने साथ देत होते.

हिंदू कॉलनीतील सवर्ण हिंदूना बाबासाहेबांच्या पार्थिव देहाचे दर्शन घेण्यासाठी रांगेत तीन चार तास उभे रहावे लागले. हिंदू कॉलनीतील लोकांनी, 'आमच्या वसतींतील ज्ञानियांचा राजा गेला! आमच्या हिंदू कॉलनीचे भूषण हरवले! !' असे उद्गार काढले.

या सर्व विराट दृश्यांची छायाचित्रे घेण्यास वर्तमान पत्रांचे छायाचित्रकार वरच्या मजल्यावरून, कोणाच्या खांद्यावर उभे राहून, झाडावर चढून, शेजारच्या इमारतीच्या सज्जा-वरून छायाचित्रे घेण्यास धडपडत होते.

शुक्रवार, दिनांक ७ ला दुपारी सुमारे १ वाजता बाबासाहेबांचा पार्थिव देह शृंगारलेल्या ट्रकवर उंच आसनावर ठेवला. त्यांना दिल्लीहून ज्या सुटात आणलेले होते, त्याच पोषाखात ट्रकवरच्या उच्चासनावर ठेवण्यात आले, गळयाभोवती मफलरही तसाच गुंडाळलेला होता. ट्रक १-१५ वाजता राजगृहापुढून हालला! महायात्रेला आरंभ झाला. त्या प्रेत यात्रेत पुढे व मागे मिळून सुमारे दहा लाख लोक अश्रू गाळीत आणि बौद्ध धर्माचे त्रिशरण हुंदके देत म्हणत चालले होते. पोलीस खात्याने सुमारे पाचशे पोलीस व्यवस्थेसाठी ठेवले होते. समता सैनिक दलाचे हजारो सैनिक, लोकांना पाणी देणे, प्रथमोपचार करणे याची व्यवस्था करीत होते. राजगृहापासून ही यात्रा निघून रामनारायण रुइया कॉलेज समोरून मी रहातो त्याच्या पुढील मैदानावरून व्हिन्सेन्ट रोड (आतांचे डॉ. आंबेडकर रोड) ला मिळाली, ही अभूतपूर्व निघालेली स्मशानयात्रा आणि प्रेतदहन संस्कार, इत्यादी संबंधी निरनिराळया वर्तमान पत्रांतून जे सविस्तर वृत्तांत प्रसिद्ध झाले होते, ते मी वाचकांच्या माहितीसाठी समग्र येथे देत आहे :—

(१) राजगृहातून बाबासाहेबांच्या पार्थिव देहाची प्रचंड मिरवणूक शुक्रवारी ७ डिसेंबर १९५६ काढली आणि ती शिवाजी पार्कला नेली तेव्हांचे छायाचित्र 'फ्री प्रेस जर्नलने' शनिवार तारीख ८ डिसेंबरला १ ल्या पानावर प्रसिद्ध केले होते, आणि बाजूला लिहिले होते ते असे :—"A view of the vast sea of humanity that accompanied the last remains of Dr. Ambedkar on the last journey. The left, the right half of the picture shows the crowd in front of 'Raj Grita' (Ambedkar's residence) and half shows the scene at Shivaji Park for crimatorium, where the body was cremated" (The Free Press Journal, of 8th December 1956) या मिरवणुकीचा आणि अग्निसंस्काराच्या विधीचा वृत्तांत सदर पत्राने पान १ आणि ५ यांवर

दिलेला होता तो आणि त्याच अंकाच्या पहिल्या पानावर लाखो-लोकांचा बौद्ध धर्माचा स्वीकार केल्याचाही वृत्तांत होता. ते सर्व जसेच्या तसे पुढे देत आहे :—

" Moving Scenes at Funeral Ceremony of Dr. Ambedkar. Bombay Friday.

........Mangala Gour and Ganesh Puja (The Free Press Journal, 8th, 12th 1956 P.I.)

(२) लोकसत्ता.—या पत्राने ८ डिसेंबर १९५६ च्या अंकात बाबासाहेबांचे शव दिल्लीहून मुंबईस आणले व ते दुसरे दिवशी दहन करण्यास स्मशान भूमीवर नेले, यासंबंधी १ व २ पानांवर दोन निराळे, वर्णनात्मक वृत्तांत प्रसिद्ध केले. पहिल्या पानावर तीन फोटोही दिले होते. "शुक्रवारी दुपारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पार्थिव देहाची महायात्रा दादर येथील त्यांच्या पूर्वीच्या राजगृह या निवासस्थानापासून काढण्यात आली. डावीकडील छायाचित्रात डॉ. आंबेडकर यांचे शव वाहून नेणारा ट्रक पुष्पहारांनी खच्चून भरलेला दिसत आहे. तर उजवीकडील चित्र महायात्रेत सामील झालेल्या जन-सागराचे आहे." असे त्या दोन फोटोंचे वर्णन आहे. "दादर चौपाटीवर शुक्रवारी सायंकाळी डॉ. आंबेडकरांच्या अंत्यविधिसाठी जमलेल्या लक्षावधी लोकांनी हात वर करून बौद्ध धर्म स्वीकारण्याचा निश्चय जाहीर केला. त्या प्रसंगी घेतलेले छायाचित्र". पहिला वर्णनात्मक वृत्तांत येणेप्रमाणे :—

## (1) MOVING SCENES AT FUNERAL CEREMONY OF DR. AMBEDKAR

Bombay Friday

The mortal remains of Dr. B. R. Ambedkar were cremated to-day at the Shivaji Park Hindu Crematorium, amidst touching scenes of grief, as lakhs of people paid their homage to the departed leader.

More than half a million people witnessed the last rites which were performed according to Buddhist scriptures by Bhikku Bhadant Anand Kausalayan.

The funeral pyre, placed on a raised platform of sand, was made entirely of sandalwood and was lit by Shri Yeshwantrao Ambedkar (Dr. Ambedkar's only son) at 7 p. m. while many sobbed quietly.

The remains were earlier taken to the crematorium in a mammoth procession the biggest of its kind in living memory. The procession started from " Raj Griha ", the former residence of Dr. Ambedkar at Hindu Colony, Dadar, at 1-30 p. m. and passed through Vincent Road, Poibawdi, Parel, Elphinstone Bridge, Sayami Road Gokhale Road, to Shivaji Park.

As the procession (a recritable sea of humanity) wended its way along the five-mile route, moving literally at a snail's pace, people showered flowers on the body of Dr. Ambedkar which was lying on a motor van. Several organisations and individuals in the city paid their floral homage, prominent among whom were Shri G. D. Tapase Minister for Backward Classes, Government of Bombay Shri N. M. Naik-Nimbalkar, Minister for Public Works and Shri K. K. Shah, Vice-President of the Bombay Provincial Congress Committee.

*This was the first instance in the history of Bombay when thousands of women belonging to the poorer classes joined a funeral procession.*

At the crematorium hundreds of perople, who had come from the neighbouring districts, were waiting since early afternoon to have the last glimpse of the leader.

The body was placed on a table at the crematorium facing the sea so that lakhs of people who had assembled on the shore could have the last "darshan" of the leader.

Four Buddhist Bhikkus, led by Bhadant Anand Kausalayan, chanted "mantras" in Pali, and the whole assembly repeated the mantras after them. The whole atmosphere was filled with "Buddham Sharanam Gachhami! Dhammam Sharanam Gachhami! Sangham Sharanam Gachhami!"

**TRIBUTES PAID : HOMAGE TO AMBEDKAR**

Addressing the gathering in Hindi, the Bhadanta Anand Kausalayana paid glowing tributes to the late Dr. Ambedkar. Two other Bhikkus, coming from Malaya and Ceylon also paid tributes to the departed leader.

Shri. P. K. Atre, noted Marathi writer, speaking on the occasion, said that Dr. Ambedkar has suffered and struggled for the rights for the seven crores of the depressed classes of India. With his death had closed the last chapter of a great book, he added.

At the crematorium, the Chief Secretary to the Bombay Government, placed wreath on the body on behalf of the Chief Minister. The body was profusely garlanded by several organisations at the funeral grounds.

As the mortal remains were consigned to flames, the mourners burst into tears. The wife of Dr. Ambedkar, who was present at the funeral, was beside herself with grief when the funeral pyre was lit.

## "LAST POST"

The city police honoured the departed leader by sounding the "last post," an honour given for the first time in Bombay to a non-official person. Hundreds of policemen were posted at the crematorium to maintain order and the top police officers in city personally supervised the police arrangement. Among those who were present were Shri S. L. Silam, Speaker of the Bombay Legislative Assembly, Shri. M. Harris, Shri M. V. Donde, Shri B. C. Kamble, Shri B. S. (K) Kaikwad and Naushir Bharucha.

*Earlier in the day, one and a half lakhs of the city's industrial workers stayed away from work in the biggest spontaneous demonstrations of public sorrow seen in Bombay, since the passing away of Mahatma Gandhi.*

Since the early hours of the morning, thousands of industrial workers and labour trekked to Raj Griha where Dr. Ambedkar's body was kept on the porch.

Every approach to the Chowk in the Hindu Colony, near Raj Griha, was completely jamned by large crowds and repeated attempts made by the police to keep the crowds proved of no avail.

While every suburban train, bus and tram moving to Dadar brought a fresh load of mourners, hundreds of others trecked long distances on foot to have one last "darshan" of the late Dr. Ambedkar. From early in the afternoon, every street and lane on the route to Shivaji Park crematorium was lined with crowds of men, women and children who braved the hot sun to wait in patience for the funerral procession.

The arrival of the bier at the crematorium was herelded by six lighted candles which were carried in by Shri Yeshwantrao Ambedkar and Smt. Ambedkar. Humans extolling Lord Buddha were chanted by the Bhikkus as the lighted candles were placed round an image of Buddha, before the actual funeral ceremonies commenced.

**Police Arrangements**

The police arrangements to control the vast sea of humanity at the Shivaji Park sea-face were almost perfect and repeated attempts made by a section of the crowd to break the cordon failed as a result of the prompt attention given by the constables and officers on duty. Among top police officers present

on the occasion to attend to the arrangements personally were Deputy Commissioner of Police, Shri Pant, Deputy Commissioner of Police, Shri W. K. Patil and Deputy Commissioner of Police, Shri Lobo.

The entire shore opposite the Shivaji Park crematorium was so overflowing with crowds that many stood knee-deep in the sea despite the gathering darkness and the winter cold.

Every ceremony was followed in rapt attention by the silent crowds surcharged with emotion when the conversion ceremony started.

Shri Atre's 15 minute address moved the crowds to sobbing openly as the Marathi literature in a thundering voice enumerated the work done by the Late " Babasaheb " during his life-time and asked in a voice choked with emotion. " Why is it that out of this vast conglomeration, death has come to only such a man the like of whom will never be seen again by us. "

(The Free Press Journal, 8th December 1956, pages 1 and 5).

**" A Special Journey "**

Bombay, Friday; A letter written by Dr. B. R. Ambedkar, accepting the invitation sent by the Elphinstone College to attend its centenary celebrations, was the centre of attraction at an exhibition of rare books and manuscripts opened in the college hall this evening.

The letter sent from Delhi on October 27, expressing Dr. Ambedkar's desire to attend the celebrations, says : " I am so far away that I shall have to make a special journey for the occasion. "

Dr. Ambedkar's body was specially flown down to Bombay last night, about the same time that the centenary celebrations of his " alma mater began. "

(The Free Press Journal, dated 8th December 1956, page 1)

**" OVER A LAKH EMBRACE BUDDHISM BOMBAY, FRIDAY "**

At least a lakh of eager, downhoasted members of the Scheduled Castes embraced Buddhism to-day, as the last remains of Dr. B. R. Ambedkar awaited to be consigned to the flames at the Shivaji Park crematorium.

It was the most spontaneous demonstration of loyalty to a leader ever witnessed in Bombay and probably in the country, and provided an unusual climax to the last journey of the Rebel against untouchability.

The mass conversion was conducted by a Buddhist monk, Bhikku Bhadant Anand Kausalayana, after a section of the vast sea of mourners had expressed a desire to be initiated into the faith of their leader.

No accurate estimate of the number of converts was possible as the oath was taken on the spur of the moment and simultaneously by the entire congregation. But thousands of people, including large numbers of women present at the funeral, indicated by a show of hands their willingness to embrace Buddhism when Dadasaheb Gaikwad, President of the Maharashtra Pradesh Scheduled Castes Federation, asked them on the microphone if they desired to be admitted to Buddhism.

He said that Dr. Ambedkar was to have presided over the conversion ceremony on December 16 in Bombay, when ten lakhs of people from all over the State were to join the Buddhist fold. But, he added, unfortunately, Dr. Ambedkar passed away prematurely. "You can now fulfill his last desire before his mortal remains are consigned to flames," Dadasaheb Gaikwad said and asked them to indicate their desire by a show of hands.

Immediately, thousands of hands shot up and Bhikku Anand Kausalayan administered in Pali language "Diksha" by making the congregation recite the sacred hymns of Buddhism, the "Shri Sharanam" and the "Panchshila".

The neo-Buddhists were thereafter given a code of conduct in Hindi which stressed, among other things the following:—

(1) "We swear–we shall not recognise any Hindu God or deity",

(2) "We swear–we shall not worship any Hindu God or Goddess in any manner",

(3) "We denounce the worship of any Hindu God like Rama, Krishna, Ganesh, Mahadev and Satyanarayana", and

(4) " We swear–we shall not perform any Hindu ceremonies like Satyanarayan puja, Mangala Gaur and Ganesh Puja ". (The Free Press Journal, 8th December 1956, page 1).

**(२) "डॉ. आंबेडकर यांच्या अंत्यदर्शनासाठी २ लाखांचा जमाव अत्यंत शिस्तबद्ध वागणुकीमुळे गांभीर्यात भर.**

**मुंबई, शुक्रवार.**—डॉ. आंबेडकर यांचे शव आज पहाटे ५-३० वाजतां राजगृहांत आणण्यांत आले तेव्हा पासून आज दुपारीं १-०० वाजेपर्यंत सुमारे दोन लक्ष लोकांनीं त्यांचें अंत्यदर्शन घेतलें. परंतु एवढ्या गडबडींत एकदांहि कोणाची गैरशिस्त वागणूक झाली नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचें शव दिल्लीहून विमानानें रात्रौ दोन वाजतां सांताक्रूझ विमानतळावर आणण्यात आलें. काल सायंकाळीं ४ वाजल्यापासून तेथे हजारों लोक अंत्यदर्शनांसाठी गर्दी करून उभे होते. या गर्दीमुळें तेथील नोकरवर्गास आपली नेहमीची कामे करणेंहि मुष्कील झालें होतें.

**रस्त्यावरहि दुतर्फा गर्दी**

विमानतळावरून रात्रौ २-२० वाजतां डॉ. आंबेडकर यांचे शव दादर येथील त्यांच्या निवासस्थानी नेण्यासाठीं हलविण्यांत आले. त्या शवाबरोबर हजारो लोक पायीं येत होते. त्याचप्रमाणें मार्गांतही हजारो आबालवृद्ध पेट्रोमॅक्सच्या बत्त्या लावन भर थंडीत रात्रभर उभे होते. हे शव दादर येथील राजगृहांत आणण्यासाठीं ३ तास लागले. तेथेही हजारों लोक अंत्यदर्शनासाठीं रात्रभर ताटकळत उभे होते.

सकाळीं १० वाजेपर्यंत डॉ. आंबेडकर यांचे निकटवर्ती लोक अंत्यदर्शन घेऊन गेले. सकाळपासून शहराच्या निरनिराळ्या भागांतून हजारो लोक मिळेल त्या वाहनानें दादरला लोटत होते. १० वाजतां दादर भागांत अंत्यदर्शनासाठीं लक्षावधी लोक जमा झाले होते, दादर स्टेशन (मध्य रेल्वे) ते माटुंगा रेल्वे स्टेशन यांना जोडणारा मार्ग माणसांनीं इतका खच्चून भरला होता कीं तेथें मुंगीलाही शिरता आले नसतें. जणू काय तेथें आज मानवी महासागरच अवतरला होता असें वाटत होते. त्याचप्रमाणें हिंदू कॉलनीच्या गल्ल्या व खोदादाद सर्कल या भागांतही रात्री फार गर्दी झाली कीं, त्यामुळें कांहीं काळ बस व ट्रामच्या वहातुकीस अडथळा निर्माण झाला. एका ठिकाणीं गर्दी पांगविण्यासाठी पोलिसांना सौम्य लाठीहल्ला करावा लागला.

**शिस्तप्रिय जमाव**

एवढी जरी गर्दी तेथें जमली होती तरी लोक अत्यंत शिस्तीनें अंत्यदर्शनासाठीं उभे होते. बहुसंख्य लोकांनीं दंडावर शोकप्रदर्शन अशा काळ्या फिती धारण केल्या होत्या. सर्वजण दुःखभार असह्य झाल्यानें अक्षरशः रडत होते. या लोकांना अंत्यदर्शन घेणें सुलभ व्हावें म्हणून शे. का. फेडरेशनचे निळा गणवेश घातलेले शेंकडो स्वयंसेवक मार्गदर्शन करीत होते.

**धार्मिक विधि**

शव राजगृहांत आणण्यांत आल्यानंतर बौद्ध भिक्षूंनीं कांहीं धार्मिक विधि पार पाडला. हा विधि अत्यंत साधा होता व नतर डॉ. आंबेडकर यांच्या शवावर पावित्र्य निदर्शक अशी

शुभ्र वस्त्रें चढविण्यांत आलीं. शवाजवळ असंख्य मेणबत्त्या लावण्यांत आल्या होत्या. त्यांच्या उशाशीं माईसाहेब आंबेडकर बसून होत्या. रडून रडून त्यांचे डोळे सुजले होते.

राजगृहाबाहेर ५ फूट उंचीच्या एका भव्य मंचकावर डॉ. आंबेडकरांचा मृत देह ठेवण्यांत आला. त्यांच्या उशाला बुद्धाची एक मूर्ती होती. दुपारी १ वाजेपर्यंत सुमारें २ लक्ष लोकांनी त्यांचें अंत्यदर्शन घेतलें. शवांस वाहण्यांत आलेल्या हारांचा तेथे प्रचंड ढीग जमा झाला होता.

अंत्यदर्शनासाठीं आज पुणें, सातारा, नागपूर अशा लांबच्या ठिकांणाहूनहि हजारों लोक आले. अंत्यदर्शन घेण्यासाठीं अनेकांनीं आपलीं पादत्राणें काढून ठेवली होती. त्याचा प्रचंड ढीग रस्त्यावर दिसत होता. रात्रभर जागरण झालेले व तासन तास ताटकळत उभे असलेले हजारो वृद्ध लोक, डॉ. आंबेडकरांची प्रेतयात्रा राजगृहांतून बाहेर पडतांच रस्त्याच्या कडेला जागा मिळेल तेथें विश्रांतीसाठीं आडवे झाले.

**शहरातील हरताळ**

बाबासाहेबांच्या दु:खद निधनानिमित्त सुमारें २ लक्ष कामगारांनीं आज हरताळ पाळला. त्यामुळें २५ कापड गिरण्या पूर्णपणें बंद होत्या. ५ गिरण्या अंशत: चालू होत्या. रेशमाच्या बहुसंख्य गिरण्या बंद होत्या परळ व माटुंगा येथील रेल्वे वर्कशॉप संपूर्णतया बंद होते. सरकारी नोकरांपैकी चतुर्थ श्रेणींत असलेले बहुसंख्य नोकर आज कामावर गेले नाहींत.

उत्तर मुंबईत आज अनेकांनीं आपलीं दुकानें स्वयंस्फूर्तीनें बंद केलीं होतीं. बहुसंख्य शाळा कॉलेजांतील विद्यार्थ्यांनींहि हरताळांत भाग घेतला होता. पाणीपुरवठाविषयक खाती त्याचप्रमाणें शहरांतील कांहीं प्रमुख इंजिनिअरिंग कारखानेहि बंद होते. लालबाग, डिलाईल रोड भागांतील दगडफेकींचे कांहीं तुरळक प्रकार सोडले तर हरताळ शांतपणे पार पडला. कोणताहि अनुचित प्रकार घडला नाहीं.

डॉ. आंबेडकर यांना श्रद्धांजली वाहण्यासाठीं म्हणून बॉंबे पोर्ट ट्रस्टच्या गोदींतील सुमारें २५ हजार कामगारांनीं अंतयात्रेंत भाग घेण्यासाठीं दुपारीं १ वाजल्यापासून काम बंद केलें होतें. गोदींतील दिवसाचीं अर्धीपाळी व रात्रीच्या दोन पाळ्यांतील कामगार या स्वयंस्फूर्त हरताळांत सामील झाले. उद्यांपासून गोदींतील व्यवहार नेहमींप्रमाणें सुरू होतील.

शहरांतील विविध राजकीय पक्षांचे पुढारी आज माईसाहेब आंबेडकरांचें सांत्वन करण्यासाठीं आलें होते. भारत सरकारचे १० अधिकारी खास विमानानें येथें आले. मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण व हंगामी राज्यपाल श्री. छगला यांनीहि शोक प्रदर्शित करणारे संदेश पाठविले.

**हायकोर्टांतील श्रद्धांजली**

आज मुंबई हायकोर्टांत मुंबई राज्याचे हंगामी प्रमुख न्यायमूर्ती श्री. एन्. एच्. सी. कोयाजी यांनी डॉ. आंबेडकर यांना श्रद्धांजली अर्पण केली. त्याचप्रमाणें औद्योगिक न्यायालयांत प्रेसिडेंट श्री. एम. आर. मेहेर यांनी श्रद्धांजली अर्पण केली."

सदर पत्राच्या पहिल्या पानावर खालील बातमी चौकटींत दिली होतीं :—

"**नागपूर येथे समाधि**

नागपूर, ता. ७ :—गेल्या १४ ऑक्टोबरला डॉ. आंबेडकर यांनीं ज्या ठिकाणीं पत्नी व इतर अनुयायांसह बौद्ध धर्माचा स्वीकार केला त्या ठिकाणीं समाधि बांधण्याचा निर्णय बुद्धजन समितीनें घेतला आहे. सदर स्मारकासाठीं नोकरी करणारा प्रत्येक बौद्ध एक दिवसाचें वेतन देणार आहे. आमदार हरिभाऊ आवळे मुंबईहून बाबासाहेबांच्या अस्थि येथें आणणार आहेत. या अस्थि समाधीच्या चौथऱ्यांत ठेवण्यांत येतील. नागपूर शहरांत आजहि संपूर्णतया हरताळ पाळण्यांत आला. कस्तुरचंद पार्कमध्यें जमलेल्या १ लक्ष जनसमुदायानें दोन मिनिटें स्तब्धता पाळली व बौद्ध मंत्राचा उच्चार केला."

दुसऱ्या पानावर खालील बातमी प्रसिद्ध झाली होती :—

डॉ. आंबेडकर यांच्या आकस्मिक निधनामुळें भारताच्या सार्वजनिक जीवनांतली एक थोर व्यक्ती नाहींशी झालेली आहे असे उद्‌गार राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांनीं श्रीमती आंबेडकर यांना पाठविलेल्या दुखवटयाच्या संदेशांत काढले आहेत. भारताच्या घटनेचे ते शिल्पकार होते, असेंहि राष्ट्रपतींनीं या संदेशांत म्हटलें आहे."

बाबासाहेबांच्या अंत्यविधीचे वर्णन करणारा दुसरा मजकूर लोकसत्ता पत्राच्या ८ डिसेंबर १९५६ च्या अंकांत, पानें १ आणि २, खालीलप्रमाणें प्रसिद्ध झालेला होता :—

"**आंबेडकरांच्या अंत्यविधी प्रसंगीं दोन लक्षांचे धर्मांतर, चौपाटीवरील शांत व गंभीर वातावरणांत बौद्ध धर्माचा स्वीकार केला.**

चिता पेटतांच लाखों डोळ्यांतून अखंड अश्रुधारा वाहूं लागल्या. **मुंबई, शुक्रवार.**— भारतांतील सात कोटी दलित जनतेचे कैवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पार्थिव देहाला साक्षी ठवून आज सायंकाळीं दादरच्या चौपाटीवर अत्यंत शांत व गंभीर वातावरणांत सुमारें २ लक्ष लोकांनीं बुद्ध धर्माचा स्वीकार केला व त्यानंतर बुद्ध भिक्षूंच्या मार्गदर्शना-खालीं चंदनाच्या चितेवर बाबांच्या देहाला अग्नि देण्यांत आला तेव्हां तेथें जमलेल्या पांच लक्ष लोकांना शोकावेग सहन न होऊन ते हुंदके देऊं लागले.

डॉ. बाबासाहेबांची मुंबई ही कर्मभूमि असल्यामुळें त्यांच्या अंत्ययात्रेसाठी लाखों लोक हिंदू कॉलनींतील 'राजगृह' या त्यांच्या पूर्वीच्या निवासस्थानाजवळ जमले होते. दुपारीं ३ वाजतां अंत्ययात्रेला प्रारंभ होणार असल्याचें जाहीर झालें होतें. परंतु आज सकाळीं एक पत्रक काढून परिनिर्वाण महायात्रा दुपारीं २ वाजतां निघेल व ती खोदादाद सर्कल, परळ ट्राम नाका, एलफिन्स्टन ब्रिज, गोखले रोड व रानडे रोड या मार्गांनी शिवाजी पार्कजवळील चौपाटीवर जाईल असे जाहीर करण्यांत आले. तथापि दुपारीं १-३० वाजतांच महायात्रेला प्रारंभ झाला. प्रारंभापासून सुमारें दोन लक्ष लोक अंत्ययात्रेंत सामील झाले होते. हजारो पोलीस, शेंकडो पोलीस अधिकारी व समता सैनिक दलाचे शेंकडो स्वयंसेवक यांनीं सांखळ्या करून मिरवणुकींचा बंदोबस्त फारच उत्कृष्ट ठेवला होता.

### लक्षावधि लोकांनीं घेतलेलें दर्शन

एका शृंगारलेल्या ट्रकवर पुष्पहारांखाली झांकलेला बाबासाहेबांचा पार्थिव देह ठेवण्यांत आला होता. त्या मागें भगवान बुद्धाची मूर्तीहि ठेवण्यांत आली होती. त्या शेजारीच त्यांच्या पत्नी माईसाहेब, पुत्र श्री. यशवंतराव व पुतणे श्री. मुकुंदराव बसले होते. मिरवणुकीची लांबी सुमारें दीड ते दोन मैल तरी असावी. किमान दहा लाख लोकांनीं भारताच्या या बंडखोर सुपुत्राचे अंतिम दर्शन घेण्यासाठी महायात्रेच्या मार्गावर दुतर्फा गर्दी केली होती. एवढी मोठी प्रचंड गर्दी! पण बेशिस्त वर्तनाचा एकहि प्रकार कुठेंहि घडला नाहीं.

वाटेंत अनेक ठिकाणीं डॉक्टरसाहेबांच्या शवावर पुष्पवृष्टि झाली. हजारों पुष्पहार त्यांना समर्पण करण्यांत आले. विशेष म्हणजे हार घेऊन येणाऱ्या प्रत्येक स्त्री-पुरुषाला मोटारीपर्यंत वाट करून दिली जात होती. परळ नाक्यापासून मिरवणूक एलफिन्स्टन रोडकडे निघाली तेव्हां जिकडे तिकडे माणसांशिवाय दुसरें कांहींच दिसत नव्हतें.

### मंत्री सामील झाले

मिरवणूक सयानी रोड व गोखले रोड यांच्या नाक्यावर आली तेव्हां स्थानिक स्वराज्य व मागासलेल्या वर्गाच्या खात्याचे मंत्री श्री. ग. दे. तपासे, सौ. तपासे, बांधकाम मंत्री श्री. नाईक-निंबाळकर, उपमंत्री श्री. भ. दा. देशमुख व मुंबई सरकारचे मुख्य चिटणीस श्री. एम. डी. भन्साळी मिरवणुकीत सामील झाले. श्री. तपासे व श्री. नाईक-निंबाळकर यांनी स्वत: डॉक्टरसाहेबांच्या शवावर पुष्पहार घातले. आणि यात्रेत सामील झाले. श्री. बा. चं. कांबळे. आर. डी. भांडारे, श्री. भाऊराव गायकवाड, श्री. वडवळकर, श्री. जाधव, श्री. केळशीकर, व इतर शेंकडों शे. का. फेडरेशनचे (कार्यकर्ते) व प्रा. टोपे, श्री. दोंदे, श्री. नौशेर भरूचा, श्री. मधु दंडवते, श्री. अ. स. भिडे, श्री. हॅरीस, श्री. मधुकर महाजन वगैरे सर्व पक्षीय नेते सामील झाले होते.

### चौपाटीवरील अपूर्व जनसंमर्द

बरोबर ५-१५ वाजतां महायात्रा दादरच्या चौपाटीवर आली. डॉ. बाबासाहेबांच्या शवाला अग्नि देण्यासाठी भागेश्वर स्मशानभूमींतच समुद्राच्या बाजूच्या भिंतीलगत एक वाळूचा प्रचंड चौथरा तयार करण्यांत आला होता. स्मशानभूमींत फक्त स्त्रियांना व मुलांना प्रवेश देण्यात आला होता. सुमारे ५०,००० महिला तरी त्या आवारांत असाव्यात. मोटारींतून 'बाबां' चें शव खालीं घेण्यांत आल्यावर मेणवत्त्यांचीं तबके घेतलेले ४ बौद्ध भिक्षू पुढें व त्यामागोमाग डॉक्टरांचे निकट आप्त व त्यामागें डॉक्टरांचें शव दादरच्या चौपाटीवर स्मशानभूमीनजीक आणण्यांत आलें. दुसऱ्या एका लाकडी मेजावर बसून श्रीमती माईसाहेब आंबेडकर यानीं हातांत भगवान बुद्धाची मूर्ती घेऊन भिक्षूंनीं सांगितल्याप्रमाणें प्रार्थना म्हटली व त्यानंतर डॉक्टरांचें शव सर्वांना दिसेल अशाप्रकारें दुसऱ्या एका उंच व्यास-पीठावर ठेवण्यांत आलें.

मुंबई सरकारतर्फे तेथेहि डॉक्टरांच्या शवाला पुष्पहार अर्पण करण्यात आला. स्मशान-भूमीवर विधानसभेचे सभापति श्री. स. ल. सिलम, श्री. अ. ह. गद्रे, पुण्याचे राजाभाऊ

भोळे, श्री. कृष्णराव गांगुर्डे, डॉ. बाबासाहेबांच्या शवाबरोबर दिल्लीहून आलेले श्री. मोहन-लाल शास्त्री, कॉम्रेड मिरजकर, श्री. बापूराव जगताप, श्री. नाना पाटील, रा. ब. सी. के. बोले, श्री. डी. जी. दळवी, प्रा. व्ही. जी. राव व मुंबईतील व बाहेरगांवची अनेक प्रमुख मंडळी उपस्थित होती.

### तें करुण दृश्य !

डॉक्टरांचें शव व्यासपीठावर ठेवल्यानंतर त्यांचे डोक्याजवळ त्यांचे पुत्र यशवंतराव मध्यें हांतांत बुद्धाची प्रतिमा घेऊन श्रीमती माईसाहेब व पुतणे श्री. मुकुंदराव हातांत जळत्या मेणबत्त्यांच्या थाळ्या घेऊन उभे राहिले व बुद्ध भिक्षूंनीं धार्मिक विधीस प्रारंभ केला. तें करुण दृश्य पाहातांना अनेकांच्या डोळ्यांतून अश्रू वाहात होते. बौद्ध धर्माची दीक्षा घेतलेले डॉ. आंबेडकर यांचा दर्जा भिक्षु किंवा परिव्राजक असा नसून उपासक असा असल्यानें. त्याप्रमाणें हा विधि भिक्षू आनंद कौसल्यायन यांच्या मार्गदर्शनाखालीं सुरू झाला. त्यांनीं बुद्धाचा संदेश सांगितल्यावर व डॉक्टरसाहेबांना श्रद्धांजली अर्पण केल्यावर भिक्षु धम्मानंद (भारत), भिक्कू एन्. पन्नाकारा (सिलोन) व भिकू के. धर्मानंद (सिलोन) यांनींहि डॉ. बाबासाहेबांना आदरांजली अर्पण केली. या बुद्ध भिक्कूंनीं 'नमो तस्स भगवतो अरहतो सम्मो संबुधस्स' ही प्रार्थना, बुद्धं सरणं गस्सामि, धम्मं सरणं गस्सामि व संघं सरणं गस्सामि हे मंत्र व पंचशील (वर्तनाचे नियम) असा विधि सांगितला व जमावाने अत्यंत गंभीर वातावरणांत त्यांचा पुनरुच्चार केला.

यानंतर भिक्कू आनंद यांनीं श्री. भाऊराव गायकवाड यांना दोन शब्द बोलण्याची आज्ञा केल्यावर श्री. गायकवाड यांनीं येत्या १६ तारखेस मुंबईस लाखो लोकांना बुद्ध धर्माची दीक्षा देण्यासाठी १४ तारखेस बाबासाहेब येथें येणार होते याची आठवण करून दिली व त्यानंतर पार्थिव देहासमोर लाखो अस्पृश्य धर्मांतर करण्याचा निश्चय करीत आहेत, असे सांगितलें. यानंतर तो विधि आतां आजच बाबांच्या नश्वर देहाला साक्षी ठेवून आपण पार पाडूं या. आपण तयार आहांत ना? असें त्यानीं विचारतांच लाखो हात वर झाले, त्यानंतर भिक्कू आनंद यांना त्यांनीं धर्मांतर दीक्षाविधि पार पाडण्याची विनंती केली.

यानंतर सर्व भिक्कूंनीं ध्वनिक्षेपकावरून 'नमो भगवतो' ही प्रार्थना, तीन सरण व पंचशील यांचा जमावाकडून संध्यासमयींच्या त्या प्रशांत वातावरणांत उच्चार करून घेतला तेव्हां अधिकच गांभीर्य निर्माण झालें. पंचशीलामध्यें असत्य बोलणार नाहीं, परस्त्रीगमन करणार नाही, दारू, तंबाखू वगैरे अंमली पदार्थांचे सेवन करणार नाहीं, बुद्धाला विष्णूचा अवतार मानणार नाही, हिंदू देवतांची पूजा करणार नाहीं, ब्राम्हणांना दान देणार नाहीं, इत्यादी नियम आहेत. यानंतर श्रीमती माईसाहेब व श्री. यशवंतराव-मुकुंदराव यांनीं अर्घ्यदान केलें.

### आचार्य अत्रे यांचें भाषण

यानंतर भिक्कू आनंद यानीं आचार्य प्र. के. अत्रे यांना भाषण करण्याची आज्ञा केली. आचार्य अत्रे यांच्या भाषणाचे वेळीं लाखो लोकांच्या हृदयाचा बांध फुटला व ते मोठमोठ्यानें हुंदके देऊं लागले. कांहीं पोलीस व एक दोन पोलीस अधिकारीहि आपला शोकावेग आवरूं

शकले नाहींत. आचार्य अत्रे म्हणाले, "मराठी पत्रकार व लेखक यांच्या वतीनें भारतांतील एका महान् विभूतीला श्रद्धांजली अर्पण करण्यासाठीं मी उभा आहे. या महान नेत्यांच्या मृत्यूनें मृत्यूचीच कींव वाटू लागली आहे. मरणानेंच आज आपलें हंसूं करून घेतलें आहे. मृत्यूला काय दुसरी माणसें दिसलीं नाहींत? मग त्यानें इतिहास निर्माण करणाऱ्या या नरपुंगवावर, एका महान जीवनाच्या या ग्रंथावर, इतिहासाच्या एका पर्वावरच कां झडप घातली? महापुरुषांचें जीवन पाहूं नये असें म्हणतात. पण त्याचें मरण पाहण्याचें भाग्य आपल्याला लाभलें. आकाशांतील देवांनाहि हेवा वाटावा असें भाग्य त्यांना लाभलें. भारताला महापुरुषाची वाण कधीं पडली नाहीं. परंतु असा युगपुरुष शतकाशतकांत तरी होणार नाहीं. झंझावाताला मागें सारणारा, महासागराच्या लाटांसारखा अवखळ स्वभाव त्यांचा होता. जन्मभर त्यानीं बंड केलें. आंबेडकर म्हणजे बंड, असा बंडखोर, शूरवीर, बहादूर पुरुष आज मृत्यूच्या चिरनिद्रेच्या मांडीवर कायमचा विसावा घेत आहे. त्याचें वर्णन करण्यास शब्द नाहींत.

**बंडमय जीवन**

अशी एक गोष्ट नाही कीं ज्याविरुद्ध 'बाबा' नीं बंड पुकारलें नाहीं. अन्याय, जुलूम, जबर-दस्ती, विषमता जेथें दिसली तेथें या वीरानें आपली गदा उगारली. **बुद्ध धर्म स्वीकारून हिंदू धर्मावर सूड घ्यावा अशी त्यांची इच्छा नव्हती. त्यांच्या इच्छेप्रमाणें लोकसभेनें हिंदू कोड बिल मंजूर केलें असतें तर त्यांनीं धर्मांतर केलेंच नसतें.** हिंदू धर्म सुधारण्यासाठींच त्यांनीं हा क्रांतिकारक निर्णय घेतला. सूड घेण्यासाठीं नव्हे.

**महात्मा गांधींना वाचविले**

बाबासाहेब अंतःकरणाचे कसे मृदु होते याचें वर्णन करतांना आचार्य अत्रे म्हणाले, "महात्मा गांधींना वांचविण्यासाठीं आपल्या लाखो अस्पृश बांधवाचें कायमचे नुकसान करूनहि, त्यांनीं पुणें करारावर सही केली. ते कच्च्या गुरूचे चेले नव्हते. बुद्ध, कबीर व फुले हे त्यांचे गुरु होते. अस्पृश्यता जाळा, जातीभेद जाळा, मनुस्मृति जाळा असें म्हणणारा हा पुरुष स्वतंत्र भारताच्या घटनेचा शिल्पकार बनला. त्यांना आम्ही छळलं–सरकारनं छळलं–अशा वेळीं कुठं जावं. त्यांनीं. शेवटीं भगवान् बुद्धाला ते शरण गेले व त्यानें त्यांना कायमचा आश्रय दिला. (या वेळीं सारा जनसमुदाय ओक्साबोक्सी रडूं लागला). ७ कोटी लोकांच्या उद्धारासाठींच त्यांनीं बुद्धाला कवटाळलें.

अशा परिस्थितींत मी हिंदू म्हणून जन्मलों तरी मरताना हिंदू म्हणून मरणार नाहीं; असे जे बोलले. ते बोलले तें काय रागाऊन बोलले? हिंदू धर्माचे तेच खरे उद्धारकर्ते होते, हें पुढें कळून येईल. बाबा अत्यंत आणीबाणीच्या वेळीं आम्हांला सोडून गेले. संयुक्त महा-राष्ट्राचा पाळणा त्यानीं हलविला. मुंबई परमेश्वरानें महाराष्ट्राला दिली ती कुणाच्या बापाला महाराष्ट्रापासून हिरावून घेतां येणार नाहीं. असे ते म्हणाले. आतां मुंबईचा लढा आम्ही कुणाच्या नेतृत्वाखाली लढावयाचा? शोक करणें त्यांना आवडणार नाहीं. आज त्यांचा प्राण त्यांच्या कुडीतून बाहेर पडून सात कोटी अस्पृश्यांच्या शरीरांत शिरला आहे. त्यांचें चरित्र, निर्भयपणा व दुसरे गुण अंगीं बाणवून, आपण त्यांचे कार्य पुरें केलें पाहिजे."

**पोलिसांची मानवंदना**

यानंतर चंदनाच्या चितेवर चढविलेल्या डॉ. बाबासाहेबांच्या शवाला सशस्त्र पोलीस दलानें त्रिसर बंदुकीचे बार काढून मानवंदना दिली व बिगुलाच्या गंभीर स्वरांत त्यांच्या देहाला श्री. यशवंतराव यांच्या हस्तें संध्याकाळी ७-१५ वाजतां अग्नि देण्यांत आला. अ. भा. नभोवाणीनें या अंत्यसंस्काराचें धावतें वर्णन ध्वनिक्षेपित केलें व ती कामगिरी श्री. पु. ल. देशपांडे पार पाडीत होते. डॉक्टरांच्या शवाला अग्नि देतांच त्यांचे आप्त व स्वकीय यांना संयम आवरतां आला नाहीं. ते चितेकडे धांवले. ओक्साबोक्सी रडूं लागलें व त्यांनीं पुनः एकवार 'बाबां' चें शेवटचें दर्शन घेतलें. चितेवर कापूर व तूप घालण्यांत आल्यामुळें ज्वाला उफाळल्या व बाबासाहेबांचा पार्थिव देह कायमचा अनंतांत विलीन झाला.

गर्दीत चेंगरल्यामुळें अनेकांना मूर्च्छा आली तर अनेक मुलें हरवली.

शनिवार, ८ डिसेंबर १९५६ च्या नवशक्ति पत्नाच्या पहिल्या पानावर दोन छायचित्नें प्रसिद्ध केलीं होतीं. पहिल्या छायाचित्राचें "शुक्रवारीं सकाळीं राजगृहापाशीं पूज्य बाबा-साहेबांच्या अंत्यदर्शनासाठीं उसळलेल्या जनसागराचें एक दृश्य" असें वर्णन केलेलें होतें. दुसऱ्याचें "राजगृह या कै. बाबासाहेबांच्या निवासस्थानीं त्यांचा पार्थिव देह अंत्यदर्शनासाठी ठेवला होता आणि दर्शन घेण्यासाठी रात्नीपासून 'राजगृहा'पाशीं प्रचंड लांबीच्या रांगा लागल्या होत्या." असें वर्णन केलेलें होतें.

दिल्लीहून बाबासाहेबांचें शव मुंबईत आणलें व त्यानंतर त्यांच्या अंत्यदर्शनासाठीं मुंबईतील आणि मुंबई बाहेरील लोकांचे थवेच्या थवे दुःखित अंतःकरणानें राजगृहाकडे एकसारखे येत होते, याबद्दलचें वर्णन नवशक्तीनें पहिल्या व सहाव्या पानावर दिलेलें होतें. पहिल्या पानावरचा कांहीं भाग मी खालीं देत आहे :—

**"'अंत्यदर्शनाला' राजगृहा' कडे अभूतपूर्व रीघ**

**पार्थिव देहाला अक्षरशः अश्रूंचें स्नान**

**मुंबई, शुक्रवार.**—शहरांतील लक्षावधि शोकाकुल नागरिकांनीं आज सकाळीं डॉ. आंबेडकरांचे अंत्यदर्शन घेतलें. त्यांच्या दर्शनासाठीं लागलेली रीघ आणि हजारों अस्पृश्यांच्या डोळ्यांतले अश्रू हें सारें दृश्य अभूतपूर्व व कोणाचेहि मन हेलावणारें असें होतें.

डॉ. आंबेडकरांचा पार्थिव देह घेऊन येणारे विमान गुरुवार-शुक्रवारच्या मध्य रात्नीनंतर १ वाजतां येथें येऊन पोंचलें. विमानतळावरून त्यांचे पार्थिव देह दादर हिंदू कॉलनीतील राजगृह या त्यांच्या निवासस्थानीं आणण्यांत आला यावेळी लाखो लोक व्यथित अंतःकरणानें या झुंजार नेत्यांचे त्याच्या घरी अखेरचें दर्शन घेऊन जात होतें.

**अंत्यदर्शन**

राजगृहाच्या पोर्चमध्ये फुले व पुष्पहार घातलेला त्यांचा पार्थिव देह अंत्यदर्शनासाठी ठेवलेला होता. ज्या बौद्ध धर्माचा त्यांनीं अगदी अलीकडेच अंगिकार केला होता, त्या धर्माचे प्रणेते भगवान गौतम बुद्ध यांची प्रतिमा त्यांच्या शिरोभागीं होती.

सारी मुंबई शोकसागरांत बुडाल्याचें आजच्यासारखे दृश्य केवळ महात्माजींच्या निर्वाण-प्रसंगीच दिसलें होतें.

बाबासाहेबांचे अंत्यदर्शन घेण्यासाठी पहांटेपासूनच लोकांची राजगृहाकडे रीघ लागली होती. राजगृहाबाहेर तर, सर्वत्र जनसागरच पसरलेला होता. प्रत्येक जण निःशब्द होता व विनम्रतेने बाबासाहेबांचें अंत्यदर्शन घेऊन पुढे सरकत होता, . . . . . . ."

बाबासाहेबांच्या अंत्य संस्कारासंबंधी नवशक्तिने पहिल्या पानावर जो मजकूर दिलेला होता तो येणेप्रमाणेः—

**"आंबेडकरांच्या चितेला साक्ष ठेवून हजारोंचें धर्मांतर. . . . . . .**

**दादर चौपाटीवर १२ लाखांचा समुदाय, बौद्ध पद्धतीनें अंत्यसंस्कार.**

**मुंबई, शुक्रवार.—आंबेडकरांच्या हजारों अनुयायांनीं आज संध्याकाळीं दादर चौपाटीवर त्यांच्या पार्थिव देहाला साक्ष ठेवून बौद्ध धर्माचा स्वीकार केला व नंतरच बाबासाहेबांच्या देहाला बौद्ध पद्धतीनें अंत्यसंस्कार करण्यांत आला.**

अंत्यसंस्कारासाठी दिल्लीहून मुद्दाम आलेले बौद्ध भिक्षू आनंद कौसल्यायन यांनींच या सगळ्या लोकांना सामुदायिक रीतीने बौद्ध धर्माची दीक्षा दिली.

या प्रसंगी भाषण करतांना बौद्ध भिक्षू आनंद कौसल्यायन म्हणाले, "बाबासाहेब आंबेडकर यांनी आपले अलिकडील आयुष्य बौद्ध धर्माच्या प्रचारास वाहून घेतले होते."

नंतर पुढील दीक्षा या प्रसंगी देण्यांत आल्या. त्यांच्या इतर अनुयायांनीहि हिंदू धर्म सोडून बौद्ध धर्माचा स्वीकार केला, या प्रसंगी त्यांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केलेल्यांना बौद्ध धर्माचे पंचशीलही सांगण्यात आले.

बौद्ध धर्म स्वीकारलेल्यांनी आता हिंदू धर्म सोडला आहे, असा या पंचशीलेचा थोडक्यात अर्थ आहे.

**या पुढची त्यांची निष्ठा**

यापुढे आपण एक देव मानला पाहिजे. तो म्हणजे बुद्ध. आपण सत्य नारायणाची पूजा करणार नाहीं, इत्यादी शपथा प्रतिज्ञापूर्वक करण्यांत आल्यावर तेथें हजर असलेल्या हरिजनांना हात वर करण्यास सांगण्यात आलें व त्यांनी तसें केल्यावर ते बौद्ध धर्मीय झाल्याचें जाहीर करण्यात आलें.

अंतीम यात्रेस सुमारे २ लाख लोक हजर होते. दुपारी १-३० वाजता दादर हिंदू कॉलनी येथील त्यांचे निवासस्थान राजगृह येथून त्यांची स्मशानयात्रा निघाली. त्यांचा जड देह मोटार गाडीत ठेवण्यांत आला होता. मिरवणुकीच्या अग्रभागी आचार्य अत्रे, मा. वा. दोंदे, बा. चं. कांबळे, आर. डी. भंडारे, साथी हॅरिस, नौशेर भरूचा, आदि मंडळी होती.

तसेच नगरपिते व आमदारहि या यात्रेंत होते. यात्रा दादर, हिंदू कॉलनी, परळ, एल्फिन्स्टन ब्रिज, सयानी रोड, गोखले रोड या मार्गाने शिवाजी पार्कच्या स्मशान भूमींत संध्याकाळी ६–३० वाजताच्या सुमारास पोंचली, रस्त्याच्या दोनहि बाजूंस व घरांत असंख्य नागरिक ही महायात्रा पहात स्तब्ध उभे होते.

## लक्षावधी डोळे अश्रूंनीं डबडबले, मिरवणुकीला अलोट गर्दी

ठिकठिकाणीं वाटेंत शवास असंख्य पुष्पहार घालण्यांत आलें. सयानी रोडवरील एका घराच्या गॅलरीतून एका तरुणीनें अंत्ययात्रेचे छायाचित्रहि घेतलें. वाटेत गोखले रोडवर मुंबईचे स्थानिक स्वराज्य मंत्री श्री. तपासे व बांधकाम मंत्री निंबाळकर यांनी शवास पुष्पहार अर्पून श्रद्धांजली वाहिली. याच ठिकाणी मुंबई सरकारतर्फे मुख्य चिटणीस श्री. एम. डी. भन्साली यांनी शवास पुष्पहार घातला-स्मशान यात्रेला एवढी अलोट गर्दी लोटली होती कीं, दुपारीं परळ भागांत मुंगीला पाऊल ठेवण्याला अक्षरशः जागा नव्हती. गिरण्यांना हरताळ असल्या-मुळे संबंध गिरणगाव जवळजवळ त्या ठिकाणी लोटला होता, असे म्हटल्यास चूक होणार नाहीं. बस व मोटार यांची वहातुक सुमारे तीन तास या भागांत स्थगितच होती. नंतर मुंबई प्रदेश काँग्रेस, संयुक्त महाराष्ट्र समिती, हिंदुराज्य, प्रु. सो. पक्ष व कम्युनिस्ट पक्ष आदि अनेक संस्थांतर्फे त्यांच्या शवास पुष्पहार अर्पण करण्यांत आलें.

## सलामी

नंतर शिवाजी पार्कवरील स्मशान भूमींत सभापति श्री. सिलम यानीही शवास पुष्पहार अर्पण केला. आंबेडकरांच्या सन्मानार्थ पोलीस पथकानें याच ठिकाणी त्यांना सलामी दिली. स्मशानांतहि हजारो नागरिक उपस्थित होते. चंदनाची चिता रचण्यांत आली होती.

## श्रद्धांजली

आचार्य अत्रे त्यांना श्रद्धांजली वाहतांना म्हणाले, हरिजनांवरील अन्यायासाठी ते सबंध आयुष्यभर झगडले. तसेंच ते संयुक्त महाराष्ट्रवादिहि होते व त्यांनीं मुंबई महाराष्ट्राची असल्याचे लोकसभेंत ठासून सांगितले. त्यांचे हिंदुकोड हिंदू धर्माला लागू झाले असते तर त्यांनी हरिजनांनां बौद्ध धर्म स्वीकारण्यास सांगितलेहि नसते. तत्पूर्वी श्री. भाऊसाहेब गायकवाड यांचें त्यांना श्रद्धांजली अर्पण करणारें भाषण झालें. त्यांनी आपल्या भाषणांत डॉ. बाबासाहेब यांचे हस्तें येत्या १६ तारखेला होणारे बौद्ध धर्मांतर ज्यांची इच्छा असेल त्यांना आजच हात वर करून सांगण्यास सांगितले व त्याप्रमाणे अनेक महीला व पुरुष यांनी हात वर करून बौद्ध धर्म स्वीकारल्याचें जाहीर केलें. नंतर त्यांच्या शवास त्यांचे चिरंजीव श्री. यशवंतराव यांचे हस्ते ७-३० वाजतां अग्नि देण्यात आला. नंतर सर्व लोक मोठ्या दुःखी अंतःकरणाने घरी परतलें.

## बौद्ध धर्मानुसार मंत्र

अंत्यसंस्काराचे मंत्र बौद्ध धर्माप्रमाणें म्हटले गेले आणि डॉ. आंबेडकरांच्या इच्छेप्रमाणे त्यांना हिंदू पद्धतीप्रमाणे अग्निसंस्कार दिला गेला."

पहिल्या पानावरील मजकुराखाली " प्रजा समाजवादी पक्षाचे, चिटणीस फरीद अनसारी यांनीं आंबेडकरांच्या निधनाबद्दल दुखवटा व्यक्त करणारा संदेश मुंबईतून शुक्रवारी प्रसिद्ध केला आहे" अशी बातमी प्रसिद्ध केली होती. शेवटच्या स्तंभात दुसरी बातमी चौकटींत प्रसिद्ध केली होती ती अशी :—

**"तें हृदयस्पर्शी दृश्य**

**(आमच्या प्रतिनिधीकडून)**

**मुंबई, शुक्रवार.**—डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अग्निसंस्कार प्रसंगी ज्यांना बुद्ध धर्म स्वीकारावयाचा असेल त्यांनी हात जोडावे व मंत्र म्हणावे असे सांगण्यात आलें होते. त्यावेळीं तेथें हजर असलेले आचार्य अत्रे हेहि त्या विधीत हात जोडून मंत्र म्हणत असलेले दिसत होते."

पहिल्या स्तंभात खालील दोन मजकूर प्रसिद्ध झाले होते. पहिला मजकूर चौकटींत होता. तो असा :—

**"आंबेडकरांचे अखेरचे पत्र**

**मुंबई, शुक्रवार.**—एल्फिन्स्टन कॉलेजच्या शताब्दीच्या उत्सवांत आज त्या कॉलेजांत दुर्मिळ पुस्तकें व हस्तलिखिते यांचे एक प्रदर्शन मांडण्यांत आले होतें. त्यांतील एका पत्राकडे प्रेक्षकांचे लक्ष विशेष वेधले जात होते. हें पत्र डॉ. आंबेडकरांचें असून कदाचित त्यांच्या हातचें हें अखेरचें पत्र असू शकेल. शताब्दीच्या उत्सवाचे आमंत्रण बाबासाहेबांना गेलें होते. त्या वरील त्यांच्या उत्तराचें हे पत्र आहे. मुद्दाम इतक्या लांब येणें मला शक्य होणार नाहीं, असे आंबेडकरांनी या पत्रांत कळविले होते."

दुसरा मजकूर येणेप्रमाणे :—

**"मुंबई हायकोर्टाची श्रद्धांजली**

**मुंबई, शुक्रवार.**—डॉ. आंबेडकरांचें जीवन ध्येयवादी होतें आणि अखेरपर्यंत जुलुमाखाली चेंगरलेल्यांच्या उद्धारासाठी त्यांनी ते खर्च केलें, असे उद्‌गार मुंबई हायकोर्टाचे हंगामी सर न्यायाधीश श्री. कोयाजी यांनी काढले.

त्याच्या अंतिम दर्शनेच रडतो का नील सिंधूहि हा?
ज्यांना नीच म्हणोनिया तुडविले पायतळी, शोषिले, ।
ज्यांना नित्य पशू–समान गणुनी खाईमध्ये लोटिले ।
त्यांना दीर्घ परिश्रमे उठवि जो अज्ञान–निद्रेतुनी ।
तो देवाहुनि वंद्य त्यांस गमला झुंजार, विद्वन्मणी ।
" घेता ते ' उपकार ' व्यर्थ कसले? मिंधेपणा कासया ?
जाणोनी अधिकार सर्व अपुले, व्हा सिद्ध ते जिंकण्या ! "
ऐसे गर्जुनी ' भीम ' बंड उभवी जो मूर्तीच्या भंजना
(त्याची सर्व मते पटो न पटो) त्याला असो वंदना !
अन्याया–प्रतिकारिणी, बलवती, अज्ञान विध्वंसिनी
आता या दलिता कवण हो देईल चेतावणी ?

—विद्याधर गोखले

प्रिन्सिपॉल मो. वा. दोंदे यांचे मुंबईत नभोवाणीवर बाबासाहेबांच्यावर भाषण झाले. ते नवशक्तिच्या ८ डिसेंबर १९५६ च्या अंकात दुसऱ्या पानावर प्रसिद्ध झाले होते. ते असे–

**" कै. डॉ. आंबेडकर यांना नभोवाणीवरून श्रद्धांजली. "**

प्रि. मो. वा. दोंदे यांनी गुरुवारी रात्री नभोवाणीच्या मुंबई केंद्रावरून कै. डॉ. आंबेडकर यांना श्रद्धांजली वाहणारे भाषण केले ते नभोवाणीच्या सौजन्याने खाली दिले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे दिल्लीमध्ये निधन झाले. अखिल भारताला जबर धक्का बसला. पाच कोटी अस्पृश्यांवर आकाशाची कुऱ्हाड कोसळली. डॉ. बाबासाहेब निर्वाणाप्रत गेले. भगवान बुद्ध अडीच हजार वर्षांपूर्वी निर्वाणाप्रत गेले. सर्व जग आज त्यांना वंदन करीत आहे. अडीच हजार वर्षांनी आपल्या असंख्य अनुयायांना बरोबर घेऊन, त्यांना बुद्ध धर्माची दीक्षा देऊन, डॉ. बाबासाहेब बुद्धचरणी विलीन झाले. याच वर्षाची आक्टोबरची १४ तारीख बाबासाहेबांनी बुद्ध धर्माची दीक्षा घेतली. बाबासाहेब जन्मले हिंदू धर्मात, अस्पृश्य महार समाजात अत्यंत दारिद्र्यात दिवस काढले. अंगात एक-कपडा घालून, इराण्यांनी दिलेल्या पाव व कपभर चहावर आपला उदरनिर्वाह करून डॉक्टर साहेबांनी मुंबईच्या एल्फिन्स्टन कॉलेजात शिक्षण घेतले. केळुसकर मास्तरांच्या ओळखीने सयाजीराव महाराज गायकवाड यांच्याकडे गेले. महाराजांनी त्यांना विलायतेस पाठविले. बाबासाहेब लंडन विश्वविद्यालयाचे एम.ए. झाले. पी.एच.डी. झाले. डी.एससी.ची पदवी घेतली. महान अर्थशास्त्रज्ञांकडून वाहवा करून घेतली. नंतर अमेरीकेला गेले. तेथेही पदव्या मिळाल्या. अलिकडेच या भूषणभूत असलेल्या विद्यार्थ्याला कोलंबिया विश्वविद्यालयाने एल.एल.डी.ची पदवी देऊन सन्मान केला. जागतिक कीर्तीचा विद्वान हा महान सन्मान पदरी बांधून भारतामध्ये आला. या विद्वानाला अनंत हाल सोसावे लागले. खेड्यापाड्यात बॅरिस्टरचे काम करायला निघाले तर प्रवासात पाणी कोणी द्यावयाचे नाही, टांगेवाला टांग्यामध्ये घ्यावयाचा नाही. स्पृश्य समाजापैकी एकाद-दुसराच क्लाएंट त्यांना लाभायचा. एलफिन्स्टन हायस्कूल सारख्या सरकारी शाळेमध्ये प्रवेश मिळेना. मिळाला तर वर्गाच्या दारात या महारांच्या पोरासाठी निराळा बाक, शास्त्रीबोवांनी या अस्पृश्याला संस्कृत शिकवायच नाकारले. बाबांना पर्शियन शिकावे लागले. लहानपणी अस्पृश्य म्हणून हाल अपेष्टा, विद्येमध्ये अस्पृश्यतेचा अडथळा, सरकारी नोकरीत स्पृश्य शिपायांकडून अपमान! विद्यासंपन्न झाले तरी अस्पृश्यता चिकटलेलीच ते भूत काही सोडीना. माझ्या गेल्या ३५ वर्षांच्या सहवासांत या प्रत्यक्ष पाहिलेल्या गोष्टी मी! हिंदु धर्माचा उद्धार व्हावा, तर ही सामाजिक विषमता नाहीशी झाली पाहिजे, याची पुष्कळ तळमळ. त्यांनी महाडच्या चवदार तळ्यावर सत्याग्रह केला, नाशिकच्या काळारामासमोर सत्याग्रह केला. पुण्याच्या पर्वतीवर सत्याग्रह केला. मार्ग खुंटले सर्वकडून! माझ्या सात कोटी अस्पृश्य बांधवांची अस्पृश्यता कशी नाहीशी होणार ! त्यांना समता कधी लाभणार! माणुसकीचे जिणे, माणुसकीचे हक्क त्यांना कधी लाभणार! बाबा रात्रंदिवस तळमळत होते. हिंदू राहून आम्हाला समानता मिळेल का? वीस वर्षांपूर्वी त्यांनी धर्मांतराची घोषणा केली. वीस वर्षांचा कालावधी दिला. भारताला स्वातंत्र्य लाभले, प्रजासत्ताक राज्याची घटना झाली तेच त्यांचे शिल्पकार अस्पृश्यता पाळणारा गुन्हेगार ठरविण्यात आला. पाचवर्षे झाली. अस्पृश्यता कमी झाली, परंतु गेली नाही. बाबासाहेब बुद्ध धर्मीय झाले. बुद्ध धर्मात तरी अस्पृश्यता नाही. बुद्धाच्या तत्त्वज्ञानाप्रमाणे मी सर्वांवर प्रेम करीन, माझे अस्पृश्य बांधव, आम्ही प्रेम करू. आता तरी आम्हाला प्रेमाने वागवा. समानतेने वागवा. त्यात अस्पृश्यांचे हीत आहे. भारताचे सुद्धा हीत आहे, असे त्यांना वाटले.

**पददलितांना दिव्य संदेश**

३१ मे १९३६ रोजी मुंबईमध्ये अस्पृश्यांच्या परिषदेमध्ये, " मुक्ति का पथ " (खरे शीर्षक " मुक्ति कोन पथे ?") या विषयावर हे ऐतिहासिक भाषण केले. सामाजिक क्रांतिकारचे जळजळीत भाषण ते त्यामध्ये त्यांच्या धर्मांतराच्या तत्त्वज्ञानाची त्यांनी साधक-बाधक विचारांनी चर्चा केली. ऐहिक आणि अध्यात्मिक दृष्टिकोनामधून छाननी केलेली आहे. आपल्या अस्पृश्य बांधवांना त्यांनी उपदेश केला. भगवान बुद्धाने निर्वाणसमयी आपल्या भिक्षु संघाला जो उपदेश केला, तसाच तो उपदेश होता. तुम्ही दिव्याप्रमाणे स्वयंप्रकाशित व्हा, पृथ्वीप्रमाणे पर-प्रकाशांत राहू नका. स्वतःवरच विश्वास ठेवा. दुसऱ्या कोणाच्या अंकित होऊ नका. सत्याला धरून राहा व दुसऱ्या कोणाला शरण जाऊ नका. तुम्हीच आपले आधार व्हा. स्वतःच्या बुद्धीला शरण जा. दुसऱ्या कोणाचाही उपदेश ऐकू नका. दुसऱ्या कोणालाही वश होऊ नका. सत्याचा आधार घ्या. सत्यालाच शरण जा. अस्पृश्यांना हा उपदेश का बरे? अखिल भारताला सुद्धा हा संदेश ! अखिल मानवजातीला हाच संदेश! !

**खरेखुरे देशभक्त**

डॉ. बाबासाहेब खरे खरे देशभक्त होते. घटना समितीमधील त्यांची भाषणे, गोलमेज परिषदेमधील त्यांची भाषणे त्यांच्या देशभक्तीची साक्ष देत आहेत. घटनेवरील त्यांचे शेवटचे भाषण. . . . . . . .स्वातंत्र्यामुळे आपल्याला निःसंशय आनंद झाला आहे. पण स्वातंत्र्याने आपल्यावर फार मोठमोठ्या जबाबदाऱ्या टाकल्या आहेत हे आपण विसरता कामा नये. देशात काहीही बिघडले, की ब्रिटिशांमुळे असे झाले अशी सबब यापुढे आपल्याला सांगता येणार नाही. आता जर काही घोटाळा झाला तर त्याची जबाबदारी सर्वस्वी आपल्यावरच येणार आहे. सर्व जगामध्ये आणि या देशामध्येही नवीन विचारांचा उदय होत आहे. ' लोकांनी राज्य करावे ' या कल्पनेचा लोकांना आता कंटाळा येऊ लागला आहे. लोकांसाठी राज्य असले म्हणजे झाले. मग ते लोकांचे आणि लोकांनी केलेले राज्य असो वा नसो अशी लोकांच्या मनाची आता तयारी होऊ लागली आहे. राज्य हे लोकांचे लोकांसाठी आणि लोकांनी केलेले असावे. या तत्त्वावर आपण ही घटना उभारली आहे. ती जर टिकावी अशी आपली इच्छा असेल तर लोकांनी केलेल्या राज्यापेक्षा लोकांसाठी केलेले राज्य बरे असे ज्या घातुक परिस्थितीमुळे जनतेला वाटू लागले आहे, त्या परिस्थितीकडे लक्ष देण्याच्या कामी आपण दिरंगाई करता कामा नये. एवढेच नव्हे, तर ती परिस्थिती नष्ट करण्याच्या कामी आपण धैर्याने पुढे पाऊल टाकले पाहिजे. देशाची सेवा करण्याचा हा एकच मार्ग आहे. यापेक्षा अधिक चांगला मार्ग मला तरी माहीत नाही. एके ठिकाणी त्यांनी तरुणांना संदेश पाठवला ' We must be determined to defend our Independence with the last drop of our blood.'

भारतातील महान व्यक्ती आज निजधामास गेली, बुद्धरूप झाली. भारत शोकाकुल झाला. अस्पृश्य समाज, सर्व पददलित समाज शोक सागरात बुडून गेला. कोणा कोणाची समजूत घालायची

डॉ. आंबेडकर रागीट होते. परंतु तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री म्हणतात, आंबेडकरांचा संताप रास्त होता त्याबद्दल न्यायी मनुष्य त्यांना दोष देऊ शकत नाही. बाबासाहेब म्हणजे, महान चारित्र्यवान व्यक्ती, अर्थशास्त्रज्ञ, शासनशास्त्रज्ञ, धर्मशास्त्रज्ञ, इतिहासाचा विद्वान अभ्यासक,

बुद्धिमान कायदेपंडित, आधुनिक स्मृतिकार, अनेक भाषांवर प्रभुत्व असलेला प्रभावी वक्ता, संशोधक ग्रंथकार, निधड्या छातीचा व मनोधैर्याचा समाज मार्गदर्शक, फुले, रानडे, आगरकर, टिळक, भांडारकर, गोखले या परंपरेतला त्यागी, बुद्धिमान, चरित्र्यवान लोकनेता निर्वाणप्रत गेला. विनम्र भावे या भगवान बुद्धाचे अवतारकार्याचा संदेश सर्व जगांत पसरविणारा व पददलितांचे स्फूर्ति आणि आशास्थान असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना विनम्र भावे ही आम्हा सर्वांची श्रद्धांजली."

(श्री. दोंदे यांनी बाबासाहेबांच्या सहवासात ३५ वर्षे घालविली तरी त्यांना बाबासाहेबांच्या विद्यार्थी दशेतली अचूक माहिती देता आली नाही, हे वाचकांच्या नजरेस आले असेलच. ती साधार माहिती चरित्र खंड १ यात पहावी. अस्पृश्यांची लोकसंख्या एकदा पाच कोटी व दुसऱ्यांदा सात कोटी प्रिन्सिपॉल दोंदे यांनी दिलेली आहे. हेही त्यांच्या ठिसूळ माहितीचे निदर्शक होय.)

**SHANKAR'S WEEKLY, December 9, 1956.**

**Feature:—' The Man of the Week '.** (Page 4)

Dr. AMBEDKAR's bellicosity was more an affectation than a dimersion of character and therefore, even though it might have lost him many friends it made him very few enemies. It had become almost a convention in the public life of the country to weigh his vast scholarship against the searing anger of his opinions and to overlook his transcient irritations as a price that must be paid if the virtue of his knowledge had to be secured.

When the constitution of free India began to be discussed, Ambedkar was a natural choice in spite of what he loudly complained what Congress and Gandhi had done to him. He had that inevitable weakness of sharp intellectualism, a fear of the obligations of organisation. Because of it he could never make the Scheduled Castes Federation any kind of political force. As age and ill health gave notice of the *parinirvana* that overtakes even the least of the enlightened, he fled from narrow organisations into a Sangham that was only a faith. Many made light of his elaborate conversion; but the ritual must have been for his over-educated, over-refined mind that humble act of sublimation of rationalism necessary for many individuals in our century.

Without the enervating demands that outcaste-dom made on his brilliant mind, he may have evolved into a statesman of truly tremendous six, for, free of his political cantankerousness he was a mountain of information. That even he had to pay the price of Harijan origin and, because of the price he paid, to become somewhat of an opportunist is a judgment not of his genious but of the society that cooped up and preverted one who could have been a great law maker into a complaining politician.

BHIMRAO AMBEDKAR'S was a great personality, straitejacketed in a piddling tradition. His effort throughout sixty-three years of his strenuous life was to smash that tradition. That it is not yet wholly smashed is a matter shame to all Indians who have been his contemporaries.

(१०) रविवार, दिनांक ९ डिसेंबर १९५६ च्या केसरीने ६ पानावर "शोकग्रस्त महाराष्ट्राची आंबेडकरांना श्रद्धांजली" या मथळ्याखाली ठिकठिकाणी झालेल्या शोकसभांचे वृत्तांत प्रसिद्ध केले होते. सांगली येथील 'रोटरी क्लब' श्रीरामपूर आणि मिरज येथील रहिवाशी यांनी या सभा भरविलेल्या होत्या. सोलापूर येथे फॉरेस्ट विभागात बिनाशिरस्त्राणाच्या आठ हजार लोकांनी मूक मिरवणूक काढली होती.

केसरीने याच अंकात बाबासाहेबांच्यावर सुमारे चार स्तंभी अग्रलेख लिहिला तो असा :—

**"स्वतंत्र प्रज्ञेचा थोर नेता"**

डॉ. आंबेडकर यांचे आकस्मिक निधन. डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांच्यावर गेल्या गुरुवारी कालाने अचानक झडप घालून, अनेकांगांनी चमकलेले हे भारताचे रत्न हिरावून नेले. विद्वान व व्यासंगी कायदेपंडित, अर्थशास्त्रज्ञ, स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेचे कुशल शिल्पकार, राजकीय पुढारी आणि दलित वर्गाचे आधारस्तंभ या नात्याने भारताच्या अलिकडील इतिहासात त्यांची कामगिरी उच्च श्रेणीची व चिरस्मरणीय अशीच आहे. त्यांच्यावर निस्सीम श्रद्धा ठेवणाऱ्या अस्पृष्ट वर्गावर तर त्यांच्या निधनाने आकाशाची कुऱ्हाडच कोसळली आहे. स्वतंत्र अभ्यासाने ठरलेले आपले विचार कोणाचीही भीति अथवा भीड न ठेवता छातिठोकपणे ग्रंथातून व भाषणांतून मांडण्याची त्यांची बेडर वृत्ति असामान्य होती. आपल्या विविध गुणांच्या जोरावर त्यांनी भारतीय राजकीय जीवनात अनेक मोठी जबाबदारीची क्षेत्रे आक्रमिली. या उच्च स्थानांवर ते खंबीर आत्मविश्वासाने उभे राहत; पण त्या स्थानांच्या बंधनात ते कधी अडकून पडले नाहीत. "निःस्पृहस्य तृणं जगत्" अशा वृत्तीने उच्च स्थाने सोडावीशी वाटल्यास त्वरित सोडून देत व त्याची कधी खंत बाळगीत नसत.

**शिक्षणातील चढते यश**

डॉ. आंबेडकरांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी महू येथे (झाला) त्यांचे वडील रामजी यांना सैनिकी खात्यामध्ये नोकरी होती. पुढे ते पेन्शन घेऊन मुंबईस आले. तेथे एल्फिन्स्टन हायस्कूलमधून १९०७ मध्ये डॉ. आंबेडकर मॅट्रिकची परीक्षा पास झाले. एल्फिन्स्टन कॉलेजमधून १९१२ साली ते बी. ए. उत्तीर्ण झाले. अस्पृष्ट समाजांतील या अभ्यासी व हुशार पदवीधराला पुढील उच्च शिक्षणासाठी श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांनी उदारपणे साह्य दिले. त्यायोगे अमेरिकेत जाऊन कोलंबिया विद्यापीठामध्ये तीन-चार वर्षे त्यांनी उच्च पदवी परीक्षांचा अभ्यास केला. अर्थशास्त्रामध्ये ते एम. ए. झाले. व मानसशास्त्र हा विषय घेऊन त्यांनी त्याच विद्यापीठाची पीएच्. डी. ही पदवी मिळविली.

(बाबासाहेब अमेरीकेत १९१३–१६ या काळात होते. त्यांनी पी. एच्. डी. पदवी आर्थिक विषयावर प्रबंध लिहून मिळविली. चरित्र खंड १ पहा.) अमेरीकेतून परत आल्यावर त्यांना बडोदे संस्थानात मोठ्या हुद्याची जागा श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांनी दिली. पुढे १९२० मध्ये मुंबईस येऊन सिडनहॅम कॉलेजमध्ये त्यांनी अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून काही दिवस काम केले.

## जीवन कार्याचा केंद्रबिंदू

डॉ. आंबेडकरांची तैल बुद्धिमत्ता आणि स्वतंत्र बाणा यांमुळे त्यांना नोकरीच्या रौप्यशृंखलेत अडकून जन्म घालविणे ही गोष्ट पसंत पडणे शक्य नव्हते. कोल्हापूरच्या महाराजांनी यावेळी त्यांना साह्य केल्यामुळे इंग्लंडला जाऊन त्यांनी बॅरिस्टरीची परीक्षा दिली आणि अर्थशास्त्रावर निबंध लिहून लंडन विद्यापिठाची डी. एस्सी. ही उच्चतम पदवी संपादन केली. (कोल्हापूरच्या महाराजांनी लंडनला जाण्यास बाबासाहेबांना आर्थिक साहाय्य केले नव्हते. ते स्वतःच्या पैशाने लंडनला गेले होते.) तेथून परत आल्यावर त्यांनी १९३७ पर्यंत पुनः मुंबईच्या सिडनहॅम कॉलेजात प्राध्यापक म्हणून काम केले. (ही माहिती चुकीची आहे. बाबासाहेब लंडनहून मुंबईस १९२३ च्या एप्रिलमध्ये आले. त्यानंतर सरकारी नोकर म्हणून लॉ कॉलेजमध्ये प्रोफेसर आणि प्रिन्सिपॉल म्हणून त्यांनी १९२८ ते १९३४ च्या दरम्यान काम केले.) पुढे तेही काम सोडून त्यांनी स्वतंत्रपणे बॅरिस्टरी चालू केली. (बाबासाहेबांनी हायकोर्टाची सनद १९२३ च्या जुलैमध्ये घेतली होती व तेव्हापासून ते प्रॅक्टिस करीत होते). अस्पृश्य वर्गाची हिंदू समाजाकडून होणारी अवहेलना आणि त्यांचे निकृष्ट व अपमानास्पद जीवन यांच्यामुळे त्यांच्या मनात दुर्दम्य बंडखोरीची वृत्ति सतत जागृत होती. तोच त्यांनी आपल्या जीवनकार्याचा केंद्र बिंदू मानला. आपली सर्व सखोल बुध्दी आणि विद्वत्ता, संशोधन आणि व्यासंग यांच्या योगाने त्यांनी आपल्या देशाचे हित साधलेच; पण सर्वांचे पुण्य आपल्या अस्पृष्ट बांधवांच्या उद्धारार्थ कारणी लावण्यासाठी ते अहर्निश झटले.

## अस्पृश्य वर्गात जागती

१९२५ ते १९३५ या कालात त्यांनी देवळे, पाणवठे इत्यादी सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यांना इतर हिंदूंच्या बरोबरीने आणि समतेने अधिकार मिळावेत यासाठी चळवळी केल्या. "मूकनायक", "बहिष्कृत भारत", "जनता" इत्यादी वृत्तपत्रांच्याद्वारे आपल्या लेखांनी स्पृश्यास्पृश्यांत जागृति निर्माण केली. पर्वती सत्याग्रह, नासिक राममंदिर सत्याग्रह, व महाडच्या चवदार तळ्यावरील सत्याग्रह हे याच कालात घडले. न्यायालयात चवदार तळ्याचा प्रश्न जाऊन तेथे अस्पृश्यांना त्या तळ्याचा इतरांप्रमाणे उपयोग करण्याचा अधिकार मान्य झाला. ब्रिटीश सरकार, सयाजीराव गायकवाड किंवा कोल्हापूरचे छत्रपति यांच्यासारखे सुधारक हिंदू राजे, समाज सुधारणावादी विद्वान विठ्ठल रामजी शिंदे, गुरुवर्य कर्वे, प्रा. माटे, इत्यादींसारखे समाजसुधारक, महात्मा गांधी, वीर सावरकर यांच्यासारखे राजकीय पुढारी या सर्वांनी अस्पृश्यतेचा नाश आणि अस्पृष्टांचा उद्धार या कामी जागृति व प्रयत्न आपआपल्या परीने केले, पण त्यायोगे होणाऱ्या प्रगतीचा मंदपणा डॉ. आंबेडकरांचे कधीच समाधान करू शकला नाही. त्यांच्या महान आकांक्षा अतृप्तच राहिल्या.

**धर्मांतराचा निर्णय**

१९३१–३२ मध्ये ब्रिटिश राज्यकर्त्यांनी जमवलेल्या गोलमेज परिषदेत यांनी अस्पृश्यांच्यासाठी स्वतंत्र मतदार संघाची मागणी पुढे करून ती संमत करून घेतली. पुढे गांधीजींनी प्राणांतिक उपोषण केल्यामुळे अस्पृश्यांच्या राखीव जागा पण संमिश्र मतदार संघांतून निवडणूक असा पर्याय त्यांनी काही काल अनिच्छेने स्वीकारला. पण उपासाच्या हटवादी उपायांनी घडवून आणलेला पुणे–करार त्यांनी पुढे मानला नाही. (१९३७ व १९४६ च्या निवडणुका या कराराप्रमाणे झाल्या. बाबासाहेबांचे म्हणणे असे होते की, करारात योग्य तो फेरबदल करणे जरूर आहे. पण करारावर सह्या करणाऱ्या लोकांनी बाबासाहेबांच्या या मागणीचा सहानुभूतिपूर्वक कधीही विचार केला नाही.) १९३६–३७ साली स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना करून त्याच्यावतीने ते मुंबई कौन्सिलात निवडून आले. गेल्या महायुद्धाच्या काळात व्हाईसरॉयांच्या कार्यकारिणीत मजूरमंत्री म्हणून त्यांची नेमणूक झाली. पुढे भारताच्या स्वराज्य-प्राप्तीनंतर भारतीय राज्य घटनेची घडण घटना समितीमध्ये त्यांनी केली. पहिल्या हिंदू कोडाची रचना स्वतंत्र भारताचे पहिले कायदे मंत्री या नात्याने त्यांनी केली. १९३७ नंतर त्यांनी हिंदू राहून समान अधिकारासाठी झगडण्याचा पिपीलिका मार्ग त्याज्य ठरवून, हिंदू धर्मच सोडण्यांच्या विहंगम मार्गाचा पुरस्कार केला. तेव्हा हिंदू लोकांमध्ये खूपच खळबळ झाली. हिंदू धर्म सोडून कोणत्या धर्माचा स्वीकार करावयाचा हे त्यांनी बरीच वर्षे मुग्ध ठेवल्यामुळे हिंदू समाजाला केवळ धक्का देण्यापुरता या कल्पनेचा ते वापर करीत असावेत असेही पुष्कळांना वाटले. पण पुढे त्यांनी बौद्ध धर्माचा स्वीकार करण्याचा निर्णय प्रकट केला आणि त्या धर्माच्या वाङ्मयाचा अभ्यासही चालवला. यामुळे त्यांचा धर्मांतराचा निर्णय केवळ बोलण्यापुरता नव्हता हे स्पष्ट झाले.

**बौद्ध धर्माचा पुरस्कार**

बौद्ध धर्म स्वीकारल्यानंतर त्यांनी गेल्याच महिन्यात नेपाळच्या राजधानीत भरलेल्या बुद्ध-जयंतीच्या सोहळयात उत्साहाने भाग घेतला. व बौद्धधर्म स्वीकाराची आपली कारणे त्यांनी आपल्या भाषणात सविस्तरपणे मांडली. त्यानंतर त्यांनी बुद्धगया व सारनाथ या बौद्ध धर्मक्षेत्रांची यात्राही केली. पुढील आठवडयात नागपूरप्रमाणे मुंबईस सामुदायिक बौद्ध धर्म स्वीकाराचा कार्यक्रम आखण्यात आला होता. त्यांच्या निधनामुळे या कार्यक्रमावर खेदाची दाट छाया पसरली होती. डॉ. आंबेडकर हे मोठे कायदेपंडित होते व हिंदुसाठी विशिष्ट म्हणून केलेल्या अनेक जुन्यानव्या कायद्यांत बौद्धांचा हिंदुमध्येच अंतर्भाव केलेला आहे. हे त्यांना तरी अज्ञात असण्याचा संभव नाही. हिंदुंची धर्मतत्वे, धार्मिक आचार व सामाजिक रुढी या तिन्ही गोष्टी संकीर्ण असून त्यांची इतकी सरमिसळ झालेली आहे की, धार्मिक हिंदुत्व कोठे संपते व सामाजिक कोठे सुरू होते याची स्पष्ट सीमा आखणे दुरापास्त आहे. राष्ट्रीय अर्थाने हिंदुत्वाची मर्यादा त्यापेक्षाही थोडी विस्तृत मानावी लागणार आहे. या दृष्टीने पाहिले तर आंबेडकरांच्या बौद्ध अनुयायांना समाजांतर किंवा राष्ट्रांतर केले असे म्हणता येणार नाही, म्हणूनच इतर कोणत्या धर्मांत प्रवेश करण्यापेक्षा ते बौद्ध होणार हे प्रकट झाल्यापासून त्यांच्या हिंदू बांधवांना त्यातल्यात्यात विरंगुळा वाटला.

**दलितवर्गाचे सर्वमान्य पुढारी**

गेल्या वर्षी व चालू वर्षी भगवान बुद्धाची अडीच हजार वर्षांची जयंती भारतामध्ये सरकारी पाठिंब्याने साजरी झाली. या दोन समारंभांच्या संधिकालातच गेल्या विजयादशमीला

नागपूरला त्यांनी आपल्या दोन लक्ष अनुयायांसह बौद्ध धर्मप्रवेशाचा अपूर्व समारंभ घडवून आणला. गेल्या काही वर्षात त्यांनी केलेल्या बौद्ध धर्माच्या अभ्यासाचे फळ ग्रंथरूपाने ते लोकांपुढे मांडणार होते. त्या ग्रंथांचे लिखाण त्यांनी नुकतेच पुरे केले होते, असे समजते. बौद्ध धर्माच्या स्वीकारामागे त्यांच्या मनात असलेली सर्व विचारसरणी व मतप्रणाली त्यांच्या प्रसिद्धीनंतर स्पष्ट होईल. राज्यघटनेमध्ये अस्पृश्य समाजाचे स्थान आणि अधिकार यांच्या संबंधाने काही ठरवावयाचे झाले तर ते डॉ. आंबेडकरांच्या संमतीनेच व्हावयास पाहिजे ही गोष्ट ब्रिटिश राज्यकर्त्यांनी तर मान्य केलीच, पण भारताच्या राजकीय पुढाऱ्यांनीही ती मान्य केली. म्हणूनच ब्रिटीशांनी बोलावलेल्या गोलमेज परिषदेत अस्पृश्य समाजाच्या वतीने त्यांनाच पाचारण करण्यात आले. तसेच गांधीजीनीही अस्पृश्य हे हिंदुपासून वेगळे नाहीत म्हणून त्यांना वेगळे मतदार संघ नकोत असा आपला आग्रह डॉ. आंबेडकरांच्या गळी उतरवण्यासाठी प्राणांतिक उपोषण आरंभिले. डॉ. आंबेडकर यांनी गांधीजींचा संयुक्त मतदार संघाचा आग्रह मानला पण त्यासाठी अस्पृश्यांना त्यांच्या संख्याप्रमाणापेक्षा अधिक जागा मिळवून दिल्या. "शेडयूल्ड कास्ट फेडरेशन" या दलित वर्गाच्या राजकीय संघटनेची स्थापना व नेतृत्व करून त्या वर्गाला राजकीय सत्तेच्या भागीदारीत त्यांनी स्थान मिळवून दिले.

### गाढ विद्वत्ता

पण दलित वर्गाचे पुढारी एवढ्यापुरतीच त्यांची भारतीय मान्यता मर्यादित नव्हती. भारतीय स्वराज्यांतील पहिले कायदे मंत्रिपद त्यांना देण्यात आले आणि इतर मदभेद असूनही त्यांनी ते स्वीकारले. कायद्याचा आणि घटनाशास्त्राचा त्यांचा गाढ अभ्यास हा त्यांच्या जीवनाचा एक स्वतंत्र पैलू होता. म्हणूनच राज्यघटनेचा आराखडा निर्माण करण्याचे आणि हिंदुसाठी म्हणून नव्या सर्वकष 'हिंदुकोडा'ची रचना करण्याचे कार्य त्यांच्याकडे निःशंकपणे सोपविण्यात आले. इतिहास, अर्थशास्त्र, धर्मशास्त्र इत्यादी विषयांचे त्यांचे वाचन अखंड चालू असे मुंबईतील त्यांच्या 'राजगृह' या निवासस्थानात या व इतर अनेक विषयांवरील ग्रंथांचा त्यांनी केलेला संग्रह भरगच्च आहे. अनेक चळवळीच्या व्यापामध्ये त्यांनी अव्याहत चालू ठेवलेल्या विद्याव्यासंगाची कल्पना त्यावरून येते. घटनेचा मसुदा तयार करण्यात त्यांचे जसे कौशल्य दिसून आले तसेच घटना-समितीपुढे तो मसुदा आल्यानंतर झालेल्या चर्चेमध्येही ते दिसून आले. "शूद्र कोण होते?" "भारतातील जातिसंस्था" इत्यादी सामाजिक विषयांवरील त्यांच्या ग्रंथांमध्ये त्यांचे समाजशास्त्रविषयक वाचन आणि संशोधन यांचा प्रत्यय येतो. त्याचप्रमाणे "पाकिस्तानावरील विचार" हा त्यांचा ग्रंथ खळबळ उडविणारा व एकप्रकारे अचूक भविष्यवादी ठरला.

### भारताला भूषणभूत व्यक्ति

कर्मधर्मसंयोग असा की, त्यांच्या अकल्पित निधनाच्या आदल्या दिवशीच मुंबईस एल्फिन्स्टन कॉलेजच्या शतसांवत्सरिक महोत्सवाला प्रारंभ झाला. या कॉलेजातून बाहेर पडून भारतीय जीवनास भूषणभूत झालेल्या व दिवंगत झालेल्या १४ थोर व्यक्तिची नावे खोदलेल्या शिलेचे अनावरण त्यावेळी करण्यात आले. त्या नामावलीत दादाभाई नौरोजी, डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर, जमशेटजी टाटा, दिनशा वाच्छा, काशिनाथ पंत तेलंग, बद्रुदिन तैय्यबजी, फेरोजशहा मेहता, लो. टिळक, ना. गोखले, चिमणलाल सेटलवाड, भुलाभाई देसाई, इत्यादी ठळक नावे आहेत. ही नररत्ने त्या कॉलेजलाच नव्हे तर सर्व भारताला भूषणभूत झाली.

दुसऱ्याच दिवशी याच श्रेणीत बसणाऱ्या त्याच कॉलेजमधून शिक्षण घेतलेल्या, आणखी एक नररत्नाचे नाव कोरण्याची वेळ येणार आहे, याची या समारंभाच्या योजकांना आणि वक्त्यांना व श्रोत्यांनाही कल्पना झाली नसेल. डॉ. आंबेडकर हे एल्फिन्स्टन कॉलेजचेच पदवीधर होते व त्याला भूषणभूत झालेल्या आजवरच्या दिवंगतांच्या नामावलीत शोभण्यासारखीच अखिल भारतीय कीर्ती त्यांनी संपादन केली होती.

### अपुऱ्या राहिलेल्या आकांक्षा

त्यांना मृत्यू आला त्याच्या आदल्या दिवशी रात्री ते "भगवान बुद्ध व त्याचा धर्म" या त्यांच्या नव्या ग्रंथाची प्रस्तावना लिहीत बसले होते असे समजते. यावरून आपल्या नव्या धर्मस्वीकाराला आधारभूत असा हा ग्रंथही त्यांनी पुरा केला होता असे दिसते. त्याची प्रसिद्धी पाहण्यास मात्र ते उरले नाहीत. बौद्ध धर्माचे ते मिशनरी बनणार होते. पण राजकारण सोडण्याचा मात्र त्यांचा विचार नव्हता. स्वातंत्र्य, समता व बंधुता या तत्त्वांवर अधिष्ठित असा नवा 'रिपब्लिकन पक्ष' स्थापन करण्याचा त्यांनी विचार ठरविला होता व त्याची घटनाही लिहून काढली होती! तो पक्ष केवळ अस्पृश्य वर्गापुरता मर्यादित नसून सर्वांना मोकळा ठेवण्यात येणार होता. द्विभाषिक मुंबई राज्याविरुद्ध त्यांचे मत प्रसिद्ध होते व 'हे द्विभाषिक मोडून काढणे हेच माझे मी कर्तव्य समजतो' असे नागपूरला बौद्धदीक्षा समारंभाच्या प्रसंगी त्यांनी सांगितले होते. आपण धर्मांतर केले तरी भारताला कमीत कमी हानिकारक असाच मार्ग पत्करण्याचे त्यांनी गांधीजींना वचन दिले होते. नागपूरच्या निवेदनात त्यांनी या वचनाची आठवण करून दिली. ते म्हणाले "आता बौद्ध धर्म स्वीकारून मी हिंदु-समाजाच्या दृष्टीने एक उपकारक कृत्यच करीत आहे, कारण बौद्ध धर्म हा भारतीय संस्कृतीचेच अंग आहे."

### सर्व समाजाची खेद भावना

डॉ. आंबेडकरांचा प्रथम विवाह जुन्या काळाच्या रीतीप्रमाणे लहानपणीच झाला होता. त्यांच्या प्रथम पत्नी सौ. रमाबाई १९३७ मध्येच (आईसाहेबांचा मृत्यू दिनांक २४ मे १९३५) निवर्तल्या. त्यांच्या अपत्यांपैकी आज फक्त थोरले चिरंजीव यशवंतराव हे हयात असून ते मुंबईस बुद्धभूषण छापखाना व प्रबुद्ध भारत हे नियतकालिक चालवतात. १९४८ मध्ये सारस्वत ब्राम्हण ज्ञातीतील डॉ. कु. लक्ष्मीबाई यांच्याशी त्यांचा दुसरा विवाह झाला. त्यांच्यासह त्यांनी नागपूरला बौद्ध धर्माची दीक्षा घेतली. त्यांच्या आणि इतर जवळच्या आप्तेष्टांच्या दुःखात सर्व दलित समाज आणि भारतीय जनता सहभागी आहे."

मुंबईतील 'दी करंट' या साप्ताहिकाच्या बुधवार दिनांक १२ डिसेंबर १९५६ च्या अंकात बाबासाहेबांच्यावर दोन लेख प्रसिद्ध झाले होते. ते मी खाली देत आहे.

### (1) 'BUDDHA CLAIMS INDIA'S GREATEST 'UNTOUCHABLE'

**Ambedkar : Great end to a great fight**

By N. S. Muthana

There is an element of predestimation in the manner death came to Dr. Bhimrao Ramji Ambedkar, 62, Leader of India's 60 million "untouchables"

Fate did not give this life-long rebel a chance to pitch a last battle against the irrevocable finality of death, for death overtook him in his sleep. The gallant fighter against the 2,000 year old laws of *Manu* (the Hindu law-giver) was not even aware of the hovering presence of death when he retired to bed last Thusrday night.

As if out of "fairness", destiny allowed him to forsake the shackless of "untouchability" only a month ago by letting him "surrender" himself to the Buddha.

That was my predominant feeling as I allowed myself to be properlled by a surging crowd towards the porch of Raj Griha, Ambedkar's residence in Hindu Colony, Dadar, Bombay.

It was here that his last remains lay in state. And the intonation of the shlokas–*Buddham Sharanam Gachame* (I surrender to the Buddha), *Dhammam Sharanam Gachame* (I surrender to religion) and *Sangham Sharanam Gachame* (I surrender to the community)'–over the loud–speaker confirmed my feeling about the "fairness" of destiny.

Babasaheb (as he was popularly known) did not die as a Manu ordained "untouchable" but as a follower of the Buddha. That death should have come to him during the period when the country was ceebrating the "Mahaparinirvan of the Enlightened one 2,500 years ago is significant at in a mystic way.

Out on the porch of Raj Griha, surrounded by a mountain of flowers, lay, internal repose, the hero of the "untouchables". Draped in saffron-yellow robes of a *Buddhist bhikku,* with a little figurine of the Buddha behind his head, the valient fighter's face appeared calm and peaceful.

*Through the haze of incense smoke, it appeared as if Death had drained away all bitterness of his life. The marks of tension he had worn on his face all these years had disappeared. Ambedkar was at peace with his Maker.*

A sprinkling of *Buddhist bhikkus* in saffron–yellow chanted their hymns. Ambedkar's wife, a Brahmin once, stood by sobbing. *Yeshwantrao,* his only son (by his first wife), fed the smouldering embers with incense.

For a brief moment I thought I saw the look of enlightenment on the lifeless ace.

Soon I was out, squeezed out by wave upon wave of human beings, simmering with emotion. Everybody wanted to have a *darshan* of the man who had led the "untouchables" fight against the brutal dogmas of a pernicious caste system.

**The Mourners**

The mourners were mainly people from the same stock as he. They were humble people. They personified poverty, but they were sensitive. Their emotions were genuine, but the way they released themselves varied. Some of them, seeing Ambedkar's face, clapped their hands and wept. Some of them stood rooted to the ground, looking stunned. Others stretched out their hands as if to touch his feet in a last salutation.

The most touching scene was the tribute two Mahar Regiment boys paid their hero. They took their rifle-green berets off, stood with half-shut eyes for a moment, and broke out with *"Jai Bhim"* and *"Babasaheb amar rahe."* They filed out weeping like children.

Until I came out of the porch of Raj Griha, I had not realised what a crowd had gathered there. *The crowd that came to pay homage to Ambedkar was the largest mass at any funeral I have seen.*

It was a furlong's walk before I could not pay my own humble homage to this great leader. Walking the last furlong took me about an hour.

The funeral procession began, slow and dignified—a procession of workers from the city factories. *It was not quite orderly. Not because the mourners were disorderly, but because the streets were two narrow to hold so many participants.*

Behind the flower-leaden cortege, one could not avoid trampling on flowers all the way. The route of the procession was carpetted with them.

Thousands of people showered the cortege with flowere. With the cortege rode *Shrimati Ambedkar*, Yeshwantrao and a nephew. *They appeared to be overwhelmed by the realisation of the greatness of Babasaheb.* They had not been used to such public adulation of him in recent times. At least not since he resigned his Law Ministership.

**The Crusader**

*Ambekdar's death is an end which rivals in magnitude only Gandhi's in India and Jinnah's in Pakistan.*

*Gandhi died after he freed 360 million Indians from foreign domination.*

*Jinnah died after he accomplished his ambition of creating Pakistan.*

*And Ambedkar died after he renounced Hinduism which showed his people the only ultimate release from " untouchability ".*

Renouncement of Hinduism was not his mission. He rebelled against its oppressive features. He succeeded only through " surrendering " himself to the Buddha.

Ambekar mounted his attack on Manu for the same reasons as the Mahatma had. But there was one essential difference in their individual tactics.

*While Gandhi ordained that " untouchability " be conquerred through love, through social education and by the intermingling of castes and communities (for which purpose he called the " untouchables " Harijans-children of God) Ambekdar fought the social inequalities of caste with bitterness and anger.*

He did not fight them under the Harijan banner, but under the colours of his own caste.

He wore his people's " lowliness " proudly, flaunted himself as an " oppressed " victim of caste Hindus, and directed all his energies against the " upper " class Hindus.

*To him his life was a crusade—a crusade not only for the impliment of the " depressed " classes, but also against caste Hinduism with all its Vedic trappings and Brahaminical "Superiority."*

All these centiments were sharply etched out for the processionists through the loud-speaker system all the way from Raj Griha to the burning ghat at Shivaji Park.

**A Million People**

By the time the procession reached the ghat it had swollen to over a million. People on the way joined it, and I found myself pushed further back into the procession. The cortege was almost two miles ahead of me.

The burning ghat was one seething mass of humanity. Heads bobbed up and down as far as the eye could see.

A little before the sandal-wood pyre was set aflame, thousands of " untouchables " " surrendered " themselves to the Buddha.

*It was a simple conversion. Their leader had attained Nirvan........ The Buddha had claimed the Manu-ordeained " untouchable ". There was only one last tribute they could pay their departed leader. That was to follow in his footsteps spiritually.*

*"Buddham Sharanam Gachame, Dhammam Sharanam Gachame, Sangham Sharanam Gachame."*

(The Courrent, 12th December 1956, pages 1 and 3)

(2) *" Ambedkar " : Symbol of Revolt. He Warned that hero-worship in politics would lead to dictatorship.*

By H. V. Kamath, M.P.–Member of the Lok Sabha.

*New Delhi*—With all his faults he was a " mighty man, a self-made man " a man who could not be " ignored ".

This was the almost universal comment in the lobbies soon after Parliament adjourned at noon last Thursday as a mark of respect to the memory of *Dr. Ambedkar.*

One important Congress member of the Lok Sabha went to the length of saying that in 1947 there was no one in the Congress ranks in the Constituent Assembly who could have piloted the Constitution Bill with as much pertinacity and verve. And so he is rightly regarded as the Chief architect of our Constitution.

No Prime Minister, I felt as I listened to *Pandit Nehru,* could have paid a finer tribute to one of his harshest political opponents. He spoke with 'visible' feeling, and I heard the ring of true sincerity when he said.

*"He was a symbol of revolt, he had rebelled against something we should all rebel against."*

We shall not hear his booming voice again. I believe that, as an orator in the Constituent Assembly and later in the Provisional Parliament, he stood

in the very front rank. *Dr. Shyama Prasad Mookerjee* excelled him after he joined the Opposition.

There is no doubt that his double defect, in the General Election, 1952 (from Bombay), and again in a bye-election 1954 (Bhandara, then in Madhya Pradesh, had embittered him and he became an unsparing, relentless and even scathing critic of the Congress Party and of Pandit Nehru.

That his Hindu Code Bill, on which he had laboured so hard could not be put through in his time also contrubuted to the rage in his soul.

I knew him fairly well outside Parliament too. I have often sat with him in his chamber in Parliament, on the verandah of his ministerial residence in Hardinge Avenue, and again in the drawing-room of his house on Alipur Road after he became a member of the Rajya Sabha. His manner was always stimulating, often caustic, but rarely cynical. *He had a genuine regard, bordering on devotion, for the Buddha, whom he looked upon as perhaps the greatest thinker the world has produced, and definitely the biggest fighter for social equality in India.*

When I once asked him whether the grand Upanishadic teaching was not more satisfying than the rather agnostic teaching of the Buddha, he impatiently retorted : What have the Rishi's of the Upnishads done towards the eradication of social evils ?

My answer failed to convince the dogged Doctor.

He was, as far as I am aware, the only Minister who walked out of the House. When the then Deputy Speaker, *Ananthasayanam Ayyangar,* raised some technical objection to his reading the statement on his resignation in October 1951 *he walked out in protest, and handed copies of his statement to Pressmen outside.*

That incident gave more colour and importance to his resignation than it might otherwise have got.

I had lunch with him at Alipur Road, Delhi, on the day he decided to contest the bye-election to the Lok Sabha in 1954 from the double-member constituency of Bhandara. His running mate was *Asoka Mehta* (P.S.P.). He was in fine fettle at the time, though in indifferent health.

It was a disappointment for all of us when he lost the bye-election.

I cannot help recalling what he said with so much vigour and clarity in his last speech in the Constituent Assembly, just before the Constitution Bill was passed.

*"It is quite possible in a country like India where democracy from long disuse must be regarded as something quite new there is danger of democracy giving place to dictatorship. It is quite possible for this new-born democracy to retain its from but give place to dictatorship in fact.......*

"In India, Bhakti or what may be called the path of devotion or hero worship, plays a part in its politics unequalled in magnitude by the part of it plays in the politics of any other country in the world. Bhakti in religion may be a road to the salvation of the soul. *But in politics, Bhakti or hero worship is a sure road to degradation and to eventual dictatorship.........*

"If we wish to preserve the Constitution in which we have sought to enshrine the principle of Government of the people, for the people and by the people, let us resolve not to be tardy in the recognition of the evils of that lie across our path and *which induce simple to prefer Government for the people to Government by the people,* or to be weak in our initiative to remove them.

*"This is the only way to serve our country—I know of none better."*

His revolt against the stratified caste system of Hindu Society was so violent that he used to say : "I was born a Hindu, but I will not die one." He embraced Buddhism a couple of months ago, and death summoned him during the Buddha Jayanti celebrations in India."

(The Current, 12th December 1956, pages 20 and 19).

रविवार दिनांक १६ डिसेंबर १९५६ च्या दी टाइम्स ऑफ इंडियाच्या अंकात ' The Indian Political Surveyed by Ithuriel ' या शीर्षकाखाली बाबासाहेबांच्या संबंधी पुढील मजकूर प्रसिद्ध झालेला होता.

## THE INDIAN POLITICAL SURVEYED BY ITHURIEL

" NIL NISI BONUM was a useful warning not to continue speaking ill of a man after his death. But it has degenerated in our time into an excuse for insincerity and meaningless phrase-wearing.

Most of the persons who indulged in this conventional practice on the death of Dr. B. R. Ambedkar, had suffered from the Doctor's biting lash. Many

were not able to keep out of their tribute the bitterness of past memories. For Ambedkar was no respector of persons, and as a class the Indian politician is unaccustomed to rough-handling.

The demands of convention and the feel of old sears combined to obstruct a fair evaluation of Dr. Ambedkar's contribution. This is regrettable. Dr. Ambedkar, from what I knew of him, was basically a lonely man. I believe he would have been surprised by the strong emotions of his followers at his funeral and amused at the compliments of his political contemporaries.

The fear of being swallowed up by the system restrained him from giving of his intellectual best; the awareness that he was far ahead of others in the political field, pulled him back from devoting himself fully to the cause of the under-privileged and the discriminated against.

**RARE OPPORTUNITY**

He was a realist and it must have been a sad thought that somewhere he had held the clue in his hand but failed to use it. No one else had his opportunity plus the capacity to turn it to effect.

He was, in a sense, bound by the spell of his own propaganda. Among Hindu reformers, he alone was of the depressed classes. It was his strength which, had he but worked constructively, would, have hastened the pace of change a hundredfold. The other reformers were aware of the weaknesses in the Hindu community-inertia, unimaginativeness and ignorance.

It was their failure that they could not convince Dr. Ambedkar of this. Briefly, they were afraid to go too far lest the whole fabric of Indian society collapse; and Dr. Ambedkar feared that gradual progress would end in reaction. His toying for nearly three decades with the idea of leading a man exodus to another faith prevented healthy development on well thought-out lines.

Yet, these forerunness have all contributed to taking the Hindu community and Indian society where it is to-day. The time is now ripe for the next logical step-the abandonment of the habit of looking to cartain hereditary groups in the community for performing unpleasant and unsavoury tasks. We cannot continue much longer along the old traditional lines.

It is not inspired leadership that is require but clear thinking, organised effort and social awareness. Dr. Ambedkar's great contribution lies in having

thought the underprivileged not to be content with small reforms, and having communicated to the privileged that a patronising attitude is not enough."

(The Times of India, 16th December 1956, " The Indian Political Survey," by Ithuriel).

आचार्य अत्रे यांनी आपल्या नवयुग साप्ताहिकाचा "आंबेडकर श्रद्धांजली" विशेषांक २० पानांचा (वेष्टनासहित) १६ डिसेंबर १९५६ ला काढला. मागे बुद्धाचा पुतळा त्याच्या-पुढे बाबासाहेब हातात दंड घेऊन उभे आहेत आणि त्यांच्या डाव्या बाजूला माईसाहेब अशा पोजचे हृदयंगम चित्र खास अंकाच्या पहिल्या पृष्ठावर दिलेले होते. आणि त्या चित्राखाली कलात्मकतेने फुलांचे लंब वर्तुळ काढून त्यात "बुद्धं सरणम् गच्छामि। धम्मं सरणम् गच्छामि। संघं सरणम् गच्छामि।" हे त्रिशरण दिलेले होते. आत बाबासाहेबांचे निरनिराळ्या पोजमधील आणि पोषाखातील पाच सुंदर फोटो दिले होते. अंत्ययात्रेचेही काही फोटो दिले होते. यामुळे विशेषांक वाचकांच्या नजरेत भरेल असाच होता. या विशेषांकात कॉ. श्रीपाद अमृत डांगे आणि धनंजय कीर यांचे खास लेख होते. **"अत्रे उवाच— भारताचा उद्धारकर्ता महात्मा"** यात आचार्य अत्रे यांनी वाहिलेली श्रद्धांजली होती. ती अशी :—

"महात्मा फुले, महात्मा कबीर आणि महात्मा बुद्ध या तीन महात्म्यांचे महान् शिष्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांचे महापरिनिर्वाण एवढ्या आकस्मिक रीतीने होईल अशी कोणाला कल्पना होती? पाच डिसेंबर रोजी सायंकाळी भगवान् सूर्यनारायण जेव्हा अस्तंगत झाला तेव्हा त्याला तरी कोठे माहीत होते की, उद्या सकाळी आपण दिल्ली शहराच्या क्षितिजावर जेव्हा उगवू तेव्हा तेथे तो महात्मा आपली जीवनयात्रा संपवून मृत्यूच्या मांडीवर अखेरची निद्रा घेत पहुडलेला आपल्याला दिसेल! सात कोटी अस्पृश्यांनी पाच हजार वर्षे नरकयातना भोगल्यानंतर त्यांच्या उद्धारासाठी अखेर ज्या महात्म्याचा अवतार झाला त्याच्या अवतारकार्याचे सार्थक कुठे होते न होते तोच त्याजवर अशी एकदम झडप घालून स्वतःच्या बदनामीखेरीज मृत्यूने तरी काय मिळविले? जुन्या मराठी शाहिराच्या कवितेत थोडासा बदल करून मृत्यूला असे विचारता येईल की "कमी नव्हते पृथ्वीत अवांतर प्राणी न्यायाला, सोडुनि त्यांना घातलास 'बाबा' वर घाला?" खरोखरच, भारत हा मोठा दुर्दैवी देश आहे. अगोदर येथे महापुरुष शतकाशतकातून एकादाच जन्माला येतो आणि तो जन्माला आला तरी ह्या देशातले कोट्यवधि मूर्ख लोक त्याचे मोठेपण त्याच्या हयातीत मुळी ओळखतच नाहीत. जिवंतपणी त्याचा ते अन्वनित छळ करतात. आणि मग तो मेला म्हणजे ऊर बडवून आणि गळा काढून त्याच्यासाठी शोक करीत असतात. सगळ्या महापुरुषांचा इतिहास अगदी सारखा आहे. ख्रिस्त, बुद्ध, कबीर, ज्ञानेश्वर, तुकाराम, गांधी ह्या सर्वांचा त्यांच्या देशबांधवांनी अमानुष छळ केलेला आहे. पण आंबेडकर हा ह्या जगात एकच असा 'महात्मा' होऊन गेला की यमयातनेच्या ज्या भयंकर अग्निदिव्यांतून त्याला सारा जन्म जावे लागले, तसे जगातल्या दुसऱ्या कोणाही महापुरुषाला जावे लागले नसेल! ह्या पृथ्वीतलावर एकट्या भारताखेरीज 'अस्पृश्य' समजली जाणारी अगोदर माणसेच नाहीत. आणि समाजाचा कसलाही अपराध केला नसता अस्पृश्यतेची राक्षसी शिक्षा शतकानुशतके

भोगत असलेल्या अशा दुर्दैवी समाजात एकही महापुरुष आतापर्यंत कधी जन्माला आलेला नाही. जगातल्या इतर महापुरुषांच्या समाजाने कितीही छळ केला असला तरी त्याच्या छळाचा प्रारंभ काही त्यांच्या जन्मापासून झाला नसेल. पण आंबेडकरांना आईच्या स्तनांतील दूध प्राशन करण्याच्या अगोदरच हाल अपेष्टेच्या हलाहलाचा प्याला तोंडाला लावावा लागला. सारा समाज ज्याला शिवायलाच मुळी तयार नाही असली विटंबना जगातल्या कोणा महापुरुषाला कधी सहन करावी लागली आहे काय? साऱ्या समाजाने ज्याला जन्मापासून लाथाडले, प्रेमाचा हात साऱ्या आयुष्यात एकदा देखील ज्याच्या पाठीवरून समाजाने कधी फिरविला नाही, ज्याच्या विद्वतेबद्दल किंवा कर्तृत्वाबद्दल कौतुकाने एक अक्षरसुद्धा कधी-समाजाने उच्चारले नाही, उलट ज्याच्या डोक्यावर राष्ट्रद्रोही, इंग्रजाचा हस्तक, हिंदू धर्माचा शत्रु अशा एकाहून एक भयंकर शिव्यांची आग समाजाने एकसारखी उधळली, त्याने त्या समाजाच्या रागालोभाची परवा (पर्वा) तर कधी केलीच नाही, उलट त्या समाजाविरुद्ध सतत पंचवीस वर्षे बंडाचा झेंडा उभारून देशाच्या राजकीय आणि सार्वजनिक जीवनातले परमोच्च स्थान पटकावले, असा अलौकिक गुणाचा व सामर्थ्याचा पुरुष जगाच्या इतिहासात कुठे होऊन गेला आहे काय? आम्हाला तरी माहीत नाही. दीडशे वर्षे ह्या देशात प्रस्थापित झालेली इंग्रजांची सत्ता उलथवून टाकण्यासाठी ज्यांनी ज्यांनी आपले सर्वस्व पणाला लावले त्यांची त्यांची नावे देशाच्या इतिहासात सुवर्णाक्षरामध्ये लिहिली जातील. पण धार्मिक आणि सामाजिक पारतंत्र्याच्या नरकात पाच हजार वर्षे सडत पडलेल्या सात कोटी गुलामाना स्वतंत्र करण्यासाठी तळहातावर शीर घेऊन जो नरवीर साऱ्या देशाशी आयुष्यभर एकटा लढला त्याचे नाव देखील कदाचित ह्या देशाच्या इतिहासात लिहिले जाणार नाही. ही ह्या महापुरुषाच्या जीवनाची सर्वांत मोठी शोककथा ठरणार आहे.

परकीयांशी जो लढतो तो 'देशभक्त' ठरतो आणि स्वकीयांशी जो लढतो तो 'देशद्रोही' ठरतो असा ह्या देशामधल्या राजकीय नीतिशास्त्राचा सिद्धांत आहे. आणि आंबेडकरांचे दुर्दैव असे की, ह्या देशामधल्या ह्या शतकांतल्या सर्वात मोठ्या पुरुषाशी म्हणजे महात्मा गांधींशी आणि देशामधली सर्वात बलाढ्य राजकीय संस्था जी कॉंग्रेस तिच्याशी जन्मभर झगडावे लागले. महात्मा गांधींना किंवा कॉंग्रेसला ज्यांनी ज्यांनी विरोध केला ती ती मंडळी ह्या देशाच्या सार्वजनिक आणि राजकीय जीवनातून सपशेल उठली. त्यांची नावनिशाणी देखील मागे राहिली नाही. आंबेडकरांना हे माहीत का नव्हते? पण त्यांनी जाणूनबुजून हा धोका पत्करला. त्यांना तो धोका पत्करल्यावाचून गत्यंतरच नव्हते. 'ब्रिटिशांचे हस्तक आणि देशद्रोही' हे जे भयंकर आहेर टीकाकारांकडून त्यांनी मिळविले त्याचे कारण गांधी आणि कॉंग्रेस हे देशाच्या स्वातंत्र्यासाठी ब्रिटिशाशी ज्या वेळी झगडत होते, त्याच वेळी सात कोटी अस्पृश्यांच्या स्वातंत्र्यासाठी आंबेडकरांना गांधीशीं आणि कॉंग्रेसशी झगडावे लागले. आंबेडकर जर ब्रिटिशांचे हस्तक आणि देशद्रोही असते तर त्यांना उघडपणे ब्रिटिश सरकारची नोकरी पत्करून परमोच्च सन्मानाचे पद मिळवता आले असते! त्यांच्यासारख्या अलौकिक बुद्धीच्या आणि विद्वत्तेच्या माणसाला ब्रिटिशांच्या राज्यात दुष्प्राप्य असे काय होते? बरे कॉंग्रेसमध्ये प्रवेश करून महात्मा गांधींची कृपा संपादन करण्याचे त्यांनी मनात आणले असते तर तीही गोष्ट त्यांना काही अवघड नव्हती. कॉंग्रेसमध्ये त्यांनी पंडित नेहरूंच्या बरोबरीने सारे सन्मान मिळविले असते. त्यांच्या विद्वत्तेच्या आणि सामर्थ्याचा एकही माणूस आज कॉंग्रेसमध्ये नाही. पण ब्रिटिशांची सेवावस्त्रे त्यांनी अंगावर धारण केली नाहीत, किंवा कॉंग्रेसच्या 'देशभक्तीचा' गणवेषही अंगावर त्यांनी चढविला नाही!

सात कोटी अस्पृश्यांच्या उद्धारासाठी त्यांनी सर्व सुखाचा, सन्मानांचा आणि लोकप्रियतेचा त्याग करून सर्वांगावर काटेरीवस्त्रे चढविली आणि आपले जीवन रक्तबंबाळ करून घेतले. अस्पृश्यता निवारणाचे महात्मा गांधीचे आणि काँग्रेसचे मार्ग त्यांना सर्वस्वी अमान्य होते. अस्पृश्यांकडे पहाण्याची स्पृश्य समाजाची दृष्टी बदलली आणि त्याचे हृदयपरिवर्तन झाले तरच देशातील अस्पृश्यता जाईल ही महात्माजींची भूमिका होती. आंबेडकरांना स्पृश्य समाजाची दया, सहानुभूति आणि भीक नको होती. अस्पृश्यता कायद्याने गेली पाहिजे आणि अस्पृश्यांना कायद्याचे संरक्षण मिळाले पाहिजे असा आंबेडकरांचा आग्रह होता. एवढ्यासाठी त्यांना इतर जातीप्रमाणे अस्पृश्यांना देशाच्या राज्यकारभारात त्यांच्या संख्येप्रमाणे वाटा मिळावयाला हवा होता. आंबेडकरांच्या पूर्वी अस्पृश्यता निवारणाचे अनेकांनी प्रयत्न केले. नाही असे नाही. पण ह्या सर्व प्रयत्नांचे स्वरूप सामाजिक सुधारणेचे होते. आंबेडकरांनी अस्पृश्यतानिवारणाच्या चळवळीला राजकीय स्वरूप देऊन तिच्यात आमूलाग्र क्रांति घडवून आणली. ही त्यांची कामगिरी अभूतपूर्व आहे. पाच हजार वर्षे सात कोटी अस्पृश्य जनावरा-पेक्षा हीन जिणे जगत होते. मेलेल्या मुड्याचे मांस खाऊन आणि समाजाच्या घाणीचे उकिरडे उपसून त्यांची मने आणि शरीरे सडून गेली होती. मेल्याहून मेली होती. ह्या सात कोटी मुड्यांना जागे करून त्यांच्यामध्ये तेजाची आणि स्वाभिमानाची ज्योत यांनी पेटवली आणि आपल्या हक्काचा लढा लढण्यासाठी जुलमी समाजाविरुद्ध हातात बंडाचा झेंडा घेऊन त्यांना उभे केले ते आंबेडकर सात कोटी दलितांना परमेश्वरासारखे वाटले तर त्यात काय आश्चर्य?

### सात कोटि दलितांचा महात्मा गेला

अस्पृश्यांचा उद्धार कसा करावयाचा आणि कोणी करावयाचा हाच महात्मा गांधी आणि आंबेडकर ह्यांच्या मधल्या वादाचा मुख्य मुद्दा होता. आपण अस्पृश्यांचे एकमेव पालक आहोत म्हणून त्याचे प्रतिनिधित्व करण्याचा केवळ आपल्याला आणि काँग्रेसलाच अधिकार आहे हा महात्माजींचा दावा होता. तो आंबेडकरांना सुतराम मान्य नव्हता. भारतातील साऱ्या अस्पृश्य वर्गाचे पुढारी आपण आहोत आणि त्यांच्यावतीने बोलण्याचा आपल्याखेरीज कोणालाही अधिकार नाही असे आंबेडकरांचे म्हणणे होते. अस्पृश्य समाज हा सामाजिक आणि धार्मिक दृष्ट्या ज्याप्रमाणे हिंदुसमाजाचा एक अभिन्न भाग आहे त्याप्रमाणे राजकीय दृष्ट्यासुद्धा त्याचा समावेश बहुसंख्य हिंदू समाजामधेच व्हावयाला पाहिजे, ह्याबाबत महात्माजींचा मोठा कटाक्ष होता. आंबेडकरांचा ह्या गोष्टीला कट्टर विरोध होता. त्यांनी महात्माजींना त्यांच्या तोंडावर सांगितले की, "ज्या देशात आणि धर्मात मला कुत्र्यामांजरापेक्षा देखील हीन तऱ्हेने वागविले जाते, एवढेच नव्हे पण मला पाणीसुद्धा प्यायला मिळत नाही, त्या देशाबद्दल आणि धर्माबद्दल मला काय म्हणून प्रेम वाटावे? मला जेथे रहायला घर नाही तो देश माझा कसा? ज्या देशाने शतकानुशतके आमच्यावर अन्याय केला आहे, आमचा राक्षसी छळ केला आहे, त्या देशाशी आम्हाला इमान राखता आले नाही तर त्याची जबाबदारी आमच्यावर नसून त्या देशावर आहे. लोक मला देशद्रोही म्हणतात. ठीक आहे मला त्याबद्दल मुळीच वाईट वाटत नाही. ह्या देशाबद्दल मला प्रेम वाटावे अशी एकही गोष्ट माझ्या देशबांधवांनी केलेली नाही. इतकेही असून ह्या देशाची जर काही सेवा माझ्या हातून घडली असेल तर ती माझ्या देशभक्तीमुळे घडलेली नसून माझ्या सद्सद्विवेकबुध्दीमुळे घडलेली आहे." अस्पृश्यांसाठी जेव्हा आंबेडकरांनी स्वतंत्र मतदार संघाची मागणी केली तेव्हा त्याला महात्माजींनी विरोध केला. ते म्हणाले, "अस्पृश्य धर्मांतर करून मुसलमान किंवा

ख्रिस्ती झाले तरी मला चालतील. पण अस्पृश्यांना स्वतंत्र मतदारसंघ मिळाल्याने हिंदू समाजात जी दुफळी पडेल ती मी कदापि सहन करणार नाही. मग ह्या गोष्टीला विरोध करताना माझे प्राण खर्ची पडले तरी मला त्याची परवा (पर्वा) नाही." आंबेडकर त्यांना म्हणाले, "मुसलमान आणि शीख हे आर्थिक आणि राजकीय दृष्टचा अस्पृश्यांपेक्षा पुढारलेले असताना तुम्ही त्यांचे स्वतंत्र राजकीय अस्तित्व मान्य करता आणि अस्पृश्यांच्या स्वतंत्र मतदार संघाला मात्र विरोध करता हे कसे?" ह्या प्रश्नाला गांधीजींजवळ उत्तर नव्हते. विलायतेमध्ये 'वर्तुळ परिषदेच्या वेळी हे उभयतांचे भांडण पराकाष्टेचे विकोपाला गेले. अस्पृश्यांना स्वतंत्र मतदारसंघ मिळू नयेत म्हणून गांधीजींनी मुसलमानांशीसुद्धा संगनमत केले. आंबेडकरांनी तर गांधीजींच्या भोवतालचे महात्मेपणाचे वलयच फोडून टाकण्याचा प्रयत्न केला. आंबेडकर हे मूर्तिभंजक होते. गांधीजींच्या 'महात्म्या'ची त्यांना काय परवा? (पर्वा) त्यांनी त्यांना सरळ तोंडावर सांगितले की, "माझ्या या देशातल्या 'महात्म्या'वर विश्वास नाही. महात्मे लोक नुसती आपल्या भोवती धूळ उडवतात पण समाजाची पातळी उंचावीत नाहीत, असा इतिहासाचा दाखला आहे!" ब्रिटिश पंतप्रधानाकडून आंबेडकरांनी अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदार संघ मिळविले. आंबेडकरांचा जय झाला. तेव्हा त्यांना नेस्तनाबूद करण्यासाठी अखेर महात्मा गांधीनी प्राणांतिक उपोषणाचे 'ब्रह्मास्त्र' बाहेर काढले. त्यामुळे 'महात्म्या'चे प्राण वाचविण्यासाठी आंबेडकरांना अखेर 'पुणे करारा'वर सही करणे भाग पडले. ही सही करताना आंबेडकरांनी काँग्रेसवर जो विश्वास ठेवला त्या विश्वासाचा घात करून पुढे काँग्रेसने आंबेडकरांना आणि त्यांच्या पक्षाला देशाच्या राजकीय जीवनामधून उठवून लावले!

जो हिंदू समाज आपल्याला आत्मीयत्वाने, सहानुभूतीने, प्रेमाने आणि माणुसकीने वागवीत नाही त्या समाजामध्ये आपण निष्कारण रहाण्यात काय अर्थ आहे हा विचार वीस वर्षांपासून आंबेडकरांच्या डोक्यात खेळत होता. त्याची धर्मांतराची घोषणा त्यातूनच निर्माण झाली. धर्मांतराचा त्यांनी ऐहिक आणि आध्यात्मिक अशा दोन्ही दृष्टीनी विचार केला. भारतात अनेक अल्पसंख्यांक असताना त्यांचा छळ होत नाही. आणि अस्पृश्यांचाच तेवढा छळ का होतो? खेडेगावात दोनच मुसलमानांची घरे असतात. पण त्यांच्या वाटेला गाव जात नाही. आणि अस्पृश्यांवर सारखा जुलूम होतो, ह्याचे कारण त्या दोन मुसलमानाच्या घरामागे साऱ्या हिंदुस्थानांतील मुसलमान समाजाची शक्ति व सामर्थ्य उभे आहे ह्याची हिंदू लोकांना जाणीव असते. अस्पृश्यांच्या मदतीसाठी कोणीही धावून येणार नाही हे त्यांना माहीत असते. अस्पृश्यांना पैशाचा पाठिंबा मिळत नाही. अधिकाऱ्यांचे संरक्षण मिळत नाही. ह्या त्यांच्या असहायपणामुळे त्यांच्यावर होणाऱ्या जुलुमाचा प्रतिकार करण्याचे सामर्थ्य त्यांच्या अंगी असत नाही. हे सामर्थ्य अस्पृश्यांनी बाहेरून कोठून तरी मिळविले पाहिजे असे आंबेडकरांना वाटू लागले. आध्यात्मिकदृष्टचा हिंदू धर्मात अनेक दोष आहेत ह्याचीही तीव्र जाणीव त्यांना होतीच. सर्वात मोठा दोष म्हणजे चातुर्वण्य. एकाने विद्या शिकावी, दुसऱ्याने शस्त्र धरावे, तिसऱ्याने व्यापार करावा आणि चौथ्याने नुसती सेवा करावी ही व्यवस्था व्यक्तीच्या आत्मोन्नतीला मुळीच पोषक नाही, असे आंबेडकरांचे ठाम मत होते. हिंदू धर्मात व्यक्तीला प्राधान्य नाही. विचारस्वातंत्र्य नाही. त्यामुळे सर्वच हिंदू बौद्धिक गुलामगिरीत सापडलेले असले तरी त्या गुलामगिरीच्या हलाहलाचा अर्क फक्त अस्पृश्यांच्या वाटचाला आलेला आहे. जातिभेद आणि अस्पृश्यता ही हिंदू धर्माची शिकवण आहे. हिंदू धर्मात राहून जातिभेद नष्ट करू असे म्हणणे म्हणजे विषाचे अमृत करू असे म्हणण्यासारखे आहे. जोपर्यंत

जातिभेद आहे तोपर्यंत अस्पृश्यता रहाणारच. म्हणून धर्मांतरावाचून अस्पृश्यांना दुसरा मार्ग नाही. असा आंबेडकरांचा युक्तिवाद होता. धर्मांतरामुळे आहे त्या परिस्थितीत काहीच फरक पडणार नाही. आजही हिंदू समाजाचा आणि अस्पृश्यांचा काडीमात्र संबंध नाही. धर्मांतरानंतरही तो तसाच राहणार आहे. तथापि, सगळ्यात आंबेडकरांचा बिनतोड मुद्दा हा होता. ते म्हणाले, "आज अस्पृश्यांचे 'नामांतर' करावे ही गोष्ट सर्वांना पटली आहे. महार लोक स्वतःला 'चोखामेळा' म्हणवितात. काँग्रेसवाले त्यांना 'हरिजन' म्हणतात. अस्पृश्यांनी 'नामांतर' केले तर चालते. मग त्यांनी 'धर्मांतर' केले तर काय बिघडले?" धर्मांतराचा विचार वैफल्याच्या भावनेमधून निर्माण झाला अशी अनेक लोक आंबेडकरांच्यावर टीका करतात. पण ही टीका खरी नाही. आंबेडकरांचा पिंड हा धर्मनिष्ठाचा पिंड आहे. ते नेहमी म्हणत की, "ज्या मनुष्याचा देवावर विश्वास नाही, धर्मावर विश्वास नाही त्या मनुष्यावर मी तरी विश्वास ठेवणार नाही!" वीस वर्षांपूर्वी धर्मांतराची घोषणा करताना ते म्हणाले, "माझ्या धर्मांतराच्या मुळाशी आध्यात्मिक भावनेशिवाय दुसरी कसलीही भावना नाही." सर्व धर्मांचा तौलनिक अभ्यास केल्यानंतर बुद्धाचा धर्म हा सर्वश्रेष्ठ धर्म आहे अशी त्यांची खात्री झाली म्हणूनच त्यांनी तो धर्म स्वीकारावयाचे ठरविले. ते म्हणाले, "बुद्धाचा धर्म हा खरा मानवी धर्म आहे. मानवाच्या संपूर्ण विकासासाठी तो निर्माण केलेला आहे. तो प्रत्येक आधुनिक आणि बुद्धिवादी माणसाला पटण्यासारखा आहे. बुद्धाची शिकवण अगदी साधी आणि सोपी आहे. त्या धर्मामध्ये मनुष्याला पूर्ण वैचारिक स्वातंत्र्य दिलेले आहे. मानवतेला आणि सद्सद्विवेकबुद्धीला ज्या गोष्टी पटतील त्याच त्या धर्माने ग्राह्य मानलेल्या आहेत." महात्मा गांधींनी अस्पृश्यांना 'हरिजन' बनवून ते स्पृश्यांच्या दयेचा आणि सहानुभूतीचा विषय बनवले. पण आंबेडकरांनी लक्षावधि अस्पृश्यांना 'बुद्धजन' बनवून त्यांच्या मुक्तीचा आणि आत्मोद्धाराचा चिरंतन दीपस्तंभ त्यांच्यासमोर बांधून ठेवला.

हिंदू धर्मावर सूड घेण्यासाठी आंबेडकरांनी आणि त्यांच्या लक्षावधी अनुयायांनी बुद्ध धर्म स्वीकारला, ही गोष्ट खोटी आहे. हिंदू धर्मावर त्यांना सूडच घ्यावयाचा असता तर त्यांनी इस्लामचा किंवा ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केला असता. पण "भारताच्या इतिहासात देशाचा आणि धर्माचा विध्वंसक म्हणून माझे नाव रहावे अशी माझी इच्छा नाही!" असे ते नेहमी म्हणत. भारताच्या अखंडत्वावर त्यांची गाढ श्रद्धा होती. घटना समितीच्या पहिल्याच बैठकीत "हिंदुस्थान हा काही झाले तरी अखंडच राहीला पाहिजे. मुस्लीम लीगचे पाकिस्तानचे धोरण चूक आहे!" अशी घोषणा करून आपल्या प्रखर राष्ट्रीय बाण्याने आपल्या सर्व विरोधकांचे डोळेच दिपवून टाकले होते. 'पाकिस्तान' वर एक प्रचंड ग्रंथ लिहून देशाचे फाळणी करताना कोणत्या गोष्टीची सावधगिरी घेतली पाहिजे ह्याचे त्यांनी निःसंदिग्ध मार्गदर्शन केले होते. पण घमेंडखोर काँग्रेसनेत्यांनी त्यांच्या त्या ग्रंथाकडे दुर्लक्ष करून अशा रीतीने देशाची फाळणी केली की, ज्यामुळे लक्षावधि लोकांच्या घरादारांच्या आणि प्राणांच्या होळ्या झाल्या. भारताला स्वातंत्र्य प्राप्त होताच काँग्रेस पक्षाशी आपले पूर्वीचे सर्व मतभेद विसरून ते मध्यवर्ती सरकारात प्रविष्ट झाले. आणि स्वतंत्र भारताची घटना घडविण्याची सर्व जबाबदारी त्यांनी पत्करली. ते हिंदू समाजाचे द्वेष्टे असते तर 'हिंदू कोड बिल' आणून त्यांनी हिंदू समाजात आमूलाग्र सुधारणा घडवून आणण्याचा कधीच प्रयत्न केला नसता. पण त्यांच्या त्या महान् क्रांतिकार्याला प्रतिगामी काँग्रेसने सुरुंग लावल्यामुळे त्यांना मोठ्या दुःखाने आणि निराशेने मध्यवर्ति सरकारमधून बाहेर पडावे लागले. हिंदू धर्म आणि हिंदू समाज सुधारण्याचा त्यांचा तो अखेरचा प्रयत्न होता. तो अयशस्वी झाल्यानंतरच

त्यांना भगवान् बुद्धाला शरण जाण्यावाचून दुसरे गत्यंतरच उरले नाही. दोन महिन्यापूर्वी बुद्ध धर्माची दीक्षा घेताना ते म्हणाले, "माझ्या ह्या धर्मांतराने भारतीय संस्कृतीचा आणि इतिहासाच्या परंपरेला धक्का न लागेल अशीच मी काळजी घेतलेली आहे." बौद्ध धर्म हा सर्वस्वी भारतीय धर्म आहे. सनातन हिंदू धर्म तर भगवान् बुद्धाला अवतारच मानतो. प्रत्येक धार्मिक संकल्पात 'गोदावर्याः दक्षिणे तीरे बौद्धावतारे' असा हिंदू लोक बुद्धाच्या नावाचा उच्चार करतात म्हणून आंबेडकरांनी आणि त्यांच्या लक्षावधी अनुयायांनी बौद्ध धर्माची दीक्षा घेतल्यामुळे हिंदू समाजाला दुःख किंवा वैषम्य वाटण्याचे मुळीच कारण नाही. भगवान बुद्ध हा भारताचा नव्हे जगाचा उद्धारकर्ता आहे. पंचवीसशे वर्षांची त्याची जयंती साऱ्या राष्ट्राने नुकतीच साजरी केली आहे. स्वतंत्र भारताचे राज्ययंत्रही आज भगवान बुद्धाच्याच नावाने चालते. त्याचे धर्मचक्र आज आमच्या राष्ट्रध्वजावर आलेले आहे. सम्राट अशोकाची सिंहमुद्रा आमची राष्ट्रमुद्रा झाली आहे. बुद्धाचे पंचशील हा विश्वशांति प्रस्थापित करण्याचा एकमेव मार्ग आम्ही आता स्वीकारलेला आहे. आज जगापुढेही दोनच मार्ग आहेत एक बुद्धाचा आणि दुसरा युद्धाचा राजकारणात भारतवर्ष जर आज बुद्धाचा अनुयायी झालेला आहे, तर धर्म कारणात त्याचे अनयायित्व आंबेडकर आणि त्यांचे कोटचावधी बांधव ह्यांनी पत्करले तर त्याबद्दल दुःख मानण्याचे काय कारण आहे? जिवंतपणी आंबेडकर जेवढे मोठे होते, त्याच्या शतपटीने आज मृत्यूनंतर ते मोठे झाले आहेत. भारतात आजपर्यंत पुष्कळ महापुरुष मरण पावले असतील. पण ज्यांच्या मृत्यूने कोटचावधि अंतःकरणे रक्तबंबाळ झाली आणि कोटचावधी नेत्रांतून अश्रूंच्या धारा वाहिल्या असे महान मरण आंबेडकरांवाचून कोणाच्याही वाटचाला आलेले नाही. आंबेडकरांच्या मोठेपणाबद्दल आणि योग्यतेबद्दल कित्येक लोकांना आतापर्यंत संशय वाटत होता. पण त्यांच्या महानिर्वाणाचे विराट दृश्य पाहिल्यानंतर त्यांचे जन्मजन्मांतरीचे शत्रू देखील त्यांचे भक्त होतील. आंबेडकर हे केवळ सात कोटी अस्पृश्यांचे कल्याणकर्ते नव्हते. तर पंचवीस कोटी स्पृश्यांचे ते उद्धारकर्ते होते. विभूतिपूजा आणि ढोंग ह्याने साऱ्या हिंदू समाजाचा अधःपात झालेला होता. म्हणून त्या विभूतिपूजेवर आणि ढोंगावर घणाचे घाव घालून त्या खोटचा मूर्ति आंबेडकरांनी फोडून टाकल्या आणि 'बुद्धीची नि मानवतेची पूजा करा' अशी देशाला शिकवण दिली. "मी मूर्तिपूजक नाही. मी मूर्तिभंजक आहे. गांधी मला आवडत नसत. कारण भारतावर माझे अधिक प्रेम होते!" ह्या त्यांच्या वैशिष्टचपूर्ण वाणीत त्यांच्या अमर जीवनाचे रहस्य साठविलेले आहे. भारताच्या धार्मिक, सामाजिक आणि राजकीय जीवनात क्रांती घडवून आणण्यासाठी सारा जन्म ज्यांनी जुलूम, असत्य आणि ढोंग ह्यांच्याशी निकराने झुंज दिली असा लोकोत्तर धैर्याचा, वज्रकठोर छातीचा आणि कुसुमकोमल हृदयाचा महात्मा म्हणून डॉ. भीमराव रामजी आंबेडकर ह्यांचे नाव भारताच्या इतिहासात निरंतर प्रकाशित राहील!

—प्रल्हाद केशव अत्रे (पा. ३, ६ व १५)

(AN EXTRACT FROM ' TIME ' dated 17th December 1956 page 55)

**Feature.—MILESSTONES**

*Died.*—Dr. Bhimrao Ramji Ambedkar, 63, round-faced, tempestuous champion of India's 60 million untouchables and principal author of India's constitution (adopted in 1949, which makes discrimination against untouchables a crime; in New Delhi Himself an untouchable (and thus so repuggnant to some highcaste Hindus that his shadow was considered pollution) Dr. Ambedkar warred with Gandhi over the Mahatma's gradualism in righting caste discrimination, entered Prime Minister Jawaharlal Nehru's Cabinet as Minister of Law in 1947, resigned four years later in protest over delay in anti-caste legislation. Two months ago Hindu Ambedkar renonced his caste-perpetuating religion, claimed stood for " inquality and oppression, led 3,00,000 followers in a mass conversion to Buddhism.

**THE DAUGHTY DOCTOR**

Thus here's an obituary I make of Dr. Ambedkar.

A man who could well give and take and an able Administrator !

A lawyer of no small repute. He took a leading hand. In framing what did constitute. The Government of this land;

Though some may doubt his politics. His love for his fellow men. Was such a caused acrobatics, in spite of his legal acumen!

A burly man with a sturdy frame. With all a lawyer's skill. He staked his life, he staked for the untouchables' his fame and weal!

The daughty doctor is now past. Beyond all distinction. His row for us to bravely blast. The evil to its extinction ! "

S. G. BHAT, Advocate.

The Maratha, dated 4th January 1957 (Friday) page 8.

## " THE INSPIRING MASSAGE OF LORD NAVA BUDHA "

### DR. B. R. AMBEDKAR

### 'SERVICE, SINCERITY AND SACRIFICE'

The greatest need of the modern world is for men and women of ability and goodwill to sacrifice and also to serve the community sincerely without hope of any reward. The most satisfactory thing in all this earthly life is to be able to serve our fellow beings. To be of service is a solid foundation for contentment in this world.

' If we were only wise enough to choose,
The path of service everyday we live
We'd learn the truth that what we keep we loose !
And gather what we give.'

We render fine service by little and seemingly insignificant deeds if only they are done in the right spirit and with a worthy motive. We must now wake up and spend the time and energy to serve the worthy cause to preserve the unique spirit of our objectives inorder to better the lot of our whole community and also to strengthen the backbone of the natioal prosperity. We must create the order of ideals to maintain not only the order of societies but also to build up the nation as an ideal one. Because the greatness of nation or of society depends not only upon population, nor acreage, nor wealth nor the strength of the armed forces and battleships, nor upon scientific achievements; but also upon its moral elevation, the purity of its ideals, the intensity of its devotion to reality, sincerity, service and sacrifice towards the good of all beings.

We must no forget those great careers of mankind and mark the lives that have counted most in human history, they have not been those who were seeking material rewards. They have been generally, persons with a great vision of service to their fellow men and towards the welfare of the humanity.

Mr. Emerson aptly says, " SERVE AND THOU SHALT BE SERVED. " If we love and serve men, one cannot, by any hiding or stratagem escape the remuneration. No the New Era has began. This is the era of Atomic Age. This is the world of new thoughts and new ideas. The whirlwind growth of the civilization has changed the order of all the old ideas. Everybody think in a democratic notions to establish truth, happiness and prosperity by their own

way. Let all the intellectuals, thinkers and social workers, in order to strengthen the phenomenon of our constructive notions and ideas to serve the purpose of our community at large ! Let us come, into one fold, under one banne banner which may inspire us to do good of all with true spirit of service sincerity and sacrifice on the basis of co-operation, mutual understanding, exchange of thoughts and ideas towards the development of our wel-beings.

Let us now cultivate the spirit of SELF-HELP, and follow the teachings of our Great Lord, 'Nava-Buddha' who has given us a new vision a bright-inspiration, a true notions of understanding each other. The individual rifts, misunderstandings, differences are to be burnt down into ashes. Let us follow the path of noble silence which will lead us unto the light of peace, prosperity and progress. The time has now come that everybody must realise the importance of unity, the importance of oneness. The coordination of all our activities into one fold is an essential factor. It is the foremost duty, an obligatory duty in order to create the inspiration of selfhelp, the leaders, workers and also the people belonging to the Backward Classes keeping aside their differences, individual rifts, minds of groupism, must come forward with a unique spirit to serve the cause of people. They should render selfless service to improve the lot of our masses. If we avoid sympathy and wrap ourselves around in a coldchain armour of selfishness, we exclude ourselves from the sympathy of many.

It is my sincere APPEAL to all the youngsters, students, close-associates and also the members of the public to co-ordinates, co-operate and also to unite in one single banner of Noble Silence. This is the great path in the world which has been shown by our Great "NAVA-BUDDHA"—Dr. B. R. Ambedkar.

For the immortal work done by Him, for the prosperity of our nation, for the cause of the people for creation of a new thought in this world of ours re-orientation of a Human Religion, we bow down to great teachings. And also his memory has been incribed into our hearts, into our actions throughout the ages also throughout the generation unto the last of this world.

Let us contribute our mite to strengthen his memory into reality.

We pay humble homage—for his attainment of The Maha Pari Nirvana

(Sd/–).
H. KHOBRAGADE.

रविवार, दिनांक १३ जानेवारी १९५७ च्या मौज साप्ताहिकाच्या अंकात (पा. ९-१०) बाबासाहेबांच्या जीवनकार्यासंबंधी लेख प्रसिद्ध झाला होता. तो मी खाली देत आहे.

"कै. डॉ. आंबेडकर आपल्या जीवन कार्यात यशस्वी झाले काय?

लेखक—' चिकित्सक '.

डॉ. आंबेडकरांच्या निधनाला आता चार आठवडे होतील. त्यांच्यासारख्या थोर पुरुषाला साजेशीच श्रद्धांजली देशाने त्यांना वाहिली. किंबहुना ते श्रेय त्यांना त्यांच्या जीवनात लाभले नाही ते मृत्यूनंतर श्रद्धांजली बरोबर त्यांच्या चरणी वहाण्यात आले. आंबेडकरांची एकंदर विद्वत्ता, अर्थशास्त्रनैपुण्य किंवा घटनाकायद्याचा व्यासंग सर्वश्रुत तसा सर्वमान्यही होता. परंतु अस्पृश्योद्धाराचे जे कार्य आज झालेले दिसते त्याचे सारे श्रेय परवापर्यंत तरी कुणी आंबेडकरांना दिले नव्हते; त्याचा फारच मोठा वाटा गांधीजींकडे देण्यात येत असे. परवा मात्र अधिकारारुढ पक्षांतील मंडळींनीसुद्धा गांधीजींना विसरून आंबेडकरांना ते श्रेय दिले. (माणूस मृत्यू पावल्यानंतर त्याची अफाट स्तुति करण्याचे नाहीतरी आपल्याला वेडच आहे. मागे स्टॅलिन मृत्यू पावला तेव्हा पं. नेहरू लोकसभेत उद्गारले, "He was a man of peace !" — पुढे काय झाले ते वाचकांना माहीत आहेच.)

**सत्यान्वेषणाची आवश्यकता**

पण मोठी माणसे हा राष्ट्राचा अमोल ठेवा असतो, ही माणसे इतिहास घडवीत असतात, मानवाने मानवत्व सार्थ करीत असतात. त्यांच्या जीवनापासून स्फूर्ति घेऊन सामान्य माणसाला आपल्या खुज्या जीवनाची ऊंची काही इंचांनी वाढली तर वाढवायची असते; मिळाला तर थोडा प्रकाश मिळवायचा असतो, आणि मुख्य म्हणजे भूतकालीन इतिहासाचा मागोवा घेत भविष्य घडविण्यासाठी वर्तमान कालात वाटचाल करावयाची असते. पण हे आपण करीतच नाही. करता येत नाही असे नव्हे; भीति अशी असते की, सत्यान्वेषणाला तर्कदुष्टता म्हटले जाईल, दोषदिग्दर्शनाला निंदापुराण मानण्यांत येईल, व्यापक समाजहिताच्या दृष्टीने मात्र सत्यान्वेषणाची, जरूर पडल्यास दोषदिग्दर्शनांचीही गरज असते.

आंबेडकरांच्या एकंदर चरित्राचे मूल्यमापन अधिकारी पुरुषांनीच केले पाहिजे. येथे फक्त आंबेडकरांच्या यशापयशाची—माझ्या मते अपयशाचीच—थोडीफार मीमांसा करता आली तर करावी एवढाच हेतु आहे. पुढील विवेचनात मला आंबेडकर हे मुख्यत: राजकारणी आणि अस्पृश्योद्धारक (व काही प्रमाणात घटनाकार) म्हणूनच अभिप्रेत आहेत. त्यातही असे आढळले की राजकारणी आंबेडकरांच्या अपयशाच्या मीमांसेतूनच आपण अस्पृश्योद्धारक आंबेडकरांच्या अपयशाशी येऊन ठेपतो.

**तत्वज्ञान नाही; कार्यक्रम नाही!**

डॉ. आंबेडकर राजकीय पुढारी होते का आणि असल्यास त्यांचे राजकीय तत्त्वज्ञान कोणते, या प्रश्नांचा विचार केल्यास, आंबेडकरांना राजकारण खेळण्याची मनीषा होती असे

मला तरी वाटत नाही अस्पृश्यांना वरिष्ठ वर्गांकडून मिळणारी अमानुष वागणूक पाहून त्यांचे मन व्यथित झाले. त्यांना स्वतःला वरिष्ठ वर्गाच्या सोवळेपणाचे चटके बसले तेव्हा त्यांचे मन बंड करून ऊठले. या बंडाने त्यांचे आयुष्य अखेरपर्यंत व्यापले, अन्यायाविरुद्धचा अखंड झगडा यादृष्टीने त्यांच्या जीवनकथेचे महत्त्व अनन्यसाधारण ठरू शकेल. पण त्यामुळे राजकीय क्षेत्रातील त्यांचे स्थान विशेष बळकट ठरते असे नाही. कारण ते कार्य मुख्यत्वे सामाजिक स्वरुपाचे आहे. ते राजकारणात खेचले गेले, हरिजनांच्या प्रश्नांवर त्यांनी गांधीजीविरुद्ध घेतलेल्या भूमिकेमुळे. एकदा राजकारणात खेचले गेल्यावर देखील आपले असे एक खास विश्व त्यांना निर्माण करता आले नाही; कारण त्यांच्यापुढे कोणतेही निश्चित तत्वज्ञान नव्हते, कार्यक्रम नव्हता.

याचे परिणाम अनेक झाले. एक तर राजकीय संघटना त्यांना उभारता आली नाही. दुसरे असे की, राजकारणामध्ये ठाम अशी कोणतीही भूमिका त्यांनी घेतली नाही. राष्ट्रीय पक्षाविरुद्ध विधिमंडळे त्यांनी गाजविली. राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी देश प्राणपणाने लढत असता व्हाइसरॉयच्या कौन्सिलांत ते जाऊन बसले. आणि स्वातंत्र्योतर कालांत भारताच्या पहिल्या मंत्रिमंडळात ते मंत्रिपदावर आरुढ झाले. एक विशिष्ट राजकीय ध्येयवाद असलेला माणूस एक तर व्हाइसरॉयच्या कौन्सिलांत जाणार नाही किंवा नेहरूंच्या मंत्रिमंडळात जाणार नाही. घटना बनविण्याचे काम त्यांनी मिशनऱ्याच्या श्रद्धेने केले, पण त्यानंतर पांच वर्षांनी ते घटनेची होळी करायला निघाले. टीकाकारांनी छेडले तर त्यांचे उत्तर असे की, 'मी स्वतंत्र नव्हतो, मला राबवून घेतले.' पण त्यावेळी तर आंबेडकरांनी कसलीच कुरकुर केलेली नव्हती; आपण राबवले जात आहोत ही जाणीव त्यावेळी त्यांना नव्हती काय?

### लोकशाहीवर अस्पष्ट श्रद्धा

येथे महत्त्वाचा मुद्दा आहे तो हा की, त्यांचे राजकीय धोरण ठाम तत्वज्ञानावर आधारलेले असण्याऐवजी तात्कालिक परिस्थितीवर अवलंबून होते. आपल्याला काय नको हे त्यांना चांगले माहीत होते; परंतु काय हवे आहे हे काटेकोरपणे ते कधीच सांगू शकले नाहीत. कम्युनिझमला त्यांचा तीव्र विरोध होता. येथील दलित समाज कम्युनिस्टांच्या आहारी गेला नाही याचे हे एक कारण आहे. गांधीजींना कम्युनिझम अमान्य होता, त्यांनी आपला पर्याय पुढे ठेवला; जयप्रकाश कम्युनिझम विरोधी आहेत. त्यांनी लोकशाही समाजवादाचे तत्वज्ञान प्रतिपादले. आंबेडकरांनी असा पर्याय पुढे ठेवला नाही, त्यांची लोकशाहीवर निष्ठा होती, पण ती त्यांच्या पक्षात कधी नव्हती आणि मनात होती ती केवळ लोकशाहीची चौकट. गांधीजींच्या नेतृत्वाखाली ज्या देशाने स्वातंत्र्य मिळविले त्या देशाच्या घटनेवर गांधीजींच्या व्यक्तित्वाचा ठसा असणे अपरिहार्य नाही काय? पण ही घटना अखेरच्या मंजुरीसाठी लोकसभेपुढे ठेवताना आंबेडकरांनी असे स्पष्टपणे सांगितले की, लोकशाहीमध्ये सत्याग्रहाला स्थान नाही. नेहरू सकट गांधीजींचे तथाकथित सर्व वारससुद्धा आता असे बोलतात, हे खरे पण त्यांत राजकीय स्वार्थ असतो. आंबेडकरांना असा स्वार्थ नव्हता. तरीसुद्धा ते तसे बोलतात याचा अर्थ असा की, त्यांची लोकशाहीविषयक कल्पना सुस्पष्ट नाहीच पण 'सत्याग्रह म्हणजे केवळ संन्यासमार्गी साधुत्वच नव्हे तर ते एक अतिश्रेष्ठ प्रकारचे राजकारण आहे'. व त्याच्या साहाय्याविना भारतीय लोकशाही अपूर्ण राहील हे त्यांना नीटसे आकलन झालेले नव्हते.

**आंबेडकर निष्ठेचा बाजार**

अशा अनिश्चित मनोवृत्तीची व्यक्ति राजकीय पुढारी म्हणून नावारूपाला येणेच अशक्य आहे. तरीसुद्धा आंबेडकर राजकारणांत अखेरपर्यंत वावरले याचे कारण त्यांच्या जमातीची त्यांच्या-वरील अव्यभिचारी निष्ठा. डॉ. आंबेडकर हरिजन समाजाला, विशेषत: महार जमातीला, ईश्वरासमान वाटत आलेले आहेत. डॉक्टरांनी काहीही सांगावे आणि त्यांच्या जमातीने ते शिरसावंद्य मानावे,—वस्तुत: एवढे एकनिष्ठ अनुयायी लाभणे आजच्या काळात दुर्लभच. ते डॉक्टरांना लाभले हे त्यांचे भाग्य. पण देशाचे दुर्भाग्य असे की, या शक्तीचा त्यांनी सदुपयोग केला नाही. उलट त्यांच्या सहकाऱ्यांनी हरिजनांच्या आंबेडकरनिष्ठेचा बाजार मांडला. आंबेडकरांच्या चेल्यांनी हरिजनांच्या मतांचा सौदा केल्याचे प्रकार काय थोडे आहेत? खेड्यापाड्यांतील हरिजन समाज बहुतांशी निरक्षर, बाबासाहेबांचा फोटो छापून कोणतीही गोष्ट त्यांना करण्यास सांगावे! कॉंग्रेसमध्ये आज लाचखाऊपणा कितीही बोकाळला असला तरी या बाबतीतले 'रेकॉर्ड' शे. का. फे कडेच आहे. आंबेडकरांच्या राजकीय भवितव्याला खरा सुरुंग कुणी लावला असेल तर तो हरिजन समाज व डॉ. आंबेडकर यांच्यामध्ये वावर-णाऱ्या या तथाकथित दुय्यम पुढाऱ्यांनी. ज्या देशाला काही सांस्कृतिक, नैतिक परंपरा आहेत. तेथे इतके भ्रष्ट राजकारण चालू शकत नाही. कम्युनिष्टांची मुळे या देशात जोर धरू लागली नाहीत याचेही कारण हेच होय.

**तृतीय श्रेणीचे कोंडाळे**

येथे आपण आंबेडकरांच्या राजकीय अपयशाच्या तिसऱ्या कारणाशी येऊन ठेपतो. वैयक्तिक दृष्ट्या माणूस कितीही मोठा असला तरी राजकारणांत तो एकट्याने काहीही चमत्कार घडवून आणू शकत नाही. कळस एक असला तरी खालच्या इमारतीचा डोलारा अनेक स्तंभावर उभा राहात असतो. हे स्तंभ मजबूत हवेत, निकोप हवेत, गांधीजींनी राजकीय व बिनराजकीय क्षेत्रांत निष्ठेने काम करणारी अव्वल दर्जाची इतकी माणसे सभोवार गोळा केली की आपले विचार ते आचारात आणू शकले; इतकेच नव्हे तर गांधीजी गेले तरी गांधीजींची कार्ये चालू आहेतच, चालू रहातील. दुर्दैवाने आंबेडकरांच्या भोवती सहकाऱ्यांचे असे वर्तुळ आढळत नाही. प्रि. दोंदे यांचा एकमेव अपवाद सोडला तर आंबेडकरांना लाभलेले सहकारी अत्यंत सामान्य कर्तृत्वाचे किंवा संशयास्पद चारित्र्याचे होते. राजकीय संघटना उभारुन तिच्या नेतृत्वाची धुरा वाहण्याची पात्रता त्या सहकाऱ्यांच्या ठायीं अभावानेच होती. अठराव्या शतकापर्यंतच्या इतिहासांत असे आढळते की, केंद्रीय सत्तेच्या पडत्या काळीं ठराविक करभार बादशहाला दिला की मग काहीही करायला सरदार-दरकदार मोकळे, तसे आंबेड-करांचे ठिकठिकाणचे प्रमुख कार्यकर्ते करीत असत. आंबेडकरांच्या हे ध्यानी आले नसेल असे कसे म्हणावे? पण तरीसुद्धा ही परिस्थिती पालटण्याचा प्रयत्न त्यांनी केल्याचे ऐकिवात नाही. योग्य सहकारी निवडण्यांत अशाप्रकारे ते अयशस्वी ठरले व परिणामत: तृतीय श्रेणीच्या लोकांच्या कोंडाळ्यात अडकले. या सर्व कारणपरंपरेचा परिणाम म्हणून राजकीय पुढारी या नात्याने आंबेडकरांचे स्मरण भावी पिढ्यांना होणार नाही.

**अस्पृश्योद्धाराचा मार्ग**

अस्पश्योद्धारक आंबेडकरांची कथा जवळजवळ अशीच आहे, अस्पृश्यतेचे चटके खात ते वर आले. ज्ञान, विद्वत्ता या दृष्टीने ब्राह्मणांच्या पातळीवर येऊनही हिंदू समाजने त्यांची अवहेलना

केली. वरिष्ठ हिंदू समाजाला, गंजून गेलेल्या जातिसंस्थेला त्यांनी आव्हान दिले नसते तरच आश्चर्य मानावे लागले असते. शतकानुशतके अस्पृश्यांची एवढी अवहेलना हिंदू समाजाने केली होती की, आंबेडकरांसारखा नेता लाभल्यावर सारा समाज आशेने त्यांच्या नेतृत्वाखाली गोळा होणे साहजिकच होते; तसा तो झाला. गांधीजींनी हरिजनसेवेचे व्रत आमरण घेतले तरी त्यांना हरिजनांची एवढी भक्ति कधी लाभली नाही. एवढ्या संघटित समाजाच्यावतीने आंबेडकरांनी हिंदुत्वाला जे आव्हान दिले त्यामुळे हिंदू समाजाचे डोळे उघडायला पाहिजे होते हे खरे; पण हिंदू समाजाने आढ्याताखोरपणाने ते आव्हान उपेक्षिले, हा त्याचा करंटेपणा आहे. पण अस्पृश्योद्धाराच्या चळवळींत आंबेडकरांची भूमिका नेहमीच चुकली, हे सत्य नाही का? चातुर्वर्ण्यावर आधारलेली समाजचौकट बदलली पाहीजे. जन्मावर जात ठरता कामा नये, एक मानव दुसऱ्याला अस्पृश्य वाटण्याईतकी अस्पृश्यता असतां नये ही त्यांची मागणी रास्त होती. पण ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी त्यांनी कोणते मार्ग अवलंबिले?

### अढी कायम राहिली

अस्पृश्योद्धाराच्या प्रश्नाला दोन बाजू होत्या : (१) समाजामध्ये वैचारिक जागृति घडवून आणून अस्पृश्यतेविरूद्ध लोकमत तयार करणे आणि (२) अस्पृश्यांचा आर्थिक प्रश्न सोडवून त्यांचे जीवनसार ऊंचाविणे. पण अस्पृश्यतेविरूद्ध आंबेडकरांची प्रतिक्रिया एवढी प्रबळ होती की, हे विधायक विचार त्यांना सुचलेच नाहीत. अस्पृश्यांकडे पाहण्याचा वरिष्ठ वर्गाचा दृष्टिकोन गांधीजींनी बदलला. उलट आंबेडकरांनी धर्मांतराची भाषा इतक्यावेळा वापरली की, त्यांना धर्मांतराला प्रवृत्त करणाऱ्या अन्यायाच्या चिडीचे गांभीर्य नाहीसे झाले. शतकानुशतके समाजाच्या रोमरोमांत भिनलेले विष क्षणार्धात नाहीसे कसे होईल? त्यासाठी चिकाटीने सतत प्रयत्न केले पाहिजेत व हे प्रयत्न वरिष्ठ वर्गांची मने बदलणारी असले पाहिजेत. गांधीजींच्या प्रयत्नांची दिशा ही होती, तर आंबेडकर विचारीत होते, "What the Congress and Gandhi have done for Untouchables ?" (या इंग्रजी नावांत मूळ ग्रंथांत "the", नाही आणि "for" याच्या ठिकाणी "to" आहे.) हा विरोध नजरेत भरणारा आहे. याचा परिणाम असा झाला की, अस्पृश्यतेविषयीच्या कर्मठ हट्ट हिंदू समाजाने सर्वसामान्यपणे सोडला तरी आंबेडकरांविषयीची अढी कायमच राहिली.

### हरिजन होते तेथेच आहेत

हिंदू समाजाचा अस्पृश्यताविषयक दृष्टिकोन बदलला असला तरी अस्पृश्यता गेलेली नाही, याचे कारण काय? एक कारण असे आहे की, समाज बुद्धीने अस्पृश्यताविरोधी बनला तरी तसा आचार करायला अजून मने तयार नाहीत. पण हरिजनांची मागासलेली राहणी हे ही त्यांचे एक प्रमुख कारण आहे हे दुर्लक्षिता येणार नाही. राहणी सुधारण्यासाठी आर्थिक ऊर्जितावस्था व नवे संस्कार अवश्य होते. आर्थिक ऊर्जितावस्थेचा प्रश्न आंबेडकरांच्या कक्षेबाहेरचा होता. पण स्वजातींचे शिक्षण करून तिच्यावर संस्कार करणे त्यांना शक्य होते. पण ते त्यांनी कधीही केले नाही. अलिकडे त्यांनी काढलेल्या शिक्षणसंस्थांचा मला विसर पडलेला नाही. अनेक हरिजन तरूणांना उच्च शिक्षणाची संधि उपलब्ध झाली. हरिजनांमध्ये एक नवी शिक्षित पिढी तयार होत आहे; परंतु येथे असा प्रश्न उपस्थित करणे प्रस्तुत ठरेल की, शिक्षित हरिजनांमुळे हरिजन समाज उंचावला आहे का? सुधारला आहे का? वस्तुस्थिती अशी आहे की, शिक्षित हरिजन व सर्वसाधारण हरिजन समाज याच्यांत एक

भिंत उभी राहिली आहे. ते एकमेकांशी मिसळू शकत नाहीत. नवशिक्षितांच्या शिक्षणाचा उपयोग त्यांची वैयक्तिक राहणी उंचावल्यास होतो, समाजाला नाही. त्यामुळे हरिजन समाज होता तिथेच आहे, आंबेडकरांच्या सामाजिक व राजकीय जीवनाची शोकांतिका झाली असे मला म्हणावयाचे आहे ते याचसाठी. ज्या पुरुषाला इतिहास निर्माण करावयाचा असतो त्याला आपल्या ध्येयासाठी आयुष्य वहायला तयार असलेली मंडळी सभोवार गोळा करावी लागते व आपल्याइतकीच प्रखर ध्येयनिष्ठा त्यांच्या ठायी निर्माण करावी लागते. आंबेडकरांना अशी मंडळी लाभली नाही; त्यांना ती गोळा करता आली नसेल; आणि स्वतःच्या जमातीवर ते असा संस्कारही घडवू शकले नाहीत की, ज्यामुळे तिचा तोंडावळा बदलेल. स्वतःच्या शिक्षणसंस्थांतून पदवीधर होऊन बाहेर पडलेल्या तरुणांच्या ठायीसुद्धा स्वजमातीच्या उत्कर्षासाठी झटण्याचा ध्येयवाद आंबेडकरांना निर्माण करता आला नाही हे त्यांचे सर्वांत मोठे अपयश होय. त्यांची वैयक्तिक लायकी फार मोठी असूनसुद्धा त्यांना हे जमले नाही हे खरे दुर्दैव.

कधी साध्याची स्पष्ट जाणीव नाही, तर कधी साधनांचा विचार नाही, यामुळे भारताचा हा थोर सुपुत्र आपल्या जीवन-कार्यात अयशस्वी ठरला. साध्य-साधन-विवेक हा ध्येय-सिद्धीतला एक महत्त्वाचा घटक आहे. आंबेडकरांनी तो दुर्लक्षिला हे त्यांची जीवनकथा सांगत आहे. पण परवा त्यांनी केलेले धर्मांतरसुद्धा हेच सांगते. त्यांनी बौद्ध धर्म स्वीकारला याबद्दल तक्रार असू नये. परंतु अस्पृश्यतानिवारणाचा एक मार्ग म्हणून जेव्हां बौद्ध धर्माचा स्वीकार ते करतात तेव्हा हे नमद केले पाहिजे की, धर्मांतराने अस्पृश्यता संपत नाही. जोपर्यंत अस्पृश्य समाजाची आर्थिक, शैक्षणिक व सांस्कृतिक उन्नती एकसाथ होत नाही तोपर्यंत अस्पृश्यता समूळ नष्ट होणार नाही; आणि धर्मांतरामध्ये ही तिहेरी उन्नती साधण्याचे सामर्थ्य नाही.

या सर्व चिकित्सेनंतर एका गोष्टीचे श्रेय आंबेडकरांना द्यावे लागते व ती गोष्ट म्हणजे "अस्पृश्य वर्गाचा स्वाभिमान त्यांनी जागृत केला. हे त्यांचे यश, आणि त्या पलिकडे ते जाऊ शकले नाहीत, हे त्यांचे अपयश!"

प्रबुद्ध भारताचा "डॉ. आंबेडकर महापरिनिर्वाण विशेषांक" २९ डिसेंबर १९५६ आणि २६ जानेवारी १९५७ अशा तारखा देऊन प्रसिद्ध केला. पाने ७४ किंमत दोन रुपये वेष्टन पानावर बुद्ध आणि बाबासाहेबांचा मृतावस्थेतील पार्थिव देह यांचे मनोहर चित्र दिलेले होते. नऊ पानावर या पार्थिव देहाचा जो फोटो घेतलेला होता तो दिलेला होता. तो पाहून पाषाणहृदयी माणसाच्याही डोळ्यात अश्रू उभे करणारा होता. अंत्ययात्रा, अस्थि गोळा करणे, वगैरे बद्दलची हृदय हेलावणारी दृष्ये यांचे फोटो या अंकात दिलेले होते. सात पानावर "बाबांचे संक्षिप्त जीवनसार" या सदरात जी माहिती दिलेली होती ती बहु अंशाने चुकीची आहे. त्यांतील काही नमुने मी येथे मुद्दाम देतो. हेतु हा की बाबासाहेबांच्या खास व श्रेष्ठ दर्जाच्या अनुयायी लेखकांना बाबासाहेबांच्या जीवन वृत्तांताची खरी व अचूक माहिती न मिळविताही जनतेच्या बोकांडी ते आपली खोटी माहिती "ठोकून देतो ऐसाजे" म्हणून कसे मारीत आलेले आहेत, याचे ज्ञान वाचकांना व्हावे :—

"१९१७ साली कोलंबिया विश्वविद्यालयात संशोधन. Evolution of Promincial Finance in British India हा निबंध लिहिला."

१९१७ पुढील अभ्यासासाठी इंग्लंडास प्रयाण. लंडन येथील स्कूल ऑफ इकॉनिमिक्स येथे प्रवेश व संशोधन. त्याचप्रमाणे बॅरिस्टर होण्यासाठी 'ग्रेज इन' येथे प्रवेश. १९१८ 'रुपयांचा प्रश्न' हा डी.एस.सी. चा प्रबंध लिहिला. पदवी मिळाली.

१९१८ "रुपयांचा प्रश्न" या प्रबंधाचे प्रसिद्धीकरण लंडन येथील पी.एस. किंग आणि कंपनीकडून, हा ग्रंथ त्याना पसंत पडल्यामुळे त्यांनी अमेरिकेंत लिहिलेला प्रबंध १९१९ "Evolution of Promincial Finance in British India" छापून प्रसिद्ध केला. त्यामुळे ठरावाप्रमाणे कोलंबिया विश्वविद्यालयाला शंभर प्रति पाठविल्यामुळे तेथील पीएच.डी. ही पदवी मिळाली. १९२० साली हिंदुस्थानास प्रयाण व सिडनेहम (सिडनहॅम) कॉलेजातील अर्थशास्त्राचे प्राध्यापक.

१९२३ साली नोकरी सोडून पुन: इंग्लंडास प्रयाण.

१९२३–२४ एक सेमेस्टर(तीन महिने) जर्मनी येथील बॉन् विश्वविद्यालयात अभ्यास.

१९२४ ऑक्टोबर 'ग्रेज इन' मध्ये बॅरिस्टरची परीक्षा.

खरी माहिती कागदोपत्री पुराव्यानिशी मी (चरित्रकारानी) चरित्र खंड १ व २ यात दिलेली आहे. ती थोडक्यात अशी:—

(१) अमेरिकेतील कोलंबिया युनिव्हर्सिटीत एम.ए. आणि पी.एचडी. या परिक्षेसाठी जुलै १९१३ ते मे १९१६, वास्तव्य. बडोद्याच्या शिष्यवृत्तीची मुदत जून १९१३ ते जून १९१६–तीन वर्षे.

(२) लंडनमध्ये जुलै १९१६ ते जुलै १९१७.

(३) बडोदे–नोकरी, ऑगस्ट ते ऑक्टोबर १९१७.

(४) १० नोव्हेंबर १९१८ ते ११ मार्च १९२० सिडेनहॅम कॉलेजमध्ये प्रोफेसर.

(५) ५ जुलै १९२० ते मार्च १९२३ लंडनमध्ये. लंडनहून मुंबईला आगमन, ३ एप्रिल, १९२३ ला. या काळात डी.एस.सी. आणि बार-अॅट-लॉ या पदव्या मिळविल्या.

(६) दी प्रॉब्लेम ऑफ दी रुपी––डिसेंबर १९२३ प्रसिद्ध.

(७) The Evolution of Promincial Finance. १९२५ मध्ये प्रसिद्ध

(८) जुलै १९२४, मुंबई हायकोर्टात वकिलीला सुरुवात.

प्रिसिडियमची प्रस्थापना, वर्किंग कमिटीने केलेले महत्त्वपूर्ण ११ ठराव, १९५७ च्या निवडणुकीसाठी उभे केलेले उमेदवार यांची यादी, वगैरे माहिती या विशेषांकात होती. (पाने ५१ ते ५३) ठराव नं. ७ बाबासाहेबांच्या अकस्मात निधनाची चौकशी सरकारने करावी, असा होता. या ठरावानंतरच्या काळात चौकशी बद्दलच्या मागणीचा प्रचंड प्रचार झाला. भारत सरकारनें खास अधिकारी नेमला. या अधिकाऱ्यासमोर मी ही तोंडी व लेखी साक्ष दिली होती. पण अनेक

साक्षीदारांच्या साक्षी घेऊन सरकारने ठरविले की, बाबासाहेबांचा मृत्यु नैसर्गिक होता. खास अधिकाऱ्यांचा अहवाल प्रसिद्ध करण्याचे सरकारने नाकारले. या सर्व घटना १९५७–५८ सालात झाल्या.

प्रबुद्ध भारताचा विशेषांक फार उशिरा निघाला. आणि तो चटकदार स्वरुपात नव्हता त्यामुळे नवयुगाच्या खास अंकाप्रमाणे तो मोठ्या प्रमाणात खपला नाही. कारण, त्याच्या विक्रीसाठी जाहिरात दोन तीन वर्षे प्रबुद्ध भारतात येत होती.

## WHO AND WHERE

### At Home in the World

By—Santha Rama Rau (Mr. Faubion Bowers)

" The first and to my mind the most important thing to say about caste in India is that it is dying out. Its dealt will probably be a long and slow one, but at least its hold on the Indian people is growing steadily weaker. In this as in so much else in Indian life, Mahatma Gandhi was a major contributor. In the emotional battle of the untouchables for acceptance he was their Champion and leader. He changed their name from untouchables to *Harijans*-the chosen, or Loved Ones of God-and insisted that they have access to Hindu temples, from which they had previously been excluded. Their legal battles were fought for them by one of the most brilliant and controversial figures of " Indian politics, Dr. Bhimrao Ramji Ambedkar—himself a *harijan*. A bitter, honest and difficult crusoder, he is largely responsible for the fact that *harijans* have full equality before the law. What remains is the tedious process of evolution that will someday bring them social acceptance.

Just why or how caste began is something that Indian scholars still wrangle about. In the Vedas, the earliest, most sacred and authoritative of Hindu religious writings, the references to caste are so vague as to leave room for endles interpretations. As a result some people claim that caste is a recent (for India) corruption with no real theological authority.

Certainly it is not until the writing of the great " lawgiver " Manue, near the beginning of the Christian era, that caste is codified into the four major divisions that " Indians know to-day............"

(Holiday, page 40, October 1957, N.Y.)

**" Nehru-The Years of Power" by Vincent Sheen (1960)**

" When I think of the critics I am most constantly reminded of the late Dr. B.R. Ambedkar, who was Minister of Law from 1947 to 1951. Ambedkar was an untouchable-aggressively so-and perhaps for this reason, perhaps by temperament, was an inveterate critic of all Indian society. I think I may be entitled to say that he was my friend. I always saw him when I went to India in just those years when he was Law Minister, and we had long talks—or rather, he had long talks and I had long listenings. He was bristling with barbed wire from the inside out, was no respecter of persons and at times used sweeping terms to describe what he disliked. On one occasion we journeyed together on a train to Sanchi and back to Delhi-a long journey and spent our days at the Buddhist shrine down there, the great *stupa* where the relies of the disciples now lie. Even then (1950) Ambedkar knew a great deal about Buddhism and lectured me upon it at inexhaustible length; in the end he himself became a Buddhist.

A big, brusque fellow with a most belligerent manner, he delighted me by his utter difference from any other Hindu of my acquaintance. It is a form of genius to be so individual, and it is not much use explaining it by untouchability—I have known a fair number of other untouchables, but nobody at all like Ambedkar. He enjoyed attacking me for what he considered my undue affection for India.

" If you like our Brahmin Government so much, Sheen, why don't you pack it up and carry it off to America? We don't need it and may be you do. "

" We have Brahmins of our own, Sir, " I would tell him.

" Ah, but not like ours..........."

And off he would go on one of his hour long diatribes about Brahminism and the caste system and all the evils therein involved. He was perfectly capable of talking for three years at a stretch on this and related subjects. He was highly irrelevent about Mahatma Gandhi, to whom I believe he was (underneath this irreverence) genuinely attached. He was so obsessed by the caste system, and untouchability in particular, that he could not possibly be fair to the Government of India, of which he formed a part. His diatribes were a healthy corrective, just the same, and there was always something in what he said no matter how much he exaggerated. Few cabinet ministers I have ever seen could distribute such tongue lashings to his own associates.

Ambedkar put into his biography in *Who's Who* the starting phrase, " Untouchable by caste." Indians whose biographies appear in that study volume never mention caste, but Ambedkar would have no misunderstanding about it. He then mentions his marriage, in 1948, to Dr. Sharda Kabir of Bombay, and says she is "Brahmin by caste. "

Dr. Sharda Kabir, a charming woman of great intelligence, had disregarded her own caste rules by becoming a doctor of medicine; she cared for Ambedkar through a serious illess and then married him. It was my impression, especially during that long journey to Sanchi and back, that she loved and revered him inordinately, and I have no doubt she thought him a very great man indeed. Nothing alse could account for her humour and patience while he went on and on, hour after hour, about the misdeeds of the Brahmins throughout history. When I asked her how she could, she laughed happily "I do not listen after a while", she confessed. The whole government turned out for their wedding-Brahmins included, and headed by the Brahmin Nehru-but nothing ever seemed to soften the edge of Ambedkar's resentments.

This extraordinary man claimed to be the one acknowledged head of all Indian untouchables—a point in great dispute-but when they gathered along the way stations between Delhi and Sanchi, waiting for a glimpse of him, if he happened to be asleep or resting he did not appear. It was his Brahmin wife who stood dutifully on the platform of their private car, bowing with folded hands before the poor people outside. I saw this happen often, and at the most in convenient hours. In his robust way Ambedkar would probably have called this sentiment, but I greatly admired her for it.

He was prodigously educated, that man. He had degrees from Columbia University and the University London, had studied at the Sorbonne and was a barrist of Greys Inn. His degrees were M.A. ,Ph.D., D.Sc., and LLD. Degrees do not mean so much, perhaps, but in the torrential flood of his talk there came up great chunks and whirling avatars of learning. He may not have been the greatest of Sanskrit scholars but he could plaster a text with dozens of references to early Hindu authorities. His treatise on *The Origin of Untouchability* was thus embellished with Sanskrit erudition, but its central theme was a rather daring theory, and one which, I imagine, could never be proved. He thought that untouchability arose through the breaking up of tribes in the ancient wars; when a tribe no longer had enough members to be a tribe, it remmants were "broken men" and were compelled to live outside the walls of the town or village,doing unclean work and enduring the insults of the

unbroken. This hypothesis reposes upon analogy chiefly; broken men" from such shattered tribes did exist in ancient times in Wales and perhaps elsewhere. Ambedkar never convinced me, in print or in talk, that such was the case in India.

Perhaps I make him sound unsympathetic, but I assure you he was the best possible company for anybody who was really interested in these subjects. He had no Inhibitions whatever; he would say anything that came into his head; if you discounted his unfairness to the Brahmin caste and the government of India—discounted it pretty heavily—there was verve and acumen in everything he had to say. He could not criticize the Constitution of India because he was in fact its principal author or, as he said, its"architect". As Minister of Law he supervised the entire work, borrowing at will from the constitutions of the United States, England, France and Switzerland; he wrote the actual text in many passages and he had to see it through parliament to its adoption. He told me that the doctrine of the separation of powers, as expressed in the Constitution of the United States (and entitling the August independence of a Supereme Court for constitutional debate), was one of his main contributions to the Indian Constitution. I have understood elsewhere that he made many.

But Ambedkar is no more, and critics of his caliber, so brilliant and merciless, are not to be found in public life to-day. Few politicians can possibly harp on the evils of the caste system as he did, because the sober fact is that an overwhelming proportion of them belong to the higher castes. Many are indeed Brahmins. Even E.M.S. Namboodripad, Chief Minister of Kerala and a very leader for the Communists all over India, is a Brahmin. If the caste system is the chief hindrance to progress, as Ambedkar believed, it badly needs another inveterate enemy of low caste or untouchable origin who can fight it with all the unquenchable bitterness of personal experience.

Nehru had long acquaintance with Ambedkar's thorns; so had Gandhi as long ago as 1932 Gandhi felt obliged, under the compulsion of his inner voice, to begin a fast unto death so as to prevent the untouchables of India being made into a separate electorate, as Ramsay MacDonald wished That fast aroused India and the world, Ambedkar as head of the untouchables came to an agreement with Gandhi in prison, the fast ended and the separate electorate was abandoned but on terms which were a victory for Ambedkar. Nehru had been aghast at all this, particularly at the implication that it was being done by the express instructions of God. When the solution came Nehru

sent Gandhi a famour telegram, the last phrases of which were " An unable to judge from religious viewpoint. Danger your methods being exploided by others but how can I presume to advise a magician. Love Jawahar."

Both for Nehru and for Gandhi there was the same quizzical, often scornful and skeptical, but somehow affectionate, attitude on the part of Ambedkar. That same remark he made to me about"our Bhahmin government" was made on another occasion, also in private, about Gandhi.

" You Americans all love Gandhi " he said. " I never have understood why you don't import him to America long ago so that we should have been rid of him."

He never could see any resemblance or connection between Gandhi and Buddha, at least in our prolonged conversations. He ended as a Buddhist and perhaps in his last days he understood more than his combative nature had permitted while he was in the thick of the battle." (pages 234-38).

□ □ □

# संदर्भ सूची


इंग्रजी

1. The Current
2. Free Press Journal
3. Holiday
4. Lok Sabha Debates, Vol. 10, part 2, December 1956.
5. The Manchester Gardian
6. Parliamentary Debates, Rajya Sabha Vol. XV-A, November December 1956.
7. Shankar's Weekly
8. Times of India
9. Talk for Voice of America (A[s])
10. Talk for the B.B.C., London (A[s])

Books :—

Nehru—The Years of Power-by-Vincent Sheen (1950)

मराठी

(१) आकाशवाणी, मुंबई.

(२) केसरी

(३) प्रबुद्ध भारत

(४) मराठी

(५) लोकसत्ता

# चरित्र लेखकाचा अल्पपरिचय

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे चरित्रकार श्री. चां. भ. तथा आबासाहेब खैरमोडे यांचा जन्म पाचवड, ता. खटाव, जि. सातारा येथे १५ जुलै १९०४ मध्ये झाला.



१९२९ मध्ये बी. ए. झाले. एम्. ए., एल्एल् बी. च्या टर्म्स भरल्या परंतु सेक्रेटरीएटमध्ये नोकरी मिळाल्याने परीक्षेस बसले नाहीत. त्यांचे सामाजिक चळवळीवरील लेख व कविता १९२३ ते १९६४ या काळात अनेक नियतकालिकांतून प्रसिद्ध झाल्या. १९२९ साली त्यांचे 'अमृतनाक' हे खंडकाव्य प्रसिद्ध झाले. युनिव्हर्सिटी ऑफ वुस्कानसन (अमेरिका) येथील रॉबर्ट मिलर यांचा " Button Button .. Great Tradition Little Tradition Whose Tradition ? " या शिर्षकाखाली ॲन्थ्रापॉलॉजिकल क्वारर्टली व्हॉ. नं. ३० जानेवारी १९६६ ला लेख प्रसिद्ध झालेला आहे. त्यांत 'अमृतनाक' बद्दल गौरवपर उद्गार काढले आहेत.

बाबासाहेबांच्या ' शूद्र पूर्वी कोण होते ', ' हिंदु स्त्रियांची उन्नती व अवनती ' यांचे अनुवाद श्री. खैरमोडे यांनी केले ते प्रसिद्ध झाले. श्री. आबासाहेब खैरमोडे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सहवासात आल्यापासून त्यांचे चरित्र लिहिण्याच्या दृष्टीने प्रचंड सामुग्री जमा करून चरित्राचे अठरा खंड प्रसिद्ध करण्याचा संकल्प केलेला होता. १९५२ ते १९६८ पर्यंत ५ खंड प्रसिद्ध झाले. ६ वा खंड छापत असतानाच म्हणजे १८ नोव्हेंबर १९७१ ला त्यांचा मृत्यू झाला.

१९८३ पासून पुढील खंडांचे काम म. रा. साहित्य आणि संस्कृती मंडळाने हाती घेऊन ६, ७, ८, ९, १० व ११ हे खंड प्रसिद्ध झाले. हा १२ वा खंड आता प्रसिद्ध होत आहे.

पूर्वी प्रसिद्ध झालेल्या चरित्र खंडावरील काही अभिप्राय खंड १ (द्वितीय आवृत्ती) व खंड ५ यांत दिलेले आहेत. यावरून श्री. खैरमोडे यांच्या कर्तृत्वाची, अचूक व साधार लिहिण्याच्या प्रवृत्तीची साक्ष पटते.